Peer Reviewed Annual
National Research Journal in Marathi

ISSN 2454-7409
Vol. I Issue I Jan. 2016

वर्ष पहिले अंक पहिला जानेवारी २०१६

Impact Factor
2016 – 4.084
www.sjifactor.com

# मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका



अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषदेच्या कळंब येथील पहिल्या अधिवेशनाची दुर्मिळ छायाचित्रे

अध्यक्ष राम डोके, उद्घाटक कुलगुरु डॉ. के.जी. देशमुख, संस्थापक अध्यक्ष डॉ. भाऊ मांडवकर व इतर



मराठी भाषा, संस्कृती व अस्मिता जोपासणारे
मराठी विषयाचे प्राध्यापक, संशोधक आणि अभ्यासक यांच्या
संशोधनकार्याला चालना देणारे वार्षिक

डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र
आणि संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद
यांचा संयुक्त उपक्रम

Impact Factor 2016 – 4.084 ISSN 2454-7409

डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र आणि
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद
यांचा संयुक्त उपक्रम

# मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका

Peer Reviewed Annual National Research Journal
वर्ष पहिले, अंक पहिला, जानेवारी २०१६

**मुख्य संपादक**
डॉ. पवन मांडवकर
संस्थापक अध्यक्ष, डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र
अध्यक्ष, सं.गा.बा. अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद
प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब

**प्रकाशक व सहसंपादक**
प्रा.डॉ.सौ. वीरा मांडवकर
संचालक, डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५४०१

**मुद्रक**
सेवा प्रकाशन
विजय कॉलनी, रुक्मिणी नगर, अमरावती ४४४६०६

**मुखपृष्ठ**
डॉ. पवन मांडवकर

Communication
Dr. Bhau Mandavkar Research Centre
Indira Mahavidyalaya, kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra 445 401
e mail – **marathipradhyapak@gmail.com**
Alternate mail id – **imvkalamb@yahoo.co.in**
Tele. 07201-226170, 226147, 226129 Mob. 9422867658. 9403014885
**Website: www.indiramahavidyalaya.com**

जानेवारी, २०१६

# मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका


## निमंत्रित संपादक मंडळ

विक्रम राजे, 4, Alderman Willey Close, Wokingham – RG41 2AQ, Berkshire, United Kingdom
डॉ. अनिता गुप्ते पाटील, Auckland, New Zealand
रणजीत राजे, 201/83 Whiteman Street, Southbank, Melbourn, VIC-3006, Australia
विशाल डहाळकर, 20747, N Margaret Ave, Prairie View, IL 60069 USA

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद कार्यकारिणीचे सर्व सदस्य

अध्यक्ष – डॉ. पवन मांडवकर
उपाध्यक्ष – प्रा. अनुप नांदगावकर
सचिव – प्रा. रा.तु. आदे
कोषाध्यक्ष – डॉ. गजानन हेरोळे
सहसचिव – प्रा. अतुलकुमार सारडे
सदस्य – प्रा. अनिल काळबांडे
सदस्य – प्रा.डॉ. ममता इंगोले
महिला प्रतिनिधी – प्रा.डॉ. मीना जुनघरे, प्रा. डॉ. शुभांगी कोंडोलीकर
अमरावती जिल्हा प्रतिनिधी – प्रा.डॉ. रमाकांत इटेवाड, प्रा.डॉ. दिनेशचंद्र राऊत
अकोला जिल्हा प्रतिनिधी – प्रा. विनय पैकिने, प्रा. प्रकाश वानखडे
बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी – प्रा.डॉ. शोभा नाफडे, प्रा. आनंद धुंदाळे
यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी – प्रा. सिद्धार्थ भगत, प्रा.डॉ. युवराज मानकर
वाशिम जिल्हा प्रतिनिधी – प्रा.डॉ. विजय जाधव, प्रा.डॉ. शरद वाघोळे

## सल्लागार मंडळ

सोनाली डहाळकर, 20747, N Margaret Ave, Prairie View, IL 60069 USA
डॉ. शशिकांत सावंत, विक्रम विश्वविद्यालय, उज्जैन, मध्यप्रदेश
डॉ. अनिल गजभिये, माजी प्राचार्य, शासकीय महाविद्यालय, सरदारपूर, जि. धार, मध्यप्रदेश
डॉ. धनाजी गुरव, प्राचार्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, महाड, जि. रायगड
डॉ. लीला मोरे, सेवानिवृत्त प्राध्यापक, शासकीय कला वाणिज्य महाविद्यालय, इंदौर, मध्यप्रदेश
डॉ. सिंधू मांडवकर, सेवानिवृत्त प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ
डॉ. किसन पाटील, एम.जे. कॉलेज, जळगाव, खान्देश



या अंकाचे नियमित मूल्य – २०० रुपये
– सरळ खात्यात वर्गणी पाठविण्याकरिता बँकेची माहिती –
A/c Name - Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre
Bank - Bank Of Maharashtra — Branch - Azad Maidan Road, Yavatmal
A/c No. – 60175373000 — IFSC code - MAHB0000047



(या नियतकालिकात प्रकाशित झालेल्या लेखांचे किंवा शोधनिबंधांचे अधिकार त्या त्या लेखकांकडे असले तरी इतरत्र प्रकाशनार्थ संपादक मंडळाची परवानगी घेणे गरजेचे आहे. मात्र या लेखांमधून अथवा शोधनिबंधांतून प्रकाशित मतांशी संपादक मंडळ, सल्लागार मंडळ किंवा प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. मूळ संदर्भ तपासून घेण्याची विनंती वाचकांना करण्यात येत आहे. मुद्रणदोषासह कोणत्याही चुकांबद्दल दिलगिरी व्यक्त केली जाईल; मात्र कायदेशीर बाबी कळंब येथील न्यायालयांतर्गतच सोडविता येतील.)

# संपादकीय

'मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिके'चा पहिला अंक आपल्या हाती देताना अत्यंत आनंद होत आहे. डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्राच्या वतीने आणि संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषदेच्या सहकार्याने हे वार्षिक सुरू करण्याचा निर्णय संशोधन केंद्राने आणि मराठी प्राध्यापक परिषदेने बऱ्याच आधी घेतला होता; परंतु नोंदणी आणि आयएसएसएन मिळण्यासाठी काही कालावधी खर्ची पडला. आता खंड न पडू देता हे वार्षिक व्यत्ययाविना नियमित सुरू राहावे म्हणून या नियतकालिकाचे प्रकाशक डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र हेच राहील, संशोधन केंद्र संस्थापक अध्यक्ष डॉ. पवन मांडवकर हे मुख्य संपादक आणि मराठी प्राध्यापक परिषदेच्या कार्यकारिणीचे सर्व सदस्य या वार्षिकाचे निमंत्रित संपादक म्हणून नेहमीकरिता राहतील, असे सर्वानुमते ठरले.

उच्च शिक्षण क्षेत्रात कार्य करणाऱ्यांसाठी आज संशोधनाला अत्यंत महत्त्व आलेले आहे. कॅससाठी प्रत्येक पायरीवर आयएसएसएन नियतकालिकांत किंवा चर्चासत्र स्मरणिकांमध्ये प्रकाशित शोधनिबंध, आयएसबीएन पुस्तके यांची तपासणी होत असते. यूजीसी, नॅक यांचाही संशोधनावर भर आहे. 'मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका' हे मराठी प्राध्यापकांच्या शोधनिबंधांकरिता हक्काचे व्यासपीठ आहे. मराठी भाषा, भाषा विज्ञान, साहित्यशास्त्र, ललित व ललितेतर साहित्य, संस्कृती, लोककला आणि तदनुषंगिक सर्व प्रकारचे संशोधन व लेखन करू इच्छिणाऱ्या अभ्यासक, प्राध्यापक, शिक्षक, विद्यार्थी अशा सर्वांना या राष्ट्रीय स्तरावरील वार्षिकात आपले शोधनिबंध प्रकाशित करता येतील.

हा अंक प्रकाशित करण्यामागे अर्थातच स्व. डॉ. भाऊ मांडवकर आणि डॉ. सिंधू मांडवकर यांची प्रेरणा आहे. शिवाय अनेक मराठी विषयाचे अध्यापन करणाऱ्या बंधूभगिनींची इच्छा होती की संशोधनपर लेखनाकरिता मराठी प्राध्यापक परिषदेला एखादे हक्काचे नियतकालिक असावे. त्याचीच फलश्रुती म्हणजे हे वार्षिक होय.

या अंकात अभ्यासकांनी विविध विषयांवर जे संशोधनसार मांडले आहे, त्यात भारतीय संस्कृती, बौद्ध संस्कृती, म. फुले यांच्या सार्वजनिक सत्यधर्मातील धार्मिक सहिष्णुतेपासून वारकरी संप्रदायापर्यंतच्या विचारवैभवाचा मागोवा तर घेतलेला आहेच, शिवाय प्राचीन भारतीय स्त्रीजीवन, स्त्रीवादाचा मराठी साहित्यावरील प्रभाव, मराठीतील स्त्रियांच्या कथालेखनाचे स्वरूपही मांडले आहे. ग्रामीण साहित्य, लोकसाहित्य, आदिवासी साहित्य असे मराठीतील साहित्यप्रवाहही अभ्यासले आहेत. मराठीचा अभ्यासक्रम असो किंवा एखाद्या विशिष्ट साहित्यकृतींवरील समीक्षणात्मक संशोधन असो, अभ्यासकांनी विविध पैलूंना स्पर्श करून हा अंक सकस वैचारिकतेने सजवला आहे. शोधनिबंधकारांच्या लेखनात फारशी लुडबूड न करता संपादनात मराठी साहित्य महामंडळाने ठरवून दिलेल्या लेखनविषयक नियमांना अनुसरून किरकोळ दुरुस्त्या केलेल्या आहेत.

सल्लागार मंडळाच्या निमित्ताने 'मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिके'करिता जे मान्यवर, नामवंत अभ्यासक मार्गदर्शन करीत आहेत, त्यांचे आभार मानले पाहिजेत. राष्ट्रीय पातळीवरील या वार्षिकाच्या निर्मितीकरिता डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्राचे सर्व पदाधिकारी व कर्मचारी तसेच संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषदेच्या कार्यकारिणीतील सर्व पदाधिकाऱ्यांनी सहकार्य केले त्याबद्दल मन:पूर्वक आभार! पीअर रिव्ह्यू टीमची नावे जाहीर करणे योग्य नसल्याने त्या सर्वांचा नामोल्लेख टाळला आहे.

हा अंक आपल्या पसंतीस उतरावा, हीच अपेक्षा!

— डॉ. पवन मांडवकर
व संपादक मंडळ

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १ | संपादकीय | डॉ. पवन मांडवकर | ३ |
| २ | प्राचीन भारतीय स्त्री–जीवन : ठळक वैशिष्ट्ये | प्रा.डॉ. अपर्णा पाटील | ५ |
| ३ | स्त्रीवादाचा मराठी साहित्यावर प्रभाव | डॉ. स्वाती दामोदरे | ९ |
| ४ | 'साधना' साप्ताहिकाचे प्रबोधन कार्य | प्रा.डॉ. प्रमोद देवके | १४ |
| ५ | मिरासदारांच्या ग्रामीण विनोदी कथा : एक आकलन | डॉ. आर.एम. केदार | १७ |
| ६ | मराठवाड्यातील लेखिकांच्या साहित्यातील 'स्त्री'विषयक जाणिवा | अमोल शिवाजीराव खोसे | २० |
| ७ | वारकरी संप्रदायाचा भक्तियोग | प्रा.डॉ. राम रौनेकर | २२ |
| ८ | मराठीच्या अभ्यासक्रमाचे आदर्श स्वरूप | डॉ. प्रशांत शेळके | २५ |
| ९ | मराठीतील स्त्रियांच्या कथालेखनांचे स्वरूप | प्रा.सौ. लीना शेंडे | २८ |
| १० | राजन गवस यांची 'तणकट' कादंबरी आणि राजकारण | प्रा. दिपक बावस्कर | ३१ |
| ११ | महात्मा फुले यांच्या सार्वजनिक सत्यधर्मातील धार्मिक सहिष्णुता | प्रा.डॉ. संतोष विष्णू चतुर | ३४ |
| १२ | बौद्ध संस्कृती | प्रा. रवींद्र खंडेराव | ३८ |
| १३ | नक्षलवाद आणि आदिवासी साहित्यिकांची भूमिका | प्रा.मृदुला रायपुरे–जांगडेकर | ४१ |
| १४ | आंबेडकरी कविता अभिव्यक्ती आणि स्वरूप | प्रा. डॉ. रमेश खंडारे | ४४ |
| १५ | स्वातंत्र्योत्तर साठपूर्व वैदर्भीय कादंबरीतील रंजनवाद | डॉ. पवन मांडवकर | ४८ |
| १६ | ग्रामीण साहित्याचे मराठी वाङ्मयातील योगदान : एक साधक बाधक चर्चा | प्रा.डॉ. युवराज मानकर | ५२ |
| १७ | भारतीय संस्कृती आणि पौर्णिमांचे महत्त्व | डॉ. माधुरी भटकर | ५७ |
| १८ | भारतीय स्त्रीवादाचा देदीप्यमान तारा : ताराबाई शिंदे | प्रा. डॉ. विशाखा वंजारी | ५९ |
| १९ | ग्रामीण साहित्यातील निसर्ग जाणिवा | डॉ. कल्पना त्र्यं. मेहरे | ६३ |
| २० | तुकारामांचा ईश्वर व अंधश्रद्धाविषयक विचार | डॉ. नवनाथ दणाने | ६५ |
| २१ | स्त्री–मुक्ती चळवळीतील मैलाचा दगड मुलगी झाली हो.... (मुक्तनाट्य) | प्रा.डॉ. भूमिका वानखडे | ६९ |
| २२ | वैदर्भीय ग्रामीण स्त्री कथाकारांच्या कथेतील स्त्रीचित्रण | प्रा. नेमीचंद एफ. चव्हाण | ७२ |
| २३ | स्वातंत्र्योत्तर काळातील ग्रामीण साहित्याचे बदलते स्वरूप | प्रा.लिंगायत विशाल प्रकाश | ७७ |
| २४ | ग्रामीण साहित्याचे चार विशेष | प्रा. अतुलकुमार सारडे | ८१ |
| २५ | ग्रामीण साहित्याचे मराठी वाङ्मयात योगदान | डॉ. रमाकांत ईटेवाड | ८४ |
| २६ | १९८० नंतरच्या मराठी ग्रामीण कादंबरीचे स्वरूप | प्रा. डॉ. सविता पवार | ८७ |
| २७ | ग्रामीण साहित्यातील अनुभवविश्व | डॉ. सुवर्णा रा. गाडगे | ९१ |
| २८ | समाज परिवर्तन आणि ग्रामीण साहित्य | प्रा. रा.तु. आदे | ९५ |
| २९ | मराठीतील नवा साहित्य प्रवाह: आदिवासी साहित्य | अनिता अर्जुन कांबळे | ९९ |
| ३० | वैदर्भीय मराठी गझलेतील सामाजिक जाणीव | प्रा. संजय एस. पोहरे | १०२ |
| ३१ | लोकसाहित्य : व्याख्या, महत्त्व आणि प्रयोजन | प्रा.डॉ. वीरा मांडवकर | १०६ |
| ३२ | ग्रामीण साहित्य आणि शेतकऱ्यांचे जीवनवास्तव | प्रा. डॉ. गजानन हेरोळे | ११० |
| ३३ | वऱ्हाडी कादंबरीतील ग्रामीणवास्तव आणि शेती जीवन | डॉ. राजेश मिरगे | ११३ |
| ३४ | मराठी ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा आणि ग्रामीण कादंबरी | डॉ. माधव जाधव | ११६ |
| ३५ | संत एकनाथांची समयसूचकता | प्रा. डॉ. विठ्ठल जंबाले | १२२ |
| ३६ | ग्रामीण कादंबरीतील निसर्गदर्शन | डॉ. पंढरी डोईफोडे | १२५ |
| ३७ | रा.रं. बोराडे यांच्या कथेतील बदलते स्त्रीजीवन | प्रा. वाघमारे बी.एस. | १२८ |

# प्राचीन भारतीय स्त्री–जीवन : ठळक वैशिष्ट्ये

प्रा.डॉ. अपर्णा पाटील
सहा. प्राध्यापक,
बा.बु.कला, ना.भ.वाणिज्य व बा.पा.विज्ञान महाविद्यालय, दिग्रस, जि.यवतमाळ
भ्रमणध्वनी ९७३०७७५५८५

## सारांश

स्त्रीजीवनाचा अभ्यास करताना स्त्रीच्या वैयक्तिक व सार्वजनिक जीवनाचा विचार केला जातो. वैयक्तिक जीवनात तिने अन्न, वस्त्र, शरीर आभूषणे, मनोविनोदाने यांचा विचार केला जातो आणि सार्वजनिक जीवनात समाजाचा एक घटक या दृष्टीने तिची कर्तव्ये, अधिकार, हक्क व मर्यादा यांचा विचार केला जातो.

कुटुंब हा समाजाचा सर्वात लहान घटक असतो. स्त्री ही कुटुंबातील घटकांशी विविध नात्यांनी जोडलेली असते व त्यानुसार तिची कर्तव्ये व अधिकार ठरत असतात. कुटुंबासाठी अर्थोत्पादन व अर्थ विभाजन यासाठी विविध घटकांमध्ये श्रमविभागणी होत असते व त्यानुसार त्या त्या घटकांचे कुटुंबातील स्थान, मान व प्रतिष्ठा ठरविली जाते. या सर्वांचा विचार स्त्री जीवनाच्या अनुषंगाने केला जातो.

हिंदू समाजाच्या प्रदीर्घ इतिहासामध्ये असंख्य स्थित्यंतरे झाली आहेत. ही स्थित्यंतरे घडत असताना शास्त्रकारांच्या व अन्य समाजाचा स्त्री विषयक दृष्टिकोनही बदलत आला आहे. आर्यांच्या आगमनापूर्वी येथे मातृसत्ताक पद्धत होती. इ.स. सन १२०० पर्यंतच्या काळात स्त्रियांची स्थिती कशी होती, कोणती बंधने होती, तिचा ऱ्हास कसा होत गेला याची माहिती दिली आहे. ह्या सर्व कालखंडाचा आढावा घ्यावयाचा झाला तर साधारणत: इसवी सनाच्या प्रारंभापासून स्त्रियांची कमालीची दुरावस्था झालेली दिसते. वैदिक काळात तुलनात्मक दृष्ट्या स्त्रियांच्या स्थिती काही अंशी बरी होती असते दिसते.

मनुस्मृतीच्या काळापासून पुढे जो स्त्रीच्या सामाजिक स्थानाचा कमालीचा ऱ्हास व जी घृणास्पद अवनतर झालेली दिसते ती पूर्वी मात्र नव्हती असे म्हणता येईल.

## बीजशब्द

- एकत्र (अविभक्त) कुटुंब पद्धती – एका पेक्षा अधिकपिढया एकाच छत्राखाली कुटुंबात राहणे.
- पितृसत्ताक कुटुंब – कुटुंबातील कर्तेपण पुरुषांकडे असणारे कुटुंब यात पित्याचा अधिकार अंतिम असतो.
- मातृसत्ताक पद्धत – कुटुंबात स्त्रीला महत्त्वाचे स्थान, मान असतो.
- ताम्राश्म युग – ज्या कालखंडात मानव पाषाणाच्या जोडीला तांब्याचा वापर आपल्या हत्यारे अवजारांसाठी करीत होता, त्या कालखंडास ताम्राश्म युग असे म्हणतात. भारतात या युगाचे प्रथम दर्शन आपणास सिंधू सरस्वतीच्या खोऱ्यात निर्माण झालेल्या संस्कृतीमध्ये पाहावयास मिळते.
- वैयक्तिक जीवनस्तर – जसे आहार, विहार, पोशाख, अलंकार इ. गोष्टींचा समावेश असणारे.
- सामाजिक जीवनस्तर – यात राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक इ. गोष्टींचा समावेश होतो.

## प्रस्तावना

स्त्रीवर लादलेले निकृष्ट जीवन हे एकूण भारतीय समाजाच्या दुरावस्थेचे एक अत्यंत महत्त्वाचे कारण आहे, हे काही आता नव्याने सांगण्याची गरज नाही. आजही हे चित्र फारसे पालटलेले नाही. ही बाब खरी दु:खदायक आहे.

तसे पाहिले तर जगातील पुरुषप्रधान अशा समाजांनी व धर्मांनी स्त्रियांना निकृष्ट अवस्थेत ठेवले आहे. प्राचीन काळापासून स्त्रीला हीन लेखण्याची प्रवृत्ती पुरुषांच्या अणूरेणूमध्ये रुजलेली आहे. त्या प्रवृत्तीमागे कोणत्या धार्मिक अंधश्रद्धा आहेत हे जाणून घेतले तर त्या अंधश्रद्धा दूर सारून सध्याची परिस्थिती पालटण्यास मदत होईल असा विश्वास वाटतो.

तसे पाहिले तर हिंदू धर्मामध्ये मुळात स्त्रीला देवता मानले आहे; परंतु नंतरच्या काळात तिला दासीचे स्थान मिळाले. म्हणूनच सत्य काय ते नीट समजून घेतले पाहिजे, तसा नम्र प्रयत्न या लेखनात आहे.

## विवेचन

समाजजीवनात व्यक्तीचे दाने जीवनस्तर असतात (१) वैयक्तिक (२) सार्वजनिक, वैयक्तिक जीवनात आहार–विहार, पोशाख, अलंकार यांचा विचार होतो, तर सार्वजनिक जीवनात राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक या गोष्टी येतात. सामाजिक जीवनातही कौटुंबिक जीवनाचा भाग येतो. कुटुंबात स्त्री ही अनेक नात्यांनी वावरत असते. माता, पत्नी, भगिनी, कन्या, सासू, सून, जाऊ, सवत, नणंद अशी तिची अनेक रूपे असतात. ती सौभाग्यवती वा विधवा असेल, स्त्री जीवनामध्ये या प्रत्येक रूपाचा परामर्श घ्यावयास पाहिजे.

समाजाच्या चौकटीत बसविण्यासाठी प्राचीन शास्त्रकारांनी व धर्मशास्त्र्यांनी स्त्रीवर अनेक संस्कार, कर्तव्ये, अकर्तव्ये लादली होती. त्याबद्दल तिच्याही प्रतिक्रिया उमटत, या सर्वांच्या समुच्ययाने तिचे जीवन घडत असते. व्यक्तिजीवन घडविताना समाजाने काही जीवनमूल्ये निर्धारित केलेली असतात. त्यांच्या व्यक्ती समाजाचा उपयोगी घटक बनू शकतात. या सर्वांचा विचार आपणास स्त्री जीवनात करावा लागेल.

प्राचीन भारतीय संस्कृतीचा आढावा घेताना आपणास सिंधू संस्कृतीच्या काळापर्यंत म्हणजे ताम्राश्म युगापर्यंत मागे जावे लागेल. सिंधू–सरस्वती नद्यांच्या काठावर विकसित झालेल्या या संस्कृतीत स्त्री जीवन कसे होते याचा परामर्श आपणास घ्यावा लागेल. दुर्दैवाने या काळातील उपलब्ध साधने फार थोडी आहेत. त्यामुळे फारशी माहिती मिळत नाही. या संस्कृतीतील चित्रलिपीचे अद्यापही बरेचसे वाचन झालेले नाही, त्यामुळे स्त्री जीवनावर पडणारा प्रकाश बराचसा अनुमानजन्य म्हणावा लागेल.

ज्या संस्कृतीचे सातत्य आजपर्यंत टिकून आहे त्या भारतीय संस्कृतीचे आरंभस्थान आपणास वैदिक वाङ्मयामध्ये पाहावयास मिळते. या वैदिक वाङ्मयात ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद यांच्या विविध शाखांच्या संहिता वगैरेंचा समावेश होतो. यामधून स्त्री जीवनाचे चित्रण अधिक स्पष्ट होत जाते.

वाङ्मयात व प्राचीन साहित्यकृतीत मानवी जीवनाचे प्रतिबिंब पडलेले असते असे समजतात. वेदोत्तर प्रदीर्घ कालखंडात निर्माण झालेल्या संस्कृत व प्राकृत साहित्य भांडारातूनही स्त्री जीवनाचे चित्रण झालेले आपणास पहावयास मिळते. या सर्वांचा संकलित विचार आपण करणार आहोत. यासाठी पुराणवस्तू शास्त्र, तौलानिक भाषाशास्त्र, शिलालेख इ.चाही आपणास उपयोग होईल.

या दृष्टीने पाहिल्यास ख्रिस्तपूर्व चौथ्या शतकापासूनचे शिलालेख उपलब्ध होतात. त्यांच्या वाचनाने स्थलकालाची निश्चित माहिती मिळून खऱ्या अर्थाने ऐतिहासिक काळ सुरू होतो. अशोकाचे शिलालेख आपणास पाहावयास मिळतात. अशोकाने बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी आपल्या मुला–मुलीचापण उपयोग करून घेतला होता हे सर्वज्ञात आहे. म्हणून स्त्री जीवनाचा अभ्यास करत असताना शिलालेखातून स्त्री जीवन कसे होते हे समजण्यास उपयोगी पडते.

बौद्ध व जैन धर्मग्रंथात, वैदिक धर्मग्रंथात स्त्री जीवनाचा अनेक ठिकाणी उल्लेख आलेला आहे. विशेषतः बौद्ध व जैन भिक्षुणी संघ कसे होते, त्यांची रचना व कार्य यासंबंधी माहिती मिळते. धर्मप्रसारासाठी भिक्षुणी संघ महत्त्वाची कामगिरी करत होता. स्त्रिया धर्मग्रंथाचा अभ्यास करीत असत.

## ताम्राश्मयुगीन (संस्कृतीतील) स्त्री–जीवन

२० व्या शतकात झालेल्या उत्खननामुळे एका नव्या अज्ञात भारतीय कालखंडाचा शोध लागला. सुरुवातीला हे उत्खनन सिंधू नदीच्या खोऱ्यात मोहंजोदडो येथे झाले म्हणून यास ''मोहंजोदडो संस्कृती'' म्हटले गेले. पण पुढे याचे अवशेष विस्तृत प्रदेशात सापडले, त्यामुळे या काळास ''ताम्राश्म युग'' असे नाव दिले गेले.

या कालखंडातील विकसित संस्कृतीचे दर्शन मोहंजोदडो व हडप्पा येथे होते. या ठिकाणी एक नागरी संस्कृती ख्रिस्तपूर्व तिसऱ्या सहस्रकाच्या अखेरीस विकसित झालेली दिसते. येथील उपलब्ध अवशेषांवरून स्त्रियांच्या वैयक्तिक जीवनाची काहीशी माहिती मिळते.

स्त्रियांच्या पोशाखात घागरा व त्यावर दुपट्टा पांघरलेला दिसतो. दुपट्ट्यावर त्रिदलसारख्या आकृत्या रंगवीत. केशभूषेच्या विविध तऱ्हा आढळतात. केस सुव्यवस्थित राखण्यासाठी पिनांचा वापर करीत. आरसे (तांब्यांचे) व फण्यांचा वापर बराच होत असे. फण्या सामान्यतः सांबरशिंगे व हस्तिदंताच्या असत. दागिन्यांचेही

विविध प्रकार आढळलेले आहेत. कानातील बाळ्या, कर्णफुले, गळ्यातील विविध प्रकारचे हार, बाजूबंद, पैंजण, बांगड्या, अंगठ्या कमरपट्टे, इ. संपूर्ण भारतीय अलंकार उत्खननात सापडले आहेत.

अलंकारासाठी सोने, चांदी, शिसे, शंख, शिंपले, श्वेतशाडू, मूल्यवान खडे, रत्ने इ.चा वापर केला जाई. शंख, श्वेतशाडू, तांबे यांच्या बांगड्या, विशिष्ट काळ्या दगडांची कुंडले विशेष लोकप्रिय दिसतात.

चंद्रकांत, मर्गझा, नील, गोमेद, अकील, फिरोझ, वैदूर्य, स्फटीक, लसण्या, याशेफ इ. अनेक प्रकारच्या खड्यांचा व मण्यांचा दागिन्यांकरिता वापर केला जाई. वरईच्या दाण्यापासून बोरापर्यंतच्या सर्व आकाराचे गोल, लांबट, लंग वर्तुळाकार फुंगण्यासारखे अतिदीर्घ (cylindrical) असे नानाप्रकारचे चित्रविचित्र मणी मोठ्या प्रमाणावर आढळतात.

काही मणी आम्ललेखित (Etched) आहेत. स्त्रियांना नृत्याची आवड असावी असे दिसते. हडप्पा येथील शृंगारपेटीकेत दातकोरणी, कानकोरणी, लहान चिमटा, टाचण्या इ. वस्तू आढळल्या आहेत. यामुळे तत्कालीन स्त्री जीवनाच्या पैलूवर प्रकाश पडतो.

## ठळक वैशिष्ट्ये

प्राचीन भारतीय स्त्रीला सामाजिक जीवनात खूप मोकळेपणा व स्वातंत्र्य होते; परंतु ते आपवादानेच. पुरुषाच्या बरोबरीने ती जीवनाच्या विविध क्षेत्रांत सहभागी होऊ शकत नव्हती. मात्र तिला समाजात मान व प्रतिष्ठा होती. समाजाचे अर्थव्यवहार फारसे विकसित झालेले नसल्याने स्त्रीच्या आर्थिक स्वातंत्र्याचा प्रश्न फारसा महत्त्वाचा नव्हता. जसजसा समाजाचा आर्थिक विकास होत गेला तसतसा स्त्रीच्या वारसा हक्काबद्दल समाजाला विचार करावा लागला व परिस्थितीनुसार त्यात बदल करावे लागले. समाजधारणेचा स्रोत एकत्र कुटुंबपद्धती होती. कुटुंबात एकापेक्षा अधिक पिढ्या एकाच छत्राखाली राहत व कुटुंबातील सुखदु:खात सहभागी होत असत. प्रत्येक जण आपल्या कुवतीनुसार कुटुंबाचा भार वाहत असे. त्यामुळे कुटुंबात श्रमविभागणी अपरिहार्य होती. भारतीय कुटुंब हे पितृसत्ताक असल्याने कुटुंबाचे कर्तेपण हे पुरुषाकडे असणे अटळ होते. त्यादृष्टीने प्राचीन भारतीय समाज पुरुषप्रधान होता. त्याचे फायदे–तोटे स्त्रीच्या वाट्याला येणे अपरिहार्य होते.

आर्य भारतात येण्यापूर्वी येथील काही समाजात मातृसत्ताक पद्धत प्रचलित होती. सिंधूपासून नाईलपर्यंतचा हा प्रदेश एकेकाळी मातृसत्ताक समाजव्यवस्थेखाली होता. हा डॉ. मार्शलच्या संशोधनाचा निष्कर्ष आता जवळ जवळ सर्वमान्य झाला आहे, असे डॉ. स.रा.गाडगीळ म्हणतात.

मानवी संस्कृतीचा एक टप्पा असा होता की, जेव्हा अपत्य निर्मितीच्या प्रक्रियेमध्ये पुरुषाचे काही स्थान असते हे माणसाला कळले नव्हते. स्त्रीमध्ये अपत्य निर्मितीचे काही अलौकिक सामर्थ्य आहे असे त्याला वाटत होते. हे सामर्थ्य पृथ्वीच्या ठिकाणी त्याला दिसत होते. शिवाय शेतीचा शोध ही स्त्रीनेच लावला होता. त्यामुळे त्या काळात पृथ्वीप्रमाणे स्त्रीलाही महत्त्व प्राप्त झाले होते. पुढे निर्मिती प्रक्रियेत पुरुषाचे स्थान स्पष्ट झाल्यानंतर आणि नांगराची शेती सुरू झाल्यानंतर स्त्रीचे हे महात्म्य कमी झाले आणि पुरुषप्रधानतेचे आगमन झाले.

भारतापुरते बोलायचे झाले तर पुरुषप्रधान आर्यांचे भारतात आगमन झाल्यानंतर येथील मातृसत्ताक अनार्यांबरोबर त्यांचा संघर्ष व पुढे संकरही सुरू झाला. या संघर्षात अखेरीस आर्यांचा विजय झाला; परंतु पराभूत अनार्यांबरोबर त्यांना काही तडजोडीही कराव्या लागल्या. अनार्य पराभूत झाले तरी त्यांनी आपली मातृसत्ताक पद्धत सोडून दिली नाही. एकीकडे त्या पद्धतीचे शक्य तितके अंश जपण्याचा त्यांचा प्रयत्न होता, तर दुसरीकडे शक्य तितके दडपून टाकण्याचा आर्यांचा प्रयत्न होता. या प्रक्रियेमध्ये पुरुषप्रधानता अधिकाधिक स्थिरावत गेली. मातृसत्ताक पद्धतीचे काही अवशेष मात्र काही ठिकाणी शिल्लक राहिले आहेत.

या बाबतीतील आर्य अनार्यामधील सांस्कृतिक संघर्षाचे फार चांगले वर्णन डॉ.गाडगीळांनी केले आहे. पुरुषप्रधान वैदिक आर्य समाजाने अनेक क्रूर चालीरीतीच्या सहाय्याने या अनार्य जमातीच्या जीवनातील मातृसत्ताकाचे महत्त्व नष्ट करण्याचा प्रयत्न करून पाहिला. बालविवाह, बहुपत्नीत्व, विधवांना दिली जाणारी अमानुष वागणूक आणि सतीची चाल या सर्व गोष्टी या दृष्टीने उद्बोधक आहेत. स्त्रीच्या तुलनेने पुरुष हाच श्रेष्ठ आहे. ही पुरुषप्रधान समाजाची कल्पना येथील मातृसत्ताक प्रभावित समाजावर बिंबविण्यासाठी वैदिक आर्य परंपरेत वाढलेल्या विचारवंतांनी या चाली रूढ केल्या. स्त्री महात्म्याचे अवमूल्यन करण्याचा इतका कठोर आणि आग्रही प्रयत्न जगात अन्यत्र कोठेही झालेला आढळत नाही. आर्यपूर्व भारतात मातृसत्ताकाचा असलेला विलक्षण प्रभाव कृत्रिमरीत्या नाहीसा करण्यासाठी अशा कठोर मार्गाचीच आवश्यकता वैदिक आर्यांना भासली असावी. अजूनही काही आदिवासी जमातीत मातृसत्ताक पद्धत अपवादाने आढळते.

## निष्कर्ष

भारताचा प्रचंड असा भौगोलिक विस्तार पाहता एकाच कालखंडातील, परंतु वेगवेगळ्या प्रदेशांतील शास्त्रकारांनी स्त्रियांच्या बाबतीत वेगवेगळी भूमिका घेतल्याचे आढळते. उदाहरणार्थ: भारताच्या बहुतेक, भागातून मातृसत्ताक पद्धतीची पिछेहाट झाली, तरी केरळमध्ये अलीकडच्या काळापर्यंत तिचा प्रभाव होता. त्यामुळे इतर प्रदेशातून मुलींचे लग्नाचे वय कमी करण्याची स्पर्धा चालली असताना केरळमध्ये मात्र बालविवाहाची स्पर्धा रुजली नाही. केरळ प्रांतात मुलीला विवाहापूर्वी रजोदर्शन झाले तरी दोष लागत नाही. इतर प्रांतातून मात्र मुलीच्या बाबतीत असे घडले तर हे फार मोठे पाप मानले जाते. काश्मीर व बंगाल या प्रांतात इतर प्रांताच्या मानाने सती जाणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण अधिक होते असे आढळते. मामाच्या मुलीशी लग्न करण्याची दाक्षिणात्यांची प्रथा उत्तर भारतातील लोकांना मान्य नव्हती.

अशा रीतीने पुरुषप्रधान समाजव्यवस्था स्थिरावण्यापूर्वी मातृसत्ताक पद्धतीचा अवलंब करणारी समाजव्यवस्था भारतातही होती आणि स्वाभाविकपणे त्या व्यवस्थेमध्ये स्त्रियांना नंतरच्या काळापेक्षा अधिक स्वातंत्र्य होते मात्र इसवीसनाच्या प्रारंभापासून स्त्रियांची कमालीची दुरावस्था झाल्याचे दिसते.

## संदर्भग्रंथ

१) लोकायन — डॉ. स.रा.गाडगीळ
२) मराठी बखर — र.वि.हेरवाडकर
३) स्त्री पर्व — जयवंत दळवी
४) माझ्या जल्माची चित्तर कथा — सौ.शांताबाई कांबळे

❖❖❖

# स्त्रीवादाचा मराठी साहित्यावर प्रभाव
## (१९७० नंतरच्या कवयित्रींच्या रचनासंदर्भात)

डॉ. स्वाती दामोदरे
एम.ए., सेट, पीएच.डी.
सहा. अधिव्याख्याता, भाषा विभाग, श्रीमती ल.रा.तो. वाणिज्य महाविद्यालय, अकोला
Email: swati.damodare@rediffmail.com Mob.: 9421836797

### प्रस्तावना

जगाची अर्धी लोकसंख्या व्यापणाऱ्या 'स्त्री' या घटकाला, इतिहास आणि वर्तमानाच्या संदर्भात, स्वतःचे स्थान तपासून पाहण्याची संधी विद्यमान काळाने दिली आहे. जागतिकीकरणाची वाटचाल, ज्ञानसामग्रीचा प्रचंड प्रसार, आणि ज्ञान – माहितीचा विस्फोट यांमुळे हे स्वतःचे स्थान तिला निरपवादपणे आणि अनेक संदर्भात तपासून पाहता आले. त्या उजेडात जागतिक घडामोडी, साहित्य क्षेत्रातील प्राचीन अर्वाचीन प्रवाह, त्यांची वाटचाल, त्यातील तथ्ये – सत्ये यांचे आकलन स्त्रीला करता आले. त्यातून गवसलेल्या सत्याचा सारांश असा की, स्त्री ही कमजोर, दुबळी, कमी क्षमतांची कधीच नव्हती. तिला ती एक चौकट प्राप्त करून दिली गेली. या चौकटीत एवढ्या दडपणाखाली तिला ठेवले गेले की, 'ही चौकट हेच आपले नैसर्गिक आयुष्य आहे' असे ती समजत राहिली. या सत्याच्या आकलनाने जागृत झालेली स्त्री आपले अस्तित्वभान शोधू लागली. अधिकार हक्क मागू लागली. आतापर्यंत तिला दडपणाखाली ठेवणाऱ्या व्यवस्थेला विरोध करू लागली, नकार देऊ लागली. इथेच स्त्रीवादाचे चित्र स्पष्ट झाले. या चळवळीला, या विरोधालाही इतिहास आहे हे लक्षात आले आणि या सगळ्याच घटनांचे पडसाद साहित्यात उमटले. याच स्त्रीवादाचा मराठी साहित्यावर पडलेला प्रभाव विचारात घेण्यासाठीच हा छोटासा प्रयत्न आहे.

### उद्देश

स्त्रीवादाचा परिणाम एकूणच कथा, कादंबरी, नाट्य, काव्य या सगळ्या साहित्यप्रकारांवर झाला. त्यातही स्त्री कवितांच्या, त्याही १९७० नंतरच्या कवितांच्या संदर्भात या शोधनिबंधाची मांडणी करायची आहे. स्त्रीवादाच्या प्रभावाने बहरलेली भाषा, दृष्टिकोन, अभिव्यक्ती, नकार, बदलत्या प्रतिमा यांचा मागोवा घेणे हा उद्देश त्यात अनुस्यूत आहेच.

### महत्त्व

स्त्रीवादाच्या प्रभावाने मराठी साहित्यात परिवर्तने आली. स्त्रियांचाच नव्हे, तर काही अंशी पुरुषांचा दृष्टिकोनही बदलला. स्त्री ही एक कन्या, भगिनी, पत्नी माता वगैरे नंतर असते, आधी ती एक माणूस असते, एक स्वतंत्र व्यक्ती असते ही भावना स्पष्ट झाली. प्रत्येक घटना स्त्रीला केंद्रीभूत ठेवून विचारात घेतली तर, आहे त्या अर्थापेक्षा काही वेगळे कंगोरे मिळतात हे स्पष्ट झाले. खास असे स्त्रियांचे असणारे अनुभव व्यक्त होण्यालाही वाव मिळाला. म्हणून स्त्रीवादाचा प्रभाव हा महत्त्वाचा अभ्यास विषय ठरतो.

स्त्रीवादाच्या प्रभावाने मराठी स्त्री कविता बदलली, तशा इतर भाषांमधील स्त्री कविताही बदलल्या का ? जागतिक पातळीवरही हे परिवर्तन प्रतिबिंबित झालेच असेल. त्यांचा विचार, त्यांच्या अभिव्यक्तींच्या तुलनेत मराठी स्त्री कवितेचे स्थान काय? यांचा विचारही या विषयाच्या अनुषंगाने करता येईल.

बदलत्या जाणीवा, स्त्रीच्या अभिव्यक्तीच्या संदर्भात बदलते सामाजिक – सांस्कृतिक संदर्भ, भाषा, स्त्रीचे मनोव्यापारसुद्धा स्पष्ट करतात. म्हणून या बदलांचा अभ्यास अनेक शाखांशी जोडला जातो.

### विषयप्रवेश

स्त्रीवाद म्हणजे नेमके काय? याचा शोध घेताना 'वाटेला आलेले दुय्यमत्व नाकारून, माणूसपणाचा हक्क प्राप्त करण्यासाठी केलेली चळवळ म्हणजे स्त्रीवाद' अशी व्याख्या अभ्यासकांनी केलेली आढळते. हा वाद पुरुषविरोधी नाही तर पुरुषप्रधान व्यवस्थेच्या, पुरुषी वर्चस्व विचारधारेच्या विरोधात आहे.

'स्त्री ही पुरुषापेक्षा कमी किंवा वाईट नाही, ती फक्त भिन्न आहे आणि भिन्न असण्यात काही दोष, काही गैर नाही' या तथ्याच्या पार्श्वभूमीवर 'मग स्त्रीची प्रगती का खुंटली? ती पुरुषांच्या तुलनेत प्रगती–विकास–स्वातंत्र्य या पातळीवर मागे का राहिली?' हे प्रश्न उद्भवले. याला व्यवस्था कारणीभूत असल्याचे स्पष्ट झाले. म्हणून या व्यवस्थेला विरोध करण्याची, नकार देण्याची गरज उत्पन्न झाली. हीच स्त्रीवादाची गरज आहे.

स्त्रीवादी चळवळींनी प्रथमत पाश्चात्य देशात मूळ धरले. १७९२ मध्ये इंग्लंडमध्ये स्त्रियांनी मतदानाचा हक्क मिळण्यासाठी चळवळी केल्या. १८६९ ला अमेरिकेत स्त्री हक्कांसाठी चळवळी झाल्या. पोशाखाच्या जाचातून, परंपरांमधून सुटण्यासाठी, शिक्षणाच्या हक्कासाठी चळवळी झाल्या. जॉन स्टुअर्ट मिल यांनी 'The subjection of Women' या ग्रंथात स्त्री हक्कांची चर्चा केली. सिमॉन द बुवा हिचे 'Second Sex', बेटी फ्रिडन हिचे 'Feminine Mystique' यातून स्पष्ट स्त्रीवादी धारा उसळली. स्त्रीला स्वत:चा वेळ असावा, स्वत:साठी घराचा एक स्वतंत्र कोपरा असावा, समानतेची वागणूक असावी, स्वतचे अनुभव शब्दबद्ध करता यावे आणि महत्त्वाचे म्हणजे हा छंद / हौशीचा भाग नसून, खूळ नसून, तो स्त्रीच्या अस्तित्वाचा गाभा आहे, ही जाणीव आकाराला आली.

हा स्त्रीवाद मराठी कवितेत, १९७० नंतरच्या स्त्रियांच्या कवितेत, कसा जाणवला, उजळला हा अभ्यासार्थ मुद्दा आहे. १९७० च्या सुमारास आलेल्या स्त्री कवितांमध्ये –

१) पद्मा गोळे यांच्या कवितेत स्त्रीवादाच्या पाऊलखुणा दिसतात. प्रियकर, पती, सजवलेलं घर, गोजीरवाणी मुलं, अलंकार वस्त्रे यापेक्षा वेगळे काहीतरी स्त्रीला हवे असते याची जाणीव पद्मा गोळेंच्या 'श्रावणसरी' काव्यसंग्रहानी बऱ्याच अंशी दिली.

'तिच्या श्वासाशिवाय घरचे
पानसुद्धा हलत नाही।
तरी तिच्या अस्तित्वाची जाण
कुणाला होत नाही।।'

हे शल्य पद्माबाईंच्या कवितेतून जाणवते. पण नुसती खंत व्यक्त करून त्या थांबत नाहीत, तर त्यांना स्वत:च्या असण्याचा शोध घ्यावासा वाटतो. घरादारातील काबाडकष्ट यात आयुष्याची इतिकर्तव्यता वाटत नाही. 'मी घरात आले' या कवितेतील त्यांची स्त्री माप ओलांडून घरात आल्यावर भुईसाठी केरसुणी होते, रांगोळी होते, चुलीसाठी लाकूड होते, घर उजळते, छिद्रे लपविते. ती स्वतला हरवून बसली आहे असे वाटते. अखेरीस मात्र तिच्या जाणीवा स्पष्ट होतात आणि आता ही सगळी सोंगे उतरवू दे असे सांगत ती म्हणते –

'माझी मला शोधू दे
भव्य काही पूजू दे
ज्याने श्वास दिला त्याचा
ध्यास घेत जाऊ दे ।।'

स्वतंत्र भूमिकेतून स्वत:चे स्त्रीत्व विचारात घ्यावेसे त्यांना वाटते. कुणाच्या तरी संसारातील पाषाणवत वस्तू होणे त्यांना मान्य नाही. पण समाजाने दिलेले स्थान तर तेच आहे या जाणीवेने त्यांना वेदना होतात. 'मी माणूस आहे, मला भावना आहेत' या अंतर्यामीच्या आक्रोशावर चढलेले परंपरांचे प्लॅस्टर त्यांना फोडून टाकावेसे वाटते. ही तळमळ व्यक्त करताना त्यांची कविता म्हणते –

'कसं झुगारु वस्तूपण –
कळवळते तळमळते
कातडीलाच चिकटलेलं
फाडून टाकायला धडपडते'

वस्तूपण ही स्त्रीची जन्मजात कातडी नाही तर तिला चिकटवलेली जाणीव आहे. ओरबडूनसुद्धा ती निघत नाही हा स्त्रीवादी स्वर स्पष्टपणे इथे जाणवतो. आयुष्यभर आणि अपरिहार्यपणे बिलगून असलेल्या वस्तूपणासाठी त्यांनी कातडीला चिकटल्याची प्रतिमा वापरली आहे.

२) अनुराधा पोतदार या कवयित्रीने घराबाहेर पडणारी, नवे करू पाहणारी स्त्री कवितेत उभी केली. पण त्यांची स्त्री पुरुषाचे पाठबळ घेऊन बाहेर पडते, विद्रोह करून नाही. पुरुषाशिवाय अस्तित्वाची कल्पना त्यांनी फारशी केली नाही. त्यामुळे स्त्रीवादाचा प्रखर सूर त्यांची कविता लावत नाही.

३) मल्लिका अमरशेख यांची कविता हा प्रखर स्त्रीवादी सूर लावते. १९७९ च्या सुमारास आलेला त्यांचा 'वाळूचा प्रियकर' हा काव्यसंग्रह धगधगता स्त्रीवाद घेऊन येतो. स्त्री शरीराच्या जाणीवा निसंकोचपणे मांडत जातो.

'शरीरसूक्तात' स्त्रीला युगानुयुगे राहिलेला वेदनांचा गर्भ हा शरीरामुळे तिच्या वाटेला आलेला भोग आहे, अशी मांडणी त्या करतात. प्रखर मूल्यांच्या आणि परिवर्तनाच्या गोष्टी करणाऱ्या, पण आतून परंपरागत पुरुष असणाऱ्या, अधिकार स्वतःकडे ठेवणाऱ्या पुरुषांना त्या 'संभावित सूर्यासारखे' संबोधतात.

'विचार— लोण्यासारखे बंद, बरणीत....
सारे पंचतंत्र तोंडपाठ....
घरापुढे उच्च विचारांची रांगोळी....
आणि....
शोकेसमध्ये चमकदार मूल्ये.'

ठेवणाऱ्या पुरुषांविरुद्ध त्यांची कविता त्वेषाने पेटून उठते.

'आमच्या आयुष्याच्या नाक्यानाक्यावर
वासूगिरी करणारे तुमचे लंपट शब्द...
इथल्या प्रत्येक आईचा पदर
असंख्य जळवांनी भरलेला...'

या ओळीतून, स्त्रीला स्वातंत्र्य देऊ पाहणारा दांभिक पुरुष त्या ताकदीने उभा करतात. त्याचे खरे आकर्षण शारीरिकच! मग त्याने प्रियकराचा कितीही आव आणला तरी! शेवटी त्याचे आकर्षण संपून तो परंपरागत भूमिकेत शिरतोच, ही भावना त्या 'वाळूचा प्रियकर' या शीर्षकातूनच व्यक्त करतात. आवेगाच्या लाटा ओसरल्या की हा वाळूचा डोलारा कोसळायचाच. याच अनुभवातून जाणारी त्यांची स्त्री म्हणते..

'माझ्या तारुण्याचं रेशमी वस्त्र
चोचीत घेऊन
माझा प्रियकर केव्हाच उडून गेला.'

मात्र स्त्रीवादाने खंबीर झालेली मल्लिकांमधली प्रेयसी इथे ढेपाळत नाही. स्त्रीवादाच्या प्रभावाने बदललेल्या भाषेचा, संकल्पनेचा परिचय देत ती म्हणते...

'नैराश्य हा पहिला मृत्यू असतो
अन् तो मला नकोय...'

४) १९९० च्या सुमारास आसावरी काकडे यांच्या कवितांमधून स्त्रीवाद आविष्कृत होताना दिसतो. स्त्रीला व्यक्ती म्हणून ओळख हवी असते आणि ती न मिळाल्यामुळे तिची तडफड होत असते. मात्र निराशा न येऊ देता किंवा पुरुषाच्या आधाराची अपेक्षा न करता त्यांची कविता स्त्रीवादी वाटचाल करते. त्या कवितेचा सूर असा असतो —

'तुझ्या दिव्याचा लख्ख उजेड नसतानाही—
वाट स्वच्छ दिसते आहे.'

५) अंजली पेंडसे यांची स्त्रीवादी कविता १९९१ च्या सुमारास अवतरली. तिची थेट भाषा आणि स्त्रीत्वाची स्पष्ट संकल्पना शब्दातून सरळ उतरते.

'मी माझ्यासारखे जगावे
याची मला आस आहे.
मी मला शोधीत जावे
याची मला प्यास आहे.'

असा, अनवट वाटा चालण्याचा सूर, ही कविता लावते. पूर्वीच्या कवितांमधली प्रियकराची, मातृत्वाची, घरकुलाची 'आस' आता 'मी माझ्यासारखे जगावे' या अक्षावर स्थिरावली आहे आणि हेच स्त्रीवादाने मराठी कवितेत आणलेले भाषिक—सामाजिक स्थित्यंतर आहे. यापलीकडे जाऊन असे म्हणता येईल की स्वतःच्या परिपूर्णतेवर पूर्ण विश्वास असल्यामुळे आता तिला कोणाचे भय नाही आणि कोणाच्या आधाराची अपेक्षाही नाही. म्हणून तर पेंडसेंची कविता उच्चार करते की —

'निर्भयतेची वाट आहे
स्वातंत्र्याची कास आहे
इतरांपेक्षा ध्येयसिद्धीत
माझाच मला त्रास आहे.'

स्वतःमधली परंपरावादी स्त्री आपल्यात कुठे डोकावू नये, तिने स्वतमधल्या उभरत्या स्वत्वाला मागे खेचू नये, या भावनेतून कवयित्री, 'माझाच मला त्रास आहे' असे म्हणत असावी.

६) अश्विनी धोंगडे यांच्या स्त्रीवादी कवितांमधून, आधुनिक स्त्री, स्वत:ला सिद्ध करण्याची तिची धडपड, संघर्ष आणि घरातल्या व बाहेरच्या अपेक्षा पूर्ण करताना थकल्यामुळे स्वत:ला हरवून बसण्याची भीती या सगळ्या भावना संमिश्रपणे व्यक्त होतात. सभोवताल असलेल्या गदारोळातून सहीसलामत बाहेर पडताना ती सोपा मार्ग म्हणून, गरज म्हणून तर कधी अपरिहार्यता म्हणून आपल्या स्त्रीत्वाचा फायदा येईल काय? सवलती घेईल काय? अशी भीती कवयित्रीला वाटते. अंतर्बाह्य चाललेल्या या संघर्षामुळे आपला विकास थांबतो, आपली प्रगल्भता तोकडी पडते या जाणीवेने त्यांची स्त्रीसूक्तातील कविता म्हणजे –

'वयाची उंची कापता कापता
आयुष्याचे बॉन्साय झाले.'

रजनी परुळेकर, प्रज्ञा लोखंडे, अनुपमा उजगरे, हिरा बनसोडे, ज्योती लांजेवार, प्रभा गणोरकर इत्यादी काही महत्त्वाच्या स्त्रीवादी कवयित्रींनी स्त्रीवादाला पोषक कविता लिहिल्या. त्यांची प्रखर स्त्रीवादी जाणीवेची वाटचाल त्यांच्या लिखाणात स्पष्टपणे प्रतिबिंबित झाली.

'मलाही लिहू द्या आता
रोमांचक, दुखरा अन् सतेज
दृष्टान्त....
बाईच्या नावानं.'

असे सांगत प्रज्ञा दया पवार यांनी स्त्रीवादी कवितेच्या प्रवाहात स्वत:चे वेगळे स्थान निर्माण केले आहे.

पुस्तकांमधले गोड गुलाबी जग वास्तवात नाही. संकटात सापडलेल्या हिमगौरीसाठी कुठलेच सातबुटके धाव घेत नाहीत. रानावनात वाट चुकली तर कुठलाच राजपुत्र शोधत येत नाही. उलट येतो तो फासेपारधीच, शिकारीच! ही, वास्तवाचे भान आणून देणारी, स्त्रीला सावध करणारी जाणीव, प्रभा गणोरकरांच्या कवितेतून स्पष्ट होते.

१९९० नंतर आजतागायत एकनिष्ठेने, निरंतर स्त्रीवादाची वाट चालणारी सकस, समृद्ध कविता कवयित्री नीरजा यांची आहे. त्यांच्या 'निरन्वय' या काव्यसंग्रहातून, अनुभवांच्या चटक्यातून जागे होणारे स्त्रीत्व आणि स्त्रीला येणारे स्वत्वाचे भान, स्पष्टपणे अधोरेखित होते. 'हे सगळं असंच असतं.' या कवितेत एखाद्या दु:शासनानं द्रौपदीच्या वस्त्रांना हात घातला तर, आपल्याही हाती एखादे वस्त्र येईल ओढायला, या आशेने बाजूला उभे राहणाऱ्या पुरुषाचे वर्णन आहे. हे पुरुषी मानसिकतेचे चित्रण आहे. त्यांच्या वृत्तीवर कवितेतून प्रहार केला आहे. स्त्रीचे शोषण पूर्वापार चालले आहे आणि त्याला संस्कृती संस्कारांचा बुरखा पांघरून त्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले जात आहे ही खंत त्यांच्या लेखनात अशी व्यक्त झाली आहे. –

'अधर्मालाच दिली सारी दाने –
तेव्हापासून आजपर्यंत...'

स्त्रीकडे आशाळभूत दृष्टी लावून बसलेला, संधीची वाट पाहणारा पुरुष आणि स्वत:त मग्न असलेली विकासाचे स्वप्न पाहणारी स्त्री यांच्यासाठी अनुक्रमे 'डबक्यातला किडा' आणि 'उंच झाडाच्या टोकावरचं लालचुटूक फळ' अशा प्रतिमा त्या योजतात. पुरुषाच्या आधाराशिवाय स्त्रीला अस्तित्व नाही आणि त्याची साथ सुटली तर ती कोसळून – उन्मळून पडते हा समज त्या मुळातूनच खोडून काढतात. 'आधार' या कवितेत नीरजा म्हणतात –

'तसा नाही होऊ शकत
पुरुष, आधार बाईचा
बाईमध्ये असतं एक निरंतर आकाश
दु:खाला सामावून घेण्यासाठी
ती सहज पेलू शकते
कुंकवाशिवाय....
कुंकवाखालचं कपाळ
तुटूंब भरलेलं
सटवाईच्या लेखांनी!'

'पती हा स्त्रीच्या जगण्याचा एक भाग आहे, एकमेव भाग नव्हे.' हे नीरजा स्पष्ट करतात. पुरुषाशिवाय ही ती जगण्याला तोंड देऊ शकते, सगळ्या संकटांना पेलू शकते हे सांगताना नीरजाची कविता पुढे जाऊन तर हे ही सांगते की 'कशाला हवा असतो मग स्त्रीला पुरुष?' तर 'तीच होत असते पुरुषाचा खरा आधार', म्हणून!

## समारोप

पुरुषप्रधान व्यवस्था आणि संकेतांना केलेला विरोध आणि दिलेला नकार इथे स्पष्टतेने जाणवतो. १९७० नंतरच्या स्त्री रचनांचा मागोवा घेताना ही काही प्रतिनिधिक उदाहरणे आपण विचारार्थ घेतली. याशिवायही अनेक कवयित्री आणि अनेक रचना आहेत. मनीषा साधूंसारखी नव्या काळाची कवयित्री आहे. या सगळ्यांच्या लेखनातून प्रियकर, प्रेयसी, चंद्र पौर्णिमा, लताकुंज, मातृत्व यांसारखे विषय किंवा वस्त्रे, अलंकार, सौंदर्य या कल्पना आता बाजूला पडल्या आहेत. कवितेतील स्त्री आता शिक्षणाबद्दल, कर्तृत्वाबद्दल, संधीबद्दल बोलू पाहते. तिच्या स्वतंत्र असण्याचा निर्वाळा देते. प्राणसखा, पतीदेव आता तिचा जोडीदार आहे. लतेला आधार देणारा वृक्ष ही संकल्पना बदलून 'स्त्री' या एकाच खांबाने घरादाराचा डोलारा तोलला, पेलला असतो हे वास्तव कवितेत येत आहे. शोषण करणाऱ्या पुरुषांसाठी डबक्यातल्या किड्यापासून नाग, गिधाडे वगैरे प्रतिमा येत आहेत. भूमी, क्षेत्र, बीज ही भाषा बदलून 'एक्सला वायचा आधार हवा असतो' हे वैज्ञानिक सत्य शब्दात प्रकटते आहे.

एकूणच भाषा संकल्पना, प्रतिमा या पातळीवर कविता बदलते आहे आणि हा स्त्रीवादाचा कवितेवरील प्रभाव आहे. अर्थातच स्त्रीवादाचा प्रभाव पुरुष साहित्यिकांवरही पडला आहे व पु. काळेंपासून, अनिल अवचट, विठ्ठल वाघ, नारायण कुलकर्णी कवठेकर, भालचंद्र नेमाडे यांनी स्त्रीचे विश्व जाणून घेऊन, स्त्रीला केंद्रस्थानी ठेवून लेखन केले आहे. कविवर्य नारायण सुर्वेंची 'तेव्हा एक कर' ही कविता तर या बाबतीत आदर्श किंवा मैलाचा दगड म्हणता येईल अशी आहे. तरीही मराठी स्त्री कविता या इतर भारतीय भाषांतील कवितांपेक्षा, पाश्चात्य, कवितांपेक्षा अजूनही मवाळ म्हटली जात आहेत. स्त्री वादी लेखन करणारी मराठी कवियित्री अधून मधून हे सातत्य सोडून इतरत्र वळताना दिसते. ग्रामीण आणि दलित स्त्रियांची अभिव्यक्ति बरेचदा जहाल असली तरी  ती अजून जातीभेदाचे, श्रेणींचे स्तर तोडण्यात अडकली आहे असे दिसते. कुमुद पावडे, मल्लिकाप्रमाणे तेजस्वी लेखनाची वाटचाल अर्थातच सुरू आहे. कल्पना दुधाळ आणि प्रतिमा इंगोलेंसारख्या जाणत्या लेखिकांकडून ग्रामीण अभिव्यक्तीत भर पडते आहे. स्त्रीवादाचा झेंडा घेऊन निघालेली स्त्री—कवितांमधील अभिव्यक्ती आता कुठली वळणे घेतेय, याकडे समाजाचे लक्ष लागले आहे.

## निष्कर्ष

१. स्त्रीवादाने सर्वच साहित्यावर एक वेगळा प्रभाव पडला आहे, आमूलाग्र परिवर्तने आणली आहेत.

२. १९७० नंतरच्या स्त्री कवितांतून स्त्रीवादाचा प्रभाव स्पष्ट जाणवतो आणि व्यक्त होतो आहे.

३. भाषा, संकल्पना, प्रतिमांचा वापर आणि अ व्यक्ती या पातळीवर स्त्री कविता स्त्रीवादाच्या प्रभावाने बदलते आहे.

४. पारंपारिक, पुरुषप्रधान विचारसरणीला छेत देत, स्वतंत्र अस्तित्वाचे भान, राग, चीड, खंत, विरोध, नकार या जाणीवांनी स्त्री कविता समृध्द होत आहे.

५. स्त्रीवादाचा प्रभाव असलेली ७० नंतरची स्त्रीची कविता, बदलते सामाजिक सांस्कृतिक संदर्भ, बदलते मनोव्यापार, खास स्त्रीचे अनुभव यांचा आरसा ठरू पाहते आहे.

६. नवीन प्रतिमा, प्रतीके वापरून, वर्तमानकाळातील, सर्वच स्तरातील स्त्रियांच्या प्रश्नांना कवितारूपाने जिवंत करण्याचे व जागृतीचे कठोर आव्हान मराठी स्त्रीवादी कवितेसमोर आहे. सर्व स्तरांच्या स्त्रियांमध्ये मिसळून, संशोधक दृष्टिकोन ठेवून, अध्ययनपूर्वक लिखाणाची जबाबदारी स्त्रीवादी कवितांवर आहे.

## संदर्भ

१. जाधव रा. ग. — 'आधुनिक मराठी कवयित्रींची कविता', प्रतिमा प्रकाशन, पुणे

२. धोंगडे अश्विनी — 'स्त्रीवादी समीक्षा, स्वरुप आणि उपयोजन', दिलीपराज प्रकाशन, पुणे

३. नाईक शोभा — 'भारतीय संदर्भातून स्त्रीवाद, स्त्रीवादी समीक्षा आणि उपयोजन', लोकवाङ्मयगृह, मुंबई

४. पाटील शोभा — 'स्त्रीवादी विचार आणि समीक्षेचा मागोवा' स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे

५. महाजन वंदना — 'स्त्रीवाद आणि मराठी साहित्य', विजय प्रकाशन, नागपूर

६. लिंबाळे शरणकुमार — 'साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह' दिलीपराज प्रकाशन, पुणे

७. वि.सा.संघाचा 'युगवाणी' त्रैमासिकाचा जाने २०१४ चा स्त्रीवादी साहित्य विशेषांक.

❖❖❖

# ‘साधना’ साप्ताहिकाचे प्रबोधन कार्य

प्रा.डॉ. प्रमोद दामोदर देवके
यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालय
मंगरूळपीर, जि. वाशिम

महाराष्ट्राच्या सामाजिक–सांस्कृतिक जडणघडणीत मराठी वृत्तपत्रे व वाङ्मयीन नियतकालिकांचा, लघुनियतकालिकांचा फार महत्त्वाचा वाटा आहे. मानवी समाजात प्रबोधनाचे, स्फुलिंग चेतवण्याचे काम ज्या विविध साहित्यप्रवाहांनी केले, त्या साहित्य प्रवाहाच्या निर्मितीत मराठी वृत्तपत्रे व वाङ्मयीन नियतकालिकांचे मोठे योगदान आहे.

मराठी वाङ्मयाच्या जडणघडणीत आणि प्रबोधनाच्या चळवळीत नियतकालिकांची कामगिरी महत्त्वपूर्ण आहे. समाजसुधारकांनी आणि विचारवंतांनी सामाजिक सुधारणेच्या चळवळीला नियतकालिकांच्या माध्यमातून विचार मांडण्याचा प्रारंभ केला.

एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रात सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात वेगाने अभिसरण सुरू झाले. याच काळात मुद्रणयुग सुरू झाले आणि प्रबोधनाची चळवळ अधिक गतिमान झाली. दैनिके, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके आदि नियतकालिकांनी ज्ञान, प्रबोधन, रंजन ही वैशिष्ट्ये स्वीकारून महाराष्ट्राच्या समाज जीवनाशी संवादी राहण्याचे कार्य केले. ते आजतागायत सुरू आहे. महाराष्ट्राच्या वाङ्मयीन संस्कृतीच्या जडणघडणीत आणि विविध साहित्य प्रवाहाच्या निर्मितीत वाङ्मयीन नियतकालिकांचा, लघुनियतकालिकांचा महत्त्वाचा वाटा आहे. लेखकाच्या आविष्काराचे माध्यम म्हणून प्रत्येक कालखंडात वाङ्मयीन नियतकालिके लेखकाच्या पाठीशी उभे राहिलेले आहे. साहित्यकृती ग्रंथरूप होण्याअगोदर, निर्माण आणि नंतरही तिची आशयवैशिष्ट्ये रसिकांपर्यंत पोहचविण्याचे महत्कार्य वाङ्मयीन नियतकालिकांनी केले आहे. वाङ्मयीन संकल्पना रूजविण्यात आणि वाचकांची अभिरूची घडविण्यात वाङ्मयीन नियतकालिकांचा महत्त्वाचा वाटा आहे.

आजच्या युगाला ‘माहिती युग’ म्हटले जाते. वृत्तपत्रे व नियतकालिकांचे वाचन करणे हा केवळ रंजन व्यवहार नसून तर हे ज्ञान व माहिती मिळविण्याचे मुख्य साधन होय. एकाच वेळी वृत्तपत्राने व नियतकालिकाने लोकांपर्यंत संपर्क साधणे, संज्ञापन करणे, विचारविनियम करणे, संबंध प्रस्थापित करणे अशा अर्थाने जनसंवादाचे हे एक प्रमुख माध्यम मानले जाते. समाजाचे सामाजिक प्रबोधन व उद्बोधन करण्याचे काम वृत्तपत्रे व नियतकालिकांनी केले.

साने गुरूजींच्या मनात स्वप्नातील एक बलशाली भारत होता आणि तो सत्यात उतरविण्यासाठी तशीच एक स्वप्नातील ‘साधना’ होती. १५ ऑगस्ट १९४८ साली मुंबईत साने गुरूजींनी ‘साधना’ साप्ताहिक सुरू केले. गेल्या साठ वर्षांत साधनाचे संगोपन–संवर्धन एका मोठ्या ध्येयवादी मांदियाळीने केले आहे. त्यात मार्गदर्शक विश्वस्त, थोर संपादक व अतिथी संपादक, लेखक–लेखिका, कलावंत, विचारवंत, सामाजिक–राजकीय नेते व कार्यकर्ते, असंख्य वाचक, हितचिंतक आणि निष्ठावंत कार्यालयीन सहकारी तथा जाहिरातदार यांचा समावेश आहे.

‘साधना’ एक ध्येयवादी, सफल व वर्धिष्णू पत्रकारिता आहे. मराठी ध्येयवादी पत्रकारितेत अशी ध्येयवादी, सफल व वर्धिष्णू वाटचाल अपवादात्मकच आहे. भारतीय पत्रकारितेतही अशी उदाहरणे कमीच आढळतील. मराठीतील अनेक साप्ताहिके ध्येयवादाच्या आणि विशिष्ट जीवनदृष्टीच्या आग्रहाने प्रामाणिकपणे उभी होती. गेल्या दोन–तीन दशकांत ती अस्तंगत झाली आहेत. मात्र ‘साधना’ साप्ताहिक गेल्या साठ वर्षांपासून अखंड सुरू आहे.

‘साधना’ कशाकरिता आहे, याबद्दल गुरुजींची दृष्टी अगदी स्वच्छ होती. पहिल्या अंकातच या संदर्भात लिहिताना ते म्हणतात, ‘वैरभाव नि विषमता नष्ट करण्याची थोर ‘साधना’ आपणास करावयाची आहे. हे ‘साधना’ साप्ताहिक या ध्येयाने जन्मत: आहे.... या साप्ताहिकाचे स्वरूप कसे असेल? निरनिराळ्या भाषांतील मौल्यवान प्रकार तुम्हाला दिसतील. शेतकरी–कामगार यांच्या जगातही आपण येथे वावरू. त्यांचे प्रश्न चर्चू. त्यांची स्थिती समीक्षू. मुलांच्या संगतीत रमू. समाजात अनेक अज्ञात माणसे सेवा करून समाजवृक्षाला ओलावा देत असतात. त्यांच्या हकिगती ऐकू येत जातील. कधी येथे प्रश्नोत्तररूप महत्त्वाच्या प्रश्नांवर चर्चा आढळेल... कधी आपण साहित्याच्या मंदिरात दर्शनाला जाऊ, कधी विज्ञानाच्या पराक्रमी कथा ऐकू.... कधी निर्मळ समाजवादाचे उपनिषद

वाचू.'[१] याचा अर्थ असा की, 'साधना' ला ध्येयवाद होता, राजकीय तत्वज्ञान होते. जीवनाच्या सर्व अंगाचे 'साधना' ला अगत्य होते आणि आजही आहे.

'साधना' साप्ताहिकाचे स्वरूप व्यक्त करताना २० जून १९९८ ला नाशिक येथील वाचक मेळाव्यात अध्यक्षीय भाषण करताना श्री रामभाऊ गायटे म्हणाले, 'ज्यांचा कोणी नाही, त्याची साधना आहे.' हे साधनेचे अलिखित घोषवाक्य असल्याचे सांगितले. याचा अर्थ असा की, 'साधना' प्रत्येकाच्या पाठीशी निस्वार्थपणे उभी आहे.

'सामान्यातील सामान्य माणसांचे दु:ख आणि दैन्य नाहीसे व्हावे म्हणून त्यांनी 'साधना' सुरू केली होती आणि या साधनासाठी आपले सर्वस्व समर्पण केले होते.'[२] 'साधना' सारखी साप्ताहिके विशिष्ट प्रयोजन घेऊन जन्माला येतात आणि निष्ठापूर्वक तशी जगतात.

'समताधिष्ठित मूल्यांचा प्रसार करण्यासाठी त्यांनी 'साधना' साप्ताहिक व तसेच 'आंतरभारती' ही संस्था सुरू केली.'[३]

३० ऑगस्ट १९९८ ला सुवर्ण महोत्सव सोहळा मुंबई येथे पार पडला. त्यावेळेस श्री नरेंद्र दाभोलकर म्हणाले, 'शांततेसाठी साधना व विवेक जागर या दोन विचार मोहिमा चालविण्यात येणार आहेत.' 'साधना'चे नित्यकर्म काय आहे आणि जीवन प्रयोजन कोणते, हे साने गुरुजींनीच आपल्या पहिल्या संपादकीयात लिहून ठेवले आहे. 'वैरभाव व विषमता नष्ट करण्याची थोर 'साधना' आपणास करावयाची आहे.' असे ते म्हणतात हीच बाब 'साधना' चे एक संपादक कविवर्य वसंत बापट यांनी रचनाबद्ध केली आहे. 'साधना'च्या शिरोभागी नियमितपणे प्रसिद्ध होणारा तो भावसंदेश असा,

'स्थापण्या, समता शांती ठेवुनी शुध्द साधना !
करिती साधना त्यांना ठेवो उत्स्फूर्त साधना.'[४]

'साधना'चा त्रेसष्ट वर्षांचा इतिहास पाहिला तर या ब्रीदाला ती पुरेपूर उतरली, असे म्हणता येते. 'विषमतेविरुद्ध संघर्ष हे साधनेचे प्रमुख सूत्र आहे. भूमिपुत्रांचे लढे, असंघटित कष्टकऱ्यांचे आवाज, धर्मांधतेविरुद्ध पुकारा, आदिवासी, दलित, भटके विमुक्त यांची अन्यायाविरुद्ध लढाई आणि या स्वरूपाचे बरेच काही आज ठायी–ठायी चालू आहे. साधनेमध्ये या संघर्षांना मानाचे स्थान आहे.'[५]

'साधना' हा सृजन शक्तीचा आविष्कार आहे. राजकीय, सामाजिक, आर्थिक, समस्यांचा जागर हे साधनेचे नित्यकर्म आहे. विवेकी, कृतीशील, प्रबोधन, हेच 'साधना'चे आत्मभान अंकाच्या पानांपानातून जाणवते. साने गुरुजींनी आपणांस दिलेला अमूल्य ठेवा म्हणजे 'साधना'. आपण तो जपला पाहिजे.

## निष्कर्ष

१. महाराष्ट्राच्या सामाजिक – सांस्कृतिक जडणघडणीत वाङ्‌मयीन नियतकालिकांचा–लघुनियतकालिकांचा महत्त्वाचा वाटा आहे.

२. 'लोकांचे प्रबोधन करणे' हा नियतकालिकांच्या निर्मितीमागील हेतू होता.

३. लोकशाहीचे रक्षण, सत्य स्थितीचे ज्ञान, असंतोषास वाट व लोकशिक्षणाचे कार्य नियतकालिकांनी केलेले दिसून येते.

४. राष्ट्र आणि समाज घडविण्याचे कार्य 'साधना' साप्ताहिकाने केलेले दिसून येते.

## संदर्भ सूची

१. प्रधान ग.प्र., जाधव रा.ग. : संपा.– 'निवडक साधना', खंड ८, वेध: साधना पत्रकारितेचा, प्रकाशक, नरेंद्र दाभोलकर, साधना प्रकाशन, ४३१ शनिवार पेठ , पुणे–४११ ०३० प.आ.: ८ सप्टेंबर २००७ पृ. २

२. प्रधान ग.प्र., जाधव रा.ग. : संपा.– 'निवडक साधना', खंड १, 'साधना'तील साने गुरूजी, प्रकाशक, नरेंद्र दाभोलकर, साधना प्रकाशन, ४३१ शनिवार पेठ , पुणे–४११ ०३० प.आ.:

११ जून २००७ पृ. ६७

३. चंपानेरकर प्रदिप : 'यांनी घडवल सहस्त्रक' २०००–२००१, रोहन प्रकाशन, ३९६–ब, नारायण पेठ, पत्र्या मारोती चौक, पुणे–४११ ०३० प्र.आ. २ ऑक्टोंबर २००३ पृ. २९१

४. प्रधान ग.प्र., जाधव रा.ग. : संपा.– 'निवडक साधना', खंड ८, वेध: साधना पत्रकारितेचा, प्रकाशक, नरेंद्र दाभोलकर, साधना प्रकाशन, ४३१ शनिवार पेठ , पुणे–४११ ०३० प.आ.: ८ सप्टेंबर २००७ पृ. ४

५. दाभोलकर नरेंद्र : संपा.–'साधना' ४ जुलै १९९८,शनिवार, प्रकाशक, नरेंद्र दाभोलकर, साधना प्रकाशन, ४३१ शनिवार पेठ , पुणे–४११ ०३० , पृ. १३


❖❖❖

# मिरासदारांच्या ग्रामीण विनोदी कथा : एक आकलन

डॉ. आर. एम. केदार
डॉ. गो. खे. महाविद्यालय, गाडेगाव
(तेल्हारा) जि. अकोला, भ्रमणध्वनी ९८९००७८४१३

ग्रामीण विनोदी कथाकार म्हणून द. मा. मिरासदार ओळखले जातात. त्यांनी आपल्या लेखनाने एक वेगळाच ठसा उमटविला आहे. त्यांचे 'माझ्या बापाची पेंड', 'माकडमेवा', 'चकाट्या','हसणावळ', 'गुदगुल्या', 'गंमत गोष्टी', 'विरंगुळा', 'सरमिसळ' इत्यादी कथासंग्रह प्रसिद्ध आहेत.

ग्रामीण भागातील लोकांच्या अंधश्रद्धा, भोळयाभाबड्या लोकांच्या काही कल्पना, ग्रामीण भागातील देव—देवता, गैरसमज, ग्रामीण भागातील मास्तर इत्यादी विषय घेऊन त्यांनी आपल्या ग्रामीण कथा लिहिल्या आहेत. ग्रामीण जीवनातील रांगडा विनोद त्यांच्या कथांमधून येतो. त्यांच्या कथेतील पात्रे धूर्त, कावेबाज, विक्षिप्त आहेत तर काही इरसाल आहेत.

मिरासदारांनी खेड्यातील लोकांच्या जीवनातील विसंगती हेरून त्या आपल्या कथेत मांडल्या आहेत. खेड्यातील लोकांमध्ये असणारे अज्ञान, आपसी हेवेदावे, त्यांचा भोळसर स्वभाव, परंपरा, समजुती इत्यादीमुळे निर्माण होणाऱ्या विसंगती ते अचूक टिपतात. त्यामुळेच त्यांच्या ह्या ग्रामीण कथा विनोदी कथा बनतात. परंतु त्यांच्या कथेतील विनोद उथळ वाटत नाही. कारण त्या विनोदामागे व्यथा व वेदना दडलेल्या आहेत. त्यांच्या कथेतील विनोदी कधी प्रसंगनिष्ठ असतो तर कधी व्यक्तिनिष्ठ असतो. त्यांच्या 'शाळेतील समारंभ', 'भुताचा जन्म', 'नदीकाठचा प्रकार' या कथांमधून प्रसंगनिष्ठ विनोद आला आहे तर 'व्यंकूची शिकवणी', 'हुबेहूब' इत्यादी कथांमधील विनोद व्यक्तिनिष्ठ आहे. त्यांच्या काही कथांमधून दु:खाचे दर्शन घडते. उदा. 'विरंगुळा' या कथासंग्रहातील कथांमधून ग्रामीण भागातील दारिद्र्याची व दु:खाची अनुभूती येते. त्यांच्या ह्या कथा अस्सल ग्रामीण कथा आहेत. मिरासदार आपल्या कथा निवेदनात ग्रामीण बोलीचा वापर करतांना दिसून येतात. त्यांच्या कथेने ग्रामीण कथा अधिक रंजक बनली आहे. त्यांची कथा विसंगतीतून विनोदनिर्मितीच करत नाही तर अंतर्मुखही करून सोडते.

त्यांच्या कथेतील प्रसंग, वातावरण व व्यक्ती ह्या इतक्या एकमेकांत मिसळलेल्या असतात की त्यामुळे यापैकी विनोद कशातून निर्माण झाला हे सांगणे कठीण होऊन जाते. त्यांची निवेदनशैलीही मोठी वैशिष्ट्यपूर्ण आहे. या वैशिष्ट्यांमुळेच त्यांची ग्रामीण कथा एकदम निराळी वाटते. त्यांनी आपल्या विनोदी कथांचे निवेदन अशा पद्धतीने केले आहे की ती कथा आपल्याला पुन्हा पुन्हा वाचाविशी वाटते. त्यांच्या कथांचा प्रारंभच मुळी उत्सुकतापूर्ण असतो. उदा. 'व्यंकूची शिकवणी', 'ड्राईंग मास्तरांचा तास', 'शिवाजीचे हस्ताक्षर' व 'माझी पहिली चोरी' इत्यादी कथा. त्यांच्या निवेदनात मिस्किलपणा तर आहेच पण योग्य वेळी योग्य शब्द वापरण्याचे त्यांचे कौशल्य वाखाणण्यासारखे आहे. ते आपल्या कथांचे निवेदन अशा प्रकारे करतात की, वाचकांची उत्कंठा शेवटपर्यंत कायम राहते. मिरासदारांच्या बऱ्याच विनोदी कथांमध्ये खेड्यातील शाळा, त्यात शिक्षण घेणारी मुले व त्यांना शिकवणारे मास्तर यांचे वर्णन येते. यावरून त्यांना शाळेबद्दल विशेष आकर्षण आहे हे स्पष्ट होते. 'शाळेतील समारंभ', 'व्यंकूची शिकवणी', 'ड्राईंग मास्तरांचा तास', 'माझ्या बापाची पेंड' इत्यादी कथांमधून शाळेतील वातावरण आले आहे. यामधेही विनोद आला आहे. स्वातंत्र्योत्तर काळात खेड्यापाड्यातून शाळा सुरू झाल्या होत्या. पण या शाळांची व तेथील मास्तरांची अवस्था कशी होती ते मिरासदार अचूक टिपतात. उदा. 'व्यंकूची शिकवणी' मधील व्यंकू. ह्या व्यंकूला मास्तरांची शिकवणी असते. परंतु मास्तरांनी व्यंकूला शिकवण्याऐवजी व्यंकूच मास्तरांना शिकवायला लागतो. तंबाखू का खावी, तमाशा का पहावा? आपले म्हणणे तो मास्तरांना पटवून देण्यात यशस्वीसुद्धा होतो. मास्तरसुद्धा वाहावत जाऊन भलत्याच मार्गाला लागतात.

ड्रॉईंगमास्तरांनी घेतलेल्या तासाचा किस्सा वाचून हसू तर येतेच शिवाय मास्तरच्या ज्ञानाची कीव कराविशी वाटते. या मास्तरांचे इतिहासाचे ज्ञान पाहून, त्यांची मुलांना उत्तरे देण्याची रीत पाहून मौज वाटते. वर्गातील बंडू नावाचा विद्यार्थी मास्तरांना विचारतो की, पानिपतच्या पहिल्या दोन लढाया कुणाकुणात झाल्या तेव्हा मास्तर पुस्तकाची पाने मागे—पुढे करत म्हणतात, ''कुणाकुणात म्हणजे काय? आपल्यात अन् शत्रूत. समजा की, आपण समोर उभे आहोत, तर शत्रूही समोरच उभा. झाली लढाई सुरू. बरं, एकदा नाही, दोनदा अशी लढाई

झाली. म्हणून या लढाईला तिसरी लढाई म्हणतात. आलं लक्षात?''[१] 'शाळेतील समारंभ' या कथेच्या सुरवातीसही विसंगतीतून विनोद साधला आहे.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात खेड्यापाड्यातून सुधारणेचे वारे वाहू लागले होते. सहकारी संस्था स्थापन करण्यात आल्या होत्या. साखर कारखाने सुरू झाले. त्यामुळे स्वाभाविकच ऊसाचा पेरा वाढून खेड्यातील लोकांच्या आर्थिक स्थितीत फरक पडला. लोक सधन झाले. पक्की घरे बांधल्या गेली. सुखसोईची साधने खेड्यात दिसू लागली, याचे चित्रण मिरासदारांच्या 'बाळू देशपांड्यांचा टी.व्ही.' या कथेत आले आहे. खेड्यापाड्यातून पैशापायी खोटी साक्ष देणारे दिगुअण्णासारखी माणसेही 'साक्षीदार' या कथेत भेटतात. शहरी वातावरणाचा प्रभाव खेड्यातील लोकांवरही कसा पडला होता ते याद्वारे लक्षात येते. लाचलुचपतखोरीचे लोण खेड्यापाड्यापर्यंत कसे जाऊन पोहचले त्याचे वर्णन 'पंचनामा' या कथेत आले आहे. गांज्या पकडणारा फौजदार पैसे मिळताच पंचनामा कसा बदलवतो ते दाखविले आहे.

मिरासदारांच्या कथेत येणाऱ्या मिस्किलपणाबाबत वा. ल. कुलकर्णी म्हणतात, ''त्यांच्या कथांमधून हा जो मिस्किलपणा व गमतीदार विक्षिप्तपणा जाणवतो, तो घटनांनी घेतलेल्या चमत्कृतीपूर्ण वळणांनी केवळ निर्माण झालेला असतो. ही मजेदार वळणे तर तेथे असतातच, परंतु तो त्या घटनांना कारण झालेल्या माणसांच्या ठिकाणच्या सर्वसाधारण आणि थोड्याफार विलक्षण अशा दोन्ही प्रकारच्या वृत्तीतून जन्मलेला असतो. अशा प्रकारच्या जीवनात विशेषत: खेड्यातल्या बिनपोशाखी जीवनात निर्माण होणारे प्रसंग हेरण्यात आणि कल्पिण्यात मिरासदार कोण्याही मराठी कथालेखनास हार जाणे कठीण.''[२] कुलकर्णी यांचे विधान योग्यच आहे. कारण त्यांच्या कथेत येणाऱ्या मिस्किलपणाच्या बाबतीत इतर कुणीही त्यांची बरोबरी करू शकत नाही.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर खेडेगावातसुद्धा स्वास्थ्यविषयक सोयी पुरविण्यात आल्या. याचा उल्लेख 'देशी उपाय' या कथेत येतो. या कथेत शहरातून भोकरवाडीला देवी डॉक्टर येतो आणि दिसेल त्याला देवी काढत सुटतो, शेवटी गावातील इरसाल लोक त्या डॉक्टरला लोखंडी पट्टीने चटके देऊन हाकलून लावतात. तसेच 'भोकरवाडीतील दारूबंदी' या कथेत दारूच्या दुकानाचा उल्लेख आला आहे. तुका कलालाच्या दारूच्या दुकानाने आपले गाव दारूडे होईल या भीतीने भोकरवाडीतील लोक नाना चेंगटाला पाठवून दारूचे दुकान बंद करण्यासाठी निरनिराळया युक्त्या योजतात.

द. मा. मिरासदार यांच्या कथेतील विनोदाचा परामर्श घेतांना डॉ. आनंद यादव म्हणतात, ''माडगूळकर—पाटील यांची यशस्वी ग्रामीण कथा प्रामुख्याने गंभीर. तिच्यात अधूनमधून मिस्किलपणा येत होता, नाही असे नाही, पण शुद्ध ग्रामीण विनोदी कथा द. मा. मिरासदार यांनीच लिहिली.''[३] मिरासदारांची कथा अभ्यासल्यावर आनंद यादवांचे मत मान्य करावेच लागते. त्यांच्या विनोदी कथेतील पात्रे मोठी विक्षिप्त व तऱ्हेवाईक असल्याचे दिसून येते. ही पात्रे जो विचार करतात त्यातूनच मग ती अस्वस्थ झालेली दिसून येतात. त्यामुळे मग त्यांच्या हातून हास्यास्पद कृती घडून येते आणि मग विनोद निर्माण होतो. त्यांच्या कथांमधील प्रसंगही असे काही असतात की त्यातूनही विनोदाची निर्मिती होते. खेड्यातील इरसाल माणसांचे जग रंगवून त्यांनी आपल्या कथा रंजक बनविल्या आहेत. त्यांच्या अशा कथांद्वारे त्यांनी सामाजिक व्यंगावर एक प्रकाशझोत टाकला आहे.

त्यांच्या विनोदी कथांबद्दल प्रा. चंद्रकुमार नलगे म्हणतात, ''एवढीशी वास्तवता, त्याहीपेक्षा कल्पकता व अतिशयोक्ती, निवेदनाचे खास किस्सेवजा तंत्र सहज शैली यामुळे विनोदी कथांची मिरास मराठी साहित्याला लाभली आहे. त्यांची कथा हुरड्यासारखी खमंग असते. ती बोचरी, खोचट, उपरोधिक अशी वाटत नाही. एक लोभस मिस्किलपणा लाभलेली त्यांची कथा निरागसपणे रंजन करून जाते. त्यांच्या कथांतील लोकविलक्षण, विक्षिप्त माणसाचं एक खास विश्व आहे. ते रंजनप्रधान असले तरी अप्रुप वाटाव असं आहे.''[४] खरेच त्यांच्या विनोदी कथा आपल्या मनाला गुदगुल्या करून जातात.

त्यांच्या कथांमध्ये खेड्यातील अज्ञानी तसेच विचित्र प्रवृत्तीची माणसे भेटतात. या माणसांच्या सवयी, लकबी, त्यांचा विक्षिप्तपणा, तसेच त्यांच्या जीवनात असणाऱ्या विसंगती येतात. यातूनच मग मिरासदारांची कथा फुलत जाते. अशा कथा मग भुरळ घालतात त्या त्यातील विनोदामुळे. हा विनोदही मोठा मजेशीर असतो.

मिरासदार ग्रामीण भागात असणाऱ्या अंधश्रद्धा कशा मिस्किलपणे सांगतात ते पाहण्यासारखे आहे. 'भोकरवाडीतील जादूगर' या कथेतील जादूगाराचे बोलण्याचे कसब, जादूगार जे बोलतो ते ग्रामस्थांनी खरे मानने, ताईत विकून जादूगाराने केलेली कमाई बघून बाबू व नाना चेंगट तशा प्रकारे पैसे कमावण्याचे ठरवतात. त्यातून मग जी धमाल होते ती वाचून हसू आल्याशिवाय राहत नाही. बाबू आणि चेंगट यांचे जादूगाराचे नाटक कसे फसते ते पाहण्यासारखे आहे. ''आता मात्र बाबू भलताच गांगरला. सगळे सवाल त्याच्या डोक्यात उलटे पालटे

झाले. तो काहीही प्रश्न विचारू लागला आणि चेंगट त्याची ठरलेली उत्तरे देऊ लागला. लहान पोराचा हात धरून त्याने 'हा काय करतोय' म्हणून विचारले तेव्हा चेंगटाने 'बिडी वढता है'— म्हणून उत्तर दिले. एका म्हाताऱ्या माणसाला उद्देशून प्रश्न विचारल्यावर ती बाई असून तिच्या लुगडयाचा रंग हिरवा आहे म्हणून त्याने जोरदार उत्तर दिले. तर बाईने चड्डी घातली असून तिच्या चड्डीचा रंग खाकी असल्याचे त्याने ठणकावून सांगितले. दुसऱ्या एका म्हातारीने डोक्यावर काळी टोपी घातली आहे आणि ती पान तंबाखू चघळीत आहे हे ही त्याने न चुकता सांगून टाकले. चेंगटाच्या एकेका उत्तराबरोबर लोकात हशाच हशा होत होता.''[५] अशा प्रकारचा किस्सा वाचल्यावर वाचकाचे हसून पोट दुखायला लागते.

कधी कधी मिरासदार प्रचलित आख्यायिका, दंतकथा याचाही आधार आपल्या कथांसाठी घेतात. त्यातूनही त्यांचा मिस्किलपणा जाणवत राहतो. या दृष्टीने त्यांच्या 'भुताचा खून', 'भुताचा जन्म', 'पंचाक्षरी' इत्यादी कथा लक्षणीय आहेत. त्यांच्या कथातून ते ग्रामीण वातावरणाची निर्मिती करतांना नदी, डोह, गावातील लोक, तेथील पीक—पाणी, देवळाचा पार, कट्टा, खेडुतांची भाषा, त्यांचा पेहराव, त्यांच्या बोलण्याच्या लकबी इत्यादीचा पुरेपूर वापर करतात. त्यामुळे त्यांची कथा अस्सल ग्रामीण कथा होऊन जाते.

मिरासदारांच्या विनोदी ग्रामीण कथांची विशेषत: लक्षात घेऊन डॉ. आनंद यादव म्हणतात, ''विनोदी कथा हा प्रकार थोडा अवघडच, कारण कथेतील व्यक्ती, प्रसंग, घटना, कथानक मुळात काही वस्तुनिष्ठतेच्या मर्यादा निर्माण करतात आणि त्या मर्यादांतच विनोद निर्माण करणे अटळ होऊन बसते. तरीही मिरासदारांनी ग्रामीण विनोदी कथा यशस्वीपणे लिहिली.''[६]

एकूणच मिरासदारांनी ग्रामीण भागात आढळून येणारे अज्ञान, अंधश्रद्धा, भाबडेपणा, लोकांचे हेवेदावे, फाजील समजुती यातून निर्माण होणाऱ्या विसंगती आपल्या कथेतून चांगल्या प्रकारे रंगविल्या आहेत. त्यांच्या कथेतून ग्रामीण जीवनातील विसंगतीचे दर्शन घडते. त्यांच्या कथेतील विनोद कधी प्रसंगनिष्ठ तर कधी व्यक्तिनिष्ठ असतो. याशिवाय त्यांनी ग्रामीण भागातील लोकांच्या वागण्या—बोलण्यातून जो विनोद निर्माण होतो त्याचाही उपयोग आपल्या कथेत योग्य प्रकारे केला आहे.

## निष्कर्ष

- मिरासदारांनी आपल्या ग्रामीण कथेतून ग्रामीण जीवनातील विसंगतीचे दर्शन घडविले आहे.
- त्यांच्या कथेतील विनोद कधी प्रसंगनिष्ठ तर कधी व्यक्तिनिष्ठ असतो.
- मिरासदार आपल्या कथांकरिता आख्यायिका, दंतकथा याचाही आधार घेतात.
- मिरासदारांनी आपल्या कथांमधून ग्रामीण भागातील अंधश्रध्दावर प्रकाश टाकला आहे.
- त्यांनी खेड्यातील इरसाल माणसांचे जग रंगवून सामाजिक व्यंगावर बोट ठेवले आहे.

## संदर्भ

१) द. मा. मिरासदार — मिरासदारी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९६६, पृ. २६३.
२) वा. ल. कुलकर्णी — मिरासदारी (प्रस्तावना), कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९६६, पृ. ९, १०.
३) डॉ. आनंद यादव — ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या, मेहता पब्लिकेशन, पुणे, १९७९, पृ. २०.
४) प्रा. चंद्रकुमार नलगे (संपादक) — ग्रामीण वाड्.मयाचा इतिहास, सुरेश एजन्सी, पुणे, १९९६, पृ. ९६.
५) द. मा. मिरासदार — गोष्टीच गोष्टी, सुवर्ण प्रकाशन, पुणे, १९९३, पृ. १५.
६) डॉ. आनंद यादव — ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या, मेहता पब्लिकेशन, पुणे, १९७९, पृ. २०.

❖❖❖

# मराठवाड्यातील लेखिकांच्या साहित्यातील 'स्त्री'विषयक जाणिवा

अमोल शिवाजीराव खोसे
मातोश्री माध्यमिक विद्यालय, महागांव, जि. यवतमाळ
भ्रमणध्वनी ९४२१७६५१७८, ८६९८७६८३८३

'कविता' या शब्दाची मुख्य व्याख्या देणे कठीण आहे. 'कविता' हा शब्द उच्चारताना वाचकांच्या मनात कवितेची विविध रूपे येतात. अनेक काव्यअभ्यासकांनी, समीक्षकांनी आणि कवींनी काव्याच्या व्याख्या करण्याचे प्रयत्न केले आहेत. या सर्व व्याख्यांचा कितीही जाणीवपूर्वक आणि काळजीपूर्वक अभ्यास केला तरी 'कविता म्हणजे काय?' या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर आपल्याला मिळू शकेल असे खात्रीने सांगता येत नाही. एकाच व्याख्येत कवितेची सर्व वैशिष्ट्ये दाखविणे कठीण आहे.

काव्याचे निरनिराळे अंग अभ्यासक व्यक्त करतात. कवितेचा सार महत्त्वाचा ठरतो. 'काव्याचा आत्मा रस आहे' असे विश्वनाथने म्हटले आहे. कविता वाचल्यावर वाचकांच्या मनात काही भावना जागृत होऊन, त्याला काही भावनिक अनुभव येत असतो. वीर, शृंगार, करुण, विनोद इत्यादी रसाला अनुरूप अशा भावनांचा तो अनुभव घेत असतो. त्या सुखदायक मनाला आल्हादकारक वाटतात. अशी भावनिक जागृती मनात उत्पन्न होण्यास त्या त्या भावनांचे सुंदर चित्र आणि ते मूर्तिमत डोळ्यापुढे उभे करणारे शब्दार्थ कारण होतात असे शब्दार्थ म्हणजे काव्य होय. 'उत्तम शब्दांची उत्तम रचना म्हणजे काव्य' असे कोलरिज म्हणतात. तर 'काव्य ही कल्पना आणि भावना यांची भाषा होय' असे हॅझट म्हणतात. 'रसात्मक वाक्य म्हणजे काव्य' असे विश्वनाथ म्हणतात. अशा पाश्चात्य आणि भारतीय व्याख्या अभ्यासावयास मिळतात यावरून कवितेची अनेक रूपे जाणवतात.

निझामी राजवटीतील कवी दे.ल. महाजन यांनी संपादित केलेल्या 'माहेर' या प्रातिनिधिक कविता संग्रहात 'सुमती उपासनी' यांच्या कविता प्रकाशित झाल्या आहे. त्यांच्या 'असे कसे पुरुष' या कवितेतून सहजतेच्या अंगाने पुरुषी रूबाब आणि पुरुषांची वर्चस्ववादी वृत्ती शब्दांकित केली आहे. स्त्रियांना सहन करावी लागत असलेली असमानता, मानहानी सहजपणे आपल्या काव्यातून व्यक्त करतात.

'सुहासिनी इर्लेकर' मराठवाड्यातील उस्मानाबादसारख्या मागासलेल्या भागात त्या काळी प्राध्यापिका झाल्या. इर्लेकरांची कविता भावकविता आहे. त्या वयातल्या तारुण्याचा खळाळता, उत्साह, सौदर्यवेध, मनोवृत्ती त्यांच्या काव्यात अभ्यासवास मिळते. त्यांचे 'तृप्ती', 'चित्रांगण', 'अक्षर', 'गाथा' असे काव्यसंग्रह प्रकाशित आहेत.

जेष्ठ कवयित्री 'प्रा. सुषमा मुंजे' यांचा 'आत्मग्ना' हा कवितासंग्रह १९९२ झाली प्रकाशित झाला. गेल्या अनेक वर्षांपासून त्या कविता लिहीत आहेत. 'ऋतुगंध' नावाचा ललितसंग्रह प्रकाशित आहे. तसेच 'सुमित्रा ओक' यांचा काव्यसंग्रह यातील कविता अत्यंत साध्या, सहज, सरळ भाषेत आविष्कृत झाल्या आहेत. क्लिष्टता, दुर्बोधता यांच्या मोहात न पडता ही कविता साकारली आहे. निसर्गातील विविध प्रतिमांच्या माध्यमातून या कविता अभिव्यक्त झाल्या आहेत. कवयित्रीने निसर्गाला साक्षी ठेवून प्रेमाची विविध रूपे या कवितेतून साकार केली आहेत.

'शैला लोहिया' यांनी समाजकार्याबरोबर काव्य निर्मिती, ग्रंथ निर्मिती केली आहे. त्यांच्या कवितेमधून प्रामुख्याने स्त्री दु:खाचे चित्रण येते. मराठीच्या जेष्ठ व श्रेष्ठ कवयित्रीच्या परंपरेचा वारसा पुढे चालविण्यासाठी कवयित्री म्हणून 'सौ. लीला धनपलवार' यांचा उल्लेख करावा लागतो. 'गुलमोहर' हा त्यांचा पहिलाच काव्यसंग्रह आहे. 'रेखा बैजल' या मराठवाड्यातील आघाडीच्या लेखिका आहेत. त्यांनी विपुल प्रमाणात विज्ञान कथा लिहिल्या आहेत. इतर साहित्याच्या तुलनेत त्यांच्या कविता अल्प प्रमाणात प्रसिद्ध झाल्या आहेत. कविता थोड्या प्रमाणात लिहिल्या असल्या तरी या कविता अतिशय दमदारपणे हाताळलेल्या आहेत. त्यांच्या 'आसक्त' कवितेतून हा अनुभव आपल्याला येतो की 'स्त्री' च्या जीवनातील सत्य त्यांनी त्यांच्या काव्यातून सांगितले आहे. 'अनुराधा पाटील' यांचा 'दिगंत' हा काव्यसंग्रह प्रसिद्ध आहे. याचबरोबर 'तरीही', 'दिवसेंदिवस' असे काव्यसंग्रह प्रकाशित आहेत. त्यांच्या काव्याने काव्यरसिकांच्या मनात आपले एक स्थान कवयित्रिने निर्माण केले.

'अनुराधा गिजरे उर्फे भारती पोल चंद्रसाक्षी' या भावतरल नावावरूनच आपल्याला विषयाची कल्पना येते. प्रेमाची विविध रूपे घेऊन आलेला हा काव्यसंग्रह आहे. प्रेमाचे विविध रंग, प्रेमविचार, प्रेमानुभव, प्रेमभावना याचे चित्रण त्यांच्या काव्यसंग्रहात पाहायला मिळतात.

'ललिता गादगे' यांचा 'फसवी क्षितिजे' हा पहिलाच काव्यसंग्रह होय. या बरोबर 'अग्नीजल', 'संवेदन' हे काव्यसंग्रह प्रकाशित आहेत. स्वत:कडे पाहणारी व संवेदनक्षम कवयित्री म्हणून ललिता गादगे यांच्याकडे पाहावे लागेल. यांच्या साहित्यातून 'स्त्री'जीवनातील वास्तव चित्रण चित्रीत होते. 'स्त्री जीवनातील अंतर्मुख करणाऱ्या भावना 'संवेदन'मधून त्यांनी उत्तम पद्धतीने मांडले आहे. यात कुठलीही चीड, वाद यातून व्यक्त केली नाही. संवादी स्वरूपात काव्याच्या माध्यमातून साधलेला हा सुसंवादच होय. एका 'स्त्री' मनाने घेतलेले हे अनुभव होय. स्वत:च्या अस्तित्वात खोलवर उतरून तेथील अनुभवांना काव्यात्म रूप देणारी ही कवयित्री होय. हे काव्य स्थल, कालातील असलेल्या स्त्रीच्या भावात्मक अस्तित्वाचे शब्दांकित करणारे काव्य होय. त्यांच्या काव्यातून एका संवेदनक्षम, स्वत्व न हरवलेल्या पण अनंत दु:खे घेऊन जगणाऱ्या स्त्रीचे दर्शन घडते.
अशा स्वरूपात मराठवाड्यातील आधुनिक कवयित्रींचे थोडक्यात 'स्त्री' अनुभव सांगता येतील.

## संदर्भग्रंथसूची


१) प्रा. वसंत आबाजी डहाके : 'वाङ्मय प्रकार', 'आकलन आणि रसास्वाद कविता म्हणजे काय?'
२) सुधीर रसाळ : कविता आणि प्रतिमा
३) (संपा) प्रा.फ.म. शहाजिंदे : मराठवाड्यातील कविता
४) देविदास फुलारी : अक्षरनारायणी
५) ललिता गादगे : 'संवेदन', 'फसवी क्षितिजे', 'अग्निजळ'


❖❖❖

# वारकरी संप्रदायाचा भक्तियोग

प्रा.डॉ. राम रौनेकर
एम.ए.: मराठी, हिंदी, राज्यशास्त्र, इतिहास, लोकप्रशासन,
महात्मा फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर विचाराधारा, पीएच.डी. मराठी
प्रमुख, पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग,
मत्स्योदरी महाविद्यालय, अंबड, जि.जालना
Email: raunekar.ram@rediffmail.com भ्रमणध्वनी: ९४२०२२१४९८, ९४०५७०५६३०

भारतीय परंपरेने धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चार पुरुषार्थ सांगितले आहेत. या पुरुषार्थाचा पाया 'धर्म' असून 'मोक्ष' कळस आहे. अर्थ आणि काम यांना धर्म आणि मोक्ष यामध्ये सीमित केले आहे. असे असले तरी आज संपूर्ण जग अर्थ आणि काम प्राप्तीसाठी धडपडताना दिसते आहे. 'विषयप्राप्ती म्हणजे सुखप्राप्ती' अशी बहिर्मुखवृत्ती समाजाने धारण केली आहे. भौतिक साधनांच्या अतिरेकी वापराने सुखाच्या कल्पना बदलून गेल्या आहेत.

भौतिक सुखाचा मर्यादित उपयोग करून स्वत:चे जीवन सुंदर कसे करता येते, याची आचारसंहिता वारकरी संतांनी समाजाला समजावली आहे. तिलाच अध्यात्मशक्ती असे म्हणता येते. हे संतानी सप्रमाण आणि स्वानुभवातून सांगितल्यामुळे समाजाला ते पटते. प्रभूच्या प्राप्तीचे मार्ग म्हणजे - कर्म, ज्ञान, योग, उपासना तथा भक्ती हे होत असे संतांचे म्हणणे आहे.

प्रभूप्राप्तीचे हे अनेकविध मार्ग संतांनी सांगितले असले तरी ते व्यक्तिपरत्वे, अधिकारपरत्वे, स्थलपरत्वे, कालपरत्वे बदलणारे आहेत, हे लक्षात घ्यावे लागते कारण हे मार्ग साधक अधिकारपरत्वे १. अवघडातील अवघड, २. अवघडातील सोपे, ३. सोप्यातील अवघड, ४. सोप्यातील सोपे असे आहेत. हे मार्ग समाजासमोर ठेवण्यात संतांचे अथक परिश्रम आणि सखोल चिंतन आहे. येथे साधकाची वृत्ती बहिर्मुख की अंतर्मुख यावर हे सर्व अवलंबून आहे. साधक 'विषयी,' 'पामर,' 'जिज्ञासू' की 'मुमुक्षु' हे चिंतन करून जगद्गुरु तुकोबाराय म्हणतात,

"अधिकार तैसा दावियेला मार्ग । चालतां हें मग कळों येतें ।।"

वारकरी संप्रदायातील साधू–संतांनी स्वानुभवातून सर्वांना सर्वात सुलभ असा भक्तिमार्ग सांगितला आहे. इंद्रियांची निवृत्ती म्हणजे मोक्ष. अशी मोक्षाची सरळ संकल्पना मांडली. भक्तीने ही मोक्षप्राप्ती होऊ शकते हे स्पष्ट केले. भक्तीचे श्रेष्ठत्व सांगितले.

"नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी ।।"

असा भक्तीचा महिमा नामदेवरायांनी सांगितला. तो महाराष्ट्रापासून पंजाबपर्यंत पोचला. त्यात अनेकांचे जीवन उजळून निघाले. कीर्तन साधनेस संतांनी विशेष महत्त्व दिले. कीर्तन करणारा आनंदी आणि कीर्तन ऐकणाराही आनंदी राहतो. कारण कीर्तन अंतर्बाह्य चांगले असते. म्हणूनच नाथ महाराज म्हणतात –

"नित्य नवा कीर्तनी कैसा ओढवला रंग । वक्ता आणि श्रोता स्वये झाला श्रीरंग ।।"

कीर्तनामुळे स्वत:चा, समाजाचा लाभ होतो. कीर्तनात नाम साधना वा नामभक्ती घडते. ही भक्ती अत्यंत सोपी असून मोठे फळ देणारी आहे. ज्ञानोबाराय ज्ञानेश्वरीच्या नवव्या अध्ययात म्हणतात –

"तरी कीर्तनाचेनि नटनाचे । नाशिले व्यवसाय प्रायश्चिताचे ।
जे नामचि नाहीं पापाचें । ऐसे केलें ।।"

माला मुद्रादिरूपाने नटून हरिकीर्तनाच्या छंदात भक्त आनंदाने नाचतात. त्यांच्या या प्रेमयुक्त उत्कर्षामुळे सर्व दोष नष्ट होतात. प्रायश्चित्ताचे सर्व व्यवहार नाश पावतात. कारण कीर्तनाने पापाचे नावच राहत नाही.

अशा भक्तीस कोणीही चालतो, कसाही चालतो. लिंगभेद, वर्णभेद, जातिभेद, वयभेद, रंकराव असा कोणताही भेद बाधक ठरत नाही येथे 'भेदाभेद भ्रम अमंगळ' ठरतो. किंबहुना सर्व भेदच मावळतात. भक्ती म्हणजे परमेश्वराविषयीची निस्सीम प्रीती होय. ज्यात भक्त विभक्त राहुचं शकत नाही. भक्तीची हीच संकल्पना भक्तश्रेष्ठांना अभिप्रेत आहे. नाथ महाराज म्हणतात –

"सहज स्वरुप स्थिती । तया नाव भक्ती ।।"

तुकाराम महाराज म्हणतात –

"हेचि थोर भक्ती आवडती देवा । संकल्पावी माया संसाराची ।।"

संसारावरील प्रेम सोडून देवाकडे वळविणे याचे नाव भक्ती. ही भक्ती असून आवडती आहे. येथे महाराज संसार सोडावयास सांगत नसून संसाराची आसक्ती सोडण्यास सांगतात. संसारात रहा मात्र आत संसार नको. जसे नाव पाण्यात चालेल मात्र पाणी नावेत नाही. म्हणजेच भक्तीसाठी काय लागते; तर केवळ आणि केवळ प्रेम! परमप्रेम!! समर्पण!!!

डॉ.ल.का. मोहरीर भक्तीची व्याख्या करताना म्हणतात, "भक्ती ( सेवा ) ही गोविंदाच्या ( विश्वरुपाच्या) दर्शनाने घडते. या सेवेत निश्चयात्मक वृत्ती निर्माण होउन अनन्य सेवाभाव जागृत होतो."[१] तुकाराम महाराज म्हणतात,

"माझी भक्ती भोळी । एकविध भाव बळी ।।"

ही भक्ती भावयुक्त असून ती एकनिष्ठ आहे. निश्चयात्मक, स्थिर भावाची आहे. विठ्ठलाचे निरंतर नाम घेणे अशी ही सोप्यातील सोपी भक्ती आहे. अशी भक्ती कोणालाही, कोणत्याही माध्यमातून करता येते. या भक्तिमार्गाबद्दल श्रीधर रंगनाथ कुलकर्णी म्हणतात, "भक्तिमार्गाच्या प्रसारामुळे धर्मचरणाचा मार्ग सामान्यांना सुलभ बनला. या मार्गात जातिभेद नसल्याकारणाने एका मर्यादेत सामाजिक समतेची प्रक्रिया देखील भक्तिपंथामुळेच निर्माण झाली."[२]

"श्रवणं, कीर्तनं विष्णो: स्मरणं पादसेवनम् । अर्चनं वंदन दास्य सख्यमात्मनिवेदनम् ।।"

भागवतामध्ये सांगितलेले हे भक्तीचे नऊ प्रकार अवघडाचे 'सोपान' आहेत.

१. श्रवण, कीर्तन, स्मरण – या पहिल्या तीन प्रकारात–परमेश्वराविषयीची अतीव श्रद्धा आहे. ही भक्ती नाम प्रधान आहे.

२. पादसेवा, पूजा, वंदन – या दुसऱ्या तीन प्रकारांत – परमेश्वराच्या सगुण रूपाशी संबंधित श्रद्धा आहे. ही भक्ती रूपप्रधान आहे.

३. दास्य, सख्य, आत्मनिवेदन – या तिसऱ्या तीन प्रकारात परमेश्वराविषयीचा आंतरिक भाव महत्त्वाचा आहे. ही भक्ती भावप्रधान आहे.

येथे आत्मनिवेदन ही सर्वोच्च पायरी आहे. सर्वस्वी शरण जाणे अशी नवविधाभक्ती परमकल्याणकारी आहेत. याने मनोवृत्ती द्रवित होते आणि विश्व भगवन्मय होऊन जाते. तात्पर्य – नाम + रूप + भाव = भक्ती असे ज्ञानोबाराय ते तुकोबाराय सर्वच संत समजावतात.

रामायणातील नवविधा भक्तीचे नऊ अधिकारी वारकरी मानतात श्रवण – हनुमंतराय, कीर्तन – वाल्मीक ऋषी, स्मरण – सीतामाता, पादसेवन – भरत, पूजा – शबरीमाता, वंदन – बिभीषण महाराज, दास्य – लक्ष्मण, सख्य– सुग्रीव महाराज आणि आत्मनिवेदन – जटायू.

## भक्तितत्त्व / स्वरूप / महत्त्व

भक्तीत कामना ईश्वराशी जोडावी लागते. त्याविना श्रेष्ठतम सुख प्राप्त होत नाही. निर्भेळ आनंद मिळत नाही. कारण काम वा कामना उपभोगून तृप्त होत नाही. उलट वाढत जातात. 'ययाति' हा पुराणपुरुष हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. म्हणूनच तुकाराम महाराज म्हणतात,

"तुका म्हणे देहे भरिला विठ्ठले । काम, क्रोध घर केले रिते ।।"

काम, क्रोध, लोभ हे तीन माणसाचे मोठे शत्रू आहेत. यांच्यामुळे समाजात व्यभिचार, हिंसाचार व भ्रष्टाचार हैदोस घालत आहेत. सर्व दु:खाचे हे तिघे मूळ आहेत. नाथ महाराजांनी 'एडका' या भारुडात कामाचा प्रभाव सांगितला आहे. कारण काम पूर्ण झाला, तर लोभ निर्माण होतो, तर काम अपूर्ण राहिला, तर क्रोध निर्माण होतो. या कामाने मोठमोठ्यांना सोडले नाही, तर सामान्यजनांची काय कथा!

## भक्ती : मोक्षप्राप्तीचे सर्वश्रेष्ठ साधन

भक्ती ही केवळ मोक्षाचे साधन नसून ती 'पाचवा पुरुषार्थ' मानली आहे. इंद्रियांची निवृत्ती झाली की साधक साधनात रस घेतो आणि फळाविषयी उदासीन राहतो. अशावेळी साधन हेच साध्य बनते. तुकाराम महाराज म्हणतात –

"मोक्ष तुमचा देवा । तुम्ही दुर्लभ तो ठेवा ।।
मज भक्तीची आवडी । नाहीं अंतरी ते गोडी ।।"

तुमचा मोक्ष हा दुर्लभ ठेवा आहे. तो तुमच्याजवळच असू द्या. मला केवळ तुमची भक्ती करणे आवडते. मला मोक्षाचा लोभ नाही. अशी भक्तीची आवड महाराजांनी प्रकट केली आहे. अठराव्या अध्ययात ज्ञानोबाराय म्हणतात –

"चहू पुरुषार्थां शिरी । भक्ती जैसी ।।"

"भक्तीच्या श्रेष्ठ अनुभवतात, परमात्म्याच्या ऐक्यानुभवाबरोबर प्रेम सुखाचा आस्वाद घेता येतो आणि या आस्वादात मन, बुद्धी व सर्व इंद्रिये सहभागी होतात, भक्तीला ज्ञानदेवांनी पंचम पुरुषार्थ मानले आहे."[३] असे डॉ.रामचंद्र देखणे म्हणतात.

"भक्ती दृढ मनाने, निश्चयी बुध्दिने, अपार श्रध्देने व नि:संशय होउन केल्यास गुरुकृपा होते."[४] असे डॉ.नरेंद्र कुंटे म्हणतात. गुरुकृपा म्हणजेच ईश्वरकृपा होय. कारण गुरूला साक्षात परब्रम्ह मानणारी आपली परंपरा आहे. हे परब्रम्ह भक्तीनेच प्रसन्न होते, याची साक्ष आपले प्राचीन ग्रंथ देतात.

भक्तीत ईश्वराची सगुण व निर्गुण अशी दोन्ही रूपे मान्य आहेत. सगुणात प्रेमलक्षण भक्ती असते, तर निर्गुणात ज्ञानलक्षण भक्ती असते. संत गोरोबाकाका म्हणतात,

"निर्गुणाचे भेटी आलो सगुणासंगे । तंव झालों प्रसंगी गुणातीत ।।"

परमेश्वराच्या सगुण साकार रुपाची प्रतिमा मनात ठेवून त्याच्या निर्गुण निराकार स्वरुपाचा साक्षात्कार घडवा अशी इच्छा संत मनी बाळगतात. ज्ञानोबाराय सगुण आणि निर्गुण यातील एकत्व–

"तुज सगुण म्हणों की निर्गुण रे ।
सगुण निर्गुण एकु गोविंदु रे ।।" या शब्दात मांडतात.

थोडक्यात भक्तिमार्गात अंत: करणप्रामाण्य अत्यंतिक महत्त्वाचे ठरते. कर्म, ज्ञान आणि भक्ती ही साधने पृथक असली, तरी ती परस्पराशी पूरकच आहेत. कर्मात भक्तीचा ओलावा असावा, ज्ञानाला कर्माचे हातपाय असावेत आणि भक्तीला डोळे असावेत. अशी डोळस भक्ती म्हणजेच भक्तियोग!

## संदर्भ

१. मोहरीर, डॉ.ल.का. : संत तुकारामांची जीवननिष्ठा, सविता प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती १९९४, पृ. ६१.
२. कुलकर्णी, श्रीधर रंगनाथ : मध्ययुगीन मराठी साहित्य : एक पुनर्विचार, राजहंस प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती १९९५, पृ. ८०.
३. देखणे, डॉ.रामचंद्र : भारुड वाङ्मयातील तत्त्वज्ञान, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती २००२, पृ. ९४–९५.
४. कुंटे, डॉ.नरेंद्र : कलहयुगात गुरुसेवाच तारक, दै.सामना, औरंगाबाद, बुधवार, दि.२३ डिसेंबर २०१५, पृ. ४.

❖❖❖

# मराठीच्या अभ्यासक्रमाचे आदर्श स्वरूप

डॉ. प्रशांत शेळके
मराठी विभाग प्रमुख
हिस्लॉप महाविद्यालय, नागपूर ०१
E mail: prashantshelke18@gmail.com भ्रमणध्वनी ९८९०६५४५२१

आधुनिक काळात शिक्षण हे केवळ ज्ञानाचे साधन राहिले नाही तर ते रोजगाराचे माध्यम बनले आहे. पदवी अथवा पदव्युत्तर पातळीवर शिक्षण घेताना, अभ्यास करताना केवळ 'ज्ञान' संपादन करणे ही विद्यार्थ्यांची भूमिका नसते तर पदवी प्राप्त केल्यानंतर आपल्याला योग्य असा रोजगार उपलब्ध व्हावा ही रास्त अपेक्षाही असते. त्यामुळे पदवी अथवा पदव्युत्तर पातळीवर अभ्यासक्रमाची मांडणी विचारपूर्वक अत्यंत जबाबदारीने करावी लागते. दुर्दैवाने मराठीच्या अभ्यासक्रमाची मांडणी ही आदर्श नाही हे मान्य करावे लागते. महाराष्ट्र व महाराष्ट्राच्या बाहेरील विद्यापीठांच्या अभ्यासक्रमाची पडताळणी केल्यास बरीच तफावत दिसून येते. राष्ट्रीय पातळीवर मराठीच्या अभ्यासक्रमाची समान मांडणी असावी का? हा प्रश्नही निर्माण होतो.

राष्ट्रीय पातळीवर मराठीच्या अभ्यासक्रमाची समान मांडणी असावी का? या प्रश्नासोबत इतरही अनेक उपप्रश्न ओघानेच निर्माण होतात. सर्वप्रथम ही राष्ट्रीय पातळीवरील समान मांडणी व्यावहारिकदृष्ट्या शक्य आहे काय? केवळ समान मांडणी केल्याने रोजगारभिमुखता निर्माण होईल काय? इतर विषयांच्या विद्यार्थ्यांसोबत मराठीचा विद्यार्थी स्पर्धा करू शकेल काय? या प्रश्नांची उत्तरे समाधानकारक मिळणार नाहीत.

राष्ट्रीय पातळीवर अभ्यासक्रमाची सुसूत्रता हवी का? मला वाटतं हे शक्य असले तरी व्यवहार्य नाही. राष्ट्रीय पातळीवर अभ्यासक्रमाची सुसूत्रता निर्माण झाल्यास काही प्रश्न उद्‌भवतात ग्रामीण आणि महानगरीय वातावरणाचा फरक हा विद्यार्थ्यांमध्ये असतो. साधनांची उपलब्धता ही प्रदेशानुरूप ठरते. अशा वेळी ग्रामीण आणि अर्धशहरी विद्यार्थी महानगरीय व विकसनशील शहरांतील विद्यार्थ्यांपेक्षा मागे राहण्याचा धोका संभवतो. याचा अर्थ ग्रामीण किंवा लहान शहरातील विद्यार्थी कमी आहेत असा नाही. तर साधनांची उपलब्धता व शैक्षणिक वातावरण हे मोठ्या शहरांमध्ये अधिक असते हे नाकारता येत नाही. महाराष्ट्राबाहेरील विद्यापीठांमध्ये सुसूत्रीकरणाने हाच धोका संभवतो. महाराष्ट्राबाहेरील वातावरण हे विद्यार्थ्यांसाठी समान राहणार नाही हे गृहित धरावेच लागेल. अशा वेळी महाराष्ट्राबाहेरील विद्यार्थी अभ्यासात बराच मागे पडलेला दिसेल किंवा महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांशी स्पर्धा करू शकणार नाही.

अभ्यासक्रमाच्या सुसूत्रीकरणाचे काही धोके संभवत असल्यामुळे यासाठी वेगळा उपाय शोधणे गरजेचे आहे. अभ्यासक्रमाच्या सुसूत्रीकरणापेक्षा अभ्यासक्रमांच्या उद्दिष्टांचे सुसूत्रीकरण केल्यास ग्रामीण, शहरी आणि महानगरीय विद्यार्थ्यांमध्ये एकसूत्रता आणता येणे शक्य आहे व कुणावरही अन्याय होणार नाही. उदाहरण द्यावयाचे झाल्यास मराठी साहित्यातील कादंबरी या वाङ्मयप्रकाराचा विद्यार्थ्यांना परिचय करून देणे या उद्दिष्टांचे राष्ट्रीय पातळीवर सुसूत्रीकरण करणे शक्य आहे. परंतु या उद्दिष्टाच्या परिपूर्ततेसाठी साधने वेगळी असू शकतात. नागपूर, अमरावती परिक्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी 'धग' ही उद्धव शेळकेंची कादंबरी उपयुक्त ठरते. कारण या कादंबरीतील पात्रे, प्रसंग, परिवेश हा विदर्भ परिक्षेत्रातील असल्यामुळे येथील विद्यार्थ्याला प्रस्तुत कादंबरीबद्दल साहजिकच आपुलकी निर्माण होईल. अभ्यासक्रमाच्या दृष्टीने व कादंबरी या वाङ्मयप्रकाराला समजून घेण्यासाठी या तंत्राची विद्यार्थ्यांना मोलाची मदत मिळू शकते. कोकणावर आधारित कादंबरीचा परिवेश, भाषा नागपूर क्षेत्रातील विद्यार्थ्यांना नवा असतो. त्यामुळे कोकणावर आधारित कादंबरीचा समावेश मुंबई, गोवा विद्यापीठामध्ये सहज शक्य होऊ शकतो. यातून उद्दिष्टांची परिपूर्तता होते व अभ्यासक्रमात तफावत राहत नाही. परंतु याला मर्यादा आहे हेही नाकारता येत नाही. परंतु पदवी पातळीवर (विशेषत: प्रथम व द्वितीय वर्षासाठी) या पद्धतीने विद्यार्थ्यांमध्ये साहित्य अभिरूची निर्माण होण्यास मदत मिळू शकते.

अभ्यासक्रमाची मांडणी करताना प्रथम पदवी ते पदव्युत्तर असा क्रम असावा. पदवीच्या प्रथम वर्षापासून ते पदव्युत्तर वर्गापर्यंत अभ्यासक्रमाची एक शृंखला असावी. पदवी प्रथम वर्षापासून साहित्याची अधिक आवड निर्माण व्हावी असा अभ्यासक्रम असावा. सोपा ते कठीण असा टप्प्या टप्प्याने हा अभ्यासक्रम आखला पाहिजे. पदवी प्रथम वर्षालाच क्लिष्ट विषयाचे आकलनास विद्यार्थी मानसिकदृष्ट्या तयार झालेले नसतात. पदवी प्राप्त केल्यानंतर प्रत्येकच विद्यार्थी हा मराठीमध्ये पदव्युत्तर शिक्षण घेणार आहे असे गृहित धरूनच पदवी पातळीवरील

अभ्यासक्रमाची मांडणी नसावी. पदवी प्राप्त केल्यानंतर विविध स्पर्धा परीक्षांसाठी पूर्व तयारी पदवी पातळीवर होणे गरजेचे असते. अशा वेळी रोजगारभिमुख व स्पर्धा परीक्षांना साह्यभूत ठरणारा अभ्यासक्रम पदवी पातळीवर असावा. त्या दृष्टीने मराठी साहित्याचा इतिहास, महाराष्ट्राचा प्रबोधनाचा काळ, महाराष्ट्रातील सामाजिक, वाङ्मयीन चळवळी, आधुनिक महाराष्ट्रातील वैचारिक साहित्य अशा विषयांचा अंर्तभाव पदवी पातळीवर आवश्यक आहे. भाषिक कौशल्यांना पूरक असा अभ्यासक्रमही पदवी पातळीवर आखल्या गेल्यास विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुखतेस साह्यभूत ठरेल.

| | |
|---|---|
| पदवी पातळीवरील अभ्यासक्रम | • वाङ्मयप्रकारांचा परिचय, कथा, कविता, कादंबरी, नाटक, समकालीन साहित्याचा अभ्यास.<br>• अर्वाचिन साहित्याचा इतिहास.<br>• विविध वाङ्मय प्रवाह : संकल्पना व स्वरूप.<br>• प्राचीन वाङ्मयाचा इतिहास.<br>• वैचारिक साहित्याचे स्वरूप .<br>• वाङ्मयीन चळवळीचा इतिहास.<br>• वाङ्मयाची सांकृतिक पार्श्वभूमी.<br>• साहित्यशास्त्र (परिचयात्मक)<br>• मराठी लेखन नियम, मुद्रित संशोधन, संपादन कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम |
| पदव्युत्तर पातळीवरील अभ्यासक्रम | • साहित्यशास्त्र<br>• भाषाविज्ञान<br>• लोकसाहित्य<br>• विशेष ग्रंथकार<br>• प्राचीन वाङ्मयाचा सूक्ष्म अभ्यास<br>• वैचारिक साहित्य<br>• साहित्य संशोधन<br>• लघु शोधप्रबंध<br>• भाषांतरित साहित्य<br>• साहित्य प्रवाहाचे सूक्ष्म अध्ययन<br>• समीक्षा |

वरील काही मुद्यांना अनुसरून उद्दिष्टांची मांडणी केल्यास पदवी पातळीवरील अभ्यासक्रम हा विविध स्पर्धात्मक परीक्षांसाठी उपयोगी ठरेल. सोबतच विद्यार्थ्यांमध्ये वाङ्मयीन अभिरूची वाढविण्यास साह्यभूत ठरू शकतो. पदवी पातळीवर मुद्रित संशोधनाचे विशेष प्रशिक्षण दिल्यास विद्यार्थ्यांसाठी रोजगार उपलब्धतेसोबतच लेखन कौशल्यामध्ये निपुणताही प्राप्त होते. पदवी पातळीवरील अभ्यासक्रमाचे सर्वात महत्त्वाचे उद्दिष्ट म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये वाङ्मय अभिरूची निर्माण करणे व रोजगारक्षम बनविणे हेच असावयास हवे आणि त्या दृष्टीने संपूर्ण अभ्यासक्रमाचे नियोजन आणि मांडणी केली पाहिजे.

पदव्युत्तर पातळीवर अधिक सूक्ष्म व सखोल अभ्यासाची मांडणी केल्यास अधिक योग्य ठरेल. एकतर पदव्युत्तर पातळीवर प्रवेश घेणारा विद्यार्थी हा वैचारिक दृष्ट्या प्रगल्भ असतो. त्याला साहित्यातील अधिक ज्ञान प्राप्त करावयाचे असते. अशावेळी मराठी वाङ्मयातील अभिजात साहित्याचा, प्राचीन साहित्याचा, भाषाशास्त्र, साहित्यशास्त्र यांसारख्या क्लिष्ट विषयांचा अभ्यास करण्यास बौद्धिकदृष्ट्या तो तयार असतो. पदव्युत्तर पातळीवरच संशोधनाची पत्रिका असणे अनिवार्य आहे. पदव्युत्तर पातळीवरच संशोधनाचा अनुभव घेणे गरजेचे

ठरते. संशोधन करताना, विविध समस्यांवर उपाय शोधताना वैचारिक मंथनातून बौद्धिक पातळीचा कस लागतो. यातून पुढे विद्यार्थ्यांना संशोधनाकडे वळण्याची प्रेरणा मिळू शकते. पदव्युत्तर पातळीवरचा अभ्यासक्रम हा सविस्तर व सूक्ष्म असावा. यातून विद्यार्थ्यांना विषयाचे विषयाचे सखोल ज्ञान प्राप्त होऊ शकेल.

अभ्यासक्रमाची मांडणी करताना आपल्यासमोर दोन घटक महत्त्वाचे ठरतात ते म्हणजे शिक्षक व विद्यार्थी. शिक्षक ज्ञानसंपन्न व विद्यार्थी जिज्ञासू असला तर अभ्यासक्रमाची उद्दिष्टे सफल होवू शकतात. परंतु दोन–पैकी कोणताही एक घटक दुर्बल ठरला तर उद्दिष्टांच्या परिपूर्ततेची शक्यता मंदावते. असे असले तरीही शिक्षक हा आपल्या विद्यार्थ्यांना अधिक जाणत असतो. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मूल्यमापणाचे काही अधिकार त्याला द्यावयास हवे. यासाठी कमीतकमी २० गुणांचे आंतरिक मूल्यमापन महाविद्यालयाने केल्यास विद्यार्थ्याच्या क्षमतेला न्याय मिळू शकतो. म्हणून विद्यार्थ्याचे आंतरिक मूल्यमापन महाविद्यालयामार्फत करावयास हवे.

मराठी विषयाच्या अध्यापनात आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करणे ही काळाची गरज आहे. केवळ पारंपरिक पद्धतीने (खडू–फळा) अध्यापन करणे २१व्या शतकात पुरेसे होणार नाही. ओ. एच. पी, संगणक, दृक–श्राव्य यंत्रांचाही उपयोग अध्यापन पद्धतीत करावयास हवा. आधुनिक तंत्राच्या साह्याने मराठीच्या विद्यार्थ्याला ज्ञानसंपन्न केल्यास इतर विषयाच्या विद्यार्थ्यासोबत तो स्पर्धा करण्यास सक्षम राहील व त्याला यशही प्राप्त होऊ शकेल.

❖❖❖

# मराठीतील स्त्रियांच्या कथालेखनांचे स्वरूप

प्रा.सौ. लीना आनंद शेंडे
एम्.कॉम., एम्.ए. (मराठी), बी.एड., मराठी विषयात पीएच.डी. संशोधन सुरू
प्राध्यापक, पी.जोग कॉलेज ऑफ सायन्स अॅन्ड कॉमर्स
मयूर कॉलनी, कोथरूड, पुणे ३८
E mail: leenashende2@gmail.com भ्रमणध्वनी ९७६६५५००३६

एक स्वतंत्र वाङ्मयप्रकार म्हणून प्रतिष्ठा पावलेल्या मराठी कथेच्या मागे श्रीमंत वारसा आहे. लोककथा कर्णपरंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे व दुसऱ्या पिढीकडून तिसऱ्या पिढीकडे असा प्रवास करीत आल्या आहेत. लोकांचे मनोरंजन करून त्यांना अध्यात्माचे व भक्तिमार्गाचे धडे देणे हेच त्यावेळी त्याचे प्रयोजन दिसून येते. अद्‌भुतता रंजविण्यासाठी व त्याचबरोबर बोध देण्यासाठी अवतरलेल्या या लोककथांत कहाण्यांना स्वतंत्र स्थान आहे. म.मा. दत्तो वामन पोतदारांनी तर कहाण्या म्हणजे मराठी उपनिषदेच असे म्हटले आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या आरंभी राजकीय स्थित्यंतर घडून आले. अव्वल इंग्रजीच्या काळात अनेक पाश्चात्य कथांची भाषांतरे झाली. कथा हा प्रकार मराठीत रूजला. पंचतंत्र, सिंहासन बत्तिशी, नीतीकथा, अरबी भाषेतील सुरस आणि चमत्कारिक गोष्टी या प्रकारच्या प्रातिनिधिक कथा निर्माण झाल्या.

ज्ञानप्रसारक ते करमणूक पर्यंत म्हणजे १८०० ते १८९० पर्यंत गोष्टी लिहिल्या जात होत्या. त्यात घटनेला प्राधान्य होते व वाचकांना काहीतरी बोध द्यावा यावर भर होता. १८९० ते १९१७ पर्यंत हरिभाऊंची 'करमणूक' वाचकांची सेवा करीत होती. हरिभाऊ लिहितात, ''जी गोष्ट जनसमूहाने अवश्य करावी म्हणून केसरी, सुधारक एखाद्या कठोर पित्याप्रमाणे कठोर शब्दांनी सांगणार व समाजाचे अप्रशस्त वर्तन झाल्यास त्यावेळी वाक्प्रतोदाचे तडाखे लगावणार तीच गोष्ट हे पत्र प्रेमळ मातेप्रमाणे गोड गोड शब्दांनी व चांगल्या गोष्टींनी अप्रशस्त वर्तनाबद्‌दल मायेचे शासन करणार.'' या संकल्पनांनुसार करमणुकीतील गोष्टी दिवाणखान्यातील टेबलापासून फणीकरंड्याच्या पेटीपर्यंत गेल्या. रंजनाबरोबर जागृती करण्याचे व्रतच जणू या काळातील लेखकांनी घेतले.

काशिबाई कानिटकर हयांचे नाव आद्यलेखिका म्हणून मानावे असे दि.वी.अमोणकर यांनी म्हटले आहे. (रत्नाकर, ऑक्टोबर १९३०, मराठी लघुकथा. लेखांक ६) 'चांदण्यातल्या गप्पा' हा त्यांचा प्रसिद्ध कथासंग्रह. त्यांच्या कथेचे स्वरूप सरळ आणि बाळबोध आहे जितीतत्व शिकविण्याच्या हव्यासाने बोधप्रधान झाल्या आहेत. निसर्गवर्णन, जीवनभाष्य, काव्यात्मक वर्णन आणि अलंकारिक भाषा हे त्यांच्या कथेचे वैशिष्ट्य. 'शिसवीपेटी', 'वनवास', 'सारसबाग', इ. त्यांच्या कथा गाजलेल्या आहेत.

मराठी ज्ञानप्रसारकादी जवळ जवळ ४०-४५ नियतकालिके १९२० पर्यंतच्या कालखंडात कथा छापीत असत. 'करमणूक', 'मनोरंजन', 'नवयुग', 'विविधज्ञानविस्तार', 'अरविंद' ही त्यातील प्रमुख नियतकालिके. या सर्व नियतकालिकांचा स्त्रियांकडे व त्यांच्या प्रश्नांकडे पाहण्याचा दृष्टिकोन सहानुभूतीचा होता. सुवासिनी, लीला, काशिबाई हिर्लेकर, वामनसुता, लक्ष्मीतनया, हिराबाई पेडणेकर, लक्ष्मीबाई टिळक, काशीबाई देवधर, आनंदीबाई देशमुख, इ. नावे कथालेखिका म्हणून झळकलेली दिसतात.

१९२० ते १९४०या पर्यंतच्या कालखंडात स्त्रियांच्या कथालेखनाला वेग आला होता असे दिसतो. कॅप्टन लिमये, दिवाकर कृष्ण व आदींच्या लेखनामुळे 'गोष्टी' ची 'कथा' झाली. कथा जी श्रवणीय होती ती वाचनीय झाली. गिरीजाबाई केळकरांच्या कथालेखनांचे स्वरूप आकर्षक नाही. बिस्किटाच्या साच्यासारख्या 'शारदा' नाटकाच्या कथानकासारख्या गोष्टी लेखक भराभर प्रसवीत आहेत या विषयी निषेध व्यक्त करून त्या लिहीतात, ''माझ्या कल्पनेप्रमाणे समाजातील रोजची चित्रे करमणूकीला यावी व जरा गंमत वाटावी व गोष्ट वाचून झाल्यावर वाटल्यास मेंदूत काहीतरी विचार रहावा असे ठेवीत असे.'' (समाजचित्रे, भाग १: माझे शब्द. पृ. ३)

आनंदीबाई शिर्के ह्यांच्या कथांचा बहर १९२० नंतर आला. पण जून १९१७ च्या 'मनोरंजन' मासिकामध्ये त्यांची 'गुप्तमंजूषा' ही कथा प्रकाशित झाली होती. 'प्रभावती', 'बेगमदिलआरा', 'आमची दिवाळी', 'हे स्वप्न तर नाही ना?' अशा कथांमधून रहस्यांचा उपयोग आकस्मिक आणि असंभाव्य प्रसंगांची गर्दी दिसून येते. ह्या काळाचा विशेष तत्त्वबोध आणि रंजकता ह्यांचा समतोल साधण्याचा प्रयत्न आहे. त्यांची भाषाशैली प्रसन्न क्वचित कृत्रिम अशी आहे.

ह्या कालखंडातील स्त्रियांचे कथालेखन हा एक कौतुकाचा विषय होतो, कारण शिक्षित आणि साक्षर अशा स्त्रियांची संख्या तुलनेने कमी होती. त्यातही ज्या शिकलेल्या आणि समाजकार्य करणाऱ्या स्त्रिया होत्या, त्या सामाजिक विषयावर आणि त्यातही स्त्रियांच्या प्रश्नावर निबंधच लिहीत. त्यामुळे स्त्रियांच्या मनाचा स्वाभाविक अविष्कार हरीभाऊंच्या कथांमधून आणि गुर्जरांच्या कथांमधून अधिक होत होता. या कालखंडातील लेखिकांच्या जवळ ठाम जीवनदृष्टी होती.रुत्यांनी लेखन केले ते आस्थेने आणि वृत्तीगांभीर्याने. या नवशिक्षित, जागृत लेखिकांनी स्त्रीच्या व्यथा, तिची स्वप्ने, तिचे प्रश्न समजावून घेतले होते आणि ते त्यांनी धीटपणाने मांडले. पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीला उपेक्षिले जाते यांची त्यांना खंत वाटत होती. स्त्री हा त्यांच्या चिंतनाचा विषय होता. १९२५ नंतर कॅप्टन लिमये, दिवाकर कृष्ण यांच्या वाटेने जाण्याऐवजी मराठी कथा फडके—खांडेकरांच्या वाटेने गेली आणि त्यामुळेच या कालखडांच्या अखेरीस मराठी कथा भावविवशता, स्वप्नरंजन, तंत्रबद्धता, इ. च्या विळख्यात सापडून निष्प्राण झाली. फडके—खांडेकरांची कथा जेव्हा प्रभावी होती तेव्हा मराठी लेखिका मात्र साचेबंद, ठोकळेबाज कथेला मुक्त करू पाहत होत्या. 'मनोरंजन', 'भगिनीसमाचार' या सारख्या स्त्रीविषयी उदार दृष्टिकोन बाळगणाऱ्या नियतकालिकांची वाढ हे या कालखडांचे वैशिष्ट्य. त्यामुळे या कालखंडातील कमलाबाई टिळक, क्षमाराव, कृष्णाबाई, विभावरी, गीता साने, आनंदीबाई किर्लोस्कर, पिरोज, कुसुमावती देशपांडे इ. लेखिकांनी स्त्रीमनाचा शोध जाणीवपूर्णक घेतला आहे. 'कृष्णाबाई' या टोपण नावाने लिहिणाऱ्या सौ. मुक्ताबाई दीक्षित यांचे कथासंग्रह म्हणजे 'मानसलहरी' (१९३३) व अनिरुद्ध प्रवाह (१९३७) त्यांनी कथांतून स्त्रीच्या मनातील आंदोलने टिपण्याचा प्रयत्न केला आहे.

१९३३ साली विभावरी शिरूरकर यांचा 'कळ्यांचे नि:श्वास' हा कथासंग्रह प्रसिद्ध झाला. त्यांनी तत्कालीन 'सामाजिक प्रश्नांना' वाचा फोडली. प्रौढ कुमारिकेच्या व्यथा सांगताना त्यांनी अनेक प्रश्न उभे केले. विभावरीबाईंच्या प्रमाणे सूक्ष्म मनोविश्लेष्ण व स्त्री जीवनातील समस्यांचे वृत्तीगांभीर्याने केलेले चित्रण हे सौ. कमलाबाई टिळक यांच्या कथेचे विशेष आहे.

कुसुमावती देशपांडे ह्यांच्या कथेतून काव्यात्मता स्त्रीच्या दु:खाची विविध रूपे जाणवतात. ''मी का लिहिते?'' या प्रश्नाचे उत्तर देताना त्या लिहितात, ''निव्वळ दु:ख सुसह्य करण्याच्या हेतूने नव्हे तर सर्व अनुभवांतच वाटेकरी हवे असण्याच्या मानसिक धर्मामुळे आपले जीवनविषयक संशोधन, अनुभवांचे पडताळे दुसऱ्यापुढे सादर करण्याची इच्छा होते.'' (पासंग, २री आवृत्ती पृ. ३७) जीवन समजून घेण्याचा लेखन हा एक उत्तम मार्ग आहे. त्यांना लेखन म्हणजे आत्मसंकरण आहे असेही वाटते.

१९४० च्या सुमारास मराठी कथा स्वत्व गमावून बसते की काय असे वाटू लागले होते. फडके—खांडेकरादी लेखक तीच ती वळणे गिरवीत होते. कुसुमावती देशपांडे या लेखिकेला वामनराव चोरघडे यांच्याप्रमाणे कथाक्षेत्रातील आवर्त, सांकेतिकता, भाववशता, यांत्रिकता जाणवलेली होती. मराठी कथेत जीवनाच्या काही नव्या अनुभूती गाडगिळादी लेखकांच्या कथांतून व्यक्त होउ लागल्या.'कथानका' विषयीच्या संकल्पनेत एक बदल घडून आला. प्रभाकर पाध्ये म्हणतात त्याप्रमाणे लेखक आजपर्यंत आपल्या कथानकाकडे स्थलकालावलंबी विकासाच्या रूढ कल्पनेने पाहत असत. (प्रतिभा १.२.१९३५) पण कथानक ठोकळ्यांच्या घरासारखे रचायचे नाही. सौ. वसुंधरा पटवर्धन दीर्घकाल कथालेखन करीत होत्या. गेल्या तपात त्यांनी भल्याभल्यांशी पैजा जिंकतील अशा कथा दशकांनी लिहिल्या आहेत असे कौतुकाचे माप टाकणाऱ्या पु.भा. भाव्यांचे मत अतिशयोक्त वाटते. शोध (१९५४), अंतरपाट (१९६२), पिपाणी (१९६१). तारा वनारसे यांनी अल्पकाळ लेखन केले. 'पश्चिमकडा' ह्या कथासंग्रहातून स्त्रीच्या दु:खाचाच वेध घेतला. ताराबाईंच्या कथांतून सूक्ष्म व तरल भावना साक्षात करण्याची त्यांची धडपड आहे. कधी कधी त्यांच्या कथेचे निवेदन वर्तमानकाळ योजून केलेले असते त्यामागे वर्तमानाची जाणीव करून देण्याचाच प्रयत्न आहे.

प्रा. शांता शेळके ह्यांनी दीर्घकाल लेखन केले. शिरीष पै यांना लेखनाचा वारसा आचार्य अत्रे ह्यांच्याकडून प्राप्त झाला. 'चैत्रपालवी', 'सुखस्वप्न', 'मयूरपंख' इ. त्यांच्या कथासंग्रहातील कथा म्हणजे स्त्रीच्या दु:खाचा शोध. सरिता पदकी यांचा 'बारा रामाचं देऊळ' (१९६६) ह्या संग्रहातून कथांमध्ये एक निवेदक आणि त्याला स्त्रीचे दु:ख चित्रीत करण्यात 'रस' आहे असे दिसून येते.

सौ. सुधा नरवणे यांच्या कथा बोलक्या रेखाचित्रासारख्या आहेत. 'मरालिका' (१९६४), 'दोलाचाल' (१९७३) त्यांनी आपल्या कथांतून रंगविलेल्या काही स्त्रिया परिस्थितीचे आव्हान स्वीकारतात. 'मोडेन पण वाकणार नाही' असा त्यांचा बाणा असतो. इंदिरा संतांचे 'श्यामली' (१९५२), 'कदली' (१९५५), 'चैतू' (१९५७) हे कथासंग्रहातून उपेक्षितांच्या जीवनाचे दर्शन घडवावे असे त्यांना वाटते. कमला फडके यांनी 'मंकरद' (१९४४), 'एक होता राजा' (१९४४), 'गुलमोहर' (१९४८) इ. कितीतरी कथासंग्रहातून वाचकांचे घटकाभर रंजन

व्हावे हया उद्देशाने लिहिल्या. स्नेहलता दसनूकर यांचे 'कळप', 'मायावी', 'सुजाता' इ. कथासंग्रह आहेत. १९६६ मधील 'कळप' ते १९७८ मधील 'सुजाता' ह्यामध्ये प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या कथालेखनाचा प्रवास पाहिला की त्यांच्या कथा घटनाप्रधान, कुंटुबकथा आहेत. योगिनी जोगळेकरांचे विपुल कथालेखन 'झुंजमुंजू' (१९५४) ते 'मांडव' (१९७८) कौटुंबिक कथांचा प्रवास आढळून येतो. ''मला जे लिहावसं वाटतं ते प्रामाणिकपणानं कथांच्या रूपानं लिहिल आहे'' अशी भूमिका डॉ.सरोजिनी बाबर यांनी मांडली. 'डोंगरची मैना', 'नव्याची पुनव' इ. कथासंग्रहातून त्यांनी ग्रामीण परिसरातील स्त्रीच्या व्यंगाचे चित्र रेखाटले.

१९६० नंतर जी.ए.कुलकर्णी यांची कथा व्यक्तिकेंद्रीत नाही तर माणसामाणासांतील संबंधांची कथा आहे. 'गोष्ट साधी सरळ सोपी' या नावाचा छाया दातार यांच्या कथासंग्रहातून करियरस्टिक पुरुषांच्या बरोबर संसार करण्याऱ्या स्त्रीचे दर्शन अढळते. पद्मजा फाटक आणि मोहिनी वर्दे ह्यांच्या कथालेखनातून कौटुंबिक वळणाच्या कथा आहेत. सुमती क्षेत्रमाडे, मृणालिनी देसाई, नयना आचार्य, शांता किर्लोस्कर, लैला महाजन इ. लेखिकांनी स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पांढरपेशा मध्यमवर्गीय कुटुंबांच्या विविध घटकांमधील नाती, त्यांची जीवनदृष्टी, त्यांची मूल्यसरणी, त्यांची मनातील वादळे, त्यांचे आग्रह—दुराग्रह हयांचे रेखाटन केले आहे.

सौ. ज्योत्स्ना देवधर यांचे कथालेखनही विपुल आहे. कराड येथे भरलेल्या महाराष्ट्र कथालेखिका संमलेनाच्या (१९७५) त्या अध्यक्षा होत्या. त्यांच्या कथात आढणाऱ्या स्त्रियांचे दु:ख वेगवेगळे आहे. 'बोच' (१९७३), 'गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या' (१९६९), 'झरोका' (१९७८) इ. त्यांचे कथासंग्रह. सौ. शकुंतला गोगोटे यांचे 'प्रसाधन', 'नजरबंदी', 'शहारा' इ. कथासंग्रह लिहिले आहेत. सौ. शैलजा राजे यांचेही 'अबोली', 'रातगंधिनी' इ. कथालेखन विपुल आहे. विजया राजाध्यक्ष ह्यांच्या कथांचा प्रवास 'अधांतर' (१९५५) पासून ते 'उघडमीट' (१९७८) असा दिसतो. एखादया जाणवलेल्या प्रतिमेमधून त्यांचा अनुभव साक्षात होतो. आत्मकेंदित वर्गाच्या व्यथा, त्यातील स्त्री—पुरुषांची विचारपद्धती, त्यांचा पराभव, त्यांची मूल्यसरणी, कुटुंबातून पार हरवलेला संवाद याचे चित्रण दिसून येते.

गौरी देशपांडे यांच्या कथांतून आढणारी स्त्री वेगळया चेहऱ्यामोहऱ्याची आहे. १९८४ नंतर कथेचे वळण बदलले. अविच्छिन्न सामित्व लाभलेल्या पुरुषात्वचा व नव्याने जाग्या झालेल्या स्त्रीचा झगडा आता सुरू झालेला आहे. सानिया यांच्या लेखनसामर्थ्याचा प्रत्यय त्यांच्या अनेक कथांतून येतो. लेखिकेला जे वास्तव जाणवले ते तिच्या भोवतालचेच आहे अशा अवतीभोवतीच्या जगातील स्त्रीच्या मनाचा तळ गाठण्याची शक्ती त्यांच्याजवळ आहे. या बदलत्या परिस्थितीचे भान असलेल्या गौरी देशपांडे, सानिया, अंबिका सरकार, सिरूर, सुकन्या आगाशे ह्यांनी आपला अनुभव वृत्तीगांभीर्याने मांडून कथेच्या विकासाला वेगळे वळण दिले.

मराठीतील सर्व कथालेखिकांत कमल देसाई यांची कथा वेगळ्या वळणाची निराळ्या तोंडवळण्यांची आणि खऱ्या अर्थाने 'स्व'ला शोधणारी ही कथा दु:स्वप्नासारखी आहे असे डॉ.रा.भा. पाटणकर म्हणतात. ज्ञानेश्वर नाडकर्णी यांना त्यांची कथा निवेदनाच्या बुडाशी असलेल्या कालप्रवाहाच्या भूतभविष्यातील चैतन्यशीलतेचा वेध घेणारी आहे असे वाटते.

सर्वसामान्यपणे आंरभीच्या काळात स्त्रिया 'प्रेमानुभवाचे चित्र' रेखाटतात. १९८० नंतर व्यक्तीस्वातंत्र्य ही कल्पना येते. नातेसंबंधातील वीण उसवायला लागली. अर्थिक स्वातंत्र्य लाभल्यामुळे स्त्रियांमध्ये स्वत:च्या मतावर ठाम राहण्याचा आत्मविश्वास निर्माण झाला.

कथा हा जीवनाचा कवडसा आहे. जीवनाचे जीवनपण कथेतून दिसते. कथा वाचकाला अनुभव संपन्न करीत करीत त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा पर्यायाने विकास साधीत असते. कथा ही जीवित यात्रेतील पाथेय आहे.

## संदर्भ


१. मराठी लेखिका : चिंता आणि चिंतन : भालचंद्र फडके

२. मराठी निबंध : म. मा. अमोणकर

३. कथा : संकल्पना आणि समीक्षा : सुधा जोशी

४. मराठी कथेची स्थितिगती : अंजली सोमण


❖❖❖

# राजन गवस यांची ‘तणकट’ कादंबरी आणि राजकारण

प्रा. दिपक निवृत्ती बावस्कर
सहा. प्राध्यापक
श्रीमती जी. जी. खडसे महाविद्यालय,
मुक्ताईनगर, जि. जळगाव, भ्रमणध्वनी ९५७९८३४२४०

## प्रस्तावना

साहित्य आणि राजकारण या विषयावर संशोधनात्मक लेखन करीत असताना साहित्य आणि राजकारण यांच्यातील सहसंबंध शोधणे महत्त्वाचे ठरते. साहित्याच्या संदर्भात असे म्हटले जाते की, ‘साहित्य हा समाजाचा आरसा असतो.’ म्हणजेच साहित्यात समाजाचे प्रतिबिंब पडते. समाजात त्या त्या काळात जे घडते त्याचे प्रतिबिंब त्या त्या काळातील साहित्यात पहावयास मिळते आणि त्या त्या काळातील साहित्याचा समाजावर देखील परिणाम होत असातो. एकूणच साहित्य आणि समाज यांच्यात सहसंबंध आहे असे लक्षात येते.

कोणताही समाज म्हटल्यावर त्याचा राजकारणाशी संबंध हा असतोच; कारण राजकारणाचा हेतूच मुळात समाजाचा विकास साधणे हाच आहे. म्हणूनच राजकारण आणि समाज यांचा परस्पर संबंध येत असतो. प्रत्येक समाजावर राजकारणाचा प्रभाव व परिणाम होत असतो. मग तो विधायक किंवा विघातकदेखील असू शकतो. म्हणूनच राजकारणाचा समाजावर आणि पर्यायाने साहित्यावरदेखील परिणाम होत असतो. आजच्या मराठी साहित्याचा विचार केला तर या साहित्यात आधुनिक काळातील राजकारणाचे वास्तव स्वरूप प्रकट होताना दिसून येते. म्हणूनच राजन गवस यांच्या‘तणकट’ या कादंबरीतून आधुनिक काळातील कृषिजनसंस्कृतीतील खेड्यातील राजकारणाचे वास्तव कशाप्रकारे प्रकट झाले आहे; त्याचा शोध सदर शोधनिबंधातून घ्यावयाचा आहे.

राजन गवस हे १९८० च्या दशकानंतरचे एक प्रमुख कादंबरीकार म्हणून आळखले जातात. त्यांच्या कादंबरी वाङ्मयातून त्यांनी अनेकविध विषयांवर प्रकाश टाकलेला दिसतो. त्यांच्या प्रारंभीच्या कादंबऱ्यांमधून त्यांनी देवदासी प्रथेचे वास्तव चित्रण केले आहे. तर नंतरच्या कादंबऱ्यांमधून गावगाड्याचे, खेड्याचे तेथील प्रथा, परंपरा, धार्मिकता, श्रद्धा—अंधश्रद्धा, सण, उत्सव, व्यक्ती, प्रदेश, संस्कृती, बोलीभाषा, शेती व शेतीसंबंधित व्यवहार, बलुतेदार, गावातील समाजकारण व राजकारण या सर्व घटकांचे चित्रण प्रखरतेने केले आहे.

## राजन गवस यांचे कादंबरीवाङ्मय

राजन गवस यांच्या कादंबरी लेखनाचा विचार केला तर त्यांनी आतापर्यंत सहा कादंबऱ्या लिहिलेल्या आहेत. त्यापैकी ‘चौडंक’ (१९८५), ‘भंडारभोग’ (१९८९) त्यांच्या आरंभीच्या दोन महत्त्वपूर्ण कादंबऱ्या आहेत. या दोन्ही कादंबऱ्यातून मराठी कादंबरी विश्वाला अपरिचित असे अनुभवविश्व प्रथमत: व्यक्त झाले. या कादंबऱ्यातून देवदासी प्रथेचे, समस्येचे, त्यांच्या असहाय्य जगण्याचे दर्शन घडते. यानंतर ‘धिंगाणा’ (१९९१) या कादंबरीतून कृषिकेंद्रित खेड्यातील जीवनाचे दर्शन घडते. यानंतरच्या कादंबऱ्यांमध्ये महाराष्ट्रातील ऐंशीच्या दशकानंतर कृषिसंस्कृतीच्या विविध ताणतणावाचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न गवस यांनी केला आहे. ‘कळप’ (१९९७) या कादंबरीतून बदलत्या सामाजिक व संस्कृतिक कृषिजन व्यवस्थेचे प्रत्ययकारी चित्रण गवस यांनी केले आहे. तसेच विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात प्रसिद्ध झालेली ‘तणकट’ (१९९८) ही त्यांची एक महत्त्वाची कादंबरी आहे. यानंतर ‘ब—बळीचा’ (२०११) या कादंबरीतून कृषिकेंद्रित खेड्यातील जीवनाचे दर्शन घडते. त्यांच्या ‘तणकट’या कादंबरीस साहित्य अकादमीचे २००१ चे पारितोषिकही प्राप्त झाले आहे. या कादंबरीतून गावातील भ्रष्ट राजकारणाचा गावकऱ्यांवर होणारा अनिष्ट परिणाम गवस यांनी चित्रित केला आहे.

## राजन गवस यांची ‘तणकट’ कादंबरी आणि राजकारण

‘तणकट’ (१९९८) या कादंबरीतून गवस यांनी कांबळे या महारवाड्यातील महाविद्यालयीन शिक्षण घेत असलेल्या तरुणाची कथा साकारली आहे. हा तरुण एका खेड्यात राहून तालुक्याच्या ठिकाणी महाविद्यालयीन शिक्षणासाठी जातो. तो जातीने महार असल्यामुळे महारवाड्यात राहतो. त्याचा हा महारवाडा ३० ते ४० घरांचा व २०० लोकांचा त्यालाच लागून मांगवाडा, वडरांची वस्ती व त्यापासून जवळच गावातील मुख्य घरांची वस्ती.

अशा या छोट्याशा गावात कबीरचे कुटुंब वास्तव्य करते. त्याचा बाप गावातील सधन शेतकऱ्याच्या शेतात कामाला जातो व आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह भागवतो. कबीर शिक्षणासाठी जेव्हा तालुक्याच्या गावाला जातो, तेव्हा त्याला डॉ. बाबासाहेबांच्या विचारावर आधारलेल्या चळवळीची माहिती मिळते. अशा या सुधारणावादी चळवळीत आपण भाग घ्यावा अशी त्याची इच्छा होते; परंतु त्या चळवळीमध्ये विचार व कृतीच्या बाबतीत त्याला तफावत दिसते. त्याच काळात त्यांच्या गावात बाळासाहेब शेडवाळे ही व्यक्ती गावातील डेअरी, सोसायटी, पतसंस्था यांचा संचालक बनते व आपल्या तर्कबुद्धीच्या जोरावर त्या संस्थांमध्ये शेडवाळे आर्थिक घोटाळे करतो. त्यासाठी गावातील महारवाड्यातील दादू हेड्या, लंगडा हाऱ्या, मिचका भिमा यांची मदत घेतो. जेव्हा गावातील संस्थांच्या चेअरमनला व संचालकांना ही बाब लक्षात येते, तेव्हा हा बाळासाहेब शेडबाळे त्यांच्याविरुद्ध महारवाड्यातील लोकांना पेटवतो व स्वतःच्या स्वार्थासाठी सवर्ण विरुद्ध दलित अशी परिस्थिती निर्माण करतो. महारवाड्यातील तरुणांना भुलथापा देवून त्यांचा भांडणासाठी गैरवापर करतो. परिणामी गावातील सवर्ण लोक महारवाड्यातील लोकांना कामावर येऊ देत नाहीत. परिणामी त्यांची उपासमार होते. महारवाड्याची अवस्था वाईट होते. या घटनेमुळे तालुक्याच्या ठिकाणी काम करणारे दलित चळवळीतील नेते व कार्यकर्ते केवळ पोकळ  आश्वासने देवून स्वार्थी राजकारण करीत बसतात. या सर्व घटनेचा कबीरच्या मनावर खोलवर परिणाम होतो त्याला या आधुनिक काळातील चळवळींच्या वास्तवाचे भान येते तो स्वतः या विरोधात पेटून उठतो आपल्या समाजाला न्याय देण्यासाठी प्रयत्न करतो. पण त्याचा हा संघर्ष प्रबळ सत्ताधाऱ्यांसमोर तोटका ठरतो.

या सर्व वातावरणामुळे कबीर कांबळे हा तरुण अस्वस्थ होतो. विचारात पडतो. या कादंबरीच्या प्रस्तावनेत या कादंबरीचा आशय स्पष्ट करतांना नारायण कुळकर्णी–कवठेकर यांनी आपले मत व्यक्त केले आहे. त्यांच्या मते, "कबीर शेवटी विचारांती एका निष्कर्षाप्रती येतो, या मातीतलं तणकट जात नाही, जाणार नाही, आता तो फक्त गच्च डोंक धरून बसतो, मेंदूत तणकटाचं बी पडू नये, म्हणून आटोकाट प्रयत्न करतो."[१] तसेच या कादंबरीचा आशय स्पष्ट करताना रणधीर शिंदे यांनी आपले मत व्यक्त केले आहे. त्यांच्या मते, "तणकट मधून गवस यांनी समकालीन कृषिसंस्कृतीतील तळ ढवळून टाकणारे खोलवरचे समाजदर्शन घडवले आहे. गावाच्या स्थलावकाशात घडणारे अंतःस्थ खळबळीचे नाट्य विपरीत व्यवहारामुळे हे जीवन कसे करपून जाते आहे आणि चहू अंगानी फोफावणारे गुंतवळ असणारे तणकट कसे फैलावते आहे याचे कथन येते. हे विपरीत राजकारणाचे विद्रूप ढग अचाानक जमा होतात आणि सगळीकडून काळवंडून येतं. कशाचंच नामोनिशाण उरत नाही याची जाणीव ही कादंबरी करुन देते."[२]

एकूणच गावातील समाजकारण, राजकारण, व्यवहार यांच्याकडे तो तटस्थतावादी बुद्धीने पाहतो. तसेच गावातील सवर्ण आणि दलितांच्या ढोंगी व दुटप्पी धोरणाकडे बघून त्याच्या मनांत संताप व चीड निर्माण होते. त्याच्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव असतो. त्यांनी केलेल्या कार्याकडे तो व्यापक दृष्टिकोनातून पाहताना दिसतो. याच काळात समाजामध्ये आंबेडकरी चळवळी सुरू असतात; परंतु त्या चळवळीमध्ये विचार व कृतीच्या बाबतीत त्याला तफावत दिसते. तसेच बाळासाहेब शेडबाळे ही व्यक्ती आपल्या तर्कबुद्धीच्या जोरावर समाजामध्ये तणकटाचे बीज पेरते व त्याचा गावातील राजकारणावर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे गावातील वातावरण गढूळ होते. गावातील एकसंधपणाला तडे जातात. गावात भांडण, तंटे, ताणतणावाचे वातावरण निर्माण होते. अनेक नवनवीन समस्या व प्रश्न जन्म घेतात. या कादंबरीतून गेल्या दोन–तीन दशकातील समाजकारण व राजकारण यात कशी दिशाहीनता आणि मूल्यभ्रष्टता आली याचे विदारक वास्तव चित्रित झालेले आहे. आधुनिक काळातील विविध जातीतील नवशिक्षित तरुणांना हतबल करून टाकणारे समकालीन वास्तव या कादंबरीतून राजन गवस यांनी प्रवाहित केलेले दिसते. चळवळींची दिशाहीनता, मूल्यांचा ऱ्हास, वलंत समस्या, आदर्शंचे विडंबन, जीवनातील निरर्थकता याचे वास्तव प्रकटीकरण तणकटमधून प्रत्ययास येते तणकटमधून कबीर कांबळे या संवेदनशील, विवेकशील मनाच्या तरुणाची कथा पर्यायाने विसाव्या शतकातील प्रतीनिधिक स्वरूपात एका गावगाड्याची कहाणी साकार झाली आहे.

## समारोप

अशाप्रकारे कबीर कांबळे शिक्षण घेऊन चांगल्या विचारांनी समाजाला बदलण्याचा, समस्या व प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करतो; परंतु त्याचा हा संघर्ष प्रबळ सत्ताधाऱ्यांसमोर, भष्ट्र राजकारण्यांसमोर तोटका ठरतो. ही कादंबरी एका माणसाचे, एका गावाचे, जातीचे म्हणता–म्हणता मुलभूत, मानवी वृत्ती – प्रवृत्तीचे दर्शन घडवते. ही कादंबरी गाव आणि गावकुसाबाहेरील जग, तेथील राजकारणामुळे निर्माण झालेले ताणतणाव,

नातेसंबंध, समूहभाव, नवेसत्तासंबंध, समूहमानस, जातीयतेची उतरंड याबद्दल जीवनार्थ व्यक्त करते. तसेच आधुनिक काळातील शहरकेंद्रित मूल्यदृष्टीचे ग्रामजीवनावर होणारे परिणाम व त्यामुळे होणारी स्थित्यंतरे या कादंबरीतून चित्रित होतात. एकूणच तणकट ही कादंबरी आधुनिक काळातील खेडयातील राजकारण कोणत्या दिशेने वाटचाल करीत आहे त्याचे प्रखर वास्तव चित्रित करते.

## निष्कर्ष

राजन गवस यांच्या 'तणकट' या कादंबरीचा साहित्य व राजकारण या अंगाने विचार केला असता आधुनिक काळातील खेड्यात बदलत्या भ्रष्ट राजकारणामुळे निर्माण झालेले प्रश्न व समस्यांचे प्रखर वास्तव या कादंबरीतून प्रतीत होताना दिसते.

१) या कादंबरीतून ग्रामजीवनात गेल्या दोन तीन दशकात होणाऱ्या समाजकारणातील आणि राजकारणातील दिशाहीनता आणि मूल्यभ्रष्टता यांचे विदारक वास्तव प्रकट झाले आहे.

२) आधुनिक काळातील नवशिक्षित तरुणांना भ्रष्ट राजकारणापुढे हतबल करुन टाकणारे समकालीन वास्तव या कादंबरीतून प्रवाहित होतांना दिसते.

३) या कादंबरीतून राजकीय, सामाजिक चळवळींची दिशाहीनता, मूल्यांचा ऱ्हास, ज्वलंत समस्या, आदर्शांचे विडंबन, जीवनातील निरर्थकता या प्रश्नांचे वास्तव प्रकटीकरण प्रत्ययास येते.

४) 'तणकट'मधून कबीर कांबळे या संवेदनशील तरुणाच्या रूपाने विसाव्या शतकातील प्रतिनिधिक स्वरूपात एका गावगाड्याची कहाणी व्यक्त झाली आहे.

५) 'तणकट'मधून राजन गवस यांनी बदलते खेडे व तेथील चळवळींच विपरीत स्वरूप प्रखरतेने चित्रित केलेले आहे.

६) आधुनिक काळातील भ्रष्ट राजकारणाचे ग्रामजीवनावर होणारे विघातक परिणाम व त्यामुळे होणारी स्थित्यंतरे या कादंबरीतून चित्रित होतात.

७) ही कादंबरी गाव आणि गावकुसाबाहेरील जग तेथील ताणतणाव, नातेसंबंध, समूहभाव, नवे सत्तासंबंध, समूहमानस, जातीयतेची उतखंड याबद्दलचा जीवनार्थ व्यक्त करते.

अशाप्रकारे राजन गवस यांच्या तणकट या कादंबरीतून आधुनिक काळामधील खेड्यातील राजकारणाचे प्रखर वास्तव प्रकट झाले आहे.

## संदर्भ सूची

१) तणकट – लेखक राजन गवस – प्रस्तावना, नारायण कुळकर्णी–कवठेकर, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, चौ. आ. २०१० पृ. १

२) ढव्ह आणि लख्ख ऊन – संपादक– रणधीर शिंदे, लोकवाडमयगृह, मुंबई, प.आ. २०१०, प्रस्तावना, पृ.१७

## संदर्भ ग्रंथ सूची

| | | |
|---|---|---|
| १) मराठी ग्रामीण कादंबरी | – | डॉ. रवींद्र ठाकूर |
| २) ढव्ह आणि लख्ख उन | – | संपादक – रणधीर शिंदे |
| ३) तणकट | – | राजन गवस |
| ४) चौडकं | – | राजन गवस |
| ५) भंडारभोग | – | राजन गवस |
| ६) धिंगाणा | – | राजन गवस |
| ७) कळप | – | राजन गवस |
| ८) ब–बळीचा | – | राजन गवस |

❖❖❖

# महात्मा फुले यांच्या सार्वजनिक सत्यधर्मातील धार्मिक सहिष्णुता

प्रा.डॉ. संतोष विष्णू चतुर
सहायक प्राध्यापक, मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा, जि. यवतमाळ
E mail - santoshchatur78@gmail.com भ्रमणध्वनी ९४२२८१६२२६

## सारांश

महात्मा फुले महाराष्ट्रातील सत्यशोधक समाज चळवळीचे आद्यपुरुष होय. त्यांनी प्रतिपादित केलेला 'सार्वजनिक सत्यधर्म' आणि स्थापन केलेला 'सत्यशोधक समाज' समाजसुधारकाला एक नवी दृष्टी देते. भारतीय परंपरेतील श्रद्धास्थाने आणि धर्म या संदर्भातील फुलेंचे विचार मानवाला विचारप्रवृत्त करणारे आहेत. पारंपरिक धर्म व त्यामधील कर्मकांडावर प्रहार करताना सत्यधर्माची व्यापक संकल्पनाही ते विशद करतात. फुलेंचा 'सार्वजनिक सत्यधर्म' हा वैयक्तिक नाही. कारण वैयक्तिक मोक्ष—मुक्ती किंवा आत्मिक शांती, समाधान यावर त्यात भर नाही. त्यासाठी मंत्र—तंत्र नाही. मध्यस्थ म्हणून कोणताही पुरोहित—उपाध्याय नाही किंवा संत—महंत नाही. ईश्वर आणि मानव यामध्ये कोणताही दलाल नाही. गुरु नाही, मोक्षदाता नाही, बळीप्रथा नाही, प्रसाद नाही, कौल नाही, अंगारा—धुपारा नाही, दोरे—गंडे नाही. त्यांच्या धर्मात सत्याशिवाय दुसऱ्या कोणत्याही गोष्टीला स्थान नाही. सत्यसुद्धा शास्त्र, ज्ञान, विज्ञान, चिंतन यांच्या सहायाने शोधून त्यानुसार आचरण करावयाचे आहे. फुलेंच्या विश्वव्यापक दृष्टिकोनामध्ये समता, स्वातंत्र्य व बंधुता हे तत्त्व केवळ आपल्या देशातील लोकांपुरतेच मर्यादित नसून ते विश्वव्यापी आहे. माणसांनी माणसांशी माणसाप्रमाणे वागून धार्मिक, सामाजिक, व्यावहारिक सलोखा निर्माण करावा. अशी धार्मिक सहिष्णुता फुलेंच्या 'सार्वजनिक सत्यधर्मा'तून व्यक्त होते. फुलेंची धार्मिक सहिष्णुतेची विचारधार भारतीय लोकांनी स्वीकारावी तरच आपला भारत देश महान व समृद्ध होईल.

**बीजशब्द** — धार्मिक सहिष्णुता, सत्यधर्म, सत्यवर्तन, नीतीतत्त्व

## प्रस्तावना

भारतीय समाजात धर्माला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. बदलत्या समाजाबरोबर येथील समाज सुधारकांना भूमिका घ्याव्या लागतात. काहींनी स्वतंत्र नव्या धर्माला किंवा संप्रदायाला जन्मही त्या त्या काळात दिलेला आहे. काहींनी प्रचलित धर्मावर टिका करताना एखाद्या जुन्याच संप्रदायाचे नव्या संदर्भातील पुनरुज्जीवनाचे कंकण आपल्या हाती बांधले असल्याचे दिसते. त्या सर्वांमध्ये महात्मा फुले अग्रणी आहेत. ईश्वरप्रणीत मानल्या गेलेल्या समाजव्यवस्थेविरुद्ध आणि अपौरुषेय धर्मशास्त्राविरुद्ध फुलेंनी बंडाचे निशाण उभारले. त्यांनी सामाजिक, धार्मिक गुलामगिरीविरुद्ध संघर्ष केला. आपल्या विचारांची मांडणी करून ते थांबले नाही, तर कृतिशील उपाययोजनाही राबविल्या आहेत.

मानवांच्या उद्धारासाठी फुलेंनी साहित्यातून धार्मिक अंधश्रद्धेवर कडाडून हल्ला केला. 'सार्वजनिक सत्यधर्मा'ची स्थापना करून समाज हिताचा धर्म सगळ्यांकरिता निर्माण केला. फुले यांच्या 'सार्वजनिक सत्यधर्मा'तील धार्मिक विचारांचा आढावा घेणे. हे धार्मिक विचार समाज जीवनास पुरक ठरतील काय? याचा शोध घेणे प्रस्तुत शोधनिबंधाचा उद्देश आहे. संशोधनाकरिता आशय विश्लेषण पद्धतीचा वापर केलेला आहे.

## धर्म संकल्पना

भारतीय समाज जीवनात धर्म ही संकल्पना सर्वस्पर्शी झालेली आहे. तिच्यापासून जीवनाचे कोणतेही क्षेत्र सुटू शकले नाही. त्यामुळे धर्मासंबंधीची अजूनही सर्वव्यापी व्याख्या करणे अवघड झालेले आहे. मराठी विश्वकोशामध्ये धर्म म्हणजे, ''निसर्गातील अत्यंत पवित्र, संपूर्ण मानवी भवितव्याशी संबद्ध, जीवन व विश्व अथवा निसर्ग यांची नियंत्रक अशा अलौकिक शक्तीवर माणसाची श्रद्धा असते; त्या शक्तीचा स्वत:शी अनुकूल, पवित्र व घनिष्ठ संबंध स्थापित करणारी वैयक्तिक अथवा सामाजिक मन:प्रवृत्ती व त्यातून निघणारी आचरणाची

पद्धती म्हणजे धर्म होय.''[१] धर्म संकल्पना उकल करताना यशवंत खडसे म्हणतात, ''सर्वसाधारणपणे आपणाला असे म्हणता येईल की, माणसाने स्वत:च्या एकाकीपणाशी एकांतात केलेले हितगुज म्हणजे धर्म होय.''[२]

माणसाला समूह जीवन जगण्यासाठी काही आचरणांच्या नीती–नियमांची आवश्यकता असते. आचरणांची नियमावली म्हणजेच धर्म. या नियमांनीच मानवी समूह जीवन नियंत्रित होते. हे सत्य सर्वांनी थोड्याफार फरकांनी मान्य केले आहे. धर्मसंस्थेकडे आदर्श सामाजिक ऐक्यासाठी कार्य करणारी शक्ती म्हणून पाहिले जाते. त्यामुळेच प्रत्येक कालखंडामध्ये धर्माचा अन्वयार्थ वेळोवेळी लावण्यात आलेला दिसतो.

## सार्वजनिक सत्यधर्म

फुलेंच्या मते हजारो वर्षापासून चालत आलेली धर्माच्या नावावरची फसवाफसवी म्हणजे अधर्म होय. धर्माच्या नावाखाली इतरांवर अन्याय, अत्याचार होता कामा नये. त्यामुळेच त्यांनी एकेश्वरवादाचा पुरस्कार करून त्याला 'निर्मिक' असे नाव दिले आहे. त्याच आधारावर त्यांनी सर्वसामान्य अशा 'सार्वजनिक सत्यशोधक समाज'ची २४ सप्टेंबर १८७३ ला स्थापना केली. यासंबंधी फुले म्हणतात, ''ब्राह्मण, भट, जोशी, उपाध्ये इत्यादी लोकांच्या दास्यत्वातून शूद्र लोकांना मुक्त करण्यासाठी व आपल्या मतलबी ग्रंथाच्या आधारे हजारो वर्षे ते शूद्र लोकास नीच मानून गफलतीने लुटीत आहेत. यास्तव सदुपदेश व विद्याद्वारे त्यास त्यांचे वास्तविक अधिकार समजावून देण्याकरिता, म्हणजेच धर्म व व्यवहारासंबंधी ब्राह्मणांचे बनावट व कार्यसाधक ग्रंथापासून मुक्त करण्याकरिता काही सूज्ञ मंडळींनी या समाजाची स्थापना केली आहे.''[३] 'सार्वजनिक सत्यधर्म' हा सर्वसामान्य माणसासाठी आणि पूर्णपणे सत्य असलेला असा धर्म आहे, म्हणूनच त्याने सर्व पारंपरिक धर्माची जागा घेणे महत्त्वाचे मानले आहे. 'सार्वजनिक सत्यधर्मात' सत्यवर्तन करणाऱ्या संबंधी ३३ नियम फुलेंनी सांगितले आहेत.

फुलेंनी 'ईश्वर' ही संकल्पना न स्वीकारता जगाच्या निर्मात्याला 'निर्मिक' म्हटले आहे. 'अखंड' या रचनेत फुले म्हणतात,

''निर्मिकांचा धर्म सत्य आहे एक ।। भांडणे अनेक ।। कशासाठी।।
मानवाचे धर्म नसावे अनेक ।। निर्मिक तो एक ।। जोती म्हणे ।।''

फुलेंच्या सार्वजनिक सत्यधर्माबाबत डॉ. रवींद्र ठाकूर लिहितात, ''सत्यधर्म सार्वजनिक आहे. तो स्त्रीशूद्रांसाठी आहे, तसा ब्राह्मणांसाठीही आहे. माणसांसाठी वेगवेगळे धर्म असू शकत नाहीत. कारण या विश्वाचा निर्मिक एकच आहे. संपूर्ण मानवजात एक आहे. म्हणून संपूर्ण मानवजातीचा धर्म एकच आहे. परंतु आज असा एक धर्म जगात उपलब्ध नसल्याने धर्म स्वातंत्र्याचे तत्त्व सत्यधर्माला मान्य आहे.''[४] सर्व मानवजातीच्या कल्याणासाठी फुलेंनी एकच धर्म सांगून जुन्या पारंपरिक हिंदू धर्माच्या आचरणात्मक भागातील अर्थहीन रूढी, परंपरा, मूर्तीपूजा आणि बोजड कर्मकांड यावर आणि त्यांच्या सैद्धांतिक भागातील मोक्ष, पुनर्जन्म, अवतारवाद, स्वर्ग–नरक इत्यादी मूलभूत संकल्पनांवर सार्वजनिक सत्यधर्माच्या रूपाने कडाडून हल्ला चढविला. विश्व अनंत व अभंग आहे. विश्वाच्या व देवाच्या शोधामागे मानवाने आपले आयुष्य व्यर्थ घालवू नये असेही त्यांचे सांगणे आहे. त्यांच्या मते, कर्मकांडे ही निरर्थक असून ती माानवात फूट पाडणारी आहेत. चोरी, व्यभिचार, व्यसनाधिनता, पिढीजात श्रेष्ठत्व, कपट, अन्याय, देवभोळेपणा, अक्षरशून्यता इत्यादी दुर्गुणांना बाजूला सारून स्वच्छता, सचोटी, सद्विवेक, सदाचरण, सतोद्योग, भूतदया, व्यक्तिस्वातंत्र्य, ज्ञान, साक्षरता, श्रमप्रतिष्ठा, सहिष्णुता, सर्वधर्म समभाव, बंधुता, मानवता, समता वगैरे सद्गुणांची जोपासना करणे हेच सत्यधर्माचे मुख्य उद्दिष्ट आहे.

फुलेंचा 'सार्वजनिक सत्यधर्म' हा वैयक्तिक नाही. कारण वैयक्तिक मोक्ष–मुक्ती किंवा आत्मिक शांती, समाधान यावर त्यात भर नाही. त्यासाठी मंत्र–तंत्र नाही. मध्यस्थ म्हणून कोणताही पुरोहित–उपाध्याय नाही किंवा संत–महंत नाही. ईश्वर आणि मानव यामध्ये कोणताही दलाल नाही. गुरु नाही, मोक्षदाता नाही, बळीप्रथा नाही, प्रसाद नाही, कौल नाही, अंगारा–धुपारा नाही, दोरे–गंडे नाही. त्यांच्या धर्मात सत्याशिवाय दुसऱ्या कोणत्याही गोष्टीला स्थान नाही. सत्य सुद्धा शास्त्र, ज्ञान, विज्ञान, चिंतन यांच्या सहायाने शोधून त्यानुसार आचरण करावयाचे आहे.

'सार्वजनिक सत्यधर्म' यात समाजाचा विचार प्रथम आहे. त्यांची 'समाज' या शब्दाविषयीची संकल्पनाही स्पष्ट आहे. 'समाज' म्हणजे सर्व मानव, वंश, देश, भाषा, संस्कृतीनिरपेक्ष असा अखिल मानव समाज. अर्थात फुले मानवाचा उल्लेख करताना स्त्री–पुरुष असा संयुक्त उल्लेख करीत नाही. पुरुषांच्या बरोबरीची समानता स्त्रियांना मिळावी यावरच त्यांचा जास्त कटाक्ष होता. वंश, धर्म, देश यामधील भेदांचा निषेध त्यांनी वारंवार केलेला आहे. मानवातील कोणतेही भेदभाव ते मानायला तयार नाहीत. धर्म, वंश हे उच्चवर्गीयांचे

आहेत व त्यांनी इतरांना तुच्छ मानून स्वत:ला इतरांपेक्षा श्रेष्ठ, सुंदर, पवित्र, इथला हिंदू मानव व त्या कल्पनेत रंगवलेला हा देश अन् त्यातून वृद्धिंगत झालेल्या रुढी, परंपरा यांचा फुलेंनी त्वेषाने निषेध केला आहे.

वरील विचारांवरून असे निदर्शनास येते की, भारतीय परंपरेतील श्रद्धास्थाने आणि धर्म या संदर्भातील फुलेंचे विचार मानवाला विचारप्रवृत्त करणारे आहेत. पारंपरिक धर्म व त्यामधील कर्मकांडावर प्रहार करताना सत्यधर्माची व्यापक संकल्पनाही ते विशद करतात.

## सार्वजनिक सत्यधर्म आणि इहवाद

सत्यधर्माची खरी ओळख शुद्रातिशूद्रांना होणे आवश्यक आहे हे फुल्यांना माहीत होते. त्यामुळेच ते म्हणतात,

''खिस्त, महंमद, मांग, ब्राह्मणाशी ।। धरावे पोटाशी ।। बंधूपरी ।।
मानव भावंडे सर्व एकसह ।। त्याजमध्ये आहां ।। तुम्ही सर्व ।।''

मुरलीधर जगताप यासंबंधी म्हणतात, ''मानव अधिकारों और मानवता के प्रतिष्ठापन के लिए जोतीराव द्वारा अहर्निश किया गया संग्राम, उसके मूल में बोये हुए शक्तिशाली परिवर्तन के बीज और उनके चारों ओर फैला हुआ उनके माहात्म्य का दिव्य वलय इन सभी की संपूर्ण अभिव्यक्ति सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक में हुई है.''[५]

धर्माच्या नावाखाली काही मंडळी शूद्रांच्या घरात प्रवेश करतात. चुकीचा धर्म सांगत त्यांच्या संसारात लुडबुड करतात. अज्ञानी शूद्रास हे कळत नाही. म्हणून त्यांना जागे केले पाहिजे. 'सार्वजनिक सत्यधर्मा'ची महंती पटवून दिली पाहिजे. हा महात्मा फुले यांचा मनोनिश्चय होता. फुलेंच्या मते, ''पृथ्वीवरील पुष्पे नि सुवासिक पदार्थ मानवाच्या उपभोगासाठी निर्माण कर्त्याने उत्पन्न केलेली आहेत, तर ते त्याला वाहून त्याची पूजा करण्यात अर्थ नाही. धंदा म्हणजे धर्म नव्हे. हजामत करणे हा न्हाव्याचा धंदा आहे, धर्म नव्हे. कपडे धुणे धोब्याचा धंदा आहे, धर्म नव्हे. सरकारी कामावर असता अज्ञानी जनापासून लाच खाणे हा कामगाराचा धर्म नव्हे, तर त्याचे सरकारशी दगाबाजी करण्याचे कसब होय.'' अशा प्रकारे धंदा आणि धर्म यातील तफावत फुलेंनी दूर केली.

धर्म श्रेष्ठतेच्या बढाया मारणाऱ्यांना फुले स्पष्ट सांगतात की, सर्वांचा निर्माणकर्ता एक व धर्मही एक हे विसरून जाऊन वितंडवाद, मारामाऱ्या, लढाया व रक्तपात करणे योग्य नाही. माझेच म्हणणे खरे असून इतरांची धर्म मते ही केवळ थोतांड आहेत, असे मात्र ते कधीच म्हणत नसत. पाप–पुण्याचा निर्णय करता यावा म्हणून निर्मिकाने मनुष्याला सद्‌विचार करण्याची शक्ती दिलेली आहे. परंतु विकाराधीन होऊन या ईश्वरदत्त निर्णयशक्तीचा अव्हेर केल्यामुळेच माणूस पापाचरणास प्रवृत्त होतो.

## सत्य आणि नीती

सत्य व नीती यांना अनुसरून आचरण करण्यावर फुलेंनी अधिक जोर दिला आहे. त्यांच्या मते, जप–जाप, अनुष्ठान, पूजा–अर्चा, धार्मिक विधी ही सर्व थोतांड आहेत. यामुळे माणसांचे कधीही कल्याण होणार नाही. मानवाची श्रद्धा ही निर्मिकाच्या ठिकाणी असावी. अखिल भारतीय एकसंघ समाज निर्माण करण्याचा त्यांचा मनोदय होता. सत्य व नीती यांना अनुसरून कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीने इच्छेस येईल त्याप्रमाणे कोणताही धर्म स्वीकारावा, आपापल्या विचाराप्रमाणे आचारही करावे. पण कुटुंबात सर्वत्र प्रेम, एकी, सलोखा नांदेल अशाच रीतीने कौटुंबिक, सार्वजनिक आचरण करावे. धर्माच्या आधाराने आणि वर्णव्यवस्थेच्या कुबड्या घेऊन कोणालाही जन्माने सामाजिक उच्च दर्जा प्राप्त होऊ शकत नाही. सर्व मानव ही एकाच निर्मिकाची लेकरे आहेत. त्यांनी दुसऱ्यांशी वर्तन करताना कोणत्याही अमानवीय तत्त्वांचा वापर करू नये. असे सार्वजनिक सत्यधर्मा आधारे फुलेंनी लोकांना पटवून दिले.

सत्य, न्याय आणि नीती यांची फारकत फुलेंना अनिष्ट वाटत होती. प्रत्येक मनुष्याने स्वत: अंगमेहनत करून आपला निर्वाह करावा अशी सृष्टीकर्त्या निर्मिकाची योजना आहे. तिच्यात प्रतारण करणे योग्य नाही अशी त्यांची भावना होती.

## समता, स्वातंत्र्य आणि बंधुता

सत्याचा नेहमी आग्रह धरणारे फुले 'सार्वजनिक सत्यधर्म' या ग्रंथाची सुरुवात 'सत्यमेव जयते' या ब्रीद वाक्याने करतात. समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मानवी मूल्यांचा पुरस्कार आपल्या विचारधारेतून फुले वारंवार करतात. फुले यांनी मानवी जीवन मूल्यांचा व मानवी स्वातंत्र्याचा एक जाहीरनामाच लिहिला आहे. धार्मिक

सहिष्णुता, मानवी प्रतिष्ठा व समता ही मानवी जीवनातील उदात्त मूल्ये त्यांच्या ग्रंथाची मूलाधार तत्त्वे आहेत. विश्वातील लोकांनी एकमताने सर्वांचे सारखे हक्क मान्य करून देशाभिमान यांच्या पलिकडे पहावे. अशी शिकवण फुले यांची आहे. 'सार्वजनिक सत्यधर्म' हा ग्रंथ लिहून त्यांनी मानवतेच्या महान तत्त्वज्ञान मंदिरावर विधायक व कल्याणदायक कळस चढविला.

महात्मा फुले यांना हिंदू धर्मातील वर्णव्यवस्था मान्य नव्हती. वर्ण व्यवस्थेमुळे मानवतावादाला, समतेला खीळ बसते असे त्यांचे मत होते. वंश, धर्म, देश हे कृत्रिम, मनुष्यनिर्मित भेदभाव आहेत. त्यामुळे मूठभर स्वार्थी लोकांचा स्वार्थ साधतो. त्यासाठी ते सामान्य जनतेमध्ये भेदभाव, विषमता, राग–द्वेश निर्माण करतात. यापासून कोणताही वंश, धर्म, देश मुक्त नाही. म्हणून या सर्वांचा विलय करून त्याहून श्रेष्ठ अशा मानवतेची, मानवी समानतेची, स्वातंत्र्याची, विश्वकुटुंबाची प्राणप्रतिष्ठा केली पाहिजे. ही खरी फुलेंची प्रेरणा, शिकवण, श्रद्धा होती. याच आपल्या श्रद्धेला त्यांनी 'सार्वजनिक सत्यधर्म' असे नाव दिले. त्यांचा शोध करणाऱ्या सत्यशोधकांचा 'सत्यशोधक समाज' त्यांनी स्थापन केला. फुलेंची सारी शिकवण, प्रेरणा सार्वजनिक सत्यधर्मात, सत्यशोधक समाजात आढळते.

फुलेंच्या विश्वव्यापक दृष्टिकोनामध्ये समता, स्वातंत्र्य व बंधुता हे तत्त्व केवळ आपल्या देशातील लोकांपुरतेच मर्यादित नसून ते विश्वव्यापी आहे. त्याचे हे विचार विशिष्ट मानव समूहापुरते मर्यादित नसून विश्वव्यापकता त्यामध्ये दिसते. फुले आपले विचार मांडताना म्हणतात,

''ख्रिस्त महंमद मांग ब्राह्मणासी ।। धरावे पोटाशी ।। बंधूपरी ।।
मानव भावंडे सर्व एकसह ।। त्यामध्ये आम्हा ।। तुम्ही सर्व ।।
बुद्धी सामर्थ्यांने सुख घ्यावे ।। दीनास पाळावे ।। जोती म्हणे ।।''
''मानवांचा जो कां अन्याय न करी ।। भावडांचे परी ।। लेखी सर्वा ।।
ह्यालाच म्हणावा सत्यवादी पुरा ।। जोती बंधू खरा।। मानवांचा ।।''

फुलेंच्या मते धर्म आणि राज्य या आधारावर मानवांमध्ये भेद न मानता बंधुत्वाने वागावे. समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या तत्त्वांच्या आधारावर प्रत्येकांचे एकमेकांशी व्यवहार असावे. जेणेकरून सर्वांना सुख प्राप्त होईल व कोणावरही अन्याय होणार नाही. अशाप्रकारे फुलेंचा मानवतावाद हा समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या तत्त्वावर आधारित लोकशाहीचे जतन करणारा आहे. फुलेंच्या मते सामाजिक जीवन हेच निर्मिकाचे राज्य असून समता, स्वातंत्र्य आणि बंधुता यावर आधारलेला प्रादेशिक समाज असा राष्ट्र याचा अर्थ आहे.

## निष्कर्ष

धार्मिक सहिष्णुता, मानवी प्रतिष्ठा आणि मानवी समानता ही मूल्ये 'सार्वजनिक सत्यधर्म' या ग्रंथाची मूलाधार प्रेरणा आहे. मानव हीच सामाजिक मूल्यांची आणि समाजधारणेची मापकाठी असावी. हा विचार यात प्राणभूत आहे. फुलेंनी आपल्या विचारधारेत समता, स्वातंत्र्य आणि बंधुता यावर आधारित स्वीकारलेले तत्त्वज्ञान सर्व मानवाला न्याय देणारे आहे. सर्व मानवजात सुखी व्हावी अशी तळमळ यातून व्यक्त होते. भारतात विविध धर्म असले तरी त्यांच्यात धर्मद्वेष असू नये. धर्माच्या तत्त्वाचे पालन करताना इतरांच्या धर्माला, तत्त्वाला तुच्छ लेखू नये. धर्मा–धर्मात सलोखा निर्माण करावा. सामाजिक व्यवहारात सर्वानी सार्वजनिक सत्यधर्माचे पालन करावे. माणसांनी माणसांशी माणसाप्रमाणे वागून धार्मिक, सामाजिक, व्यावहारिक सलोखा निर्माण करावा. अशी धार्मिक सहिष्णुता फुलेंच्या सार्वजनिक सत्यधर्मातून व्यक्त होते. फुलेंची धार्मिक सहिष्णुतेची विचारधार भारतीय लोकांनी स्वीकारावी तरच आपला भारत देश महान व समृद्ध होईल.

## संदर्भ

१) संपादक लक्ष्मणशास्त्री जोशी, 'मराठी विश्वकोश खंड ८', सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथम आवृत्ती १९७९, पृ. १७.
२) यशवंत खडसे, 'महात्मा फुलेंची समाजक्रांती', कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, २०५५, पृ. ८१.
३) तत्रैव, पृ. ८५ वरून उद्‌धृत.
४) रवींद्र ठाकूर, 'महात्मा', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, मुनर्मुद्रण २००४, पृ. २०३.
५) मुरलीधर जगताप, 'युगपुरुष महात्मा फुले', महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन सतिमी, म.शा.शि.वि.मं., मुंबई, १९९३, पृ. १७७.

❖❖❖

# बौद्ध संस्कृती

प्रा. रवींद्र खंडेराव
पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग प्रमुख
बी.एस. पाटील महाविद्यालय, परतवाडा, जि. अमरावती, भ्रमणध्वनी ९४२३६२३६५३

मानवी जीवनातील सर्वच लोकांच्या ऐहिक उन्नयनाचे परस्पर सद्‌भावाच्या, सुरक्षिततेच्या आणि सर्वहितैषी बुद्धिवादी मूल्यांचे संभाषित (Discourse) म्हणजे संस्कृती. सर्वच मानवांना उपकारक ठरणारी मूल्यांची एक संपूर्ण ऐहिक पातळीवरची संरचना साकार केली जाते, त्या संरचनेला आपण संस्कृती म्हणायला हवे. याचा अर्थ असा की संपूर्ण मानवी जीवनाच्या उज्ज्वलतेचा जाहीरनामा असे संस्कृतीचे स्वरूप आणि प्रारूप असते. संपूर्ण मानवी जीवनाच्या न्याय्य जीवनशैलीचे प्रमाणशास्त्र असे एखाद्या महासंस्कृतीचे रूप असेल तर अनेक मानवी समूहांच्या, राष्ट्रांच्या उपसंस्कृतीही संभवतात. परंतु त्यांची संस्कृती असण्याची योग्यता वर सांगितलेल्या महासंस्कृतीशी त्या किती संवादी असतात त्यावर अवलंबून असते.

एकमेकांना मारत, एकमेकांना खुजे आणि निरर्थक करीत जगण्याची पोती म्हणजे संस्कृती नव्हे. एकमेकांना काळ्या पाण्यात पाहत कुणाला तरी दुय्यम ठरविण्याचे तंत्र, कोणाचे तरी शोषण करण्याचे यंत्र, कोणाचा तरी द्वेष करण्याची पोती किंवा कुणालातरी आपल्याच केवळ स्वार्थासाठी, सुखासाठी वा वर्चस्वासाठी राबवून घेण्याची यंत्रणा म्हणजे संस्कृती नव्हे. तो असंस्कृत बकवास असतो. अशी यंत्रणा काही धूर्त माणसांनी तयार केलेली असो वा कोणत्याही देवाच्या नावाने सांगितलेली असो तिला कोणत्याही अर्थाने संस्कृती म्हणता येत नाही. अशा यंत्रणांना संस्कृती म्हणणे हा संस्कृती या संज्ञेचाच आणि त्या संज्ञेतील समत्वशील मूल्यांचाच अपमान असतो.

आई जशी आपल्या सर्वच लेकरांची सारखीच काळजी वाहते आणि सर्वच लेकरांच्या भल्यासाठी जीव पाखडते त्याप्रमाणे संस्कृतीही सर्वच लोकांच्या हिताची सारखीच काळजी वाहते. हा जवळचा, तो दूरचा, हा आवडता, तो नावडता असे ती करीत नाही. संस्कृती या प्रकारे सर्वांच्याच भौतिक आणि नैतिक कल्याणाचा मातृकोशच असते.

माणूस निसर्गाचे निर्माण आहे. तो निसर्गसुत आहे. पृथ्वीच्या पाठीवरील इतरही सर्व प्राणीमात्र निसर्गाचेच निर्माण आहे. हा सगळा मोहोर निसर्गालाच आलेला मोहोर आहे.. काळाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर निर्माण झालेली माणसे, त्यांच्या वाट्याला आलेले जीवन अधिक समृद्ध, अधिक सुखपूर्ण आणि अधिक परिपूर्ण करण्याची शिकस्त करतात. निसर्गाच्याच मदतीने ते निसर्गालाही आणि स्वत:लाही अधिक सर्जनशील करण्यासाठी झटत असतात. निसर्गातील आणि जीवनातीलही त्रुटींनी दु:खी होणारी ही माणसे निसर्गातील आणि मानवी जीवनातीलही उणिवा दूर करण्यासाठी, निसर्गातील आणि मानवी जीवनातील अपूर्णांकाने उद्विग्न होणारी ही माणसे निसर्गाला आणि मानवी जीवनालाही पूर्णांक करण्यासाठी आटापिटा करतात. ही संस्कृतीच्या निर्माणाची आणि समृद्धीची प्रक्रिया असते.

बौद्धसंस्कृती हे एकूणच वैश्विक जीवनाच्या उज्ज्वल रूपाचे गतिशील संभाषित आहे. या अर्थाने बौद्ध संस्कृती ही महासंस्कृती आहे. ती जगातली पहिली विश्वसंस्कृती आहे. एकूणच मानवी जीवनाच्या समाज, अर्थशास्त्र, शिक्षण, साहित्य, साहित्येतर कला, ज्ञान, राजकारण, नीती अशा सर्वच क्षेत्रांमधील जीवनावस्थांचे अधिकाधिक विकसित होत जाणारे रूप हे या महासंस्कृतीचे ध्येय आहे आणि हे ध्येय मानवी जीवनात साकार व्हावे यासाठी माणसांचे वर्तन कसे असावे त्याचाही विचार या महासंस्कृतीत अंतर्भूत आहे.

भौतिक आणि मानसिक हे या संस्कृतीचे दोन्ही भाग एकजीवच असतात. भौतिक जीवन सतत बदलते. याचा अर्थ भौतिकतेचा नवनवा तपशील जीवनात निर्माण होत राहतो. त्यानुसार मानवी मनांचेही क्षितिज विस्तारत राहते. जीवनात द्वंद्वशीलता आहे. मृत्यू, भूकंप, अवर्षण अशा मार्गांनी माणसांवर दु:खे कोसळतात. ही दु:खे सर्वांनाच सामाईक असतात. पण खुद्द माणसांच्या स्वार्थांमुळे, अहंकारांमुळे आणि असूयेमुळेही मानवी जीवनात नानाविध पातळ्यांवरची दु:खे निर्माण होतात. निकृष्ट जाती – वरिष्ठ जाती, कष्टकरी– मालक, कामगार– भांडवलदार, गरीब– श्रीमंत असे शोषक– शोषित संबंध असंख्य पातळ्यांवर निर्माण होतात. या द्वंद्वशीलतेच्या मुळाशी तृष्णा असते. तृष्णा हा बौद्धसंस्कृतीच्या पुढला मूलभूत महत्त्वाचा प्रश्न आहे. या तृष्णेमुळेच भौतिक पातळीवरची, प्रत्यक्ष ऐहिक पातळीवरची दु:खे देणारी एक मानसिकता विश्वात आहे आणि ही दु:खे भोगणारी

माणसे दुसरीकडे आहेत. या एकाच जगात अशी दोन जगे आहेत. या दोन जगांचे अस्तित्व द्वंद्वशीलतेवर उभे असते. बौद्ध संस्कृती ही या दोन जगांपेक्षा निराळ्या अशा तिसऱ्या जगाच्या निर्मितीचे प्रारूप देते. या जगात मृत्यू वगैरेसारखी नैसर्गिक दु:खे असतील पण माणसांनी माणसांना दिलेली दु:खे असणार नाहीत. बदलत्या काळानुसार घडणारा भौतिक विकास असेल पण या विकासाचे वाटेकरी, त्यापासून मिळणाऱ्या सुखाचे वाटेकरी सर्वच असतील, इथे भेद असणार नाही. बौद्धसंस्कृती त्यासाठी निब्बाणमनस्कतेचा उपाय सांगते.

बौद्धसंस्कृतीचा एकमेव विषय माणूस आहे. त्याच्या जीवनातील प्रश्न आणि या प्रश्नांनी त्याच्या जीवनात निर्माण केलेली दु:खे हा या संस्कृतीचा एकमेव विषय आहे आणि या दु:खांच्या आगीतून त्याला कसे सोडवायचे हा या संस्कृतीच्या पुढला गाभ्याचा प्रश्न आहे. माणसाच्या या दु:खांशी तत्त्वज्ञान, साहित्य, कला, शिक्षण, राजकारण, समाजकारण अशा सर्वांनीच भांडावे अशी बौद्धसंस्कृतीची उत्कट इच्छा आहे. विचाराचा प्रारंभ माणसाच्या या दु:खापासूनच व्हावा आणि त्याच्या दु:ख निर्मूलनाच्या प्रक्रियेसोबतच त्याने चालावे. या प्रक्रियेत त्याने विजयी व्हावे. तत्त्वज्ञान, साहित्य यांनीही माणसापासूनच स्वत:चा प्रारंभ करावा आणि त्याला दु:खमुक्त करण्यासाठीच आपली सर्व शक्ती पणाला लावावी असे बौद्धसंस्कृतीच्या संविधानाचे स्वरूप आहे. ऐहिक जीवनातील माणसांची दु:खे नष्ट होण्यासाठी ईश्वर,  आत्मा, परलोक आणि अशाच अनेक गोष्टींची चर्चा करण्यात या संस्कृतीच्या जनकाला स्वारस्य वाटले नाही. अशा गोष्टींना त्याने 'अव्याकृत्य' म्हटले. अशा गोष्टींची चर्चा केवळच कालापव्यय करणारी नव्हे, केवळ निरर्थक नव्हे तर विघातकही आहे हे या संस्कृतीचे म्हणणे आहे.

बौद्धसंस्कृती माणसाला संपूर्ण मानवी व्यवहाराचे एकमेव केंद्र करणारी संस्कृती आहे. माणूस हाच जीवनाचा एकमेव नायक आहे. ईश्वर, देव, बाबा, बुवा अशा कोणलाही ही संस्कृती मानतच नाही. त्यामुळे माणसाची ही एकमेवता कुठेही बाधित होण्याचा प्रश्नच येत नाही. आपण वर पाहिले की दु:ख देणारे कोणीही नाही आणि दु:ख भोगणारे कोणीही नाही. अशा तिसऱ्या समतामय, प्रज्ञानमय माणसांच्या जगाचे आणि त्यातील माणसांच्या मनाचे 'निब्बाण' हे वर्णन आहे. निब्बाणमनस्क माणूस जातीविहीनही असतो. वर्गविहीनही असतो आणि अंधश्रद्धेविहीनही असतो. याचा अर्थ निब्बाण हे बुद्धिवादी माणसाचे आणि बुद्धिवादी माणूस वागतो त्या ऐहिक माणुसकीचे वर्णन आहे. प्रज्ञा म्हणजे बुद्धिवाद आणि करुणा, मैत्री म्हणजे माणुसकी ही कलमे या संस्कृतीच्या संविधानाची पायाभूत कलमे आहेत.

बौद्धसंस्कृती ही इहवादी आहे. धर्मातीत आहे. मानवी जीवनात सौहार्द निर्माण करण्याच्या प्रक्रियेत ही संस्कृती धर्माला कोणतेही स्थान देत नाही. ही धर्म नसलेली सुंदर विवेकवादी संस्कृती आहे. या संस्कृतीत कोणत्याही ईश्वराला स्थान नाही. इतर धर्मांमध्ये जे सर्वोच्च स्थान ईश्वराला आहे ते सर्वोच्च आणि एकमेव स्थान या संस्कृतीने बुद्धिप्रामाण्यवादी नीतीला दिलेले आहे. ही बौद्धसंस्कृती अशी तात्त्वज्ञानिक भूमिका असलेली जगातली एकमेव संस्कृती आहे.

बौद्धसंस्कृती कोणत्याही अर्थाने मूलतत्त्ववादी (Fundamentalist) नाही. या संस्कृतीचा शिल्पकार विचारस्वातंत्र्यवादी आहे. माणसाच्या विवेकशक्तीवर त्याचा दृढविश्वास आहे. मी सांगतो म्हणून केवळ मान्य करू नकोस, इतर कोणी सांगतात म्हणून आंधळेपणाने मान्य करू नकोस. आपली बुद्धी प्रखर ठेव. ज्वलंत ठेव सतत जागी ठेव. चिकित्सक ठेव आणि आपल्या बुद्धीला प्रज्ञानी कर. सर्वहितैषी कर आणि अषा सर्वहितैषी चौकस बुद्धीला जे मान्य  होईल ते स्वीकार, असे या संस्कृतीचे सांगणे आहे. याचा अर्थ असा की या संस्कृतीचा शिल्पकार केवळ महान माणूसच नाही तर मानवतेच्या असीम कळवळ्याने ज्याचे ऊर काठोकाठ ओथंबून वाहते आहे असा दुनियेतला पहिला महान विचारवंतही तो आहे. माणसाला त्याच्यातील अत्तदीप माणसापाशी न्या. त्याला ईश्वरापासून सोडवा. त्याला स्वर्गनरकापासून सोडवा, त्याला बाबा—बुवांपासून सोडवा. त्याला पूजा—भक्तीपासून सोडवा. त्याने कवटाळलेल्या आणि त्याला नष्ट करणाऱ्या सर्व भ्रमांपासून त्याला सोडवा आणि त्याला त्याच्यापाशी, त्याच्या आत न्या. तिथे त्याचे अत्त दीपत्व आहे. अत्त स्वातंत्र्य आहे. त्याच्यातच त्याच्या माणूसपणाचे, उत्तम माणूसपणाचे उगम दडलेले आहेत. त्या बुद्धिवादी माणुसकीत विलीन होऊ द्या असे ही संस्कृती माणसाला सांगते. माणसाला सतर्क डोळ्यांनी सर्व जग आणि त्यातील द्वंद्वे, भांडवली जागतिकीकरणासारखी सर्व अरिष्टे पाहू द्या आणि त्यांच्यावर आपण मात करु षकतो ही ताकद त्याच्यात निर्माण करा असे ही संस्कृती सांगते.

बौद्धसंस्कृती हे आवर्जून सांगते की मी ज्या युगप्रवर्तक महाप्रज्ञेच्या पोटी जन्माला आले त्या बुद्ध नावाच्या महाप्रज्ञेला ईश्वर वा देव मानू नका. त्याला दैवी शक्ती मानू नका. त्याला नवस करू नका. त्याची भक्ती करु नका. कारण तो केवळ माणूस आहे. फक्त सर्वांच्या हिताखातर कळवळणारा महान माणूस आहे. तो

सर्वहितैषी आणि बुद्धिवादी माणूस आहे. तो निब्बाण देत नाही. असे निब्बाण तुम्हालाच व्हायचे आहे. बुद्ध फक्त मार्गदर्शक सूत्रे देतो.

बौद्धसंस्कृतीचा शिल्पकार नाग संस्कृतीचा होता आणि या संस्कृतीची मुळे सिंधू संस्कृतीत होती. पण त्याने निर्माण केलेल्या विश्वसंस्कृतीची चर्चा करताना या गोष्टींना आता फार महत्त्व देण्याचे कारण नाही. कारण या बुद्ध नावाच्या शिल्पकाराने जी संस्कृती जन्माला घातली ती विश्वसंस्कृती आहे. मानवी जीवनाचा ती तोडून तोडून विचार करीत नाही. सर्वांनाच पोटाशी धरते. पण असे असले तरी सम्राट अशोकाच्या काळानंतर या संस्कृतीला विकृत करणारांची संख्याही वाढत गेली. महायानाने आणि पुढे अनेक तंत्रयानांनी या संस्कृतीची क्रांतिकारकता संपविण्याला सुरुवात केली. या सर्व प्रक्रियेने या संस्कृतीला जीवनाच्या मध्यधारेतून दूर फेकले. हे विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत चालले. पण १९५६ साली मधल्या हजारो वर्षांनी तिच्यावर चढविलेली कात टाकून ही संस्कृती निरभ्र आकाशातील सूर्यासारखी तेज:पुंज झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या संस्कृतीच्या आयुष्यातले बुद्धानंतरचे बुद्ध ठरले. त्यांनी धम्म पुन्हा मांडून दाखविला. त्यांनी बावीस प्रतिज्ञांमधून बौद्धसंस्कृतीचे सर्वात संक्षिप्त सार सांगितले. बौद्धसंस्कृती असीम आहे. ती अनेक ग्रंथांच्या जंगलात पसरलेली आहे. या सर्व ग्रंथसागराला काही ओळींमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बांधले. हे बौद्धसंस्कृतीच्या नवनीतातूनही काढलेले नवनीत आहे. त्यात संपूर्ण बौद्धसंस्कृती ही आहे. तिने दिलेले नकारही आहेत. तिने केलेला प्रतिकारही आहे. तिचे 'सब्बे सत्ता सुखी' व्हावे हे रूपही आहे. तिची नवनिर्माणची संपूर्ण प्रकृतीही आहे. ही संस्कृती जगातील सर्वच शोषितांच्या सर्वच दु:खांसोबत युद्ध करीत आहे आणि जगातल्या सर्वच क्षेत्रांमधील अंगुलीमालांनाही ती आदर्श आणि उत्तम मानवी रूपात उभे करण्यासाठीही सर्व शक्ती पणाला लावीत आहे. आपल्यापुरते पाहू नका. मोठी स्वप्ने पहा. बौद्ध संस्कृतीचा किरण होण्याचे स्वप्नही जगातले सर्वात मोठे स्वप्न आहे. आपण या स्वप्नाची किरणपालवी व्हा. बौद्धसंस्कृतीचा किरण होण्याचे सर्वांना या स्वप्नाची दीक्षा द्या. तुम्ही कुशल जगा. जगालाही कुशल जगू द्या असे ही बौद्धसंस्कृती सांगते आहे. ही संस्कृतीच आजच्या भांडवली जागतिकीकरणालाही मानवी कल्याणाचा चेहरा देऊ शकते.

ही संस्कृती सांगते की मी बुद्धिवादी करुणेचा एक बोधिवृक्ष लावलेला आहे. तो जगभर विस्तारू द्या. हे असीम चांदणे कोणत्याही मर्यादेत ठेवू नका. माणूस व्हा. सुंदर, सर्जनशील, बुद्धिवादी माणूस व्हा. जात राहू नका. जीवनातून जात जाळूनच टाका. वर्गही नष्ट करुन टाका. एकच वर्ग दुनियेत ठेवा. तो वर्ग समतावाद्यांचा, सामाजिक न्यायवाद्यांचा वर्ग असे ही संस्कृती सांगते.

## संदर्भ


१. बौद्धधम्म जिज्ञासा, लेखिका— कीर्ती पाटील, पान नं. २९८, २९९

२. बौद्ध साहित्य आणि संस्कृती, लेखक — डॉ. यशवंत मनोहर, पान नं. १३,१४,१६,१८,१९,२०


❖❖❖

# नक्षलवाद आणि आदिवासी साहित्यिकांची भूमिका

प्रा. मृदुला रायपुरे–जांगडेकर
डॉ. आंबेडकर महाविद्यालय, चंद्रपूर
Email: mrudulajanglekar@gmail.com भ्रमणध्वनी ९९७५०३३०२७

## सारांश

आदिवासींवर होत असलेल्या अन्यायाशी–अत्याचाराशी झुंज देण्यासाठी आदिवासींनी नक्षलवादाचा आसरा घेतला खरा पण याच नक्षलवादाने आदिवासींच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह उभे केले आहेत. आदिवासींचे जीवन या नक्षलवादाने अधिक गुंतागुंतीचे करून टाकले आहे. त्यांना गुन्हेगारीच्या विश्वात ढकलून दिले आहे. अगतिकता वाढत आहे. याचे पडसाद आदिवासी साहित्यावर पडले.

## बीज संज्ञा

नक्षलवादाचा उगम, आदिवासी जाणिवा, साहित्यिक प्रभाव

## प्रस्तावना

आपण 'आदि'वासी आहेत ही जाणीव घेऊन आपल्या स्वत्वाचा शोध घेण्यासाठी निघालेला आदिवासी नक्षलवादाच्या दलदलीत हळूहळू धसत चालला आहे. नेहमीप्रमाणे शासनालाही याच्याशी काही सोयरसुतक नाही. नक्षलवादाने आदिवासींना वरवर पाहता अन्याय–अत्याचारापासून वाचविण्याचा जरी प्रयत्न केला असला तरी आता मात्र चित्र पार पलटून गेले आहे. आदिवासींच्या अस्तित्वाला वाचविण्यास पुढे सरसावलेला नक्षलवाद आता आदिवासींचे अस्तित्वच संपवित आहे. भोळ्या आदिवासींना याची कल्पना नाही. तरी काही विचारवंत, साहित्यिक भल्याबुऱ्या मतांनी नक्षलवादाचे समर्थन करीत आहेत आणि विरोधही करीत आहे. आदिवासींना संभ्रमात पाडणारा हा नक्षलवाद आहे तरी काय?

## नक्षलवादाचा उगम

१९६२ साली भारत–चीन युद्धानंतर भारतीय कम्युनिस्ट पक्षामध्ये फूट पडली. भारतीय कम्युनिस्ट पक्ष (सी.पी.आय.) आणि भारतीय कम्युनिस्ट पक्ष मार्क्सवादी (सी.पी.आय.एम.) असे दोन गट उदयास आले. सी.पी. आय.चे मवाळ धोरण पक्षातल्या अनेक लोकांना मान्य नव्हते. पुढे ज्योती बसू, रणदिवे यांनी पक्ष सोडून 'मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष' या पक्षाची स्थापना केली. ह्या कट्टरवादी पक्षाने १९६७ च्या निवडणूकीत भाग घेतल्याने पक्षातील काही तरुण चिडले. हा पक्ष निवडून आल्यानंतर चारू मुजूमदार, कानू संन्याल, विनोद मिश्रा, महादेव मुखर्जी यांनी पक्ष सोडून नव्या माओवादी पक्षाची घोषणा केली. या पक्षातून निर्माण झालेली चळवळ पुढे 'नक्षल चळवळ' म्हणून नावारूपाला आली. पक्ष स्थापन झाल्याबरोबर पक्षातील लोकांनी क्रांतीची घोषणा केली. या नव्या क्रांतिकारी पक्षाचे केंद्र उत्तर बंगालमधील 'नक्षलबाडी' क्षेत्रात होते. या चळवळीचे अध्वर्यू चारू मुजुमदार यांचे हे गाव होते. या चळवळीच्या कारवायांना याच गावातून सुरूवात झाल्यामुळे ही चळवळ 'नक्षलवादी चळवळ' म्हणून संबोधण्यात येऊ लागली. तसे पाहता 'नक्षलवाद' या शब्दाला फारसा काही तात्विक अर्थ नाही. मात्र अन्याय, जुलूम, अत्याचार, शोषण या विरुद्धचा सशस्त्र लढा म्हणजे नक्षलवाद असा अर्थ या शब्दाला प्राप्त झाला. जुलमी जमीनदार, निष्क्रिय राज्यकर्ते, भ्रष्ट शासकीय अधिकारी, पोलीस यांच्या हत्येचे सत्र सुरू करून या चळवळीने नव्या दहशतीला सुरुवात केली. तीन वर्षे सतत या चळवळीचा बोलबाला राहिला. पुढे नवे सरकार सत्येवर आले. चारू मुजूमदार पकडले गेले आणि या चळवळीला धुमारे फुटले. वेगवेगळ्या गटांनी स्थानिक लोकांना चिथाविण्यास सुरुवात केली. या नक्षलवादाने 'भारत हा एक देश नसून यात अनेक देश आहेत', अशी अनेकराष्ट्रवादाची संकल्पना मांडली. आजच्या काळात जवळपास २७ विविध नक्षलवादी गट कार्यरत आहेत.

## आदिवासी जाणिवा

आदिवासी हा तर सदोदित अन्याय—अत्याचारग्रस्त समूह होता आणि आहे. समाज आणि शासन या दोन्हीकडून तो पिचल्या जात आहे. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक अशा प्रत्येकच क्षेत्रात त्याचे दमन होत आहे. 'आप घरी बाँटा आणि बाप घरी बाँटा' अशी अवस्था त्याची झाली आहे. याचाच फायदा नक्षलवादी चळवळींनी उचलला आणि बिहार, ओरिसा, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल येथील आदिवासींना त्यांनी चिथवायला सुरुवात केली. अशा तऱ्हेने आदिवासी जीवनात नक्षलवादाचा प्रवेश झाला. आज देशभरात दहा हजारांच्या आसपास नक्षलवाद्यांची सशस्त्र फळी उभी आहे. आदिवासी, शेतमजूर, दलित यांची त्यांना सहानुभूती आहे. आदिवासींना नक्षलवादाचा सर्वात अधिक फटका बसला आहे. आदिवासींकडून आदिवासी मारल्या जात आहे. एक नक्षलवादाचा प्रतिनिधी आहे, तर दुसरा पोलिस यंत्रणेचा. या साऱ्यांचा फायदा राजकीय पक्षांना होत असला ती या नक्षलवादामुळे आदिवासी कायमचा गुन्हेगाराच्या कटघऱ्यात उभा करण्यात आला आहे. हा कलंक तो आपल्या भडभडणाऱ्या रक्तानेही धुवू शकत नाही आहे.

शिकलेला, विचारी आदिवासी समाज आज चिंतनास बाध्य आहे. ''आदिवासींवरील अन्याय, अत्याचार आणि शोषणाच्या दाहकतेची मांडणी करण्यासाठी नक्षलवादाचा मार्ग आदिवासींना काही मर्यादेपर्यंत परिणामकारक वाटणे स्वाभाविक आहे. जिथे कुठे आदिवासींच्या मानवी हक्कांची  पायमल्ली होत असताना तो उघड्या डोळ्यांनी पाहत असतो, ती एक गुलामीची हतबल अवस्था आदिवासींच्या पदरी दिसते. तेथील घटना प्रसंगानुसार साधन म्हणून नक्षलवाद नक्कीच परिणामकारक ठरतो. अनेक ठिकाणी ही वास्तवता आदिवासींनी अनुभवली आहे. अशी एक व्यावहारिक अपरिहार्यता आदिवासी कधी कधी स्वीकारतो. या  पलीकडे नक्षलवाद ही त्याची मानसिकता नाही, तो त्याचा आचार आणि व्यवहार नाही, स्वभाव तर नाहीच नाही.''[१] हे गोविंद गारे या ज्येष्ठ आदिवासी साहित्यिकाचे चिंतन स्वीकारण्यास योग्य आहे.

## आदिवासी साहित्यावर नक्षलवादाचा प्रभाव

नक्षलवाद या कृतीयुक्त संकल्पनेचा प्रभाव आदिवासी साहित्यिकांवरही बऱ्या वाईट अर्थाने पडलेला दिसून येतो. ''आदिवासी साहित्य हे आमच्या जगण्याचे आणि आमच्या चळवळीचे बायप्रॉडक्ट आहे''[२], असे भुजंग मेश्राम म्हणतात. नक्षलवाद हा आदिवासींना कशा प्रकारे ओळख देतो यावरही मेश्रामांनी समाजाचा दृष्टिकोण वर्णिला आहे तो असा, ''आदिवासींनी बिरसा मुंडाचे नाव घेतले तर तो नक्षलवादी ठरतो, परंतु अजित जोगी किंवा सरकारी पातळीवरून बिरसा मुंडाचे नाव घेतले तर तो देशप्रेमी ठरतो!''[३]

आदिवासींप्रती समाजाची असहिष्णुता इथेच थांबत नाही तर इंग्रजांविरुद्ध लढा देणारा तंट्याभिल्ल स्वातंत्र्यसैनिकांच्या यादीत तर कधी येतच नाही पण त्याचा जमेल तेवढा विपर्यास करून समाजापुढे उभा केला जातो. नक्षलवादी क्रांती कवयित्री कुसूम अलाम यांना तर झूठ वाटते. त्या म्हणतात,

''हे तर भरकटलेले विकृत तरुण
बेलगाम घोड्यासारखे उन्मत्त
यांना ध्येय नसतेच आणि नसते दिशाही
दुर्दशा मात्र असणारच असते.''[४]

प्रतिकूल परिस्थितीतही आपले स्वत्व आणि मानवत्व जपून ठेवण्याचा हट्टच आहे हा. 'नक्षलवाद म्हणजे आदिवासींच्या जीवनाला लागलेल्या जळवा आहेत', असे प्रतिपादन डॉ. विनायक तुमराम यांनी केले तर ''आदिवासी पिढ्या बरबाद आणि देशद्रोही ठरवू पाहणारी क्रूरनीती या देशात कधी लोकशाहीच्या बुरख्यात तर कधी पोलीस यंत्रणेच्या चक्रव्यूहात तर कधी नक्षलींच्या दहशत रूपात खेळली जात आहे''[५] असे सुनिल कुमरे म्हणतात.

एकंदर आदिवासी साहित्यिकांनी नक्षलवादाला अव्हेरले आहे. भोळा—भाबडा आदिवासी या नक्षलवादाच्या आमिषाला बळी पडून आपले जीवन उद्ध्वस्त करीत आहे. आदिवासी साहित्यिकांनी आपली जबाबदारी ओळखून द्रष्ट्याची भूमिका घेत समाजाला या नक्षलवादापासून दूर राहण्याचाच इशारा दिला आहे.

## संदर्भ सूची

१. गारे, गोविंद, नक्षलवादी आणि आदिवासी, सुगावा प्रकाशन, पुणे, प्र.आ. २००३, पृ. ५
२. मेश्राम, भुजंग, आदिवासी साहित्य आणि अस्मितावेध, संपा. प्रफुल्ल शिलेदार, लोकवाङ्.मयगृह, मुंबई, प्र.आ. २०१४, पृ. ६७.
३. तत्रैव, पृ. ६६.
४. अलाम कुसूम, रानपाखरांची माय, हरिवंश प्रकाशन, चंद्रपूर, प्र.आ. २०००, पृ. ७५
५. कुमरे, सुनिल, जंगलजिव्हार, हरिवंश प्रकाशन, चंद्रपूर. प्र. आ. २००९, पृ. ५४

❖❖❖

# आंबेडकरी कविता अभिव्यक्ती आणि स्वरूप

प्रा. डॉ. रमेश संभाजी खंडारे
कला व वाणिज्य महाविद्यालय, बोरी अरब, ता. दारव्हा, जि. यवतमाळ
E mail: dr.rskhandare@gmail.com भ्रमणध्वनी ९४२१८४४४७२

## प्रस्तावना

अन्य कुठल्याही वाङ्मयप्रकारापेक्षा परिणामकारकतेच्या दृष्टीने काव्य हा प्रकार अधिक महत्त्वाचा आहे. प्रबोधनासाठी जे विचार प्रकट करायचे असतात त्या विचारांना जर भाषिक लय असेल तर लोकांना ते अधिक आवडतात. विचारातली उत्कटता श्रोत्यांना कृतीप्रवण करण्यासाठी अधिक उपकारक ठरत असते. त्यामुळे आंबेडकरी साहित्यिकांना कविता हा वाङ्मयप्रकार आपल्या अभिव्यक्तीसाठी अधिक सोईचा वाटला. कारण आंबेडकरी साहित्यिक हे जवळपास चळवळीतले कार्यकर्तेच असतात. किसन फागू हा असाच एक जाग आलेला अस्वस्थ कवी! त्याला वाटते की, हा देश माझा असे म्हणण्याइतके या देशाने आपल्यासाठी काय केले? आनंदराव टेकाडे यांची ''हा हिंद देश माझा'' ही कविता अतिशय गाजली. किसन फागू यांचा अनुभव टेकाड्यांच्यासारखा नव्हता. ते म्हणतात –

पहा पहा सारे जन हो,
हा हिंद देश माझा
दुहीचे मूलस्थान
भेदांचे येथे रान
वैरास देई मान,
हा हिंद देश माझा

या देशात माणसासारख्या माणसाला ज्या तऱ्हेने शतकानुशतके वागणूक मिळाली तेथे यापेक्षा दुसरी काय प्रतिक्रिया होणार? धर्माच्या नावाखाली माणसांचा छळ होतो. त्या धर्माविषयी प्रेम का वाटावे? जनावरांपेक्षाही हीन जीवन अस्पृश्यांच्या वाट्याला आणून देणाऱ्या समाज व्यवस्थेत त्यांनी का राहावे? जनजागृतीच्या प्रेरणेने भारलेला कवी आपली वेदना कवितेतून व्यक्त करतो. कविता ही आपल्या वाटयाला आलेल्या दाहक अनुभवांची अभिव्यक्ती करण्याचे माध्यम आहे. असे त्यांना वाटते. किड्यामुंग्यांना साखर घालणारा हिंदू धर्म अस्पृश्यांना उपाशी ठेवतो. शिळ्यापाक्या, उष्ट्या, फेकलेल्या तुकड्यावर गुजराण करायला सांगतो. किसन फागू अगतिकपणे देवाला आळवितात.

हरि! मज पशू कर वा पक्षी कर
परि करू नको महार
पक्षीयोनी मज राघू केले तरी हिंदू शिकविती
महार केलिया विटाळ मानुनी शिक्षण बंदी करिती
यास्तव पशू कर वा पक्षी कर

हे उद्‌गार वाचले की, अंत:करण पिळवटून जाते. या दु:ख भोगातून किसन फागूंच्या मनात विद्रोह जागा होतो. वेदना ही विद्रोहाची जननी आहे. म्हणून किसन फागूंचे मन अस्पृश्यांना लाचार होऊ नका, वेदांना मानू नका असे आवाहन करीत राहतो. ते उच्चारवाने सांगतात,

साहु नका कुणाचा जुलूम
होऊ नका कुणाचे गुलाम
सोडून द्या सारे बदकाम

आणि यासाठी ''नाही लढल्याविना मुक्ती'' असे सूत्र मांडतात. त्यांना भेदरहित धर्म हवा होता.

शाहीर घेगडे यांची कविता अधिक प्रचारकी आहे. ते मुंबईला कामधंद्याच्या आशेने आले आणि पोटाच्या धंद्यात गुंतता गुंतता डॉ. बाबासाहेबांच्या आंदोलनात सैनिक म्हणून वावरले. बाबासाहेबांच्या मुक्ती लढ्यात सर्वांनी सामील व्हावे म्हणून आवाहन करीत राहिले. त्यांची कविता आवाहनप्रिय आहे. दुष्ट रूढींना तुडवून नव्या समाजरचनेसाठी लढा म्हणून ते सतत आवाहन करीत राहिले. बाबासाहेबांनी वतनदारीविरुद्ध आवाज उठवला की ते म्हणू लागत –

बरी नाही वतनदारी
शुद्ध आहे गुलामगिरी
तिच्या पायी झालो भिकारी
विचार करा जरा अंतरी
माणुसकी तुमची कळते जनतेला

आपला समाज विचार करून पेटून उठावा म्हणून ते कवितेतून समाजाशी बोलत राहिले. अज्ञानातून, दारिद्र्यातून, समाज वर यावा म्हणून त्यांची कविता गावोगाव फिरली. आंबेडकरांनी राजकीय हक्कासाठी लढा सुरू केला. तर घेगड्यांची कविता राजकीय उपहासाच्या रंगाने रंगू लागली. बाबासाहेबांच्या आंदोलनामागे तरुणांची प्रचंड शक्ती उभी करावी हा त्यांच्या कवितेचा ध्यास होता. बाबासाहेब, त्यांचे कार्य व त्यांचे विचार हे त्यांच्या कवितेचे दैवत होते. त्यांच्या जीवितकथेचे पान न पान या शाहिराने कविताबद्ध केले. त्यांचे कौतुक करताना शाहीर घेगडे यांचे भाबडे कविमन काठोकाठ कृतज्ञतेने भरून जाते. ते आपल्या एका गाण्यात म्हणतात,

महाराचं पोर बिट्य लई हुशियार,
बिट्य लई हुशियासर
साऱ्या जगात नाही असं होणार,
अरं बघ बघ बघ
अंधारात आम्हासनी वाट दाखविली
भोळी जनता त्यांनी जागृत केली
देव माणसांनी ग्यान भरलंय चिकार,
बिट्या भरलंय चिकार
साऱ्या जगात असं नाही होणार!
बघ बघ बघ

डॉ. आंबेडकर म्हटले की, या साऱ्या कवींचे मन ओसंडून वाहत होते. त्यांचे सामाजिक व राजकीय लढे सतत वेगाने चालू होते. त्यात यशापयश येत होते. पण त्या प्रत्येक लढ्यातून समाजाची शक्ती वृद्धिंगत होत होती. शतकानुशतके वसत असलेला अस्पृश्यांच्या वस्तीवरचा अंधार बाबासाहेबांच्या कृतिउक्तींनी दूर होत होता. त्यांच्या लढ्यांमुळे गावकुसाबाहेरच्या वस्तीत चैतन्य आले.

वामनदादा कर्डक आपल्या कवितेमागची भूमिका स्पष्ट करताना म्हणतात—''मी जेथे जन्मलो, ज्या जातीत वाढलो आणि ज्या अन्यायाखाली भरडला गेलो त्याची मला आठवण आहे. ती कैफियत मी शब्दात मांडतो. त्याला तुम्ही कविता म्हणा किंवा म्हणू नका. मला जे प्रामाणिकपणे जाणवले ते मांडले.'' त्यांची बाबासाहेबांच्या विचारांवर असीम श्रद्धा आहे. त्यांच्या नेतृत्वात विश्वास आहे. त्यांनी आंबेडकरी समाजाच्या मनात जळजळीत अंगार पेटविला आहे. ते म्हणतात —

तुफानातले दिवे आम्ही तुफानातले दिवे
तुफानवारा पाऊसधारा मुळी न आम्हा शिवे

क्रांतीची गीते उच्च स्वरात गाणारा वामनदादा कर्डकांसारखा कवी बाबासाहेबांच्या निर्वाणानंतर अस्वस्थ होतो.

धर्मातरानंतर व त्या पाठोपाठ डॉ. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर जी परिस्थिती निर्माण झाली त्यातून आंबेडकरी कविता वणव्यासारखी जाळीत सुटली. हा भावनांचा वणवा उद्ध्वस्ततेच्या, अन्यायाच्या, संतापाच्या, अगतिकतेच्या इत्यादी कितीतरी विविध प्रवृत्तीतून भडकलेला होता. त्या कवितेमागे मुक्तिबोध म्हणतात त्या प्रमाणे एक 'मूल्यगर्भ' जाणीव होती. या कवितेत व्यक्त होणाऱ्या विद्रोहाचे नाते किसन फागूजी आदी पूर्व कवींशी होते. पण समाजावरचा अन्याय, त्याची वेदना वेशीवर टांगणाऱ्या चोखामेळ्याशीही तिचे नाते होते. आपले दु:ख मांडून चोखा पारंपरिक मार्गाने गेला. त्याला विद्रोहाची वाट दिसली नाही. नव्हे त्यावेळी दिसणे शक्य नव्हते. पण नवी आंबेडकरी कविता वेदना व्यक्त करीत करीत विद्रोहाच्या वाटेवर वेगाने पावले टाकू लागली.

आंबेडकरी कवितेची नवी रूपे नारायण सुर्वे, नामदेव ढसाळ, वामन निंबाळकर, दया पवार इत्यादी कवींच्या कवितेतून जाणवली. त्या कवितेतील विद्रोही स्वराला बाबासाहेबांच्या तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान होते. बुद्धाच्या तत्त्वज्ञानाची शक्ती मिळाल्यामुळे तर ही कविता अधिकच तेजस्वी झाली. माणसाने माणसावर केलेल्या

अत्याचाराविरुद्ध आंबेडकरी कविता आवाहन देत उभी आहे. तिच्यातील शब्द न् शब्द बाबासाहेबांच्या समोर नतमस्तक होतो. नामदेव ढसाळ म्हणतात —

जो स्वतंत्रतेकडून स्वतंत्रतेकडेच जातो
असा तू एकुलता एक आमच्या रथाचा सारथी
जो दिग्विजयी तंद्रीतून आमच्यात उरतो
नि शेतातून, गर्दीतून नि मोर्च्यातून नि लढ्यातून
आमच्या बरोबर असतो
नि आम्हाला शोषणातून सोडवतो तो तू
तोच तू आमचा

या कवितेच्या पाठीशी बाबासाहेबांची प्रेरणा आहे तशी गौतम बुद्धाचीही आहे. मात्र त्यांच्यासमोर बुद्ध हा अवताराचे रूप म्हणून उभा नाही तर तो बुद्ध सर्वंकष क्रांतीचा महामंत्र म्हणून उभा आहे. म्हणून दया पवार लिहितात—

तुला मी असे कधीच पाहत नाही
जेतवनात
डोळे मिटून बसलेला, ध्यानस्त पद्मासनातला
अथवा अजिंठा वेरूळच्या लेण्यात
दगडी ओठ शिवलेला, शेवटची निद्रा घेत असलेला

महाडच्या चवदार तळ्याचे पाणी प्याल्यामुळे आपण अमर होऊ असे नाही, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते. आजपर्यंत चवदार तळ्याचे पाणी प्यायलो नव्हतो, तर आपण काही मेलो नव्हतो असेही ते म्हणत. पण ते आग्रहपूर्वक सांगत की, तेथे केवळ पाणी प्यायला जायचे नाही तर इतरांप्रमाणे आम्हीही माणसे आहोत हे सिद्ध करण्यासाठी जायचे आहे. त्या रणक्षेत्राला कोटी कोटी प्रणाम करताना सुखराम हिवराळे म्हणतात,

झगडा, झगडा! अखंड झगडा
दिला त्या दलितोद्धारकाने महामंत्र
आता गुलामांनी त्याच्या गुलामगिरीची जाणीव
ठेवून थंड करायला हवे!
स्वत:ला तुच्छता मुक्त करायला हवे!
त्यासाठी आपल्या जीवनाचे — पंचप्राणांचे
बलिदान करायला अन्यायाच्या प्रतिकारासाठी
हे जग उलथून टाकायला हवे!

म्हणून या रणक्षेत्राला कवी प्रणाम करतो. येथूनच क्रांतिपर्व सुरू झाले. येथूनच परिवर्तनाचा महामंत्र घोषित केला गेला. येथूनच हिंदू धर्माला घेरून टाकणाऱ्या तुफानाचा जन्म झाला. महाडच्या मुक्तिसंग्रामाने अस्पृश्यांना नवी दिशा मिळाली. पण त्याचा शतकानुशतके छळ चालला होता. तो ते कसा विसरू शकतील?

१९६० नंतरच्या कवितेत सामन्यत: 'दु:ख' प्रतीतीस येते. आंबेडकरी कवितेतही ते जाणवते. अन्य कवितेतही ते जाणवतेच. तसे दु:ख सनातनच. प्रत्येक पिढीच्या वाट्याला कोणती तरी दु:खे येत असतात आणि ती खोटी नसतात, कल्पित दु:खे नसतात. आपल्या वाट्याला जे आले ते मी भोगलेच पाहिजे. म्हणून माणूस दु:ख भोगतो. तो असेही मानीत असतो की, दैवाची, नियतीची इच्छा म्हणून दु:ख भोगावे लागते. तर कधी त्याला वाटते की, कर्माची फळे म्हणून दु:ख भोगावे लागते. दु:खच पण ते निरनिराळ्या कारणांनी उत्पन्न होत असले पाहिजे. दु:ख चक्रात गवसलेल्या तरुण कवी मनाला वाटते आहे की, सारेच अर्थहीन आहे. मानवी अस्तित्वाला अर्थ नाही. या भयानक जाणीवेने ग्रस्त झालेली कविता एकसुरी बनण्याची शक्यता आहे. आंबेडकरी कवितेतही दु:ख व्यक्त होतेच. पण हे गावकुसाबाहेरचे विदारक, अस्वस्थ करणारे दु:ख जेथे माणूस जगतो, नव्हे त्याने जगावे अशी समाजव्यवस्थेची अपेक्षाच नव्हती. आंबेडकरी कवींची जी तक्रार आहे, की गावकुसाबाहेरच्या मानव समुहाचे दु:ख मराठी कवितेने कधी आपले मानले नाही आणि ते खरे आहे. 'आमुचा प्याला दु:खाचा, डोळे मिटूनी प्यायाचा'' असे म्हणणाऱ्या केशवसुतांना एका अंत्यजाच्या मुलाचा प्रश्न अस्वस्थ करू शकला. अन्यथा मराठी कविता ध्येय, आशा, प्रेम यांची पूर्ती होत नाही म्हणून भोगाव्या लागणाऱ्या दु:खाच्या शोधात पार गढून गेली.

सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनातील विषमता नष्ट करणे हा आंबेडकरी कवींचा उद्देश आहे. ही आंबेडकरी कवींच्या बद्दलची एक अपसमजूत आहे. त्याचा उद्देश ज्या प्रकारचे जीवन समाजव्यवस्थेने शतकानुशतके लादले आहे. त्या जीवनात जे अनुभव येतात ते मोकळेपणाने मांडायचे. ही कविता समाजातील अन्यायाचे, अत्याचाराचे दर्शन घडविते आणि अपरिहार्यपणे एका नव्या समाजव्यवस्थेचे स्वप्न पाहते. त्यामुळे कविता एकसुरी व ढोबळ कशी काय होईल? तसेच आंबेडकरी कविता आशावादी आहे. आंबेडकरी कवितेने दु:ख स्वीकार केला आहे. ते भयाण वास्तव आहे. ती नवे रूपजीवन जाणून घेते आहे. कठोर, दाहक, वास्तवाचे चिंतन करता करता ती स्वत:च्या एका वेगळ्या विश्वात गढून जाते. ती सगळ्या अन्याय करणाऱ्या जीवन व्यवहारावर आगही पाखडते. तिला प्रेम आहे ते सर्वंकष क्रांतीचे. ही क्रांतिप्रियता अपरिहार्य आहे. कारण या क्रांतीतून त्याचे इप्सित अवतरणार आणि विद्रोह तर तरूण मनाची प्रवृत्तीच आहे. विद्रोहात विद्वेष असतो. जीवनातील विसंगती जाणणारा विनोदी लेखक सुसंगती जाणतो म्हणून तो मोठा असतो. जे जे कालबाह्य, जे जे छळणारे, जे जे माणुसकीचे हक्क नष्ट करणारे असते त्या त्या सर्वांच्या विरुद्ध मूर्तिभंजक उभा राहतो. आजही आंबेडकरी कविता भंजनाला प्रवृत्त झाली आहे. तिला जसे काही मोडून टाकायचे आहे तसे तिला नवे काही जोडायचे आहे.

आंबेडकरी कवितेला काळोख नाहीसा करून टाकणारा प्रकाश आणणारे सर्व थरातून वादळ उठले पाहिजे अशी तिची आकांक्षा आहे.

## संदर्भ ग्रंथ


| | | | |
|---|---|---|---|
| १. | बागूल, बाबुराव | – | दलित साहित्य आजचे क्रांतिविज्ञान |
| २. | खरात, शंकरराव | – | दलित वाङ्‌मय प्रेरणा व प्रवृत्ती |
| ३. | फडके, भालचंद्र | – | दलित साहित्य वेदना व विद्रोह |
| ४. | डांगळे, अर्जुन | – | दलित साहित्य एक अभ्यास |
| ५. | मनोहर, यशवंत | – | दलित साहित्य सिध्दांत आणि स्वरूप |
| ६. | जाधव, रा. ग. | – | निळी पहाट |
| ७. | कवठेकर, बाळकृष्ण | – | दलित साहित्य एक आकलन |


❖❖❖

# स्वातंत्र्योत्तर साठपूर्व वैदर्भीय कादंबरीतील रंजनवाद

डॉ. पवन मांडवकर
एम.ए. इंग्रजी, मराठी, बी.एड., पीएच.डी., नेट
प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ
E mail: pavanmandavkar@hotmail.com भ्रमणध्वनी ९४२२८६७६५८
४० पुस्तके, अनेक शोधनिबंध, ४ पुरस्कार, ४ महाविद्यालयीन राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय जर्नल्सच्या संपादन/सल्लागार/ पीअर रिव्ह्यू समितीवर, २ राष्ट्रीय नियतकालिकांचे मुख्य संपादक, थायलंडमध्ये बिक्स परिषदेच्या चर्चासत्राचे अध्यक्ष, मराठी प्राध्यापक परिषद अध्यक्ष, प्राचार्य फोरम कार्यकारिणी सदस्य, प्रकाशक, संस्था विश्वस्त

## सारांश

वैदर्भीय कादंबरीकारांकडे मराठी साहित्यात तसे दुर्लक्षच झाल्याचे जाणवते. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या निमित्ताने तयार होणाऱ्या कादंबऱ्यांची जागा सुखासीनतेकडे झेपावणाऱ्या रंजनवादी कादंबऱ्यांनी घेतली. फडके, खांडेकर, माडखोलकरांनी रंजनवादाला प्रभावीपणे चित्रित केले आणि विदर्भातील अन्य साहित्यिकांनीही तो मार्ग स्वीकारला. कादंबरी विश्वावर फडके तंत्राची छाप दिसते. कथानकापासून मांडणी, विकास सर्वच बाबतीत बऱ्याच प्रमाणात अनुकरण असून 'प्रेम' हा विषय मोठ्या प्रमाणावर हाताळला गेला. नायक–नायिकेची भेट–ओळख–प्रेम–भेटीगाठी–वाद –ताटातूट–विरह–पुनर्मिलन हा मार्ग रुळलेला दिसतो. आदि–मध्य–अंत या पद्धतीने शेवट गोड करणे, हेच तंत्र दिसते. काही लेखकांनी अपवादात्मक मोजक्या कादंबऱ्यांचा शेवट दु:खाचा केला आहे. विस्तारभयास्तव येथे सुमती धनवटे, मा.ना. भोळे, लीला देशमुख, श्रीकांत राय, उद्‌धव शेळके, दुर्गा जोशी, माडखोलकर इत्यादींच्या रंजनवादी कादंबऱ्यांवर प्रकाश टाकण्यात आला आहे. समाजाला विरंगुळा हवा होता आणि हीच नस पकडून रंजनवादी कादंबऱ्यांची निर्मिती होत गेली.

## बीजशब्द

कादंबरी, रंजनवाद, वाचकप्रिय, स्वातंत्र्योत्तर साठपूर्व

## प्रस्तावना

वैदर्भीय कादंबरीकारांकडे मराठी साहित्यात तसे काही प्रमाणात दुर्लक्षच झालेले आहे. त्यातही स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर साठपूर्व कालखंडात बा.सं. गडकरी, ग.त्र्यं. माडखोलकर, पु.भा. भावे, डॉ. य.खु. देशपांडे, न.र. फाटक, शं.बा. शास्त्री, वाळके, बकुलराय, अनंत गोपाल शेवडे, कोलारकर, दिनकर देशपांडे, या. मु. फाटक, वनमाली, मुक्तिबोध, वसंत वरखेडकर, शरच्चंद्र टोंगो, पां.श्रा. गोरे, केशव केळकर, गो.नी. दांडेकर, सीता ब्रम्हे, उद्‌धव शेळके, आगाशे, तल्हार, बोरसे, गीता साने, लीला दीक्षित, लीला देशमुख, रामदास सेलूकर अशी अनेक मातब्बर साहित्यिक मंडळी असूनही तत्कालीन कादंबऱ्यांचा संशोधनपर अभ्यासही फारसा झाला नाही. या कादंबऱ्यांचे विषय आणि प्रवाह विभिन्न आणि विपुल होते. शोधनिबंधाच्या आवाक्याचा विचार करता येथे केवळ रंजनवादी कादंबऱ्यांचे अध्ययन केले आहे आणि त्यातही निवडक कादंबऱ्यांवरच प्रकाश टाकण्यात आला आहे.

## मराठी कादंबरीतील रंजनवाद

हरिभाऊंच्या कालखंडातच ना.सी. फडक्यांनी आणि खांडेकरांनी कादंबरी लेखन सुरू करून समाजाभिमुख प्रश्ननिष्ठ कादंबरीकार वा.म. जोशी, केतकर, वरेरकर यांच्यापेक्षा वेगळा प्रकार हाताळून अल्पावधीतच हरिभाऊंसह या सर्वांपेक्षा अधिक लोकप्रियता मिळवली. समकालीन वाचकांच्या आवडीनिवडी आणि सुखासीन कादंबरीकडे तरुणांचा ओढा लक्षात घेऊन फडके, खांडेकर, माडखोलकर अशा कादंबरीकारांनी लेखन केले. जीवनातील दु:खाला कंटाळून कल्पनाविश्वात रमणाऱ्या सुशिक्षित तरुण वाचकांची नस या साहित्यिकांनी अचूक पकडली. नायक–नायिकांच्या भेटीगाठी, ओळख, सहवास, मैत्री, यातून निर्माण होणारे प्रेम, कधी भांडणे, विरह, पुनर्भेटी अशी वर्णने वाचकांना मोहविणारी होती. कधी रहस्य, संकट, साहस, योगायोग, सुटका यांचीही

त्यात पेरणी असायची. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातही क्रांतिकारकांचे आदर्श डोळ्यापुढे असल्याने अनेक रंजनवादी कादंबऱ्यांमध्ये हे विषय किंवा पात्र निर्माण करण्यात आले. तारुण्य, प्रेम, शृंगार, प्रणय अशा विषयांना रंजकतेने वर्णिल्याने या कादंबऱ्या नव्या पिढीला आकर्षित करीत होत्या. स्वातंत्र्योत्तर कालखंडात एक लढाई संपून समाधानाचे आयुष्य काढण्याची स्वप्ने पाहणाऱ्या समाजाला विरंगुळा हवा होताच आणि तो या रंजनवादी कादंबऱ्यांनी मिळवून दिला.

## विषय विवेचन

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील पहिल्या तपात विदर्भातीलच नव्हे तर एकंदर मराठी कादंबऱ्यांवर फडके तंत्राची छाप दिसते. अगदी कथानकापासून मांडणी, विकास सर्वच बाबतीत बऱ्याच प्रमाणात अनुकरण दिसते. 'प्रेम' हा विषय मोठ्या प्रमाणावर हाताळला गेला आहे. नायक–नायिका भेट–ओळख–प्रेम–भेटीगाठी–वाद–ताटातूट–विरह–पुनर्मिलन या रुळलेल्या नियमित मार्गावरून कथानके वाटचाल करताना दिसतात. आदि–मध्य–अंत याच पद्धतीने शेवट गोड करणे, हेच तंत्र तेथे दिसते. काही लेखकांनी अपवादात्मक मोजक्या कादंबऱ्यांचा शेवट दु:खाचा केला आहे. मात्र ते दु:ख वरवरचे वाटते आणि त्याचा सखोल परिणाम वाचकांवर होत नाही. स्वप्रतिभेचे दर्शन घडविण्याची किमया या काळात लेखकांना साकार करता आली नाही की त्यांनी त्याची चाचपणीच केली नाही, असा प्रश्न पडतो.

सामान्यांच्या जीवनापासून दूर गेलेली रंजनवादी कादंबरी 'वादळज्योत'. 'समाजात अन्यायाच्या जात्याखाली ज्या स्त्रिया भरडल्या जात आहेत, त्यांच्याकडे सहानुभूतीच्या नजरेने पाहिलं जावं, असा उद्देश बाळगून ही कादंबरी लिहिली आहे.'[१] असे लेखिका सुमती धनवटे स्वत: म्हणत असल्या तरी याच कादंबरीत 'बकुळेच्या जीवनावर कादंबरी लिहिता आली तर? ......तर खात्रीनं ती एक स्वप्नरम्य कादंबरी होईल.'[२] असेही लेखिकेने कथानकात म्हटले आहे. लेखिकेच्या मनातील भावप्रतिमा या कादंबरीत ठिकठिकाणी जाणवतात. पतीच्या प्रेमासाठी आसुसलेली आणि संसारसुखासाठी धडपडणारी बकुळा, कठोर हृदयाचा तिचा पती बापूसाहेब, तसेच प्रेमळ व्यक्तिरेखा अनंत दीक्षित अशा त्रिकोणातून ही कादंबरी फडके तंत्राचाच वापर करते. सुरुवातीची प्रकरणे आकर्षित करणारी, वाचकांना गुंतवणारी, पुढे बहरत गेलेली प्रेमकथा, निरगाठ–सुरगाठ–उकल या पद्धतीने कथानकाला फुलवत ठेवणे हे तंत्र आणि मोहक शैलीमुळे ही कादंबरी वैदर्भीय रंजनवादी कादंबऱ्यांमध्ये उठून दिसते.

या कादंबरीपूर्वी लेखिकेने लिहिलेल्या 'जय–पराजय' या कादंबरीतही नायक–नायिकेचे एकमेकांजवळ येणे, विभक्त होणे आणि पुनर्मिलन हाच मार्ग अनुसरला आहे. नायिका मर्यादाशील तर नायक बेछूट, स्वैराचारी, त्यातून निर्माण होणारे भावनिक, वैचारिक संघर्ष आणि शेवटी नायकाचे मतपरिवर्तन ही कथानकाची मांडणी आकर्षक आहे.

तारुण्यसुलभ प्रेमाला वाहिलेली या काळातील मा.ना. भोळे यांची एक रंजनवादी सुखान्तिका 'दुनिया'. ह्या कादंबरीचा नायक हा त्याच्या वडिलांचा एकुलता एक मुलगा. सर्व खेळांत निष्णांत. नायक–नायिकेच्या प्रथम भेटीत एकमेकांकडे आकर्षित होणे, प्रत्येक खेळात ते दोघे एकमेकांचे सहयोगी खेळाडू म्हणून निवडले जाणे, नायकाचा आकर्षक खेळ आणि त्यापेक्षाही त्याचा भरीव बांधा नायिकेला आवडणे, त्यांच्यामध्ये निर्माण होणारी एकमेकांविषयी आसक्ती, मध्येच नायिकेला स्वत:च्या ध्येयाची आठवण होणे, मग 'प्रेम की ध्येय' हा संघर्ष, त्यातून विकल्प, नायकाचे परागंदा होणे, त्यानंतरच्या काळात दोघांनाही एकमेकांवर असलेल्या प्रेमाची महती पटणे आणि पुन्हा त्यांचे मिलन होणे अशा रुळलेल्या मार्गावरून ही कादंबरी प्रवास करते. या कादंबरीत नायक–नायिकेच्या प्रेमप्रकरणात घरच्यांची किंवा समाजाची आडकाठी नसते. घरातील व सभोवतालची परिचित मंडळी त्या दोघांचे भले व्हावे, याचसाठी प्रयत्नशील दिसतात. एकमेकांच्या मनातील शंका–कुशंका हाच काय तो प्रेमातील अडसर. वास्तव जीवनाशी या कादंबरीची तुलना तशी कठीणच जाते.

'मी एकटीच जाणार' ही लीला देशमुखांची वैद्यकीय पेशाची पार्श्वभूमी लाभलेली ही एक प्रेमकथा. 'स्त्रीने वाटेल तसे कष्ट उपसावे अन् थोडं स्वास्थ्य मिळतात पुरुषाची फुलपाखरी वृत्ती बाहेर भटकू लागावी, हे खरोखर आजच्या सुशिक्षित स्त्रीच्या संसाराचं स्वरूप आहे. बरोबरीची बुद्धिवान, ध्येयवादी स्त्री आजच्या पुरुषाची ही फुलपाखरी वृत्ती अजमावून घ्यायला असमर्थ ठरली आहे'[३], हे सांगण्याच्या उद्देशाने या कादंबरीची रचना केली गेली आहे. लीला देशमुखांच्या कादंबऱ्यांवर फडक्यांच्या शैलीची छाप असून कलावादाकडे व

रंजनवादाकडे त्यांचा झुकता कल आहे. स्वप्नमय आभासात्मक विश्वात त्यांच्या नायक–नायिका वावरत असतात.

वाचकप्रिय आडाखे जवळ करीत एखादा लेखक आपल्या दमदार कथानकाचे कसे हाल करून घेतो त्याचे उदाहरण म्हणजे उद्धव शेळक्यांची कादंबरी 'नांदतं घर'. घरात दारिद्र्य असूनही यशवंताचे अभ्यासाकडे होणारे दुर्लक्ष, त्याचा सिनेमाचा नाद, शालूचे प्रेमप्रकरण आणि त्यातून उद्‌भवणारे संकट, वडील मुलाचे वेगळे होणे हे मध्यमवर्गीयांच्या जीवनातील सुखदु:खाचे चित्रण वास्तविकतेला जवळ करून प्रभावीपणे मांडता आले असते; परंतु आरंभ–विकास–उत्कर्षबिंदू–उकल हे सूत्र वापरून मुद्दाम ओढून ताणून निर्माण केलेला आनंददायी शेवटाकरिताचा खटाटोप पाहता उद्‌धव शेळक्यांची ही कादंबरी केवळ रंजनवादातच अडकून पडली, हे लक्षात येते.

दुर्गा जोशी यांच्या 'दिव्य ज्योती'मध्ये सविता, सरिता या प्रमुख व्यक्तिरेखा असून इंग्रजांच्या क्रूर अत्याचाराच्या पार्श्वभूमीवर अत्याचारग्रस्तांच्या बाबतीत असलेली दयाबुद्धी उठून दिसते. मात्र १९४२ ते १९४५ या धगधगत्या कालखंडातील विदारक घटनांचा उल्लेख करण्यापलीकडे या कादंबरीत केवळ स्वप्नरंजन आहे. बंगालमधील दुष्काळाचे वर्णन आहे; मात्र ते प्रभावी वाटत नाही. मोठ्या राजकीय घटनांनी युक्त परंतु परिणामशून्य अशी ही कादंबरी आहे.

'वीस दिवस' ही श्रीकांत राय म्हणजेच श्रीकांत नारायण आगाशे यांची प्रेमविषय साकारणारी कादंबरी. माहेरी गेलेल्या पत्नीच्या विरहाने तंद्री लागलेला नायक अपघातात सापडून वेडा होतो. पत्नीला बातमी नीट न कळल्याने तिच्या हृदयाची तगमग होते. केवळ वीस दिवसांचा हा नियतीचा खेळ दाखवताना लेखकाने कादंबरीचा प्रवाह खेळकर ठेवला आहे. पत्नीप्रेमाची कथा असली तरी वेड्यांचे अनुभव अतिशय दर्जेदारपणे वर्णिले आहेत.

गो.नी. दांडेकरांच्या कोकणाची पार्श्वभूमी असलेल्या 'शितू' या कादंबरीत विसूवरील शितूचे अमर प्रेम वर्णिले आहे. त्यांच्या 'माचीवरला बुधा' या कादंबरीत लेखकाने निसर्गवर्णनाबरोबरच प्रचंड कल्पनाविश्व निर्माण केले आहे. त्यांच्या कादंबऱ्या प्रादेशिक व सामाजिक स्तरात मोडत असल्या तरी त्या रसिकांच्या रंजनात कुठलीही कमतरता भासू देत नाहीत.

ग.त्र्यं. माडखोलकरांच्या 'स्वप्नांतरिता', 'अनघा', 'अरुंधती', 'रुक्मिणी' या चारही कादंबऱ्या नायिकाप्रधान असून त्याच त्या गोष्टींचा पुन:प्रत्यय येतो. समकालीन राजकारणाचे व्यापक चित्रण, क्रांतिकारकांविषयी आत्मीयता आणि उग्र शारीरिक प्रेम हे त्यांच्या कादंबऱ्यांचे विशेष. कादंबरीच्या कथानकाशी किंवा एकंदर प्रकृतीशी राजकारणाचा मेळ बसतो की नाही याचा विचार न करता त्यांनी हे लिखाण केले आहे. 'रुक्मिणी'मध्ये उत्तरार्धात जे राजकारण आले आहे, ते कथानकाशी ठिगळवजा जुळले आहे की काय असे वाटते. 'आरंभीचे भाग चटका लावणारे व कथानकाला ओघ देणारे असले तरी नंतरचा बराचसा भाग आगंतुक वाटतो किंवा कदाचित 'राजकीय कादंबरीकार' हे आपले लौकिकप्राप्त व्यक्तिमत्त्व लेखकाला विसरावेसे वाटत नसल्यामुळेही असे झाले असावे.'[४] अशीच काहीशी बाब 'अनघा'ची. या कादंबरीत प्रेमकथा आहे. तिला राजकारणाची पार्श्वभूमी आहे. डॉ. अनघा यांचा कम्युनिस्टांकडे ओढा असून त्या डॉ. अभय यांच्याशी सतत चर्चा करीत असतात असे लेखक सांगतात. म. गांधींच्या हत्येनंतर त्याचे घर उद्‌ध्वस्त केले जाते. असे काही राजकीय प्रसंग विस्ताराने वर्णिले आहेत. 'स्वप्नांतरिता' कादंबरीत राजीव देशपांडे हा क्रांतिकारक नायक आणि नयिका रंजन यांच्या प्रेमाची कहाणी आहे. मात्र या कथानकाला भारताच्या स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडातील काही राजकीय घडामोडींची पार्श्वभूमी आहे. 'अरुंधती'मध्ये चित्रित केलेल्या नायिकेला पुरुषांचे भय वाटत नाही, उलट आकर्षण वाटते. अनंग देशमुख या कम्युनिस्ट कार्यकर्त्याला नायक दाखवून त्याच्या सहवासात नायिकेच्या स्त्रीविषयक भावना जागृत होतात, अशी प्रेमकहाणी माडखोलकरांनी चित्रित केली आहे.

या चारही कादंबऱ्यांमध्ये भरपूर राजकारण आले असून विरंगुळा किंवा मनाला तजेला आणण्यासाठी तर प्रेमाची पेरणी केली नाही ना, असा प्रश्न पडतो. काही वेळा हे प्रेम भडक, कामुक, उत्तेजक, वाचकांच्या भावना चाळवणारे वाटते. 'अरुंधती'मध्ये एक प्रसंग आहे. – 'रात्र बरीच झाली आहे. आपण आत जाऊन निजू आता–' तिचे ते शब्द कानावर पडले मात्र – तो झटदिशी उठला. त्याने तिच्या केसाची झुलपे धरून तिचे तोंड वर उचलले. तिची लहान, पातळ जिवणी आपल्या किंचित रूंद, जाड जिवणीत घट्ट धरली आणि क्षणार्धात त्याचा धूम्रगंधित गरम श्वास तिच्या श्वास तिच्या सौम्य, स्वच्छ श्वासात मिसळला.' ('अरुंधती', पृ. १२७) याच कादंबरीत दुसरा प्रसंग उदाहरणादाखल देता येईल. – 'रमणभाई लोडाला ओठंगून बिछान्यावर लेटलेले होते व त्यांच्या त्या मोठ्या थोरल्या पलंगावर त्यांना अगदी बिलगून अरुंधती बसलेली होती. तिचा हात आपल्या गालावर ठेवून ते तो कुरवाळीत होते. तिच्या अंगातल्या पांढऱ्या चोळीच्या बाहीपासून तो तळव्यापर्यंत तो उघडा

गोंडस हात, आपल्या आखूड, गुबगुबीत बोटांनी हळूहळू दाबण्याचा त्यांचा क्रम, डोळे अर्धवट मिटून, सारखा चालू होता. मधून मधून तिच्या करांगुलीचे अग्र ते आपल्या जिवणीच्या बळावर हळूच दाबीत व मधूनच एखादे वेळी चोळीच्या पोकळ बाहीत आपली बोटे अलगद शिरकावून तिच्या दंडाच्या मांसल भागात ती अगदी हळुवारपणे रोवीत.' ('अरुंधती', पृ. ८५) असे भावना चाळवणारे लेखन या रंजनवादी कादंबरीत माडखोलकरांनी केले आहे.

'रविवार ते रविवार' ही शरच्चंद्र टोंगोंची कादंबरी बाळबोध कथानकसंपन्न वाटते. 'अखेरची इच्छा'मधील कथानक सरळ आहे. लेखिका—मैत्रिणीला दिलेला नकार कलाकुशलतेने टोंगोंनी वर्णिला आहे.

याच काळात लीला दीक्षितांची 'मधुबोल', गो.सं. गिरटकरांची 'पावना', द.चि. सोमणांची 'वाड्यांच्या वाड्यात', ह.चि. दातारांची 'मशाल', द.ग. प्रधानांची 'जीवनप्रवाह' अशा अनेक कादंबऱ्यांनी वाचकांचे रंजन करणे हेच ध्येय आखल्याचे जाणवते. सुरुवातीला जरी वेगवेगळ्या समस्यांची पार्श्वभूमी सादर करून किंवा एखाद्या समस्येच्या निराकरणासाठी लेखन केल्याचा भास निर्माण केल्या गेला तरी शेवटी या कादंबऱ्या रंजनवादाच्या वर्तुळातच फिरत राहिल्या, असे म्हणावे लागेल.

असे असले तरीदेखील या कालखंडातील वैदर्भीय रंजनवादी किंवा करमणूकप्रधान कादंबरीने वाचकांचे रंजन करताना जीवनाची साथ सोडली नाही, हे वैशिष्ट्य नाकारता येणार नाही. प्रेम चित्रण ही रंजनवादी कादंबरीची प्रवृत्ती असली तरी ही कादंबरी सहसा थिल्लर पातळीवर जात नाही. गांभीर्यपूर्वक प्रेमविषयक सर्व संभवनीय पैलूंचा विचार साहित्यिकांनी केलेला आहे. तारुण्यसुलभ अवखळपणाबरोबरच वैचारिकतेलाही प्राधान्य दिल्याने लेखकांचा प्रगल्भपणा मान्य करावा लागतो.

## निष्कर्ष

१. स्वातंत्र्योत्तर काळात समकालीन वाचकांच्या आवडीनिवडी आणि सुखासीन कादंबरीकडे तरुणांचा ओढा लक्षात घेऊन फडके, खांडेकर, माडखोलकर अशा कादंबरीकारांनी लेखन केले. जीवनातील दु:खाला कंटाळून कल्पनाविश्वात रमणाऱ्या सुशिक्षित तरुण वाचकांची नस या साहित्यिकांनी अचूक पकडली.

२. 'प्रेम' हा विषय मोठ्या प्रमाणावर हाताळून नायक—नायिकेची भेट—ओळख—प्रेम—भेटीगाठी—वाद—ताटातूट —विरह—पुनर्मिलन हा मार्ग तसेच आदि—मध्य—अंत याच पद्धतीने शेवट गोड करणे, हेच तंत्र स्वातंत्र्योत्तर साठपूर्व वैदर्भीय रंजनवादी कादंबरीचे दिसते.

३. वाचकप्रिय आडाखे जवळ करीत काही लेखकांनी आपल्या दमदार कथानकाचे मातेरे करून घेतले. राजकारण वर्णनाचा मोह न आवरता आल्याने त्याला पुढे करून विरंगुळा किंवा मनाला तजेला आणण्यासाठी तर प्रेमाची पेरणी केली नाही ना, असा प्रश्न काही कादंबऱ्यांच्या बाबतीत पडतो.

४. स्वातंत्र्यलढ्याची पार्श्वभूमी आणि कम्युनिस्टांचा, क्रांतिकारकांचा आदर असल्याने काही कादंबरीकारांनी त्यांचे विचार व नायकही तशा पद्धतीचे रंगविले आहेत.

५. रंजनवादी भूमिकेतून काही कादंबऱ्या शृंगारिक वर्णनाकडे वळल्या असून भावना चाळवणारे लेखन म्हणूनही त्यावर टीका झाली; मात्र त्या संख्येने अधिक नाहीत.

## संदर्भ


१. धनवटे, सुमती, वादळज्योत, परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई, पहिली आवृत्ती, १९५७, प्रस्तावना
२. तत्रैव, पृ. ४९
३. देशमुख, लीला, मी एकटीच जाणार, वर्धा, पहिली आवृत्ती, १९५३, पृ. ७९
४. मांडवकर, डॉ. भाऊ, वैदर्भीय कादंबरी—विश्व, सेवा प्रकाशन, अमरावती, प्रथमावृत्ती, १९९५, पृ. २४


❖❖❖

# ग्रामीण साहित्याचे मराठी वाङ्मयातील योगदान एक साधक बाधक चर्चा

प्रा.डॉ. युवराज श्री. मानकर
मराठी विभाग, शिवशक्ती कला, वाणिज्य महाविद्यालय, बाभुळगांव, जि. यवतमाळ
ई मेल: drysmankar@gmail.com भ्रमणध्वनी ९८९०४६७६१३

## प्रस्तावना

वेदनेच्या वेलीवरील उजेडांची फुलं म्हणजे साहित्य. समाजजीवनाच्या व्यथा, वेदना आणि दु:खाशिवाय आजवर कोणत्याही साहित्याचा जन्म झाला नाही. दु:ख हे पद जसे साहित्याच्या तळाशी अस्तित्वातच असते तसेच साहित्याच्या जन्मासह त्याच्या उदरात निश्चित असे ध्येय आणि उद्दिष्ट्येसुद्धा अस्तित्वात असतात. आजवरचे साहित्य आपल्या प्रवासाची ध्येय, दिशा जन्मासहच घेऊन प्रवास करीत आलेले आहे. साहित्याचा निर्माता हा समाजजीवनाच्या संस्कारांचे ओझे घेऊनच जसा जन्माला येतो तसेच निर्मात्याचे साहित्यही विशिष्ट अशी ध्येय– दिशा घेऊन जन्माला येत असते. अशी विशिष्ट ध्येय दिशा घेऊन जन्माला येणारे साहित्य समाजमनाची जडण–घडण करण्याच्या दृष्टीने, पारंपरिक साहित्यातील दारिद्र्य दूर करण्याच्या, त्यात नवीन काही योगदान देण्याच्या व त्या साहित्याच्या विषय, आशय, कक्षा, दृष्टिकोनांची सखोलता, खोली, व्यापकता वाढविण्याच्या उद्देशाने धडपडत असते. अशी ही साहित्याची आदर्श संहिता साहित्यनिर्मात्यापुढे व साहित्यासमोर असली पाहिजे ही स्वाभाविक अपेक्षा साहित्याकडून वाचक करीत असतो.

## शोधनिबंधाची समस्या व उद्देश

ग्रामीण साहित्याने मराठी वाङ्मयात दिलेल्या योगदानाची साधक–बाधक चर्चेची कारणे शोधल्याशिवाय पुढचा प्रवास करणे सोयीस्कर ठरत नाही. त्याचे एक कारण असे की, साहित्य ज्या ध्येय–दिशा घेऊन जन्माला येते, साहित्याची एक आदर्शवत असलेली संहिता जी वाचकांच्या, साहित्य अभ्यासकांच्या मनात उभी राहिलेली असते, साहित्याभ्यासकांची साहित्याकडून काही एक अपेक्षा असते, ती अपेक्षा या साहित्याने सध्याच्या काळात पूर्ण केलेली आहे का? हे एक कारण आणि दुसरे असे की, ज्या मराठी वाङ्मयाला नाकारत ग्रामीण साहित्याने मराठी वाङ्मयात आपले जीवन नाही, जाणिवा नाही आपल्या देशी काळ्या मातीचा जिव्हाळा नाही. आपले सुख–दु:ख नाही. आपले नायक नाही, आपली भाषा नाही आणि आपले प्रश्न सोडविण्याचा आणि ते साहित्यातून मांडण्याचा प्रयत्न नाही. हे साहित्य फक्त उच्चवर्णीयांच्या जीवनजाणिवेचे आविष्करण करण्यात गुंग झाले, कष्ट करणाऱ्या खेडूत माणसाविषयी अक्षरही लिहिले गेले नाही, जे लिहिले गेले असेल ते जाणीवपूर्वक लिहिले गेले नाही. उलट कष्ट करणाऱ्यांची प्रतारणा या मराठी वाङ्मयाने केली. हे वाङ्मय व्यक्तिकेंद्री, समाजविन्मुख, आशयापेक्षा कलात्मकतेचा सोस बाळगणारे, पांढरपेशा वर्गाचे नागरजीवनसमस्या चित्रित करणारे आणि पाश्चात्यांचा स्वीकार करणारे आहेत. अशी ओरड असा ठपका ठेवून आणि मराठी वाङ्मयापासून आपण आपली नाळ तोडून आपल्या स्वतंत्र अस्मितेचे प्रश्नाचे साहित्य निर्माण केले, हे दुसरे कारण. तेव्हा खरेच या ग्रामीण साहित्याने मराठी साहित्यापासून वेगळे झाल्यानंतर त्या मराठी साहित्याला काही दिले का? की त्याच मराठी वाङ्मयांची वृत्ती–प्रवृत्ती जोपासत त्यांना साजेशी असलेली भूमिका, पण वेगळ्या पद्धतीने वेगळा सवतासुभा निर्माण करून पार पाडली, की आपल्या वेगळेपणाचा ठसा त्या साहित्यावर उमटविला. असं काय या ग्रामीण साहित्याजवळ आहे की ते मराठी वाङ्मयाला देण्यासारखं आहे? सध्याचा काळ शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा, विचार, तत्त्वज्ञान, भाषा आणि साहित्याच्या अस्ताचा, ऱ्हासाचा काळ आहे. अशा काळात माणूस वाचला पाहिजे, तो जगला पाहिजे, त्याला जागविले पाहिजे त्याला नव्या जगण्याचे भान आणून दिले पाहिजे. त्याच्या पुढील समस्या, सोडविल्या पाहिजे. त्याला जगण्याच्या नव्या दिशा दिल्या पाहिजे याची आवश्यकता आहे आणि साहित्य साहित्यालाही आणि जीवनालाही वाचवू शकते. साहित्याला व जीवनालाही काही देऊ शकते. हे सर्व कार्य साहित्य करू शकते असा साहित्य प्रेमींचा साहित्याच्या कार्यावर विश्वास असतो. ही त्याची मागणी असते. कोणत्याही साहित्याचे कार्य हे त्या साहित्याला मोठे करीत असते. साहित्याचे मोठेपण हे त्याच्या कार्यावरच ठरत असते. एका साहित्याचे हे कार्यच इतर साहित्याच्या विषय, आशय, अभिव्यक्ती, जाणिवा,

दृष्टिकोण व्यापक करीत असते. तेच योगदान ठरत असते. ग्रामीण साहित्याचा या अनुषंगाने विचार होणे आज आवश्यक आहे.

## ग्रामीण साहित्याचे मराठी वाङ्मयातील योगदानाची साधक–बाधक चर्चा

ग्रामीण साहित्य साधारणत: १९७७ पासून जन्माला आल्याचे आता सर्वमान्य झाले असले तरी ग्रामीण साहित्याचे धागे–दोरे हे प्राचीन काळातील लोकवाङ्मय, संतवाङ्मय आणि महानुभाव वाङ्मयापर्यंत लांबविता येते. या वाङ्मयातून ग्रामीण स्तरातील जीवनानुभव प्रकट करण्याच्या मनोवृत्तीतून ग्रामीणता, ग्रामीण वास्तव आलेले आहे. परंतु ग्रामीण जीवन दर्शन, ग्रामीण वास्तव अभिव्यक्त करणे हा मूळ उद्देश या साहित्याने धारण केलेला नव्हता तर ते अपघाताने ग्रामीण जीवन दर्शन, ग्रामीण वास्तव प्रकट झालेले आहे. त्यामुळे सदर्हू काळातील वाङ्मयातून ग्रामीण साहित्य जन्माला आलेले नाही हे लक्षात येते.

ग्रामीण साहित्याचा जन्म हा आधुनिक काळातील महात्मा फुले यांच्या 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथातील विचाराने झाला आहे. विविध मराठी साहित्य प्रकारांचा जन्मही झाला त्याचे जनकही झाले आणि त्याला प्रौढपणही प्राप्त झाले. पण मराठी साहित्याच्या बहुअंगी विकासात ग्रामीणांचे अस्तित्व उपेक्षित ठेवले गेले. त्या साहित्यात पांढरपेशा व नागर जीवनाचे, विशिष्ट वर्गातील लोकांची सुख, दु:खे त्यांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला गेला. उच्चभ्रू पांढरपेशी मराठी साहित्याने ग्रामीण, अनागर जीवनाकडे आपल्या साहित्य लेखणीचा मोर्चा वळविला नाही. त्यानंतर म. गांधी यांनी 'खेड्याकडे चला' अशी हाक समग्र समाजाला केली. यातून ग्रामीण जीवन, ग्रामीण संस्कृती, त्यातील श्रद्धा, अंधश्रद्धा, रीतीरिवाज, परंपरा, तेथील निसर्ग, तेथील माती या संदर्भातील मराठी साहित्याला अनोखे असे चित्रण या साहित्यात उमटू लागले. ह्या सर्व नव्या ग्रामीण विश्वामुळे ग्रामीण साहित्य प्रवाहाच्या एका वेगळ्या व नव्या जाणीवेची ओळख होऊ लागली. यानंतर देशाला स्वातंत्र्य प्राप्त झाले. १ मे १९६० ला महाराष्ट्र अस्तित्वात आला. विकासांचा मोर्चा ग्रामीण भागात प्रवेशू लागला आणि विकासाच्या विविध प्रवृत्ती निर्माण झाल्या. जीवनाकडे पाहण्याचा एकूणच दृष्टिकोण बदलून गेला. त्यामुळे जुन्या व नव्यांच्या संघर्षातून ग्रामीण जनजीवनात अनेक समस्या, प्रश्न, आव्हाने, संघर्ष उभे झाले. या व वाङ्मयीन अभावात्मक परिस्थितीत नव्या ग्रामीण साहित्याची निकड भासू लागली. या साहित्याद्वारे जीवनात निर्माण झालेले प्रश्न व वेगळे असे अनुभव, आशय विश्व मराठी साहित्याला लक्षात आणून देण्यासाठी प्रयत्न सुरू झाले आणि अस्मितेचे राजकारण पेटले गेले.या संदर्भात शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी म्हणतात, 'शहरात गेलेली शेतकऱ्यांची पोरे शहरात रमली. त्यात लिहिण्याचं कसब असणाऱ्यांनी गावाविषयी लिहिले, पण शहराला काय पटेल, काय आवडेल याचा विचार करीत लिहिले. 'हरामखोरांनो! तुम्ही माझं गाव लुटलं, या पापाचा तुम्हाला झाडा द्यावा लागेल, हा टाहो कोणी फोडला नाही, उलट आपल्या ग्रामीण जन्मामुळे साहित्यात आपल्याला काही राखीव जागा असावी असा आक्रोश करणारी एक साहित्य–आघाडी उभी झाली.' [१] यावरून ग्रामीण अस्मितेला साहित्यात राखीव जागा नसल्याने नव्या पण हव्या अशा ग्रामीण साहित्याच्या आघाडीचे संसुचन या ठिकाणी केलेले दिसते. त्यामुळे ग्रामीण साहित्याच्या चळवळीचा प्रारंभ शरद जोशींच्या शेतकऱ्यांच्या चळवळीपासून झाला की काय, असा प्रश्न उभा राहतो. खरेतर ग्रामीण साहित्याची चळवळ ही १९७५ पासूनच सुरू असलेली जाणवते आणि या चळवळीचे बीजारोपण आनंद यादवांनी केलेले दिसते. त्यानंतर रा.रं. बोराडे, नागनाथ कोत्तापल्ले, वासुदेव मुलाटे, द.ता. भोसले, भाष्कर चंदनशीव इत्यादींनी या चळवळीचे लोण सैद्धांतिक मांडणी व साहित्यानिर्मिती करून ग्रामीण भागापर्यंत पोचविले. तेव्हा या ग्रामीण साहित्याने मराठी वाङ्मयाला ग्रामीण साहित्य चळवळीचे योगदान दिले असे म्हणता येईल.

## ग्रामीण साहित्याने मराठी वाङ्मयाला दिलेल्या ग्रामीण विशेषणांची चर्चा

ग्रामीण साहित्याने मराठी वाङ्मयाला ग्रामीण हे विशेषण दिले. ग्रामीण साहित्यात सुरुवातीला 'ग्रामीण' या विशेषणाच्या संदर्भात चर्चा झाली. 'ग्रामीण' असणे म्हणजे नागरी किंवा शहरी नसणे. नागरी किंवा शहरी या संकल्पनेच्या परस्पर विरोधी असणाऱ्या ग्रामीण या संज्ञा संकल्पनेचा ग्रामीण साहित्य चिंतकानी स्वीकार केलेला आहे. नागर किंवा शहरी साहित्यांच्या कोतेपणाविरुद्ध दिलेली प्रतिक्रिया म्हणून ग्रामीण ही संज्ञा अस्मिता व अस्तित्वाच्या पोटी आकारांला आलेली आहे. या संज्ञेने आपले वेगळेपण जपले आहे. 'नागर साहित्यापासूनचे वेगळेपण 'ग्रामीण' या विशेषणाने यथार्थपणे प्रकट होऊ लागले. साहित्यात व्यक्त झालेल्या अनुभवाचा भौगोलिक परिसर, त्याचे सामाजिक स्वरूप आणि त्यातील विशिष्ट संवेदनशीलता लक्षात घेऊन हे नामकरण करण्यात आले

आहे.'[२] यावरून 'ग्रामीण' ही संज्ञा ग्रामीण जीवन, ग्रामीण संस्कृती, ग्रामीण जगणे, शेती, शेतकरी, कृषिकेंद्रीतेतून उद्भवलेली ग्रामरचना, त्यातील मानसिकता या घटकांशी प्रामुख्याने निगडित आहे. ग्रामीण या बॅनरखाली लेखन करणाऱ्यांनी आपल्या लेखनाचा केंद्रबिंदू शेती, शेतकरी, शेतकरी पुरक असे सारे खेड्यातले जीवन समोर ठेवून लेखन करणे आणि खेड्यातील जीवनांना एकत्र एकसंघ बांधणे अपेक्षित असलेले दिसते. यावरून ग्रामीण ही संज्ञा राजकीय दबाव गट ग्रामीणांच्या एकसंघतेच्या द्वारे प्रस्थापित करणारी वाटते. ग्रामीण या संज्ञेने स्वत:भोवती मर्यादेची चौकट आखून घेतलेली दिसते. तसेच ही संज्ञा खेड्यातील जीवन वर्णन करणारी, त्याचे स्वरूप विशद करणारी, खेड्यातील जीवनाचा, रूढी, परंपरेचा, गावगाड्याचा, संस्कृतीचा गौरव करणारी संज्ञा आहे. त्यामुळे साहजिकच या विशेषण युक्त संज्ञेने शहरी पांढरपेशी व ग्रामीण असा भेद करून जीवनाला तोडले आहे. साहित्याने जीवन जोडावे अशी जीवनाचीच मागणी असते. या मागणीशी सहृदय असणाऱ्या लेखकांनी ही संज्ञा लावून मिरवणे पसंत केले नाही. तसेच त्यांना ग्रामीण ही संज्ञा लावून मिरवणे हिणकसपणाचे वाटले, ग्रामीण ही संज्ञा खेडूत, मागासपणाची द्योतक आहे त्यामुळे ही संज्ञा तुच्छतादर्शक भाव दर्शविणारी आहे. असे असले तरी या संज्ञेने साहित्य प्रांतात आपला स्वतंत्र असा ठसा उमटविला आहे. त्यामुळे साहजिकच ग्रामीण साहित्याने मराठी वाङ्मयाला ग्रामीण हे विशेषण देऊन मौलिक योगदान दिले आहे असे यथार्थ म्हणावे लागते.

## ग्रामीण साहित्याने मराठी वाङ्मयाला दिलेल्या ग्रामीण जाणिवेच्या योगदानाची चर्चा

ग्रामीण साहित्याने मराठी वाङ्मयाला ग्रामीण जाणिवेचे योगदान दिले का? या प्रश्नाची साधक बाधक चर्चा करून उत्तर शोधणे महत्त्वाचे आहे.त्यासाठी ग्रामीण जाणीव म्हणजे काय? याचा विचार करताना 'ग्रामीणता येते, ती कृषिकेंद्री जीवन व्यवहारातून आणि शेतीशी निगडित जीवन व्यवहारातून, ग्रामीणतेला गावाचा संदर्भ आहे. खेडे असणे, शेती करणे, गावगाडा असणे, विशिष्ट श्रद्धा–अंधश्रद्धांचे अनुकरण असणे, शेतीवर अवलंबून असल्याने पाऊस, पाणी, पिके, गुरेढोरे माती यांच्याबद्दल श्रद्धाभाव असणे अशा संवेदनेतून, भावनेतून ग्रामीणता अधोरेखित करता येते.'[३] याचा अर्थ शेतीशी गावगाड्याशी निगडित असणारी, जीवनव्यवहार प्रकट करणारी संवेदनशीलता म्हणजे ग्रामीण जाणीव.ही जाणीव ऐंशी टक्के खेड्यात राहणाऱ्या जनतेशी संबंधीत आहे. त्यामुळे ही जाणीव मराठी वाङ्मयाचा व्यापक विचार करणारी आहे. असे म्हणता येईल. म्हणूनच भालचंद्र नेमाडे 'ग्रामीण साहित्यातल्या जाणिवेत हिंदू–समाजरचनेतील अनेक आनंददायक तत्त्वांचा गौरव अभिप्रेत असतो.'[४] असे म्हणतात यांचा अर्थच ही ग्रामीण जाणीव हिंदू समाजरचना पूर्ववत राखू पाहणारी प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष, वर्ण, वर्ग, वंश, जातीभेद यांचे समर्थन करणारी आहे. ग्रामीण जाणीवेने आनंददायक तत्त्वे उराशी कवटाळून पांढरपेशी अथवा शहरी मराठी वाङ्मयाचा अजेंडा छुप्या पद्धतीने चालवण्याचेच काम केलेले आहे. या अर्थाने मराठी वाङ्मयाला ग्रामीण जाणीवेने व्यापकच केलेले आहे. शहरी मनातील आधुनिकता आणि प्रतिगामीत्व यांच्या द्वंद्वातील ग्रामीण जाणीवेने प्रतिगामीत्वाचे जतन केले आणि आधुनिकतेकडे दुर्लक्ष केलेत.

## ग्रामीण साहित्याने स्वीकारलेल्या प्रेरणेतून मराठी वाङ्मयाला दिलेल्या समन्वयवादाची चर्चा

ग्रामीण जाणिवेने लेखन करणाऱ्या साहित्यिकांनी एकच एक अशी प्रेरणा स्वीकारलेली नाही. अनेक विचारविमर्शकांच्या विचारांच्या गंगोत्रीचा समन्वय या साहित्याने स्वीकारून त्या वैचारिक अधिष्ठानाला प्रमाण मानून जीवननिष्ठ, वास्तव जाणिवेने लेखन केले आहे. या ग्रामीण साहित्याचे प्रेरक वैचारिक अधिष्ठान आनंद यादव यांनी सांगितले आहे. ते म्हणतात, 'म. जोतीबा फुले, लोकहितवादी, न्या. रानडे, सुधारककर्ते आगरकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, विज्ञाननिष्ठ व समाजप्रवर्तक वि.दा. सावरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, म. गांधी तसेच समाजवादी विचारप्रवाह सर्वोदयवादी विचार प्रवाह आणि महर्षी धोंडो केशव कर्वे, छत्रपती श्री. शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या बहुजन समाजविषयक कार्याची दिशा इत्यादीमधील अनेक विचार घटक आत्मसात करून तिने आपला विचार व्यूह आकाराला आणलेला आहे.'[५] या सर्व विचारकांच्या संमिश्र विचारांची गोळाबेरीज हेच या ग्रामीण साहित्याचे वैचारिक प्रेरणास्थान आहे. या संमिश्र अशा विचार अधिष्ठानाचा समन्वय हा एक विशिष्ट भूमिकेचा निर्देश करीत नाही. आपल्या सत्वाला धक्का न लागता सोयीचे ते स्वीकारण्याचा निर्देश करते. त्यामुळे ग्रामीण साहित्याने स्वीकारलेल्या अनेकविध प्रेरणेतून समन्वयवाद उत्पन्न झाला. ही समन्वयवादी प्रेरणा भेसळीच्या आणि विशिष्ट अशा ठाम, ठोस भूमिकेच्या परस्पर द्वंद्वात अडकलेली आहे. त्यामुळे ग्रामीण साहित्य हे क्रांतिवादाऐवजी प्रतिक्रांतिवादाकडे अधिक झुकलेले दिसते. त्याचे कारण म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या क्रांतिवादी महापुरुषांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय या मूल्यांवर

आधारित समाजव्यवस्था निर्माण करण्याकरिता विचार आणि कृती केली जात, वर्ण, वंश, यांचा अस्त व्हावा आणि समाज समाजवादी, विवेकवादी, इहवादी, विज्ञाननिष्ठ व्हावा याची स्वप्न पाहिली. यांच्या स्वप्नातील नवी समाजव्यवस्था उभी करण्यात ग्रामीण साहित्याने किती हातभार लावला? दलित साहित्यात या प्रश्नासंबंधीची तीव्रता दिसते. तितकी तीव्रता या ग्रामीण साहित्यात दिसत नाही. त्याचे कारण ग्रामीण साहित्याने आपल्या बुडाशी असलेल्या वैचारिक प्रेरणेच्या अधिष्ठानाच्या अभावात सापडते. त्यामुळे सदर्हु साहित्य हे मध्यमवर्गीयांचे आणि विशिष्ट प्रेरणेच्या अभावाचे साहित्य ठरते. असे प्रेरणाभावीत साहित्य मराठी वाङ्‌मयाला कोणती प्रभावकारी, आदर्शकारी प्रेरणा देणार आहेत.? असे असले तरी या साहित्याने प्रेरणेंचा समन्वय, स्वीकारून ग्रामीण साहित्य चळवळ पुढे विकसीत केली.

## ग्रामीण साहित्याने मराठी वाङ्‌मयाला दिलेल्या जगाच्या पोशिंद्याचे वास्तव भान व आशय विस्ताराची चर्चा

ग्रामीण साहित्य चळवळीने कथा, कादंबरी, कविता, ललित गद्य, नाटक, समीक्षा अशा साहित्य प्रकारात लेखन करण्यास लेखकाला प्रवृत्त केले आणि ग्रामीण साहित्य प्रवाह नावारूपाला आणला. त्यातून त्यांनी जगाचा पोशिंदा मानल्या जाणाऱ्या आणि दुर्लक्षित ठेवलेल्या ग्रामीण जीवनाचे चित्रण कृष्णराव भालेकर यांच्या बळीबा पाटील, व्यंकटेश माडगूळकर यांच्या 'बनगरवाडी उद्धव शेळके यांची धग, रा. रं. बोराडे यांची पाचोळा, चारापाणी, आनंद यादवांची गोतावळा, बाजीराव पाटील यांची भंडारवाडी, सदानंद देशमुखांची तहान, बाबाराव मुसळे यांची हाल्या हाल्या दुधू दे, पखाल विश्वास पाटील यांच्या पांगिरा, झाडाझडती, नागनाथ कोत्तापल्ले यांच्या उलट चालिला प्रवाहो, गांधारीचे डोळे, राजन गवस यांच्या तणकट इत्यादी कादंबऱ्यांतून तर व्यंकटेश माडगूळकर यांच्या गावाकडच्या गोष्टी, काळी आई' रा. रं. बोराडे यांच्या नाती गोती, बोळवण, कडबा आणि माणसे, आनंद यादव यांच्या डवरणी, उखडलेली झाडे, भाष्कर चंदनशिव यांच्या जांभूळढव्ह, मरणकळा, नवी वारुळं, बीरडं, ना. धों. महानोर यांच्या गावातल्या गोष्टी इत्यादी कथांमधून केलेले आहे. वरील कादंबऱ्यांतून खेड्यांच्या वा शेतकऱ्यांच्या जीवनातल्या समस्या त्यातील संघर्ष, खेड्याचे समूहजीवन, समूहधारणा, कृषिनिष्ठा, ग्रामनिष्ठा या वास्तव चित्रणाचा आशय विस्तार झालेला आहे. या संदर्भात डॉ. एकनाथ पगारे म्हणतात, 'कथा व कादंबरी या साहित्य प्रकारांत आशयात्मक भर घालण्याचे कार्य ग्रामीण लेखकांनी केले आहे. म. फुले यांच्यापासून आपण ग्रामीण साहित्य निर्मितीची प्रेरणा घेतली असल्याचे ग्रामीण कथा–कादंबरीकारांनी सूचित केले. मात्र प्रत्यक्षात या कथा–कादंबऱ्या अपवादानेच फुलेवादी परंपरेशी जोडलेल्या आहेत. सरधोपटपणे वास्तवाचे कथन करण्यावर कथा– कादंबरीकारांनी भर दिला आहे.'[६] यावरून ग्रामीण साहित्याने मराठी वाङ्‌मयाला वास्तव चित्रणासह आशय विस्तारांचे योगदान दिलेले आहे.

## ग्रामीण साहित्याने मराठी वाङ्‌मयाला दिलेल्या देशीवाद जोपासणाऱ्या कादंबऱ्यांची चर्चा

ग्रामीण साहित्याने मराठी वाङ्‌मयाला देशीवाद बलिष्ठ करणाऱ्या कादबंऱ्या दिल्यात, त्यात राजन गवस, पुरुषोत्तम बोरकर, बाबाराव मुसळे, शेषराव मोहिते, बाबा भांड, भारत काळे, रमेश इंगळे, उन्नादकर, राजेंद्र मालोसे इत्यादी कादंबरीकारांची नावे सांगता येईल. या कादंबरीकारांनी ग्रामीण साहित्याला देशीवादाचे भान आणून दिले. त्याचे कारण जागतिकीकरणाच्या रेट्याने पायाखालची वाळू जशी सरकावी तशी पारंपरिक मूल्यव्यवस्था सरकत चाललेली आहे. यामुळे ग्रामीण लेखकाला ह्या पारंपरिक मूल्यव्यवस्थेचे महत्त्व अधिक जाणवू लागले, तसेच नष्ट होत जाणाऱ्या पारंपरिक ग्रामीण संस्कृतीविषयी मनात हळहळ निर्माण होऊ लागली. यांच्या प्रतिक्रियेतून ग्रामीण कादंबरीने ग्रामीण संस्कृती त्यातील मूल्यव्यवस्था अधिक कवटाळण्याला, भूतकाळावरील प्रेम अधिक वाढविण्याला प्रारंभ केला. भूतकाळातील जात, वर्ण, वर्ग, वंश यांचा अस्त करण्याऐवजी वर्तमानात त्यांवर अधिक प्रेम करणे व त्याचे महत्त्व अधोरेखित करणे आणि वर्तमानाने निर्माण केलेल्या दडपणाला पर्याय म्हणून भूतकालातील अनेक अनर्थकारक बाबींचे पुनरुज्जीवन करणे हा असला देशीवादाचा आग्रह ग्रामीण कादंबरीने स्वीकारला आहे. या संदर्भात डॉ. हरिश्चंद्र थोरात म्हणतात, 'ग्रामीण कादंबरी जेव्हा संस्कृतीचा अभिमान बाळगू लागते. परंपरेचा मोठेपणा सांगू लागते, तेव्हा ती देशीवादाकडे विशेष कलते. १९९० नंतरच्या ग्रामीण कादबंरीवर नेमाडे आणि देशीवाद यांचा मोठा प्रभाव आहे.'[७] देशीवादांच्या प्रभावातून कृषी संस्कृती, ग्रामसंस्कृती ग्रामीण साहित्यातून मांडल्या गेली आहे. पण या संस्कृतीचे गोडवे गाताना या संस्कृतीच्या अंतर्गत गावातील शोषक आणि शोषित यांच्या संस्कृतीच्या अंतर्विरोधाचा विचार केलेला दिसत

नाही. त्यामुळे ग्रामीण साहित्यातून प्रकट झालेली ग्रामीण संस्कृती ही देशीवादाच्या अनुरोधाने वादग्रस्त ठरणारी आहे. असे असले तरी या साहित्याने मराठी वाङ्मयाला कथा, कादंबऱ्यांतून ग्रामीण बोली भाषेचे योगदान दिले हे नाकारता येणार नाही.

## ग्रामीण साहित्याने मराठी वाङ्मयाला काव्यातून दिलेल्या लोकलयीच्या योगदानाची चर्चा

ग्रामीण साहित्यातील कथा, कादंबरी या वाङ्मय प्रकाराइतका काव्य या प्रकाराचा आवाका नसला तरी काही ठळक कवींनी आपली नाममुद्रा कोरलेली आहे. त्यात ना.घ. देशपांडे, ग.ल. ठोकळ, बहिणाबाई चौधरी, ना.धों. महानोर यांचा उल्लेख करता येईल. यांच्या काव्यातून कृषिसंबंध जीवन, लोकव्यवहार, निसर्ग वर्णन, भाषिक सहजता, लोकलयी प्रकट झाल्या आहे. त्यांच्या काव्यातून मराठी वाङ्मयाला नवनवीन लोकलयी, गेयता प्राप्त झाल्या असून त्यांचा संबंध हा कृषी जीवनाशी व ग्रामीण संस्कृतीशी आहे. अर्थातच ग्रामीण साहित्याने मराठी वाङ्मयाला दिलेल्या योगदानासंदर्भातील साधक–बाधक चर्चा केली असता काही निष्कर्ष हाताशी लागतात ते खालील प्रमाणे नोंदविणे महत्त्वाचे आहे.

## निष्कर्ष

- ग्रामीण साहित्याचे धागे–दोरे मध्ययुगीन काळातील साहित्यातून अपघाताने प्रकट झालेले आहे.
- ग्रामीण साहित्याच्या जन्माला म. फुले, म. गांधी, स्वातंत्र्योत्तर काळातील घटना, शेतकऱ्यांची चळवळ, मराठी वाङ्मयातील अभावात्मकता कारणीभूत ठरली आहे.
- ग्रामीण साहित्याने मराठी वाङ्मयाला ग्रामीण साहित्याची चळवळ दिली.
- ग्रामीण साहित्याने मराठी वाङ्मयाला 'ग्रामीण' हे विशेषण दिले.
- ग्रामीण साहित्यातील जाणीव ही पांढरपेशी साहित्याच्या जाणिवेचे विस्तारीकरण करणारी, प्रतिगामित्वाला कवेत घेणारी आहे.
- ग्रामीण साहित्याने मराठी वाङ्मयाला प्रेरणेतील अंतर्विरोधग्रस्त भेसळता दिली आहे.
- ग्रामीण साहित्याने मराठी वाङ्मयाला भेदक ग्रामीण वास्तवाचे कथन आणि आशयाची सखोलता दिली आहे.
- ग्रामीण साहित्याने मराठी वाङ्मयाला दिलेली ग्रामीण संस्कृती ही शोषक आणि शोषित यांच्या संस्कृतीतील अंतर्विरोधाचा विचार करणारी नाही.
- ग्रामीण साहित्याने मराठी वाङ्मयाला दिलेला देशीवाद हा या देशातील समस्त मानवी जीवनाला कवेत घेणारा नसल्याने तो वादग्रस्त देशीवाद ठरलेला आहे.
- ग्रामीण साहित्याने मराठी वाङ्मयाला भूतकाळावरील प्रेमाच्या गोडव्यांचे योगदान दिले आहे.
- ग्रामीण साहित्याने मराठी वाङ्मयाला लोकलयींचे योगदान दिले आहे.

## संदर्भ

१) जाधव रा. ग, (संपा.) – मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड सातवा भाग– दुसरा, म.सा. प. पुणे पहिली आवृत्ती, जाने. २०१०, पृ. ४४७

२) नलगे चंद्रकुमार, ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास, रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर, द्वितीय आवृत्ती मार्च २०१२, पृ. ९०

३) तत्रैव पृ. ३९६

४) कुलकर्णी गो.म. (संपा) दलित साहित्य प्रवाह आणि प्रतिक्रिया, मेहता पब्लिसिंग हाऊस,पणे, द्वितीय आवृत्ती, ऑगस्ट १९९७, पृ. ११७

५) तत्रैव, पृ. ४९

६) उनि. पृ. ५०४

७) जाधव रा. ग. (संपा) मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड सातवा, भाग तिसरा, महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, पहिली आवृत्ती– ऑक्टो. २०१०, पृ. १२६

❖❖❖

# भारतीय संस्कृती आणि पौर्णिमांचे महत्त्व

डॉ. माधुरी भटकर
मराठी विभाग, संत गाडगे महाराज महाविद्यालय,
वलगांव, जि. अमरावती भ्रमणध्वनी ७७९८०५८७६०

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. विविध संस्कृती, पेहराव, भाषा, अन्न आणि सवयी ह्या भिन्न आहेत. तरीही गुण्यागोविंदाने सर्व नांदत आहे.

भारताच्या प्रत्येक प्रांताचे वेगळे वैशिष्ट्य आहे. महाराष्ट्राचेच उदाहरण घ्यायचे झाल्यास तर विदर्भ एक प्रांत येतो. पूर्वी विदर्भ एक स्वतंत्र देश होता. रावणाचा वध करून जेव्हा श्रीराम लंकेवरून पुष्पक विमानाने सीतेसह अयोध्येला जाताना विदर्भावरून जातात तेव्हा सीतेला ते विदर्भाची महती सांगतात की, 'विदर्भ भू विशेषः सरस्वती जन्मभू' म्हणजेच विदर्भ ही ज्ञानी, सारस्वतांची म्हणजे विद्वानांची जन्मभूमी आहे. याच विदर्भात वैनगंगा, पैनगंगा, पूर्णा, वर्धा यांसारख्या नद्या वाहताना दिसतात. वर्धा नदीला पूर्वी वरदा, वरदायनी असे म्हणत याच नदीच्या काठावर कौंडण्यपूर बसले आहे. ही तत्कालीन विदर्भाची राजधानी होती. राजा अजाची इंदुमती, नलाची दमयंती, श्रीकृष्णाची रुख्मिणी ह्या विदर्भकन्या कौंडण्यपूरच्याच. साक्षात भगवान कृष्णाला रुक्मिणीचे हरण करण्यासाठी विदर्भाच्या कौंडण्यपूरलाच यावे लागले ही आख्यायिका सर्वश्रुत आहे. महानुभाव व श्री चक्रधरांचेही वास्तव्य विदर्भातच झाले, तर शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव देशमुख, संत तुकडोजी महाराज, वंदनीय गाडगेबाबा, शिवाजीराव पटवर्धन हेही विदर्भातलेच. साहित्याच्या क्षेत्रातही विदर्भच अग्रेसर आहे, अनेक साहित्यकृतींनी इथेच जन्म घेतला.

याच विदर्भाला धार्मिक पार्श्वभूमी सोबतच प्रथा, परंपरा, संतपरंपरा, सणवार याचाही इतिहास आहे. ग्रामीणतेशी नाळ जुळलेला व शेती व्यवसायावर निर्भर असलेला विदर्भ आपल्या संस्कृतीशी नाळ जुळवून आहे.

## उद्दिष्टे

१) विदर्भाची पार्श्वभूमी विशद करणे.
२) विदर्भाचे वेगळे वैशिष्ट्ये असलेल्या संस्कृतीचे अवलोकन करणे.
३) संस्कृती संबंधित असलेले पौर्णिमांचे महत्त्व विशद करणे.
४) त्याचे वेगळेपण सिद्ध करणे.
५) सांस्कृतिक वारशाची तोंड ओळख करून देणे.

मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे. मानवाच्या सामुदायिकतेतून एकोप्यातून सण–उत्सवांची निर्मिती झाली व ते सणवार ऋतुचक्राशी जोडल्या जाऊ लागले आणि त्याचे वेगळेपण हेच की ते आपल्या संस्कृतीचे अविभाज्य घटक बनले. सण–उत्सवांसोबतच व्यक्तीच्या दैनंदिन गरजाही त्याच पद्धतीनी बदलू लागल्या.

ऋतुमानाबरोबर बदलणारे सण आणि त्याच्या दैनंदिन व्यवहाराशी लावलेला संबंध हा अंधश्रद्धा नव्हे तर श्रद्धा आहे. सामाजीक संस्कृतीचे अभिसरण आहे. असेच काही सण आणि पौर्णिमांचा अनोन्यसंबंध आहे. महाकवी कालिदासाने तर 'उत्सवप्रिय खलु:मनुष्य' असे म्हटले आहे.

उत्सव म्हणजे तर एखाद्या धार्मिक संमारंभात तो करणारा व त्यात भाग घेण्याऱ्याला लोकांना हर्ष, आनंद आणि मनप्रसाद यांचा अनुभव घडतो, त्याला 'उत्सव' म्हणतात.

हे उत्सव भारतीयांनी धर्मकार्य ऋतुकार्याला जोडले. त्यासोबतच मानवी आरोग्याला मिळणारी उपयुक्तता यातूनच भावजीवन, समृद्धी, सामाजिक, सांमजस्य, निसर्गाची एकरूपता, कलेचा आनंद, अध्यात्म व विज्ञानाची जोड याचा संबंध आहे.

आता थोडेसे पौर्णिमांकडे वळूया. भारतीय पंचागाप्रमाणे दर महिन्याला पौर्णिमा येते. पौर्णिमा म्हणजे ज्ञानानंदाचे प्रतिक आणि ज्ञान संपादन करण्यासाठी स्वाध्याय, संवाद, मौन, गुरुकृपा, उपवास व ईश्वराचे सान्निध्य, आत्मचिंतन आवश्यक आहे व पंधरा दिवसात सर्व करायचे आणि शेवटच्या दिवशी याची सांगता होते ती पौर्णिमा प्रत्येक पौर्णिमेचे वेगळे वैशिष्ट्य आहे.

१) चैत्र पौर्णिमा, ज्ञान–बल–शील–निष्ठा–भक्ती यांचा आदर्श

२) वैशाख पौर्णिमा – संपूर्ण विश्वाला करुणा आणि सत्य ज्ञानाची ओळख करुन देणाऱ्या गौतम बुद्धाची पौर्णिमा.

३) जेष्ठ पौर्णिमा – सावित्री पौर्णिमा

४) आषाढ पौर्णिमा – गुरु–शिष्य परंपरेची सुरुवात, व्यास पौर्णिमा

५) श्रावण पौर्णिमा – बहीण भावाच्या नात्याच्या बंधनाची आठवण व कर्माचे श्रीफल समुद्राला अर्पण

६) भाद्रपदा पौर्णिमा – भुलाबाईच्या गाण्याची सुरुवात

७) आश्विन पौर्णिमा – नऊ प्रकारच्या अज्ञानाला दूर करुन टिपुर चांदण्याची कोजागिरी पौर्णिमा

८) कार्तिक पौर्णिमा – हरी हराची भेट, श्रीगुण सत्व, रज, तम यांच्या स्वरूपाची ओळख करुन देणारी त्रिपुरारी पौर्णिमा

९) मार्गशीर्ष पौर्णिमा – दत्त जयंती ज्ञान, ध्यान, भान, जन्म, जीवन, मृत्यू याविषयी सांगणारी दत्त पौर्णिमा

१०) पौष पौर्णिमा – सूर्यनारायणाची पूजा

११) माघ पौर्णिमा – खंडेरायाची म्हणजे, पशुपालकाची आठवण करून देणारी.

१२) फाल्गुन पौर्णिमा अशूभ गोष्टींचा नाश करणारी हुताशनी पौर्णिमा म्हणजे होळी पौर्णिमा.

## निष्कर्ष

आपले रोजचे जीवन धकाधकीचे आहे. मानवी व्यवहारात ताण–तणाव, रुक्ष जीवन या गोष्टींना सामोरे जावे लागते. उत्सवाच्या निमित्ताने त्याला यातून विसाव्याचे क्षण मिळतात आणि या उत्सवांना जर ऋतुमानाशी, वातावरणाशी निगडित जोड मिळाली तर सोन्यातून पिवळे. संस्कारक्षम बनवण्यासाठी मानवाला या सण–उत्सवांची गरज लागतेच; परंतु उत्सव साजरे करताना त्यात श्रद्धा हवी अंधश्रद्धा नको नाही तर त्याचा अर्थच बदलून जातो. निसर्गाच्या ऋतुचक्राचे आणि पौर्णिमांचे महत्त्व असे आहे.

## संदर्भ ग्रंथ

१) भारतीय संस्कृतीची तोंड ओळख – भालचंद्र धामने

२) भारतीय सण आणि उत्सव – प्रा. मधू जाधव

३) भारतीय संस्कृती कोश

४) लोक साहित्य मीमांसा, भाग दुसरा – डॉ. विश्वास शिंदे

❖❖❖

# भारतीय स्त्रीवादाचा देदीप्यमान तारा : ताराबाई शिंदे

प्रा. डॉ. विशाखा वंजारी
प्रमुख, मराठी विभाग व संशोधन केंद्र
महात्मा गांधी महाविद्यालय, आरमोरी, जि. गडचिरोली
ई मेल viswanjari@gmail.com भ्रमणध्वनी ९४२१७३०८६४
(२८ वर्षे पेक्षा अधिक काळ पदवी व पव्युत्तर विभागावर अध्यापनाचा अनुभव, विद्यापीठाच्या विविध समित्यांवर कार्यरत, २५ पेक्षा अधिक शोधनिबंध प्रकाशित, विद्यापीठ अनुदान आयोगाला लघुशोधप्रबंध सादर.)

जागतिक पातळीवर स्त्रीवादी संकल्पनेच्या जनक पाश्चिमात्य विचारवंत सीमान दि बोऑ यांना मानले जाते. तर भारतात याच स्त्रीवादाचा जाणीवपूर्वक पुरस्कार सर्वप्रथम ताराबाई शिंदे यांनी केल्याचे दिसते. ताराबाई शिंदे यांचा जन्म बुलठाणी (बुलढाणा) येथे झाला. वडील बापूजी हरी शिंदे जमीनदार होत. ते डेप्युटी कमिशनरच्या कार्यालयात हेडक्लार्कची नोकरी करीत असत. ते महात्मा ज्योतिबा फुले यांच्या सत्यशोधक समाजाचे खंदे कार्यकर्ते होते. या चळवळीकरिता कार्य करताना, या चळवळीतील अनेक कार्यकर्त्यांची त्यांच्या घरी दैनंदिन ऊठबस असायची. या चळवळीच्या माध्यमाने घडणाऱ्या चर्चा नेहमी ताराबाईंच्या कानी पडत असत. यातूनचत्यांच्या बालसुबोध मनाला व विचारांच्या बैठकीला चांगले वळण लाभत गेले.

ताराबाईंना जन्मजात लाभलेली बुद्धिमत्ता व तिला चौफेर चौकस वाचनाची मिळालेली साथ यामुळे त्यांनी मराठी, हिंदी, इंग्रजी, संस्कृत या भाषांचे उत्तम ज्ञान प्राप्त केले. त्या मराठी, इंग्रजी वृत्तपत्रे नियमित वाचीत असत; यासोबतच महाकाव्ये, संस्कृत नाटके, धर्मग्रंथ, काव्यग्रंथ यांचेही त्यांनी भरपूर वाचन केले. त्यामुळेच त्यांच्या ज्ञानाच्या कक्षा रूंदावून, विचारात प्रगल्भता आली होती. त्या करारी, धाडसी व निर्भीड स्वभावाच्या असल्याने त्यांच्या स्वभावात बहुतांशतः पुरुषी आवेश जाणवत होता.

अशा या घडणी दरम्यानच्या काळात सुरत येथील विजयालक्ष्मी नामक एका ब्राम्हण विधवेने व्यभिचार करून गर्भधारणेतून गर्भपात केला. या प्रकरणात सुरत न्यायालयाने तिला फाशीची शिक्षा सुनावली. तिने मुंबई न्यायालयात अपील केले असता, ही शिक्षा ५ वर्षे सक्तमजुरीत परिवर्तीत करण्यात आली. या बातमीवर 'टाइम्स ऑफ इंडिया'ने प्रकाश टाकला. तर 'पुणेवैभव' सारख्या सनातनी वृत्तपत्रांनी या प्रकरणाने स्त्रीजाती विरुद्ध टीकेचा सूर उठविला. त्याचा थोड्याफार प्रमाणात परिणाम ताराबाईंच्या स्त्री मनावरही झाला. तेव्हा या घटनेच्या प्रत्युत्तरादाखल त्यांनी 'स्त्री –पुरुष तुलना' अथवा 'स्त्री आणि पुरुष यांत साहसी कोण?' हा मुद्दा स्पष्ट करून दाखविणारा निबंध लिहिला. हा निबंध त्यांच्यातील लेखक वृत्तीला चालना देणारा ठरला.

एका स्त्रीने दुसऱ्या एका स्त्रीवर झालेल्या अन्यायाने प्रेरित होऊन लिहिलेला हा त्या काळातील पहिलाच लेख होता. यावरून असे म्हणता येईल की, स्त्रीवादी जाणीवेचा पहिला लिखित आविष्कार इ.स. १८८२ साली 'स्त्री – पुरुष तुलना' या ग्रंथाच्या रूपाने ताराबाई शिंदे यांनी केला. त्यामुळेच त्यांच्या ह्या ग्रंथाला व त्यांना मराठी वाङ्मयातील एक अनमोल ठेवा असे मानाचे स्थान मिळाले. कारण त्यांनी या ग्रंथात सर्वप्रथम पुरुषप्रधान संस्कृतीतील लिंगभावामुळे स्त्री व पुरुष यांची विचारसरणी कशी भिन्न ठरून, स्त्रियांच्या वाट्याला कशी अवहेलना आली आहे. याचे मूलगामी चिंतन केले आहे. त्यांनी या ग्रंथात वैचारिक पातळीवर स्त्री –पुरुषातील हा असमतोल नाहीसा करून स्त्री जातीला पुरता न्याय मिळवून देण्याचे अमौलिक कार्य केले आहे. म्हणूनच मंगला वरखेडे या ग्रंथाने 'भारतीय स्त्रीवादी विचारसरणीचा पाया रचला' असे म्हणतात.

वास्तवतः तत्कालीन स्त्री लिखित या ग्रंथातील तर्कशुद्धता, चिकित्सकपणा, धैर्यशीलता वाखाण्याजोगी आहे. खरे तर प्रथमच स्त्रियांच्या व्यथा वेदनांना वाचा फोडणाऱ्या या ग्रंथामुळे तत्कालीन समाजात एकच खळबळ उडाली. या ग्रंथातील विचारांबाबत तत्कालीन सनातन्यांनी टीकेची प्रचंड झोड उठवली असताना, थोर समाजसेवक महात्मा जोतिबा फुले यांनी मात्र ग्रंथाचे व या ग्रंथातील विचारांचे जाहीर समर्थन केले.

वास्तवतः ताराबाई शिंदेनी लिहिलेला हा निबंध त्यांच्याच शब्दात सांगायचे झाल्यास, ''ज्या परमेश्वराने ही आश्चर्यकारक सृष्टी उत्पन्न केली, त्यानेच स्त्री पुरुष निर्माण केले, तरी सर्व प्रकारचे साहस दुर्गुण स्त्रियांचेच अंगी वसतात किंवा जे अवगुण स्त्रियांचे अंगी आहेत. तेच पुरुषात आहेत किंवा नाही हे अगदी स्पष्ट करून दाखवावे.'' (स्त्री पुरुष तुलना, प्रस्तावना, पृ. १) या हेतूने लिहिला आहे. पुढे त्या स्त्री जातीवर घेतल्या जाणाऱ्या

अनेक आक्षेपांचे खंडन करताना,या ग्रंथाच्या प्रस्तावनेत म्हणतात, ''रोज पुरुषाचे साहस, धाडस व दगाबाजीची नित्य नवी भयंकर उदाहरणे दिसून येत असतांनाही, तिकडे कोणीच लक्ष न देता स्त्रियांवरच सर्व दोषांची गोणी लादतात, हे पाहून स्त्रीजात्याभिमानाने माझे मन अगदी खळबळून, तळमळून गेले. त्यामुळे मला निर्भीड होऊन, असेच खडखडीत लिहिल्यावाचून राहवे ना.'' खरे तर ज्या काळात स्त्रीकडे अतिशय हीन व तुच्छतेने बघितले जात होते, त्या काळात स्त्रीविषयक मूलभूत प्रश्नांची मांडणी करून उपाय सुचविणे हे अतिशय महत्त्वाचे होते. हे व्यापक भगिनीभावाचे महत् कार्य ताराबाईंनी केले.

या निबंधाचे वैचारिक पातळीवर –

१) विधवा स्त्रियांचे प्रश्न,
२) विवाहित स्त्रीचे होणारे शोषण व
३) पुरुषांचे विविध दुर्गुण

असे तीन भाग करता येतात.

## १) विधवा स्त्रियांचे प्रश्न

इ. स. १८५६ साली विधवा पुनर्विवाहाचा कायदा होऊनही इ. स. १९०० पर्यंत फारच थोडे पुनर्विवाह उच्चवर्णियांत झाले होते. ब्राम्हणांपेक्षाही इतर जातीत तर पुनर्विवाहाला सक्त मनाईच होती. एकीकडे विधवेला पुनर्विवाह करण्यास सक्त मनाई, तर दुसरीकडे पुरुषाला मात्र 'एकीपासून पाचशे बायका करण्याची परवानगी' होती. या विरोधाभासाचा ताराबाई शिंदेंनी जबरदस्त उपहास केला. विधवांच्या प्रश्नांविषयी, पुनर्विवाहाविषयी आणि एकूणच त्या काळातल्या स्त्रियांच्या प्रश्नांविषयी दिसून येणाऱ्या दगाबाजीच्या धोरणांविषयी त्यांनी अतिशय कणखर भाषेत आपले विचार बेदरकारपणे मांडले आणि स्त्रियांच्या वेदनांना वाचा फोडण्याचे धाडस आपल्या ग्रंथातून केले.

या पुरुषप्रधान संस्कृतीत विधवांच्या लाचारीचा फायदा घेताना आधी त्यांना व्यभिचार करण्यास प्रवृत्त करणे, आणि मग कोण्या एखाद्या स्त्रीच्या हातून एखादा प्रमाद घडला की तिच्यावर अनेक कुत्सित आक्षेप घेण्याच्या व बायका या जात्याच घातकी व निसर्गत:च अनैतिकतेकडे कल असणाऱ्या असतात, असे म्हणणाऱ्या समाज प्रवृत्तीचा त्यांनी खरपूस समाचार घेतला. त्यातही पुनर्विवाह बंदीमुळे तरुण विधवांचे पाऊल वाकडे पडून महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात भृणहत्या घडत होत्या. तेव्हा ताराबाई शिंदे पुनर्विवाहाविषयी म्हणतात, 'पुनर्विवाह न करण्याची चाल महारोगाप्रमाणे अनेक ठिकाणी व जातींत पसरली आहे. त्यामुळे किती लाखो व कोट्यवधी स्त्रिया वैधव्याचे असह्य दु:ख कसकसे भोगीत असतील व भोगतील व त्यापासून कसकसे अनर्थ होत आहेत व होत असतील याची कल्पना सुद्धा करिता येत नाही.' म्हणूनच वैधव्य आलेल्या स्त्रीचे दु:ख मांडतांना त्या म्हणतात, ''वैधव्याचे गाठोडे पदरात बांधून आपल्या भर्त्याचे गुण अवगुण वाणीत व सर्व घरच्या दारच्यांचा जाच काढीत मरून जातात.'' तेव्हा त्या या जाचक रूढी–परंपरांनी ग्रस्त या समाजाला प्रश्न विचारायला लागतात, ''अरे, नवऱ्याआधी बायकोने मरावे किंवा नवऱ्याने बायकोआधी मरावे याचा तुमच्या बापजाद्यांनी देवांपासून काही दाखला आणला काय रे?''

पदरी वैधव्य पडले की, माथ्यावरील सुंदर कुरळे केस काढून टाकणे म्हणजे स्त्रीचा अनमोल असा अलंकारच हिरावून घेणे होय. जणू तिला सौदर्य पातळीवरून उघडी करून देशोधडी लावण्याप्रमाणे नागवून काढणेच होय. तिचा नवरा मेला म्हणून ती अभागी झाली, ती करट्या कपाळाची झाली, तिचे तोंड पाहू नये, अपशकून होतो, तिला कोठे लग्नकार्यात, समारंभात किंवा जेथे काही सौभाग्यकारक असेल तेथे जाण्याची बंदी घालणे यासारख्या प्रकारांमुळे तिच्या शरीराचा व मनाचा असह्य कोंडमारा होत होता. मुळात एकदा सौभाग्य गेले की, स्त्रियांनी महाजबर अपराध्यासारखे आयुष्यभर अंधारकोठडीत राहाणे, घरातील वडिलधाऱ्या मंडळींचे अन्याय सहन करीत बसणे ताराबाई शिंदेंना मान्य नाही आणि म्हणूनच ही परिस्थिती बदलण्याकरिता त्यांनी इंग्रज सरकारने विधवा पुनर्विवाहाचा कायदा करावा, अशी मागणी केली. या संदर्भात पुरुषी समाज सुधारकांच्या दिखाऊपणाचे त्यांनी पितळ उघडे पाडले. कारण पुरुष समाज–सुधारकांकडून विधवा पुनर्विवाहाच्या चर्चा घडल्या खऱ्या, मात्र त्यावर परखड अशी ठोस पाऊले कधी उचलली गेली नाही.

## २) विवाहित स्त्रीचे होणारे शोषण

ताराबाई शिंदेच्या काळात मुलीचा जन्म झाल्यापासून तिच्या विवाहाचा विचार केला जात असे. तत्कालीन समाजातील बालविवाहाच्या दृष्ट प्रथेमुळे बालविवाहाशिवाय मुलीच्या जन्माचे सार्थक नाही असा समज समाज मनाचा होता. म्हणूनच बाला–जरठविवाहासारखे प्रकार घडून, मुलींना लवकरच वैधव्याच्या सामोरे जावे लागत असे. त्यातही संसार सुख भोगताना त्यांना अनेक दिव्ये पार पाडावी लागत असत. म्हणूनच सहनशीलता ही स्त्रियांनी आत्मसंरक्षणाची ढाल बनली होती. एकीकडे वेद, पुराणे व धर्मग्रंथांच्या आधारावर चालणाऱ्या रूढी – परंपरा, तर दुसरीकडे कौटुंबिक जाचांनी तिच्यातील मानुषपण हिरावून घेतल्या गेले. तिला जनावरागत वागणूक मिळू लागली. तिला रूढी–परंपरांच्या शृंखलांत जखडून टाकण्यात आले.

पुरुषांची अपेक्षा पूर्ण करणे हाच आपला धर्म असल्याच्या धारणेने जगणाऱ्या स्त्रियांविषयी लिहिताना ताराबाई शिंदे म्हणतात, ''स्त्रीधर्म म्हणजे काय? तर निरंतर पतीची आज्ञा पाळणे, त्याचे मर्जीप्रमाणे वागणे, त्यांनी लाथा मारल्या, शिव्या दिल्या, दुसऱ्या रांडा ठेवल्या, नवरोजी दारू पिऊन, जुगार खेळून कफल्लक होऊन, शंख करीत, चोरी करून, कोणाचा प्राण घेऊन, फितुर, चहाडी, खजिना लुटून, लाच खाऊन जरी घरी आले, तरी स्त्रियांनी आपले हे कोणी जसे काही कृष्ण महाराज गौळ्याचे दहीदूध चोरून, चंद्रावळीला कलंक लावून आलेत असे समजून परमात्म्यासारखी यांची मोठ्या हसतमुखाने देवासारखी पूजा करावी, सेवेत हजर राहावे.'' हा स्त्रीधर्म स्त्रियांच्या अंगी बाणवून पुरुषांनी स्त्रियांचे शोषण करण्याची परंपराच चालविली होती.

याच विचारसरणीचे पुढे उदात्तीकरण घडताना पतीला देव व गुरू माणले जाऊ लागले. त्यामुळे पत्नी ही दासी, तर पती हा स्वामी ठरला. तिला कोणत्याच पातळीवरचे स्वातंत्र्य उरले नाही. तसेच स्त्रीच्या शीलभ्रष्टतेस पुरुष जबाबदार असला, तरी त्यास पूर्णत: स्त्रीलाच जबाबदार धरल्या जावू लागले. यामुळे ती व्यभिचारी असल्याचे दोष तिच्या माथी पडले. अशा या दबलेल्या भाव–भावनांना चेतविण्याचे कार्यताराबाई शिंदेंच्या शब्दांनी व विचारांनी केले. त्यांनी स्त्रियांच्या शोषणाविरोधात दिलेला लढा हा सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेस चालना देणारा ठरला. त्यांनी स्त्रियांच्या पडदापद्धतीला विरोध करण्यासोबतच पावलोपावली स्त्रियांवर होणाऱ्या अन्याय अत्याचारांना झुगारून देण्याइतपत स्त्रियांमध्ये समज निर्माण करण्याचे कार्य केले.

## ३) पुरुषांचे विविध दुर्गुण

स्त्रियांना दुर्गुणांबाबत सर्व पातळ्यांवर हिणवले जात असले, तरी त्यांच्या दोषांच्या तुलनेत पुरुषातच कसे अधिकचे दोष आहेत, हे दाखवून देण्याचा प्रयत्न ताराबाई शिंदेंनी आपल्या ग्रंथात केला. जरी काही स्त्रियांत काही दोष आढळले, तरी ते पक्षपातापोटी, निर्दयी रूढींमुळे आणि प्रचलित पुरुषसत्ताक व्यवस्थेमुळेच स्वीकारून घ्यावे लागतात. याचे विवेचन करताना त्या सांगतात की, खरेतर बाईची पाऊले वाकडे पडण्याला बहुधा पुरुषच जबाबदार असतात. या संदर्भात युक्तिवाद करताना त्या म्हणतात, ''टाळी एका हाताने वाजत नाही, पण त्यातून उजवे हाताचा जोर जास्त असतो.'' हे सांगण्याकरिता त्यांनी रामायण, महाभारतासारखे महाकाव्य; मुक्तामाला, मंजुघोषासारख्या कादंबऱ्या; मनोरमासारखे नाटक व पुणेवैभव सारखे वृत्तपत्र यातील दांभिकपणा उघड करून स्त्रियांच्या परवशतेला पुरूषप्रधान मूल्यव्यवस्थाच कशी जबाबदार आहे याचा विस्तृत उहापोह ताराबाई शिंदेनी केला आहे.

सावित्रीसारखी पतिव्रतेची कथा पुरुषांमध्ये आढळत नाही. बायको मेली म्हणून कोणी एक पुरुष दाढी मिशा भादरून अंधार कोठडीत राहाणे अथवा सता जाणे सारखा प्रकार आजवर घडलेला नाही. असे असताना मग स्त्रियांनीच का बरे केशवपन करून स्वत:ला विद्रूप करवून घेऊन अंधारमय जिणे जगावे? यांसारखे प्रश्न उपस्थित करून पुरुषसत्ताक पद्धतीतील कुटीर राजकारण समोर आणले आहे. जर बायकोकरिता नवरा देव ठरत असेल, तर त्याच नवऱ्याची वागणूक ही देवाप्रमाणेअसणे गरजेचे आहे. पण तसे घडताना दिसत नाही. ''बायकांनी भक्ताप्रमाणे जशी भक्ती करावी, तशी नवऱ्याने देखील त्यांजवर देवाप्रमाणेच ममता लावावी, त्यांचे सुखदु:ख जाणावे.'' (पृ. ३) असे ताराबाईंना वाटते.

बरेचदा पुरुष स्वत:चा स्वार्थ साधण्यास स्त्रीला फूस लावतात, विविध प्रकारची प्रलोभने दाखवितात, त्यांना मोहात पाडतात, त्यांच्या मनात खोट्यानाट्या प्रेमाचा आभास निर्माण करतात,आपली मनोकामना पुरी होईपर्यंत तिच्या अवती–भवती घुटमळत असतात. आणि एकदा की आपला दुष्ट हेतू पूरा झाला की मग त्या स्त्रीला वाऱ्यावर सोडून ''तू केलेस ते भोग'' असे उत्तर देऊन त्यांच्याकडे कायमची पाठ फिरवितात. याचा ताराबाईंना मनस्वी संताप येतो, तेव्हा त्या त्याला व्याघ्ररूपी, कामांध, मद्यप्राशनाने धुंद व मांसाहाराने तुंद

झालेल्या बोकडास, तुम्ही पाजी, बेइमान, भरवसा देऊन केसांनी गळा कापणारे, तुम्ही गाजरपारखे, मित्रद्रोही, राजद्रोही, शाबास रे ठकांनो अशा शब्दांनी त्या दुर्गुणी पुरुषांचा पाणउतारा करतात. ''तुमच्यापेक्षा सर्प बरा, तो डसल्या बरोबर प्राण तरी जातो. पण तुमचे जवळ जे विष आहे, ते नित्यनित्य शरीरास असह्य दु:ख देऊन प्राण घेते.'' अशा आघातशील शब्दानी पुरुषांच्या अंगी असणाऱ्या दुर्गुणांची मीमांसा ग्रंथाच्या अर्ध्याअधिक जागेत ताराबाई करून जातात. स्वत: वाट्टेल तेवढे दुर्गुणी असतानाही स्त्रियांनाच दुर्गुणी म्हणून बदनाम करणाऱ्या या पुरुषप्रधान संस्कृतीला आपल्या लेखणीने चपराक देतात.

मराठी साहित्यात ताराबाई शिंदे यांचे साहित्य यासाठी महत्त्वपूर्ण ठरते की, त्यांनी पुरुषप्रधान समाज व्यवस्थेची बारकाईने चिकित्सा केली. मात्र ताराबाईंचा हाच तीव्र सूर ग्रंथ लेखनाच्या शेवटी बराचसा कोमल झालेला दिसतो. एकीकडे त्या या पुरुषप्रधान संस्कृतीवर ताशेरे ओढताना पुरुषांची अन्यायी वृत्तीसमोर आणताना, त्यांच्यातील दुर्गुणांचे एकएक पैलू सांगायला लागतात, त्यांना सदाचार शिकवायला लागतात. तर दुसरीकडे स्त्रियांची बाजू घेऊनही बऱ्याच प्रमाणात त्यांनी ही परिस्थिती स्वत:हून स्वत:वर ओढवून घेतलेली असल्याचे मान्य करताना स्त्रियांना त्या समजही देतात. त्यांनी स्त्रीवादी दृष्टिकोनातून आपल्या संस्कृतीचा तर्कशुद्धपणे वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी स्त्री पुरुष समानतेचा विचार मराठीतून १९ व्या शतकात सर्वप्रथम मांडला. त्यांनी आपल्या निबंधातून स्त्री–पुरुष विषमतेची चर्चा प्रभावीपणे केली. तसेच औपरोधिक व विडंबनात्मक शैलीतून पुरुषी दुटप्पीपणाही उघड केला आहे. त्यामुळेच स्त्री–परिवर्तनाच्या दृष्टीने त्यांचा तत्कालीन महाराष्ट्रातील स्त्री समाज–सुधारक म्हणून उल्लेख करावा लागतो.

## निष्कर्ष

१) ताराबाई शिंदे या भारतीय जहाल स्त्रीवादाच्या आद्य प्रणेत्या ठरतात.

२) त्यांचे लेखन अतिशय जहाल भाषा वापरणारे आहे.

३) त्या काळात एखाद्या स्त्रीने स्त्री पुरुष समानतेविषयी लिहिलेले हे एकमेव आक्रमक भाषाशैली असलेले पुस्तक आहे.

४) त्यावेळच्या परंपरावादी, कर्मठ समाजाला ताराबाईंचे हे पुरोगामी विचार न पटणारे असल्याने बरेच वर्ष पर्यंत या पुस्तकाला हवी होती, ती प्रसिद्धी मिळाली नाही.

५) या पुस्तकाचा सविस्तर अभ्यास करण्यासाठी जागतिक महिला वर्षाचे (१९७५) निमित्त व्हावे लागले.

६) एकंदरीत स्त्री पुरुषांच्या समानतेच्या वर्तणुकीसाठी, अनेक सामाजिक प्रश्नांची चिकित्सा करणारा मूलगामी ग्रंथ म्हणून 'स्त्री पुरुष तुलना' हा ग्रंथ व ताराबाई शिंदे या ग्रंथकर्त्या नेहमीसाठीच अमोलिक आहेत, आणि असणार असल्याचे निश्चित आहे.

## संदर्भसूची


१) खोले विलास (संपा.), 'ताराबाई शिंदे लिखित –स्त्री पुरुष तुलना' (यथामूल संशोधित आवृत्ती); प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९७.

२) नरके हरी, 'महात्मा फुले : शोधाच्या नव्या वाटा', डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले आणि राजर्षी शाहू चरित्र – साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई, पाचवी आवृत्ती, २००६.

३) फडके य. दि. (संपा.), 'महात्मा फुले : समग्र वाङ्मय', महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुबई, पाचवी सुधारित आवृत्ती, १९९१.

४) वरखेडे मंगला, 'स्त्रीवादी समीक्षा : संकल्पना व उपयोजन', का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे, १९९९.

५) मुंजाळ महेश, 'स्त्री–पुरुष समानतेचा विचार मराठीतून सर्वप्रथम मांडणारी स्त्री', युनिक फीचर्स.

६) 'स्त्री मुक्तीचा पहिला हुंकार : ताराबाई शिंदे', दैनिक नवशक्ती –मुखपृष्ठ महिला दिनविशेष संकेतस्थळ पान दि. १३ ऑगस्ट २०१३.


❖❖❖

# ग्रामीण साहित्यातील निसर्ग जाणिवा

डॉ. कल्पना त्र्यं. मेहरे
मराठी विभाग प्रमुख
कला महाविद्यालय बडनेरा (रेल्वे), जि. अमरावती, भ्रमणध्वनी ९९२२९४५३२६

निसर्ग हा ग्राम जीवनाचा आत्मा आहे. हा निसर्गच ग्रामीण जीवनाला आकार देत असतो. त्याला रंग–रूप देत असतो. तेथील वृत्ती–प्रवृत्ती घडवत असतो. त्या जीवनाचे पोषण आणि शोषण करीत असतो. निसर्ग हा ग्रामीण जीवनाला व्यापून राहिलेला आहे. त्याच्या या सर्व व्यापकतेमुळेच ग्रामीण साहित्यात तो अनेकांगांनी प्रकटला आहे.

पहिल्या पिढीतील सरदेसाई, दिघे, ठोकळ यांसारख्या लेखकांनी ग्रामीण जीवनाच्या चित्रणाबरोबरच निसर्गाचे चित्रण केले आहे. पण हे निसर्गचित्रण अनुभवविश्वाचा अपरिहार्य घटक म्हणून केले गेले नाही, तर आपले अनुभवविश्व हे अनागर आहे असा प्रत्यय यावा म्हणून केले गेले आहे. निसर्गाचा पार्श्वभूमी किंवा वातावरण निर्मितीसाठी म्हणून त्यांनी उपयोग करून घेतला. वर्ण्य विषयाला उठाव मिळावा, त्यातून विशिष्ट प्रदेशाची ओळख निर्माण व्हावी हा साधनभूत विचार त्यामागे होता. म्हणून ग्रामीण साहित्याच्या आरंभीच्या काळातील निसर्गाचित्रण हे कलाकृतीशी एकजीव झाले आहे असे वाटत नाही.

मूल्यद्रव्य म्हणून नव्हे तर परिणामद्रव्य म्हणून निसर्गाचा उपयोग करून घेण्याच्या भूमिकेमुळे अतिरंजितता व बेगडी सौंदर्यात्मकता ग्रामीण साहित्याच्या प्रारंभकाळात साहित्यकृतीतून व्यक्त होऊ लागली. मानवी मन आणि निसर्ग यांच्यातील शाश्वत व मूल्यगर्भ नात्यांचा शोध मागे पडला आणि सवंग रंजकतेला अवसर मिळत राहिला.

पार्श्वभूमी आणि वातावरण निर्मितीसाठी जसा निसर्गाचा वापर झाला तसाच तो भावदर्शनासाठी ही विपुल प्रमाणात झाला आहे. निसर्गाच्या साहाय्याने प्रतिकात्मकता, सूचकता ग्रामीण साहित्यात अवतरली. द. ता. भोसले यांच्या 'वळू' या कथेतील देवाला नवस म्हणून सोडलेला वळू हा येथे एखाद्या पुढाऱ्याच्या लाडावलेल्या पोराचे, मस्तवाल गावगुंडाचे प्रतीक आहे.

पार्श्वभूमी, वातावरण यांच्या पलीकडे जाऊन ग्रामजीवनातील निसर्गाचे संस्कार शोधण्याचा आणि चित्रित करण्याचा व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, आनंद या प्रतिभावान लेखकांनी प्रयत्न केला. यांनी निसर्ग आणि माणूस, निसर्ग आणि ग्रामीण जीवन यांचा अन्योन्य संबंध कलाकृतीतून आविष्कृत केला पाहिजे ही निसर्गविषयक प्रगल्भ आणि व्यापक जाणीव त्यांच्या साहित्यातून अभिव्यक्त केली.

निसर्गापासून ग्रामीण मानवसमूहाचे जीवन वेगळे होऊ शकत नाही किंबहुना निसर्गाच्या इच्छेप्रमाणेच या जीवनाचे स्वरूप निश्चित होते. ही निसर्गाश्रित मानव समूहाच्या जीवनदर्शनाची जाणीव ग्रामीण साहित्यातून व्यक्त झालेली दिसते. याचे अत्यंत वेधक उदाहरण 'बनगरवाडी' आहे. व्यंकटेश माडगूळकर, गो.नी. दांडेकर हे दोन्ही लेखक उत्तम निसर्गनिरीक्षक आहे यांच्या साहित्यातील निसर्ग व्यक्तिमत्व धारण करतो. त्याला त्याची स्वतंत्र अशी भूमिका असते.

निसर्ग हा ग्रामीण साहित्याचा केंद्रबिंदू आहे. ग्रामीण साहित्य हे मूलतः कृषिकेंद्रित संस्कृतीशी नाते सांगणारे आहे. निसर्गाच्या कुशीतच येथील जीवने व व्यक्तिमने पुष्ट झालेली असतात. म्हणून निसर्ग घटकांविषयीची प्रेमविषयक जाणीव ग्रामीण साहित्यात अनेकांगांनी व्यक्त झाली आहे. कृतज्ञता भावातून ही प्रेमविषयक जाणीव प्रामुख्याने निर्माण झालेली दिसते. गाय, बैल, मेंढरे ही शेत जनावरे त्यामुळेच ग्रामीणांच्या नजरेत केवळ दावणीतील जनावरे राहत नाहीत तर ती त्यांच्या कुटुंबातील असतात. त्यांच्याशी जिव्हाळ्याचे असे त्यांचे नाते असते. आनंद यादवांच्या 'गोतावळा' या कादंबरीतील नारबा हा शेतमजूर जसा मालक, मालकिणीशी, सीता व गंग्या यांच्याशी बांधलेला आहे तसा तो प्राणी जगताशी, वृक्षवेलींशीदेखील जोडला गेलेला आहे. निसर्ग घटकांशी तो एकजीव झाला आहे. गुराढोरांच्या गोतावळ्यात तो पुरता गुंतला आहे. या अपार दुःखी माणसाला गुराढोरांशिवाय चैन पडत नाही. एक एक जनावर तुटत जाताना नारबा आतून उद्ध्वस्त होत जातो.

आनंद यादवांच्या 'मोट' या कथेतील हिऱ्या बैलावर बाबूचे अपार प्रेम असते. हत्तीसारखा दिसणारा हिऱ्या आठ–नऊ वर्षे शेतात राबून मेल्यावर, मालकाने हिऱ्या बैलाच्या कातड्याची नवी मोट शिवून घेतली. राहिलेल्या कातड्यात पांगण, नाडा – पागाण, सोंड – वादी, चाबूक, जुपण्या तयार करून घेतल्या. तेव्हा

बाबूला अतीव दु:ख होते. जमिनीवरील, गुराढोरांवरील आणि एकूण निसर्गावरील ग्रामीण माणसाची प्रेमविषयक जाणीव ग्रामीण साहित्यातून व्यक्त झाली आहे.

कृषिकेंद्रित जीवन हे निसर्गावर अवलंबून असते. पाऊस पडला तर ते फुलते व पाऊस पडला नाही तर ते कोमेजून जाते. निसर्ग कधी तारक तर कधी मारक कधी पोषक तर कधी शोषक ठरतो. निसर्गाच्या या द्विविध रूपांमुळे शेतकरी आणि शेतीशी निगडित असणारा घटक हा निसर्गासमोर नतमस्तक होताना दिसतो. निसर्गाचा कोप होऊ नये आपले जीवन उद्ध्वस्त होऊ नये ही जाणीव त्यामागे दडलेली असते. या भयजाणिवेचे प्रतिबिंब ग्रामीण साहित्यात उमटलेले दिसते. या भयजाणिवेतूनच ग्रामीण जीवनात अनेक देवता निर्माण झालेल्या दिसतात. निसर्गशक्तीला प्रसन्न करून घेण्याच्या लोकमानसातूनच निसर्गपूजा स्वीकारलेली दिसते. कृषी संस्कृतीतील सण – उत्सव हेदेखील निसर्गविषयक जाणिवेशी निगडित आहेत. त्यातूनच भूमीची, नागाची, जळाची, वारुळाची, अग्नीची, पर्जन्याची पूजा केली जाते. निसर्गशक्ती विषयींच्या श्रद्धेच्या अंधश्रद्धेच्या, भयाच्या अशा विशिष्ट जाणिवेतून लोकभ्रम, लोकरूढी, लोकसमज यांना ग्रामीण मनात विशेष स्थान मिळाले आहे. निसर्गसन्मुख जीवनातून निर्माण झालेल्या या आदिम जाणिवाचा, संकल्पनांचा उपयोग करून घेत ग्रामीण जीवनाचे चित्रण लेखकांनी केलेले आहे.

जन्म, मुत्यूसारख्या नैसर्गिक घटनांविषयीदेखील ग्रामीण व्यक्तिमत्त्व श्रद्धा, अंधश्रद्धा, भयजाणिवा कसे जपत असते याचे कलात्मक पातळीवरचे चित्रण रा.रं. बोराडे यांनी 'झाड' या कथेत केले आहे. 'झाड' या कथेतील ग्यानाकाकांचा एकुलता एक मुलगा शिरंग याचे जगणे पिंपळाच्या झाडाच्या जगण्यावर अवलंबून आहे असे वाटणे यामागे निसर्गशक्ती विषयीची अंधश्रद्धेची, आदिमतेची जाणीव जशी आहे तशी ती आत्यंतिक मायेची व त्या मायेपोटी जन्माला आलेल्या भयाचीही जाणीव आहे.

ग्रामीणांच्या भावजीवनात अधिराज्य गाजविणारा हा निसर्ग सौदर्यसंपन्न आहे. निसर्गाची दोन्ही रूपे ग्रामीण साहित्यात टिपली आहेत. र.वा. दिघे, व्यंकटेश मांडगूळकर, आनंद यादव, मधु मंगेश कर्णिक, यांच्या साहित्यातून निसर्गाची रूपे विलक्षण ताकदीने साकार झालेली दिसतात.

ऊन, पावसाची छाया–प्रकाशाची, ऋतूनुसार बदलत जाणाऱ्या निसर्गाची त्या गूढ–रौद्र रूपाची वर्णने निसर्गाविषयी वाटणाऱ्या कुतूहलाच्या व सौंदर्याच्या जाणिवेतून ग्रामीण साहित्यात अवतरलेली आहेत. आशयाशी ही वर्णने जेव्हा एकरूप होतात, तेव्हा त्यांचे सौंदर्य अधिक फुलारून येते.

निसर्गाविषयी एक भाषिक जाणीवही ग्रामीण साहित्यात व्यक्त झालेली आहे. खेडुतांच्या कृषिवलांच्या बोलीवर या निसर्गाने आपली नाममुद्रा उमटवलेली आहे. खेड्यातील एखादा अक्षर शत्रू असणारा माणूसदेखील आशयगर्भ भाषा वापरताना दिसतो. तो त्या प्रदेशाचा निसर्गाचा संस्कार असतो असे म्हणावे लागते. ग्रामीण साहित्यात किती तरी प्रतिमा ह्या निसर्गानुभवांतून आल्या आहेत. या प्रतिमांमुळे आशयाची तीव्रता व भाषेचे सामर्थ्य वाढलेले दिसते. निसर्ग हा ग्रामीण साहित्यातील प्राणतत्व आहे. तोच या साहित्यप्रवाहाचे प्राणपोषण करीत असतो.

यंत्रसंस्कृतीच्या आक्रमणामुळे खेड्यातील माणूस निसर्गापासून तुटत जात आहे. आनंद यादवांच्या 'गोतावळा' कादंबरीत नारबाला समृद्ध संस्कृतीच्या विनाशाची चाहूल लागलेली आहे. हीच जाणीव यादवांनी 'इंजिन' या कथेतून ही व्यक्त केली आहे. रासायनिक खते, औषधांचा प्रचंड वापर यामुळे आज पशू–पक्षी कीटक यांचे जिवित धोक्यात आले आहे. स्वच्छ हवा, शुद्ध जल, आणि रानमेवा खात जगण्याचा पाखरांना निसर्गानेच दिलेला अधिकार आज आधुनिकतेच्या नावाखाली मानवाने हिरावून घेतला आहे. ग्रामीण साहित्यात ही वास्तविकता मांडली जात आहे.

## संदर्भ ग्रंथ


१. ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या – डॉ. आनंद यादव
२. ग्रामीण साहित्य चिंतन आणि चर्चा – डॉ. वासुदेव मुलाटे
३. ग्रामीण साहित्य शोध आणि बोध – डॉ. नागनाथ कोतापल्ले
४. ग्रामीण साहित्य चळवळ आणि आम्ही– डॉ. वासुदेव मुलाटे
५. ग्रामीण साहित्य आणि वास्तव – डॉ. द.ता. भोसले गौरव ग्रंथ
६. संपा. डॉ. कृष्णा इंगोले, सह. संपा भाष्कर चंदनशिव


❖❖❖

# तुकारामांचा ईश्वर व अंधश्रद्धाविषयक विचार

डॉ. नवनाथ दणाने
प्रमुख, मराठी विभाग
श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय, बार्शी,
झाडबुके मार्ग, लातूर रोड, बार्शी, जि. सोलापूर ४१३४०१
E mail: nrdanane@gmail.com Mo. No. 9881483456
(संशोधन : एम.फिल. विषय – 'दलित कवितेतील आई एक अभ्यास'
पीएच.डी. विषय : 'संत तुकाराम व महात्मा फुले यांच्या कवितेतील विद्रोहाच्या स्वरूपाचा अभ्यास'
आधुनिक साहित्य प्रवाहांचा, विशेषत: विद्रोही साहित्य परंपरेचा अभ्यास)

## प्रस्तावना

सतराव्या शतकातील एक समाजसुधारक संत म्हणून तुकारामांना ओळखले जाते. तसेच एक बंडखोर कवी म्हणूनही त्यांना ओळखले जाते. तुकारामांनी आपल्या अभंगरचनेच्या माध्यमातून ईश्वर व अंधश्रद्धाविषयक विचार मोठ्या प्रमाणात मांडले आहेत. तुकारामकालीन सामाजिक परिस्थिती पाहत असताना असे दिसते की, तत्कालीन समाज ईश्वर व अंधश्रद्धाविषयक भ्रामक समजुतींनी मोठ्या प्रमाणात ग्रासलेला होता. अंधश्रद्धा व अज्ञानामुळे सर्वसामान्य समाज दारिद्र्यामध्ये आकंठ बुडालेला होता. त्यामुळे समाजाची अवस्था अगतिक बनली होती. अज्ञान व दारिद्र्यात खितपत पडलेल्या या समाजाला आत्मोद्धाराचा मार्ग दाखविण्यासाठी, तुकाराम ईश्वर व अंधश्रद्धाविषयक धारणामधील फोलपणा व थोतांड लोकांच्या लक्षात आणून देतात. विठ्ठल भक्तीच्या माध्यमातून ते एकेश्वरवादाचा आग्रह धरतात. तसेच ईश्वरप्राप्तीसाठी केल्या जाणाऱ्या अंधश्रद्धादी कर्मकांडावर प्रखर हल्लाही चढवितात.

## एकेश्वरवादाचा आग्रह

तुकारामांची ईश्वरविषयक भूमिका ही पारंपरिक ईश्वरी कल्पनांना छेद देणारी आहे. हिंदूधर्मव्यवस्थेमध्ये ३३ कोटी देव ही धारणा रूढ असताना आणि बहुविध देवदेवतांची उपासना चालू असताना तुकाराम मात्र एकेश्वरवादाचा आग्रह धरतात. तुकारामांची ईश्वर विषयक भूमिका ही डोळस व जागृत आहे. ते ईश्वर विषयक अंधश्रध्दा व भ्रामक समजुतींना प्रखर विरोध करतात. अनेकविध प्रकारची मूर्तीपूजा त्यांनी अमान्य केली आहे. विठ्ठलाशिवाय इतर कोणत्याही देवदेवतांचे अस्तित्व तुकाराम मान्य करताना दिसत नाहीत.

"सेंदरी हे देवी दैवते । कोण ती पुजे भुतेखेते ।।
आपुल्या पोटा जी रडतें । मागती शिते अवदान ।।
आपुले इच्छे अणिकां पिडी । काय ते देईल बराडी ।।
कळो ही आली तयाची जोडी । अल्प रोकडी बुद्धी ।।"[१]

तुकाराम म्हणतात, शेंदूर फासलेल्या भुतेखेतांरूपी देव दैवतांची कोण बरे पूजा करणार, स्वत:च्या पोटासाठी रडणारी, दुसऱ्याकडे शिते व बळीची अपेक्षा करणारी ही दैवते, दुसऱ्याचे काय भले करणार. स्वत:च्या इच्छेसाठी इतरांना पीडा देणारी ही दैवते काय लाभ देणार, जी स्वत:च आशाळभूत आहेत, ती दुसऱ्याला काय देणार, त्यांची अल्पबुद्धी, अधीरपणा व सामर्थ्य आम्हाला कळून चुकले आहे. अशा शब्दात तुकाराम इतर देव देवतांची खिल्ली उडविताना दिसतात. पुढे आणखी एका अभंगात ते म्हणतात,

"नव्हे जाखाई जोखाई । मायराणी मेसाबाई ।।
बळिया माझा पंढरिराव । जो या देवांचा देव ।।
रंडी चंडी शक्ति । मद्यमांसाते भक्षिते ।।
बहिराव खंडेराव । रोटीसुटी साटीं देव ।।
गणोबा विक्राळ । लाडू मोदकांचा काळ ।।
मुंज्या म्हैसासुरे । हे तों कोण लेखी पोरें ।।
वेताळे फेताळे । नको त्यांचे तोंड काळे ।।

तुका म्हणे जे चित्ती । धरा रखुमाईचा पती ।।"[२]

तुकाराम जाखाई, जोखाई, मायराणी मेसाबाई यासारख्या सर्व देवी देवतांना स्पष्ट शब्दांत नकार देतात आणि या सर्वांपेक्षा विठ्ठल हाच एकमेव सामर्थ्यशाली देव असल्याचे सांगतात. पुढे ते म्हणतात, रंडी, चंडी ह्या शक्ती देवता निव्वळ मद्यमासांचे भक्षण करतात, तर बहिरोबा खंडोबा रोटीसाठी आसुसलेले असतात. गणपती ही तर विक्राळ देवता असून, तो केवळ लाडू मोदकांसाठी आसुसलेला आहे. मुंज्या म्हेसासुराला तर तुकाराम पोराबाळांचा देव म्हणूनच अव्हेरतात. वेताळ फेताळाचे तर तोंड काळे जळो म्हणून निर्भर्त्सना करतात. आपण केवळ एका विठ्ठलावरच चित्त केंद्रित केल्यास इतर कोणत्याही देव देवतांची भक्ती करण्याची आवश्यकता नाही, असे ठामपणे सांगतात, "कासिया पाषाण पूजिती पितळ । अष्ट धातू खळ भावे विण।।"[३] तुकारामांची वृत्ती ही अंतकरणातील शुद्ध भावाला महत्त्व देणारी आहे. अंतकरणात शुद्ध भाव नसेल तर, अष्टधातू किंवा पितळा सारख्या मूर्तीला पूजने हे व्यर्थ आहे, असा स्पष्ट निर्वाळा ते देतात. तुकाराम आपल्या बहुसंख्य अभंगातून विठ्ठलभक्तीचा महिमा गाताना दिसतात. तुकाराम विठ्ठलभक्तीमध्ये आकंठ बुडाले असले तरी, त्यांची विठ्ठलभक्ती ही डोळस व कर्मकांड मुक्त आहे. ही गोष्ट महत्त्वपूर्ण आहे. ईश्वरविषयक अंधश्रध्दा व भ्रामक समजूतीपासून ते विठ्ठलाला दूर ठेवतात. तुकारामांची विठ्ठलभक्ती ही सदाचार, नैतिकता व मानवतेवर आधरित आहे. करुणा, दया व मानवता यावरच ईश्वरप्राप्तीचा मार्ग अवलंबून आहे. अशी त्यांची दृढ धारणा होती. डॉ. आ.ह. साळुंखे म्हणतात त्या प्रमाणे, "तुकारामांची विठ्ठलभक्ती म्हणजे वैदिकांचे संकुचित ज्ञानकांड आणि किचकट कर्मकांड यांना त्यांनी दिलेला प्रांजळ पर्याय आहे."[४] तुकारामांची ईश्वर विषयक भूमिका समजून घेण्यासाठी डॉ. साळुंखे यांचे हे विवेच महत्त्वपूर्ण ठरते. तुकारामकालीन सामाजिक परिस्थितीचा विचार करता, त्यांच्या या विधानाला अनन्य साधारण महत्त्व प्राप्त होते. तुकारामांच्या विठ्ठल भक्तीकडे पाहण्याचा एक डोळस दृष्टीकोन त्यामुळे प्राप्त होतो. तुकारामांची ईश्वरविषयक भूमिका अधिक स्पष्ट करताना पुढे ते म्हणतात, "तुकारामांचा देव परंपरागत स्वरूपाचा राहत नाही त्याला चिकटणारे सर्व प्रकारचे बाह्य उपाधी गळून पडतात आणि शुद्ध आचरण व शुद्ध भावना यांच्याद्वारे प्राप्त होणारी जणू काही स्वत:च्याच अस्तित्वाची एक उदात्त आवस्था असे त्यांच्या ईश्वराचे स्वरूप शिल्लक राहते." [५] डॉ. साळुंखे येथे तुकारामांच्या विठ्ठलभक्तीचे अगदी अचूक स्वरूप स्पष्ट करतात. कर्मकांडमुक्त भक्ती, सदाचरण व शुद्धभाव या विठ्ठलभक्तीतील प्रमुख घटकांकडे ते लक्ष वेधतात. तुकारामांच्या ईश्वरविषयक धारणांचा बारकाईने विचार केला असता असे दिसते की, त्यांचा ईश्वरविषयक दृष्टिकोन हा जवळजवळ पारंपरिक ईश्वरी अस्तित्व अमान्य करणारा आहे. तुकाराम सदाचारी, सद्‌गुणी व नीतीवान माणसामध्येच ईश्वरी अस्तित्व शोधतात. माणसाच्या परोपकारी वृत्तीमध्येच ईश्वराचे अस्तित्व सामावले आहे. तसे ते वारंवार स्पष्ट करताना दिसतात. त्या दृष्टीने त्यांचा पुढील अभंग तर प्रसिद्धच आहे.

"जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले।।
तोचि साधु ओळखावा । देव तेथिचि जाणावा ।।" [६]

या अभंगाच्या माध्यामातून, त्यांनी एक प्रकारे ईश्वरविषयक पारंपरिक दृष्टिकोन मोडितच काढला आहे. तुकाराम येथे दु:खीत पिडीत, रंजल्या गांजलेल्यांना जवळ करणाऱ्या मानसामध्येच परमेश्वराचे अस्तित्व असल्याचे सांगतात. आपला ईश्वरविषयक दृष्टीकोन स्पष्ट करताना, मानसाच्या अंगी असणाऱ्या कल्याणकारी व परोपकारी वृत्तीचाच ते गौरव करताना दिसतात. तुकाराम ईश्वरी अस्तित्वाकडे एक कल्याणकारी शक्तीच्या रूपात पाहतात. तुकाराम ईश्वरी अस्तित्वाकडे एक कल्याणकारी शक्तीच्या रूपात पाहतात. थोडक्यात, तुकारामांचा ईश्वर विषयक दृष्टीकोन हा अत्यंत डोळस आणि अगदी एकेश्वरवादाचा आग्रह धरणारा आहे.

## अंधश्रद्धादी कर्मकांडांना प्रखर विरोध

तत्कालीन समाज धार्मिकतेच्या नावाखाली विविध देव देवतांच्या पूजा अर्चा व अंधश्रद्धादी कर्मकांडाच्या अधीन झाला होता. पाप, पुण्य, स्वर्ग, मोक्ष, पिंडदान यांसारख्या कल्पना समाजात मोठ्या प्रमाणात रूढ होत्या. सोवळे, ओवळे, विधिनिषेधासारख्या रूढी, परंपराही प्रचलित होत्या. परमेश्वर प्राप्तीच्या अभिलाषेने सर्वसामान्य माणूस नवस, सायासासारख्या प्रथांच्या आहारी गेला होता. त्यामुळे अनेक शूद्र देव देवताना महत्त्व प्राप्त झाले होते. नवस सायासाच्या नावाखाली निष्पाप प्राणीमात्रांचे बळी दिले जात होते. अज्ञानातून लोक अशा देवदेवतांच्या अघोरी कृत्यांचा बळी ठरत होते. सर्व सामान्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन काही पोटार्थी समाजकटंक अशा प्रथांना चालना देत होते. त्यांना शह देण्यासाठी व सर्वसामान्य अज्ञ समाजाला अंधश्रद्धेच्या खाईतून बाहेर

काढण्यासाठी; आणि ढोंगी दांभिक समाजकंटकाचे वस्त्रहरण करण्यासाठी तुकाराम अंधश्रद्धादी, कर्मठ रूढी, परंपरावर अक्षरश: तुटूनच पडतात.

"आणिकांच्या कापिती माना । निष्ठूरपणा पार नाही ।।
करिती बेटे उसणवारी । यमपुरी भोगावया ।।
सेंदराचे दैवत केले । नवस बोले तयासि ।।
तुका म्हणे नाचिति पोरे । खोडिता येरे अंग दु;खे ।।" [७]

तुकाराम म्हणतात, देवा धर्माच्या नावाखाली सेंदूर फासलेल्या दगडाला नवस बोलले जातात. तो नवस फेडण्यासाठी उसनवारी कर्ज काढले जाते, अनेक मूक प्राण्यांचे बळी दिले जातात. त्यांच्या माना कापल्या जातात. त्याचा वाजत गाजत उत्सव केला जातो. अंग दुखेपर्यंत पोरे नाचत असतात. अशी बळी देण्याची प्रथा ही अमानुष असून अशा प्रथांच्या आहारी गेलेल्या समाजाच्या निष्ठूरपणाला अंतच नाही. ते केवळ पापाचेच धनी होतात. असा प्रखर हल्ला अंधश्रध्दादी कर्मकांडे करणाऱ्या समाजावर तुकाराम करतात. नवसासारख्या अंधश्रद्धेची खिल्ली उडविताना ते म्हणतात,

"नवसे कन्यापुत्र होती । तरी का करणे लागे पती ।।"[८]

नवसामुळेच जर मुलगा किंवा मुलगी जन्माला येत असेल, तर स्त्रीला पती करण्याची गरज तरी काय? असा अत्यंत थेट प्रश्न करून, तुकाराम नवसारख्या प्रथेमधील निरर्थकता अचूकपणे स्पष्ट करतात. नवस सायासासारख्या अंधश्रद्धेप्रमाणेच तत्कालीन समाजामध्ये प्रचलित असणाऱ्या पिंडदानासारख्या प्रथेलाही तुकाराम विरोध दर्शवितात.

"भुके नाही अन्न । मेल्यावरी पिंडदान ।।
हे तो चाळवा चाळवी । केले आपणचि जेवी ।।
नैवद्याचा आळ । वेचे ठाकणी सकळ ।।
तुका म्हणे जड मज न राखावें दगड ।।"[९]

तुकाराम म्हणतात, माणूस जिवंत असताना त्याच्या इच्छा पुरविल्या जात नाहीत, त्याला वेळेवर अन्नपाणी दिले जात नाही, मृत्यू नंतर मात्र त्यांच्या अपुऱ्या राहिलेल्या इच्छा पुरविण्याचा अट्टाहास केला जातो. पिंडदानासारख्या अंधश्रध्दा जोपासून त्यावर व्यर्थ खर्च केला जातो. मृत व्यक्तीला नैवद्य दाखविण्याचा बहाणा करून स्वत:च जेवण केले जाते. ही एक प्रकारची फसवा फसवीच आहे, असे तुकारामांना वाटते. पिंडदानासारख्या प्रथेमधील विरोधाभास व विसंगती तुकाराम येथे अगदी नेमकेपणाने स्पष्ट करतात. पिंडदाना प्रमाणेच पाप पुण्यांविषयी सर्वसामान्य मानसाच्या असणाऱ्या धारणांनांही तुकाराम छेद देतात. या संकल्पनाना ते एक नवाच आयाम देतात. पाप, पुण्य यासारख्या धारणांना त्यांनी मानवी वर्तनशी जोडले आहे.

"पुण्य परउपकार । पाप ते परपीडपाडा ।।"[१०]

परोपकारी वृत्ती जोपासल्यास पुण्याचा लाभ होतो, तर दुसऱ्याला दु:ख दिल्यास पाप मिळते. असे अगदी मोजक्या शब्दात तुकाराम आपला पाप, पुण्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन स्पष्ट करतात. नवस सायास पाप, पुण्य, पिंडदान यासारख्या अंधश्रद्धांप्रमाणेच सोवळे, ओवळ्याच्या कल्पनाही तत्कालीन समाजामध्ये प्रचलित होत्या. विधिनिषेधांचे स्तोमही मोठ्या प्रमाणात माजले होते. स्पृश्य, अस्पृश्यता पाळली जात होती. या सर्व गोष्टींना तुकाराम आपला विरोध दर्शवितात. स्पृश्य, अस्पृश्यतेच्या नावाखाली मानला जाणारा विटाळ व केले जाणारे सोवळे, ओवळे, या वृत्तीलाही ते छेद देतात. "विटाळ तो परद्रव्य परणारी । येथूनि जो दुरी तो सोवळा।।" [११] परद्रव्य व परस्त्रीविषयी अभिलाषा बाळगणे हा खरा विटाळ असून, त्यापासून जो स्वत:ला दूर ठेवतो, तो खरा सोवळा होय. अशा शब्दात स्पृश्य अस्पृश्यता व सोवळे, ओवळ्याविषयक पारंपरिक कल्पनांना ते विरोध करतात. तुकाराम अंत:करणातील शुद्धाशुद्धतेला अधिक महत्त्व देताना दिसतात. सोवळ्या, ओवळ्याच्या नावाखाली, केली जाणारी बाह्यत्कारी सोंगे, (उदा. मुंडण, जटा, शेंडी, जानवे) पाळली जाणारी अस्पृश्यता, स्त्री, पुरुषांमध्ये केला जाणारा श्रेष्ठ कनिष्ठतेचा भेदभाव या सर्व गोष्टींना ते विरोध दर्शवतात. त्याचबरोबर जप, तप, मंत्र, तंत्र, वैकुंठ, मोक्ष, उपासतापास, व्रतवैकल्ये, दान, धर्म, भविष्य, चमत्कार, यज्ञयाग यांमधील फसवेपणाही तुकाराम उघडा करतात. परमेश्वरप्राप्तीसाठी या सर्व गोष्टींची आवश्यकता नाही, असे अनेक अभंगातून स्पष्ट करतात. डॉ. आ. ह. साळुंखे म्हणतात त्याप्रमाणे, "वैदिक संस्कृतीमधील सर्व किचकट कर्मकांड तुकारामांनी ईश्वरप्राप्तीच्या दृष्टीने नाकारले आहे." [१२] तुकाराम परमेश्वर प्राप्तीच्या मार्गातील किचकट कर्मकांडाना फाटा देऊन नैतिकता, सदाचार व नामस्मरणाचा मार्ग लोकाना सांगताना दिसतात.

## निष्कर्ष

थोडक्यात, तुकारामांची कविता ही एकेश्वरवादाचा आग्रह धरतानाच, तत्कालीन समाजातील अंधश्रद्धादी कर्मकांड, धार्मिक रूढी, परंपरा व विधिनिषेधांमधील थोतांड उघडे करतानाच, धार्मिकतेच्या नावाखाली अंधश्रद्धादी कर्मकांडाच्या अधीन झालेल्या समाजाला प्रखर सामाजिक भानही प्राप्त करून देताना दिसते.

## संदर्भ


१. लाड पुरूषोत्तम मंगेश (संपा.) : 'श्री तुकारामबाबांच्या अभंगांची गाथा', महाराष्ट्र शासन शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय प्रकाशन, मुंबई, द्वितीयावृत्ती, १९५५, अ. क्र. ६२१ पृ. ११३
२. तत्रैव : अ.क्र. २३८४ पृ. ४
३. तत्रैव : अ. क्र. २८२७ पृ. ४७४
४. साळुंखे आ. ह. : 'विद्रोही तुकाराम', लोकायत प्रकाशन, सातारा. द्वितीयावृत्ती, मे १९९९ पृ. ५३
५. तत्रैव : पृ. १७८
६. उनि : अ. क्र. ३४७ पृ. ५७
७. तत्रैव : अ. क्र. २५६ पृ. ४३
८. तत्रैव : अ. क्र. ३२९ पृ. ५४
९. तत्रैव : अ. क्र. २७१४: पृ. ४५७
१०. तत्रैव : अ. क्र. १०२७: पृ. १८१
११. तत्रैव : अ. क्र. ९८९: पृ. १७५
१२. साळुंखे आ. ह. : उनि, पृ. १२४


❖❖❖

# स्त्री –मुक्ती चळवळीतील मैलाचा दगड मुलगी झाली हो......... (मुक्तनाट्य)

प्रा. डॉ. भूमिका गो. वानखडे
सहा. प्राध्यापक,
जगदंब महाविद्यालय, अचलपूर, जि. अमरावती
Email: gaikwadbhumika.bg@gmail.com भ्रमणध्वनी ९५६११३१६६६

१५ मे १९८३ रोजी 'मुलगी झाली हो' या नाटकाचा पहिला प्रयोग सादर झाला. या नाटकाचा आशय पथनाट्याच्या स्वरूपात मांडला गेलेला आहे. नाटकाच्या सुरुवातीलाच समाजात महागाई, भ्रष्टाचार, लाचलुचपत, जीवनावश्यक वस्तूंची दरवाढ, बेकारी, जातीय दंगली यांसारख्या समस्या असल्या तरी स्त्रियांचे म्हणून काही खास प्रश्न असतात आणि ह्या खास प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम 'मुलगी झाली हो..........' या नाट्याने केले आहे.

१९७५ हे आंतरराष्ट्रीय स्त्री–मुक्तीचे वर्ष मानल्या जाते. १९७५ हे वर्ष 'जागतिक महिला वर्ष' म्हणून जाहीर झाले. त्या निमित्ताने स्त्रियांच्या सर्वांगीण परिवर्तनाचे व्यापक भान जागविण्याचा प्रयत्न शासनातर्फे करण्यात आला. युरोप आणि अमेरिकेतील स्त्रीमुक्तीच्या लाटा व साहित्यातील प्रतिध्वनी भारतातील सुशिक्षित स्त्री वर्गामध्ये उमटत होते. स्वातंत्र्योत्तर कालखंडात स्त्री–जीवनाच्या कक्षा रुंदावल्या. स्त्रियांना धार्मिक, आर्थिक गुलामगिरीतून मुक्त करून तिला माणूस म्हणून जगता यावे यासाठी स्त्रीविषयक चळवळी निर्माण झाल्या. 'जागतिक महिला वर्षा'च्या निमित्ताने जगातील स्त्रियांना एकत्र येण्याची संधी मिळाली. स्त्री–स्वातंत्र्याचा लढा सुरू झाला. रंगभूमी हे माध्यम दृक आणि श्राव्य अशा दोनही स्वरूपात व्यक्त होत असल्याने आणि एकाच वेळी हजारो लोकांच्या अंत:करणाला भेदण्याचे सामर्थ्य रंगभूमी माध्यमाचे असल्याने 'रंगभूमी' हे माध्यम चळवळीसाठी साधन म्हणून उपयोग करणे सुरू झाले. नाटयातील अभिनयामुळे, संवादामुळे आणि दृश्यात्मकतेमुळे नाटकात मांडलेले विचार प्रभावीपणे सर्वसामान्य माणसापर्यंत जाऊन पोहचतो. रंगभूमी माध्यमांच्या या वैशिष्ट्यांमुळे स्त्री–मुक्तीचा लढा शहरी भागापासून खेड्यापाड्यांपर्यंत पोहण्यासाठी पथनाट्य लिहिली गेली. ही पथनाटये नेपथ्य, रंगमंच, वेषभूषा, केषभूषा यांना फाटा देऊन उभी राहिली. महाराष्ट्रात अशोक पटवर्धनलिखित 'जमुरा', प्रशांत दळवी लिखित 'स्त्री' ज्योती म्हापसेकर लिखित 'मुलगी झाली हो.........' ही तीन नाटके आली. मुंबईच्या स्त्री–मुक्ती संघटनेचे 'मुलगी झाली हो..........' हे मुक्तनाट्याच्या स्वरूपाचे – पथनाट्याच्या ढंगाचे नाटक स्त्री–मुक्ती लढा , स्त्री–स्वातंत्र्य चळवळ, स्त्रियांचे प्रश्न, स्त्रियांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन या साऱ्याच संदर्भात अतिशय जाणतेपणाने केलेले हे लेखन होते. ज्योती म्हापसेकरांनी नाटकाच्या प्रस्तावनेत म्हटले आहे की, ''एका मोठ्या कॅनव्हासवर स्त्रियांना भिडणारे आम्ही समान धागे पकडण्याचा प्रयत्न केला.''[१]

स्त्रियांना दुय्यम समजण्याची परंपरा स्त्री प्रश्नांचे उगमस्थान आहे. पुरषी अहंकारापोटीच स्त्रियांच्या दास्यत्वाची परंपरा निर्माण झालेली आहे. या दास्यातून सुटका करून घेण्याकरिता स्त्रियांनीच कधी एकेकटीने तर कधी एकजुटीने संघर्ष करणे आवश्यक आहे. या नाटकाने स्त्रियांना तिच्या जन्मापासून तिचा समाजातील खडतर प्रवास वर्णन केला. रूढार्थाने या नाटकाला कथानक नाही. स्त्रियांच्या जीवनातल्या व्यथाच प्रसंगांच्या माध्यमातून नाटकात विखुरलेल्या आहेत. स्त्रियांच्या समस्यांची मांडणी या नाटकात आहेच पण त्याचबरोबर त्या समस्या सोडविण्याच्या मार्गाचाही मागोवा घेतला आहे. या नाटकाद्वारे ज्योती म्हापसेकरांनी स्त्रियांना तिच्या गुलामगिरीची जाणीव करून दिली आणि त्या प्रश्नांची सोडवणूक करण्याच्या उपाययोजनाही सुचविल्या आहेत – रोजगार, समान कामासाठी समान वेतन, पुरुषांप्रमाणे स्त्रियांनाही तांत्रिक शिक्षण देणे, घरातील मुले ही केवळ स्त्रियांचीच जबाबदारी नाही ती तेवढीची पुरुषांचीसुद्धा जबाबदारी आहे. प्रत्येक वस्तीत आणि कामाच्या ठिकाणी पाळणाघरे असावीत, नोकरदार महिलांसाठी वसतिगृह असावीत, स्त्री ही दासी, उपभोगाची वस्तू नसून एक माणूस आहे, ही जाणीव समाजात रुजायला हवी, नवे कौटुंबिक कायदे हवेत, या सर्व उपाययोजना अमलात आल्यात तर स्त्रियांमधील आत्मविश्वास वाढून त्या समाजात पुरूषांप्रमाणे ताठ मानेने वावरू शकेल असा विश्वास या नाटकाच्या माध्यमातून ज्योती म्हापसकेरांनी मांडलेला आहे.''[२] आतापर्यंत पुरुष नाटककारांनी स्त्रियांच्या समस्यांची चित्रणे केलेली आहेत. या पार्श्वभूमीवर स्त्रीने नाटककार म्हणून स्त्रियांच्या चिरंतन व्यथांचे बोलके असे चित्रण

'मुलगी झाली हो.........' या नाटकाद्वारे पहावयास मिळते.''[२] या नाटकातील प्रसंगांमधेच सर्वसामान्य स्त्रियांच्या प्रतिनिधिक समस्या नाट्यरूपात येतात. मुलगा मुलगी हा भेद जन्मापासूनच सुरू होतो. मुलगा झाल्यास पेढे तर मुलगी बर्फी वाटली जाते आणि मुलगी झाल्याने नाराज झालेल्या सासूबाई बर्फी खाण्यास नकार देतात. मुलगी देण्यास सूनच जबाबदार आहे, असे म्हणून सुनेला अवलक्षणी मानते. पण रेडिओवर जाहिरातीत सांगितले जाते की मुलगी किंवा मुलगा होणे आईवर नाही तर वडिलांवर अवलंबून असते. सासूला पश्चाताप होतो आणि ती म्हणते आमच्या वेळी हे माहीत असते ती माझ्या सासूने डागले नसते.

स्त्री–जन्मापासून तर एक समर्थ स्त्री होण्यापर्यंतची स्त्रीची वाटचाल नाटकात चित्रित करण्यात आली आहे. मुक्तनाट्य–पथनाट्य स्वरूपाचा वापर करून मोजक्या नेपथ्यानिशी हे नाटक साकार होऊ शकते. केवळ पात्रांच्या कृतीतून, अभिनयातून नाटकातील अनेक प्रसंग स्थलकाळनिरपेक्ष साकार होतात. नाटकाच्या प्रारंभीच स्त्री–मुक्तीची गाणी म्हणणाऱ्या कार्यकर्त्यांचे कार्यक्रम चालू असतानाच प्रेक्षकांमधून 'कमला' रंगमंचावर आपल्या मनात निर्माण झालेल्या प्रश्नांचे निराकरण करण्याकरिता येते. नाटकातील कार्यकर्त्यांच घटना आाणि प्रसंगातील व्यक्तिरेखा धारण करतात. स्त्रीशोषणाचे रोजच्या जीवनातील प्रसंग आपल्या समोर उभे करतात. पोवाडा, भोंडल्याची गाणी, भारूड, लोकगीते यांच्या धर्तीवर आधुनिक प्रश्नांची मांडणी करणारी गीते या नाटकात झालेली आहे,

''ईस बाई ईस, दोडका किस
घरा बैस, बाई घरात बैस
कपडे धू, भांडी घास, भांडी घास, बाई, घास
रांध आाणि वाढ, उष्ट काढ
शिवण कर टिपण कर, केर काढ, रांगोळी घाल,
तुळशीला ग पाणी घाल, वडाला ग फेऱ्या घाल
उपास कर व्रत कर
मान खाली घाल, वर न बघता चाल
इकडेतिकडे बघू नको, घेतला वसा टाकू नको
स्त्री पणाचा वसा टाकू नको,
उतू नको, तू मातू नको, घेतला वसा टाकू नको''

बालपणापासूनच स्त्रीजन्माचे सार्थक मानल्या जाणाऱ्या वरील गोष्टीचे संस्कार स्त्रियांवर टाकले जातात. आणि हा वसा निटपणे सांभाळण्यातच स्त्रियांचाच मान आहे असेही तिच्या मनावर बिंबविले जाते.

चहापोह्याच्या कार्यक्रमात एकत्र आलेली मुलाची आणि मुलीची आई आपल्या मुलांचे कौतुक पुढील पिंग्यातून करते,

मुलाची आई–
''लेक माझा ग, राजबिंडा ग,
त्याला हवा ग, हुंडा ग बाई हुंडा
हुंडा ग पोरी हुंडा.''

मुलीची आई–
''लेक माझी ग, सुगरण ग, पुरविल
जिभेचे नाना चोचले ग – पोरी पिंगा''

या नाटकाच्या माध्यमातून स्त्रियांच्या मुलभूत आणि पारंपरिक प्रश्नांची मांडणी करण्यासाठी स्त्रीमुक्ती संघटनेतर्फे आयोजित झालेले हे नाटक आहे. मुलीला सुगृहिणी बनवण्यासाठी धडे दिल्या जातात; पण आयुष्यात सन्मानाने आणि आत्मविश्वासाने जगण्याचे, स्वसंरक्षकाचे धडे मात्र दिल्या जात नाही, चहापोह्याच्या दहा मिनिटाच्या कार्यक्रमात आयुष्यभराचा जोडीदार निवडावा लागतो, सासऱ्यांनी कितीही छळले आणि डागले तरी माहेरी परत यायचंच नाही अशी अशी तंबी दिल्या जाते, परिस्थिती अभावी मुलीचे शिक्षण बंद करून घरातल्या मुलांना शिक्षण देण्याची मानसिकता असल्याने मुलीला शिक्षणापासून वंचित ठेवण्यात येते. मुलीच्या जातीनं फक्त नटावं मुरडावं अशी अपेक्षा व्यक्त केले जाते. स्त्रियांच शील म्हणजे काचेचं भांडं थोड्याशा धक्क्याने तडकायचं, म्हणून वयात आल्यावर स्त्रियांचं बाहेर भटकण, हसणं, मुलांशी मैत्री यावर बंधने घातले जातात. लग्न झाल्यावर

घर आणि नोकरी अशी तारेवरची कसरत करावी. त्यातल्या त्यात तर नवऱ्यापेक्षा बायकोचा पगार जास्त असला तर पुरुषी अहंकार जास्तच दुखावला जातो. अशा अनेक प्रसंगांची मालिकाच या मुक्तनाटयातून मांडली आहे.

एकूणच 'मुलगी झाली हो.........' स्त्री–मुक्तीवरील विचारांना पुढे नेण्यास कारणीभूत ठरणारे, स्त्री–मुक्ती चळवळीतील मैलाचे दगड ठरणारे हे नाटक आहे.

## संदर्भ सूची

१. प्रस्तावना–'मुलगी झाली हो........' ज्योती म्हापसेकर ग्रथांली प्रकाशन, मुंबई, सहावी आवृत्ती २० मार्च २००७

२. स्त्री नाटकारांची नाटके, मधुरा कोराळे, स्नेहवर्धन पब्लिकेशन हाऊस, पुणे. प्र. आ. २००२

❖❖❖

# वैदर्भीय ग्रामीण स्त्री कथाकारांच्या कथेतील स्त्रीचित्रण

प्रा. नेमीचंद एफ. चव्हाण
सहा. प्राध्यापक, मराठी विभाग
सु.ना. कला, विज्ञान व उ.खे. वाणिज्य महाविद्यालय अकोला
ई मेल: nfchavhan@gmail.com भ्रमणध्वनी ९४२३१३४२६८

## प्रास्ताविक

मराठी ग्रामीण कथेची सुरुवात ह.ना. आपटे यांच्या 'काळ तर मोठा कठीण आला!' (१८९८) या कथेपासून मानण्यात येते. पुढच्या काळात 'मराठी कथा' हा वाङ्मयप्रकार खऱ्या अर्थाने प्रादेशिक लेखकांनी आणि प्रादेशिक बोलीनी समृद्ध केला. मराठी कथेच्या इतिहासात जेव्हा फडके, खांडेकर युग सुरू होते तेव्हा त्यांचे अनुकरण करून सरळ सरळ जीवनवादी आणि कलावादी असे दोन तट निर्माण झाले होते. नेमके याच काळात (१९३०—३५) कुसुमावती देशपांडे आणि वा.कृ चोरघडे या वैदर्भीय कथाकारांनी कुठल्याच वादाचे अनुकरण न करता वैदर्भीय ग्रामीण कथावाङ्मयाला सुरुवात केली. नंतरच्या काळात पु.भा भावे, उद्धव शेळके, मनोहर तल्हार, भाऊ मांडवकर, वसंत आबाजी डहाके, सुभाष सावरकर, बाबाराव मुसळे, सतीश तराळ, सदानंद देशमुख, प्रतिमा इंगोले यांसारख्या वैदर्भीय ताकदीच्या कथाकारांनी वऱ्हाडी ग्रामीण कथा समृद्ध केली. विदर्भात ग्रामीण विश्व सर्वदूर पसरलेले आहे. कोरडवाहू शेती आणि तिच्यात राबणाऱ्या स्त्रिया असेच चित्र विदर्भात आहे. दारिद्र्य, अज्ञान यांचा वसा पत्करलेल्या स्त्रिया अधिक मेहनत करतांना दिसतात. वैदर्भीय स्त्री जीवन असे असतांना याच मातीतील स्त्री कथाकारांनी आपल्या कथेतून स्त्रियांचे चित्रण नेमके कसे केले? याचा शोध घेण्यासाठीच शोधनिबंधाचा हा विषय घेतला आहे.

## कुसुमावती देशपांडे

पहिल्या वैदर्भीय ग्रामीण स्त्री कथाकार कुसुमावती देशपांडे यांनी 'दीपकळी' 'दीपदान' 'मोळी' ह्या तीन कथासंग्रहातील 'दमडी', 'लहानी जाईबाई', 'नदी किनारी', 'छायाप्रकाश', 'सदाचे निराश्रित', 'मृगाचा पाऊस', 'वहाणा', 'चिंधी', 'भ्रमनिराश', 'माऊली', 'समांतर रेषा', 'पिठोरी अमावस्या', 'कला धोबीणीचे वैधव्य' यांसारख्या समर्थ कथेतून निम्नवर्गीय समाजातील (दलित, शेतकरी, मजूर, कामगार) शोषित, पीडित स्त्रियांना केंद्रस्थानी ठेवून अनेक स्त्री पात्रे सहानुभूतीपूर्वक रेखाटलेली आहेत. 'कला धोबीण' ही कुटुंबवत्सल स्त्री आहे. नवऱ्याच्या मृत्यूनंतर संसार उघडा पडल्यावर आपल्या मुलींना आधार देण्यासाठी पतीचा व्यवसाय नेटाने चालवून जीवनाची विस्कटलेली घडी पूर्ववत करते. 'चिमणी' ही स्त्री व्यक्तिरेखा संघर्षमय जीवन जगत असताना तिची होणारी मानसिक तगमग मनाला सुन्न करते. 'जाईबाई' ही हृदयाचा ठाव घेणारी दलित स्त्री व्यक्तिरेखा आहे. ती एकीकडे मिस ग्रेगरीच्या शाळेत शिकते अन् दुसरीकडे इंधन गोळा करुन चरितार्थ चालवितांना दिसते. शिवाय चिंधी, दमडी, इंद्रा ह्या दैन्यग्रस्त संमाजातील उपेक्षित मुली परंपरानिष्ठ आहेत.

## आशा बगे

आशा बगे यांनी आपल्या 'मांडव', 'दर्पण', 'ऋतुवेगळे', 'निसटलेले' या कथासंग्रहातून जवळपास मध्यमवर्गीय स्त्री जीवनाकडे लक्ष वेधले आहे. आशाताई आपल्या कथेतील स्त्रीकडे आधुनिक दृष्टिकोनातून बघत असल्या तरी, परंपरेशी आपले जुळलेले नाते त्या तोडू शकत नाही. त्यामुळे त्यांच्या कथेतील स्त्रियांची अवस्था दोलायमान अशीच आढळते. अशा वेळी नवता आणि परंपरा यांच्यातला संघर्ष त्यांच्या कथामध्ये आपल्याला जाणवतो. उदा. मैत्रीण, बंदीशाळा, नर्सिंग होम ह्या त्यांच्या कथा. 'नर्सिंग होम' मधील डॉ. सुचरिता ही विवाहाला बंधन मानते. विवाहामुळे स्त्रीला पुरुषांच्या गुलामीत जगावे लागते किंवा तिच्या व्यक्तिमत्त्वाचा संकोच होतो, असा तिचा समज आहे. ही कथा वाचताना डॉ. सुचरिता कधीच लग्न करू शकणार नही असेच वाचकांना वाटते; परंतु ती शेवटी लग्न करुन घेते. 'रुक्मिणी' या कथेतील रेणूसुद्धा सुरुवातीला होणाऱ्या नवऱ्याचा स्वभाव विसंगत असल्यामुळे अनंतासोबत लग्न करण्यास अनुत्साही दिसते. पण शेवटी लग्न करतेच. आशा बगे यांच्या स्त्री व्यक्तिरेखा ह्या शेवटी तडजोड स्वीकारताना दिसतात. विवाह संस्थेची मातब्बरी जोपासण्याचा प्रयत्न येथे आपल्याला दिसतो. 'डोळे' या कथेत एका गरोदर स्त्रीने डोळ्याची दहशत घेतल्याचे दिसते. दुसऱ्याचे डोळे

आपल्या गर्भापर्यंत पोहोचेल आणि काहीतरी अघटित घडेल अशी तिची अज्ञानामुळे धारणा होते. 'घरटं' या कथेत मृदुला आणि शाम या दोघांचे कौटुंबिक जीवन नेमकेपणे चित्रित झाले आहे. 'जन्म'मध्ये एका स्त्रीच्या प्रसुतीवेदना दुसऱ्या स्त्रीपर्यंत कशा पोहोचतात याचे हृदयंगम चित्र आशाताईने रेखाटले आहे. स्त्रीच्या बाह्य चित्रणापेक्षा मनोविश्लेषणावर आशाताई अधिक भर देताना दिसतात. उदा. 'अज्ञात' कथेतील मधुरेची व्यक्तिरेखा. 'परीक्षा' या कथेतील कमलीनी दिसायला सुंदर नाही. त्यामुळे तिला बघायला येणारे तरुण तिला पसंत न करता तिची हरप्रकारची परीक्षा घेऊन टर उडविल्या जाते, अपमान केल्या जातो, शेवटी मनाने सुंदर आणि स्वभावाने सालस असलेली कमलिनी परिस्थितीशी हार मानून अगतिक बनते आणि एका बिजवराशी लग्न करून मोकळी होते. 'येरझारा' या कथेतील अनुताई ही आपल्या आईपासून दुरावलेली आहे. कारण तिची आई समाजसेविका असल्याने ती आपल्या कुटुंबाला वेळ देऊ शकत नाही. आईचा मृत्यू झाल्यानंतर अनूला आपल्या आईच्या मोठेपणाची जाणीव होऊन मनातील आईविषयीची अढी दूर होते. 'पत्र' या कथेत मंजू या अल्पवयीन मुलीवर होणारा अतिप्रसंग मनाला चटका लावून जातो. अशा प्रकारची जुनं आणि नवं यांचं समर्थन करणारी आशा बगेंची कथा आहे. या कथेतून स्त्रीचे अगतिक जीवन, कौटुंबिक नात्यातील ताण–तणाव, कारुण्यमय एकाकी जीवन, परिस्थितीशी तडजोड, याबरोबरच विदर्भातील वेगवेगळ्या विधी–उत्सवाची तपशिलवार माहिती आशाताई बगे देताना दिसतात.

## सिंधू मांडवकर

सिंधू मांडवकर यांनी 'सल' आणि 'वेदना' या कथासंग्रहातील कथेमधून मध्यमवर्गीय जीवन जाणिवांचा वेध घेऊन स्त्री मनाचे नेमकेपणाने चित्रण केलेले आहे. 'सुशीला', 'घुसमट', 'माझं काय चुकलं?' ह्या त्यांच्या कुटुंब कथा आहेत. 'माझं काय चुकंल?' ही कथा निलकांता परुळेकर या महत्वाकांक्षी पण भरकटलेल्या स्त्रीची कहाणी आहे. आर्थिक विपन्नावस्थेत जगताना मामाशी जवळीक निर्माण झालेली निलकांता पुढे पुढे त्यांच्या एवढ्या आहारी जाते की ती नवऱ्याला विसरते. एम.बी.बी.एस. झालेल्या मुलाला निलकांताविषयी कळल्यावर तो आपल्या आईची घृणा करु लागतो. सिंधू मांडवकर स्त्री मनाचा वेध घेण्यात यशस्वी झाल्या आहेत. त्यांच्या स्त्री व्यक्तिरेखा सोशिक असल्या तरी, त्या स्त्रियांच्या मनात एक सल आहे, वेदना आहे हे स्पष्ट दिसून पडते.

## प्रतिमा इंगोले

ग्रामीण जीवनातील वैगुण्ये, व्यथा आणि पारंपारिकता यावर अधिक भर देऊन प्रतिमा इंगोले कथालेखन करताना दिसतात. 'हजारी बेलपान', 'अकसिदीचे दाने', 'सुगरनचा खोपा', 'जावयाचं पोरं', 'लेक भुईची', 'हिरवे स्वप्न', 'अंधारपर्व' ह्या कथासंग्रहातून त्यांनी विदर्भातील विशेषतः अमरावती जिल्ह्यातील ग्रामीण जीवन चित्रित केले आहे. वैदर्भीय ग्रामीण कथेचे 'अनभिषिक्त सम्राट' म्हणून गौरविल्या गेलेले उद्धव शेळके यांच्या कथेत नवऱ्याचा मार खाऊन त्यांची पूजा करणाऱ्या स्त्रिया आहेत. मात्र प्रतिमा इंगोले यांच्या कथेत अत्याचाराला प्रतिकार करणाऱ्या नव्या उमेदीच्या नायिका भेटतात. स्त्रियांच्या दुःखाला कवेळ पुरुषाला जबाबदार न धरता समाजातील इतर घटक आणि परंपरांना त्या जबाबदार धरतात. प्रतिमाताईंनी आपल्या कथेतून स्त्री मनाचे असंख्य पदर हळूवारपणे सादर केले आहे. त्यांच्या कथेला प्रबोधनाचे अंग आहे. त्यांच्या कथेतील स्त्री व्यक्तिरेखा स्पष्ट व ठसठशीत असतात. उदा. 'वटी' कथेतील पुंजी मांगीण, 'भोंड' मधील गोकुयी, 'हजारी बेलपान' मधील पुष्पा, 'सर्वा' मधील कांती, 'जोळन्हानी' मधील सत्यभामा, 'बळी' मधील नथी, 'भिंगरी' मधील पंचफुला, 'मंगलसुत्र' मधील माया आणि सुभा, 'नागवेल' मधील लता, 'जावयाचं पोरं' मधील अनुसया, 'जखम' मधील भारती, 'गुरुप सेकरटरी' मधील मालू, 'परका' मधील पद्मा, 'हव्यास' मधील सुधा, 'दुपवा' मधील समरती वै.

'दुपवा' या कथेतील पारधी स्त्री समरती ही दारुड्या आणि स्त्री वेशात नाचणाऱ्या नवऱ्याला कंटाळली आहे. गर्भवती असलेल्या समरतीकडे तिचा नवरा शारीरिक सुखाची मागणी करतो. समरतीने नकार देताच दारूच्या नशेत तो तिला बेदम मारहाण करतो. त्यात तिचा गर्भपात होतो. नवऱ्याच्या तोंडावर पचकन थुंकून ती त्याला सोडून निघून जाते. एका आदिवासी स्त्रीने दाखविलेले धैर्य, तिने स्वीकारलेली परिवर्तनाची लाट अभिमानास्पद वाटते. 'नागवेल' या कथेची नायिका लता ही आपल्या माय बापाला एकुलती एक अपत्य आहे. माहेरच्या अंगणातील नागवेल तिची खास सखी आहे. लता आपल्या भाव–भावना, हितगुज त्या नागवेलीला नेहमी सांगत असते. लताचे एका कम्पाउंडरशी लग्न होते. तिच्या सासरच्या अंगणातही नागवेल असल्यामुळे तिला फार आनंद होतो. तिच्या नवऱ्याचे एका नर्ससोबत संबंध असल्याचे कळल्यावर ती व्यथीत होते. नवरा

तिच्याकडे दुर्लक्ष करतो. माहेरवरून पैसे आणायला सांगतो. लताची अवस्था केविलवाणी होते. स्त्रियांचे जीवन हे नागवेलीसारखेच असते, असे तिला वाटते. कारण नागवेलसुद्धा बांबूच्या आधाराने उभी असते आणि स्त्री ही नवऱ्याच्या आधाराने. रागाने ती त्या वेलीचा बांबू उखडून फेकते. नागवेल जमिनीवर येते, पण मरत नाही. लगेच तिच्या मनात विचार येतो. नवऱ्याशिवाय एकाकी का होईना पण स्वाभिमानाने जगू शकतो याची जाणीव होऊन लता नवऱ्याला सोडते. असा हा परिवर्तनवादी विचार या कथेमध्ये आलेला आहे. 'वटी' या कथेमध्ये पुंजी मांगीण ही शोषितांची प्रतिनिधी म्हणून समोर येते. तिची केविलवाणी मानसिक अवस्था मनाला स्पर्शून जाते. पतीविना एकाकी स्त्री ही लोकांना जणू रस्त्यावरील चिंचेचे झाड वाटत असते याची जाणीव 'कल्लोळ' या कथेतील एका शिक्षिकेला आहे. शाळेतील सहकारी तिच्याकडे वासनांध नजरेनी बघतात. शेवटी ती आपल्यापेक्षा लहान असलेल्या तरुणासोबत लग्न करते. लग्नानंतर तिच्या लक्षात येते की, आपल्या नवऱ्याचे आधीपासूनच त्याच्या वहिनीशी संबंध आहे. नवऱ्याचे संबंध तिला कळल्यावर ती नवऱ्याला सोडत नाही. कारण नवऱ्याशिवाय स्त्रीला समाजात काय स्थान असते? याचे अनुभव तिला असल्यामुळे ती नवऱ्याचे अनैतिक संबंध संपुष्टात आणण्याचा निर्णय घेते. 'मंगळसूत्र' कथेची नायिका माया बाळंतपणासाठी दवाखान्यात भरती होते. 'दवाखान्यातील नर्स, नोकरचाकर तुझ्या गळ्यातील मंगळसूत्र चोरून घेतील' अशी भीती दाखवून तिचा नवरा मंगळसूत्र काढून घेतो आणि मैत्रिणीच्या गळ्यात टाकून तिच्यासोबत लॉजवर रात्र साजरी करतो. मंगळसुत्राचा दुरुपयोग करुन रात्र घालवल्याचे मायाला कळल्यावर ती नवऱ्याला फटकारते. नवरा जेव्हा मंगळसुत्र परत करतो तेव्हा ती मंगळसुत्र नाकारते. 'हव्यास' या कथेची नायिका रुपवान आहे. फक्त तिच्या रुपावर, सौदर्यांवर नवरा भाळला आहे. आपल्या रूपवान पत्नीचे सौंदर्य ढळू नये, तिची फिगर बिगडू नये म्हणून तो तिला आई होऊ देत नाही. आई झाल्यावर बाळाला दूध पाजू देत नाही; परंतु तिला मातृत्वाचा अनुभव घ्यायचा असल्यामुळे ती आपल्या नवऱ्याच्या आदेशाची पायमल्ली करते. 'जखम' या कथेत शरद नावाच्या प्रियकराकडून फसविल्या गेल्याची जाणीव भारतीला होताच जळत्या काडीने स्वतःच्या हातावर 'शरद' हे नाव कोरून स्वतःला वेदना करून घेते. 'सर्वा' ही कथा सीमेवर लढता लढता मरण आलेल्या जवानाच्या तरुण विधवा पत्नीची कहाणी आहे. कांती ही पुनर्विवाह न करता लहानग्या पोरीला शिकवून नवऱ्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी झटत राहते. स्त्री शिक्षणावर प्रकाश टाकणारी ही कथा आहे. 'परका' ही कथा नोकरी करणाऱ्या दाम्पत्याची आहे. पद्मा आपल्या हेकेखोर स्वभावामुळे आपल्या सासूला कशी दुसऱ्याच दिवशी हाकलून लावते याचे चित्र या कथेत आहे. घर आणि शेत या दोन्ही जबाबदाऱ्या एकाचवेळी सांभाळणारी, पुरुषी वर्चस्व नाकारणारी, बंड करणारी वऱ्हाडी स्त्री प्रतिमाताईंनी रेखाटलेली आहे. शिवाय 'सोनंनिळं पाखरू' 'लोकावानी', बिऱ्हाड', 'चाकोली', 'भिकीचे कपळे' या कथेतून प्रतिमाताईंनी पुरुषी अंहकाराला विना तक्रार सहन करणाऱ्या, पिचलेल्या स्त्रियांही रेखाटलेल्या आहेत.

## शैलजा गावंडे

अंजनगाव सुर्जी आणि अचलपूर तालुक्यातील ग्रामीण स्त्रियांच्या दुःखाचा शोध घेण्याचा प्रयत्न शैलजा गावंडे यांनी 'मोगरा फुलला' आणि 'मधुमालती' हे दोन कथासंग्रह लिहून केला आहे. ह्या दोन्ही संग्रहातील कथेतून अंधश्रद्धा, सासुरवास, हुंडा, अस्पृश्यता, रुढी—परंपरा, अज्ञान यामुळे स्त्रियांचे जीवन कसे पिचलेले आहे, याचे चित्रण आलेले आहे. 'मधुमालती' या कथेतील मालती दहावीच्या वर्गात शिकणारी तरुणी आहे. आपल्या गावात साक्षरता अभियानासारखे राष्ट्रीय पुनरुत्थानाला हातभार लावणारे मोलाचे कार्य करीत असते. गावात रुजू झालेल्या मधुकर नावाच्या शिक्षकांवर ती मनांपासून प्रेम करते. शिक्षकाचेही तिच्यावर प्रेम आहे आणि जेव्हा लग्नाचा प्रश्न उपस्थित हातो तेव्हा मालती आंतरजातीय विवाहासाठी समाजाचे सारे संकेत मोडायला तयार होते. परंतु मधुकर मात्र दुसऱ्या गावी आपली बदली करून घेतो. मधुकरने सोडल्यावर ती डगमगत नाही. उलट साक्षरता अभियानाची मोहीम स्वतःच्या बळावर पुढे नेते. 'व्यथा देवकीची' या कथेतील देवकी प्रतिकुल परिस्थितीवर मात करीत पोराला शिकवून मास्तर बनवते. तिचा मुलगाही आज्ञाधारी आहे. पण देवकीचा धाकटा भाऊ आपली जाड, काळी आणि तिरक्या डोळ्याची मुलगी देण्याचा घाट देवकीला घालतो. देवकीची इच्छा नसतानाही तिला आपल्या भावाचा शब्द मोडता येत नाही. शेवटी देवकीचा मुलगा आपल्या आईच्या विरोधात जाऊन दुसऱ्या मुलीसोबत लग्न करतो. 'मनातलं घर' मधील मीना फार सोशिक आहे. मीनाचे काही चुकत नसतानाही तिची सासू तिच्यावर अन्याय करत राहते. मीनासुद्धा एखाद्या गरीब गाईप्रमाणे सारं सहन करते.'निर्दोष' या कथेतील मंजूसद्धा शिक्षक नवऱ्याची बळी आहे. अकारण तिचा नवरा तिला टोच्चून बोलतो, शिव्या देतो, मारझोड करतो. नऊ महिन्यांची गर्भवती असलेल्या मंजूच्या पोटावर लाथाबुक्क्यांनी प्रहार करुन तिचा जीव घेतो.

या दोन्ही कथांतील नायिका कारुण्याच्या प्रतिमा वाटतात. मीना आणि मंजूचे सोशिकपण अतिशयोक्तीपूर्ण वाटत राहते. सासुरवास, नवऱ्याची हिंसा, मनासारखी पत्नी न मिळाल्याने नवऱ्याचे आदळआपट करणे, वैधव्यानंतर पुनर्विवाह न करण्याचा विचार बोलून दाखवणे, असले पारंपारिक विचार शैलजा गावंडे यांच्या कथेतून प्रसुत होताना दिसतात.

## सुनीती आफळे

सुनीती आफळे यांनी 'केवडा', 'बाहुल्या', 'कुपणापलीकडच्या बकुळी—बाभळी', 'अनाथ', 'अतिथी' यांसारख्या कथासंग्रहातील कथेतून उच्चभू आणि मध्यमवर्गीय स्त्रियांच्या समस्या अधोरेखित केल्या आहेत. 'दाद' या कथेची नायिका ललिता ही प्राध्यापिका आहे. एकेकाळी हजारो श्रोत्यांसमोर विदूषी वक्ता म्हणून गाजलेली ललिता अस्थमाच्या आजारामुळे आपल्या व्याख्यानामध्ये अलकाला गीत गायला लावत असते. आपल्या गीत गायनामुळे अलका वरचढ ठरते आणि ललिता मागे पडते. आता केवळ ती नाइलाजाने अलकाच्या कार्यक्रमांचे संचालन करते. ही बाब तिच्या मनाला बोचत राहते. उच्चभू वर्गातील कलावंतांच्या मनातील भावनिक आंदोलन सुनीती आफळेंनी यशस्वीरीत्या टिपले आहे. 'मादी' या कथेची नायिका तल्लख व्यक्तिमत्त्वाची आहे. सारे पुरुष स्त्रीकडे केवळ 'मादी' म्हणूनच बघतात. हा तिला अनुभवाने आलेला समज आहे. वेगळ्या आशयाची ही कथा मनात अनेक प्रश्न निर्माण करते. लैंगिक शोषण हा विषय असलेली 'प्रतिबिंब' ही कथा मंगला आणि सुशीला ह्या स्त्रियांच्या मनाचा ठाव घेण्यात यशस्वी ठरली आहे. 'वेश्या' मधील सीमा, 'सुगंध' मधील सुजाता, 'उच्च' मधील नीमा, 'लेन्सिस' मधील मीना, 'तिढा' मधील रेखा, 'खेळणं' मधील सुनंदा, 'इमान' मधील चित्रा आणि सुनंदा या सर्व मध्यमवर्गीय स्त्रियांच्या वेगवेगळ्या समस्या सुनीती आफळेंनी त्या त्या कथेतून मांडल्या आहेत.

## शैलजा काळे

स्त्रीवादी जाणिवेतून कथा लिहिणाऱ्या शैलजा काळे यांच्या 'विस्तारलेले आकाश' ह्या एकमेव कथासंग्रहातील मोजक्याच कथा हृदयस्पर्शी आहेत. 'मीरा के प्रभू' आणि 'विस्तारलेले आकाश' ह्या दोन नायिकाप्रधान कथा वाचनीय आहे. 'विस्तारलेले आकाश' या कथेची नायिका कुमुद आत्मभान जागृत झालेली स्त्री आहे. तिचा शरदसोबत प्रेमविवाह झालेला असला तरी त्यांच्यात वैचारिक दरी आहे. कुमुदला फार मोठे व्हायचे आहे. ती अभ्यासू असल्यामुळे 'डॉक्टरेट' होते. पुढे मुंबई आकाशवाणीमध्ये मोठ्या पदावर रुजू होते. तिथे कवी प्रफुल्लशी तिचे संबंध जुळतात. उंच भरारी घ्यायला निघालेल्या कुमुदला संसारी स्त्री करून प्रफुल्ल तिचे पंख छाटू पाहतो. ती प्रफुल्ललाही सोडते. कुमुदला तिच्या अंतर्मनातील सामाजिक प्रतिष्ठा स्वस्थ बसू देत नाही. ती जर्मनीला जाते. तिथे तिच्या जीवनामध्ये अनेक पुरुष येतात. शेवटी ती आपल्या मुलाच्या लग्नासाठी भारतात परतते. तेव्हा शरदनी घातलेल्या मंगळसुत्राची तिला आठवण येते. काढून ठेवलेले मंगळसूत्र शोधत असतांना कथा संपते. 'मीरा के प्रभू' या कथेची नायिका रूपाली ही उच्चवर्गीय महाविद्यालयीन तरुणी आहे. प्रा. मुजुमदाराच्या व्यक्तिमत्त्वाला भाळून ती त्यांच्यावर एकतर्फी प्रेम करू लागते. रूपालीचा हा वेडेपणा सगळ्यांना समजल्यावर प्रा. मुजुमदार, तिचे आई—वडील तिची समजूत घालतात पण ती कोणाचेच ऐकत नाही. कोणतीही गोष्ट मिळवण्याची एकदा रूपालीने मनावर घेतले की तडिस नेल्याशिवाय ती राहत नाही एवढी ती हट्टी असते. तिच्यावर मनापासून प्रेम करणारा सतीश प्रधान हा तिला लग्नासाठी मागणी घालतो पण त्या स्कॉलर तरुणाला ती नकार देते. प्रा. मुजुमदार तिला न मिळाल्यामुळे झोपेच्या गोळ्या खाऊन आत्महत्या करते. 'हवास मज तू' या कथेतील रागिणीच्या रूपात वासना, तिचे आगडोंब चित्रित झाले आहे.

## ज्योती तुंडुलवार

ज्योती तुंडुलवार या वैदर्भीय स्त्री कथाकारांचा 'नियती' हा एकमेव कथासंग्रह. 'नियती', 'हिंदोळा', 'अकर्तुक', 'निर्वाण', 'मशाल', 'आगंतुक' ह्यासारख्या कथेमधून ज्योती तुंडुलवारांनी उच्चभू जीवन जगणाऱ्या स्त्रिया सुखाचा शोध घेत घेत आपल्याच वर्तुळात कशा गिरगिरत राहतात यांचे वास्तववादी चित्रण केले आहे. 'नियती' या कथेची नायिका टि.एस.रैना ही महाविद्यालयीन तरुणी नाव—गाव, लहान—थोर, आप्त—मित्र यापैकी कोणालाही महत्त्व न देता आपल्याच पद्धतीने एकाकी जीवन जगते. कारण तिचे कुटुंब अपघातात मृत्युमुखी पडल्यामुळे तिची जीवनावरची आस्थाच निघून गेलेली आहे. मात्र तिची वर्गमैत्रीण वंदना किडनीच्या आजाराने दवाखान्यात भरती असते तेव्हा स्वतःची एक किडनी देवून वंदनाला वाचवते. एकाकी, निर्भीड, जेवढ्यास तेवढे

वागणारी रैना कथेच्या उत्तरार्धात आपल्या कृतीने महान ठरते. 'अकर्तुक' या कथेतील शिरीनचे लग्नाचे वय केव्हाच निघून गेले आहे तरी तिचे आईवडील तिच्या लग्नाबद्दल गंभीर नाही. एका उपवर मुलीचे प्रश्न, भावना या कथेत चित्रित झाले आहे.

## ललिता देशमुख

ललिता देशमुख यांनी आपल्या 'धुयमाती' ह्या एकमेव कथासंग्रहातील नऊ कथांपैकी केवळ तीनच कथेमधून ग्रामीण स्त्रीचे भावविश्व रेखाटले आहे. तर सहा कथांमधून नागरी जीवन चित्रीत केले आहे. 'समाधी' मधील नबुताई ही विधवा आहे. घरच्या लोकांचे न ऐकता ती शिक्षिकेची नोकरी करून आपल्या पाचही मुलांना घडवते. एका विधवा स्त्रीच्या मनातील घालमेल निश्चित हृदयस्पर्शी आहे. 'अमरस्मृती', 'हुंदका', 'धुयमाती', 'वाशा' या कथांमधून स्त्री जीवनातील दु:खाला वाचा फोडताना त्या जीवनाचे अत:स्त्रोत, त्यांच्या विविध पैलूसह मांडताना त्या दिसतात. त्यांच्या कथेतील राधाबाई, निर्मला, संध्या, सुमन ह्या स्त्री व्यक्तिरेखा त्यांच्या संयमशील वागण्याने वाचकांच्या मनात घर करून बसतात. एकूणच ललिता देशमुख यांच्या कथेतील स्त्रियांना स्वातंत्र्याची जाणीव आहे. स्त्रियांचे हक्क, त्यांचे अधिकार, त्यांची अस्मिता ह्या स्त्रियांना माहीत असूनही शेवटी मात्र त्या पारंपरिक कक्षेतच समाधानी होताना दिसतात.

शोधनिबंधाच्या शेवटी असेच सांगावे लागेल की, वा.कृ. चोरघडे, उद्धव शेळके, मनोहर तल्हार, बाबाराव मुसळे, सदानंद देशमुख, सुभाष सावरकर, सतीश तराळ अशी वैदर्भीय ग्रामीण कथकारांची समृद्ध परंपरा असताना वैदर्भीय स्त्री कथाकारांच्या बाबतीत मात्र घोर निराशा होते. केवळ प्रतिमा इंगोले यांनीच संपन्न आणि समृद्ध कथा लिहिल्याचे दिसते. इतर वैदर्भीय स्त्री कथाकार वाङ्मयीन गांभीर्यापासून खूप दूर असल्याचे दिसते.

## निष्कर्ष

१) वैदर्भीय ग्रामीण कथालेखन करणाऱ्या पहिल्या स्त्री कथाकार कुसुमावती देशपांडे आहेत.

२) कुसुमावतींनी निम्नवर्गातील शोषित, पीडित स्त्रियांना आपल्या कथेत स्थान दिले आहे.

३) आशा बगे यांच्या कथेतील स्त्रिया आधुनिक विचारांच्या आहेत; पण शेवटी परंपरेशी तडजोड स्वीकारताना दिसतात.

४) प्रतिमा इंगोलेच्या कथेत पुरुषी अहंकाराला विनातक्रार सामोरे जाणारी, घर आणि शेत या दोन्ही जबाबदाऱ्या एकाच वेळी सांभाळणारी अगतिक स्त्री तर दिसतेच, उलट अन्याय, अत्याचाराला प्रतिकार करणाऱ्या नव्या उमेदीच्या अनेक वैदर्भीय स्त्रियाही दिसतात.

५) प्रतिमा इंगोलेच्या कथेला प्रबोधनाची बाजू आहे.

६) सासुरवास, कौटुंबिक हिंसाचार, पुरुषप्रधानता, परंपरा, अंधश्रद्धा यामुळे ग्रामीण स्त्री जीवनामध्ये निर्माण झालेल्या दु:खाचे वर्णन शैलजा गावंडेनी आपल्या कथेतून केलेले आहे.

७) सुनीती आफळे, शैलजा काळे, ज्योती तुंडुलवार यांच्या कथेमधून उच्च आणि मध्यमवर्गीय स्त्रियांचे प्रश्न अधोरेखित झाले आहे.

८) ललिता देशमुख यांच्या कथेतील स्त्रियांना स्त्री स्वातंत्र्यांची जाणीव असूनही त्या परंपरेचा स्वीकार करताना दिसतात.

९) वैदर्भीय ग्रामीण स्त्री कथाकारांमध्ये केवळ प्रतिमा इंगोले यांचेच कथालेखन समृद्ध असल्याचे जाणवते.

## संदर्भ ग्रंथ

१) 'वैदर्भीय कथेतील स्त्री व्यक्तिरेखा', डॉ. पूजा अकोटकर, प्रकाशन ज्योती कुंभार, कोल्हापूर, प्र.आ. डिसे.०५

२) 'मराठी कथा : प्रवृत्ती आणि प्रवाह', डॉ. रा.गो.चवरे, जनसाहित्य परिषद, अमरावती, प्र.आ. १९९५

३) 'ग्रामीण कथा : वास्तवता आणि रंजकता', डॉ. रमेश जाधव,ग रेवाणी प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ. मार्च, २०१०

४) 'ग्रामीण साहित्यातील स्त्री चित्रण', डॉ. बाबुराव उपाध्ये, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्र.आ. ऑगस्ट, २००९

५) 'आधारभूत कथासंग्रह'

❖❖❖

# स्वातंत्र्योत्तर काळातील ग्रामीण साहित्याचे बदलते स्वरूप

प्रा. लिंगायत विशाल प्रकाश
सहायक प्राध्यापक, मराठी विभाग,
श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय, बार्शी,
पो.बॉक्स नं. १६, जामगाव रोड, बार्शी, जि. सोलापूर ४१३ ४०१
E mail: vishallingayat28@gmail.com भ्रमणध्वनी ७५८८०२०२९०

## प्रस्तावना

मराठी साहित्यात विशेषत: ग्रामीण साहित्याचा विचार करताना स्वातंत्र्योत्तर काळातील ग्रामीण साहित्याचे बदलते स्वरूप हे फारच महत्त्वाचे ठरते. या काळात ग्रामीण साहित्याचे अनुभव क्षेत्र, आकलनाचे स्वरूप, आशय निर्मितीतील बदल, समाजाभिमुखता यामुळे ग्रामीण साहित्यातील समाजदर्शनाचा पटच बदलेला पाहावयास मिळतो. या बदलाचाच परिणाम असा की, समाजातील सर्वच स्तरांमध्ये परिवर्तन घडून आले व विविध स्वरूपाच्या साहित्यविषयक चळवळी सुरू झाल्या. या चळवळींनी मराठी साहित्याचे अनुभवविश्व समृद्ध करण्याबरोबरच साहित्यविषयक काही महत्त्वाचे व मुलभूत प्रश्नही निर्माण केले. ''स्वातंत्र्योत्तर काळातील ग्रामीण साहित्यधारेने सांस्कृतिक जे–जे परिवर्तन आहे, त्याचे जिवंत दर्शन मराठी समाजाला घडविले.''[१] ग्रामीण साहित्य म्हणताना त्यात काय असावे, ते कसे असावे, त्यामागील लेखनाच्या प्रेरणा, लेखकाची भूमिका, जाणिवा कशा असाव्यात हे स्पष्ट व्हायला हवे. ग्रामीण हे एक वेगळेच जीवनविश्व आहे. तिथले वास्तव, तिथले प्रश्न, समस्या, जगण्याचा संघर्ष, जीवन जगताना आलेली दु:खं, जगण्याची साधने, तिथली संस्कृती, रूढी, परंपरा, तिथले वातावरण इ. अनेक घटकांनी तिथले जीवनविश्व घडलेले असते. ग्रामीण साहित्याचा प्रवाह एक चळवळ म्हणून उदयाला येण्यापूर्वी किंवा या साहित्य प्रवाहाची स्वतंत्र भूमिका निर्माण होण्यापूर्वी अनेक शतके आधी असे साहित्य निर्माण होत होते. या चळवळीने स्वातंत्र्योत्तर ग्रामीण साहित्याचे स्वरूप बदलले म्हणून या साहित्याची चळवळ, चळवळीच्या प्रेरणा, भूमिका, त्याचा साहित्यावर, लेखकांवर, समाजावर झालेला परिणाम समजून घेण्यासाठी सुरुवातीपासून ग्रामीण साहित्यात कसेकसे बदल होत गेले, निर्मितीच्या प्रारंभी ग्रामीण साहित्याचे स्वरूप कसे होते, पुढे त्यात कसे व कोणते बदल झाले, ''ग्रामीण साहित्य म्हणून या साहित्याला जे वेगळेपण प्राप्त झाले ते कसे, का व कोणत्या कारणांनी, स्वरूपांनी प्राप्त झाले हेही समजून घेणे आवश्यक वाटते.''[२] त्याशिवाय ग्रामीण साहित्याच्या चळवळीचे, ती निर्माण होण्यामागचे आकलन होणार नाही.

आज ग्रामीण साहित्याला मराठी साहित्यात एक स्वतंत्र स्थान प्राप्त झाले आहे. मध्यवर्ती मराठी साहित्यातील ग्रामीण साहित्य हा एक वेगळा व मुलभूत असा प्रवाह आहे. साहित्यातील 'ग्रामीण' हा शब्द 'ग्राम' या शब्दावरून मराठीत आलेला आहे. संस्कृत मधील 'ग्राम' चा मराठीत 'गाव' असा अर्थ आहे. खेडेगाव, शेतवस्ती, गाव, खेडे, गावगाडा असे आणखी काही समानार्थी शब्द 'ग्राम' हा शब्दाचे सांगितले जातात; परंतु 'ग्राम' म्हणजे 'गाव' हाच अर्थ संयुक्तिक आहे. 'ग्राम' वरून ग्रामण्य, ग्रामस्थ, ग्रामकन्या, ग्राम्य असे संस्कृत शब्द तर 'गाव' वरून गावकरी, गावगाडा, गावकुस, गावरान, गावभवानी, गावठाण, गावकी असे अनेक शब्द आपण मराठी भाषेत वापरतो. यातील प्रत्येक शब्दाचा अर्थ गावाशी निगडीत आहे. यामुळे ग्रामीण म्हणजे 'गावाकडील' किंवा 'गावाशी निगडीत' असेल तर ते ग्रामीण होय असे म्हणता येते. यावरून मराठी साहित्याच्या संदर्भात असे विधान करता येईल की, एखाद्या साहित्यकृतीमध्ये प्राधान्याने गावातले असे काही चित्रित झाले असेल, तर त्या साहित्यकृतीला ग्रामीण साहित्य असे म्हणता येईल. ''ग्रामीण साहित्य हे व्यक्तिकेंद्रित तर असतेच, पण त्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीस कृषीकेंद्रित संस्कृती या संस्कृतीने निर्माण केलेले लोकमानस, या संस्कृतीसाठी निर्माण झालेला गावगाडा इ. घटक जबाबदार असल्याने त्या व्यक्तिमत्त्वाला केंद्रस्थानी ठेवून लिहीत असताना उपरोक्त घटक सहजपणे ध्वनीत होत जातात; आणि त्यातूनच ग्रामीण साहित्य आकार घेत जाते''[३]

स्वातंत्र्योत्तर काळात १९६० नंतर ग्रामीण साहित्याचे स्वरूप बदलत गेलेले दिसते. परंतु हा प्रवाह एक स्वतंत्र व वेगळा म्हणून नावारूपाला येण्यापूर्वी याआधीच्या लेखकांचा, त्यांच्या साहित्याचा मोठा हातभार लागलेला आहे तो विसरता येत नाही. ''या काळात प्रादेशिक स्वरूपाच्या कादंबऱ्यांमधून चित्रित झालेल्या ग्रामीण जीवनाचे स्वरूप फारसे वेगळे नाही. र.वा. दिघे यांच्या 'पानकळा', 'सराई' या कादंबऱ्यांनी ग्रामीण कादंबरी

अधिक लोकप्रिय केली.''[४] १९४५ नंतरच्या ग्रामीण साहित्यात जे संक्रमण सुरू झालेले होते, त्यापुढील पायरी म्हणजे १९६० नंतरचे ग्रामीण साहित्य होय असे म्हणता येईल. १९६० नंतर मराठी ग्रामीण साहित्य अधिकाधिक ग्रामवास्तवाच्या निकट जाण्याचा प्रयत्न करताना दिसते. यातूनच 'फकिरा', 'धग', 'इंधन', 'टारफुला' आणि 'माणूस' या महत्त्वाच्या कादंबऱ्या आलेल्या दिसतात. या कांदबऱ्यांमधून ग्रामव्यवस्थेची रचना, त्यातील ताण-तणाव आणि बदललेल्या अर्थव्यवस्थेमुळे विस्कटून गेलेले ग्रामीण लोकांचे जीवन अतिशय समर्थपणे प्रकट होतांना दिसते. ''उद्धव शेळके ('धग'-१९६०), मनोहर तल्हार ('माणूस'-१९६३), भाऊपाध्ये ('डोंबाऱ्याचा खेळ'-१९६०, 'अग्रेसर'-६८, 'होमसिक ब्रिगेड'-७४, 'राडा'-७५, 'वणवा'-७८), मनोहर शहाणे ('देवाचा शब्द' -१९६८), ए.वि. जोशी ('काळोखाचे अंग'-१९६६), प्रभाकर पेंढारकर ('अरे संसार'-१९७१), किरण नगरकर ('सांत सक्कं त्रेचाळीस'-१९७४), अनंत कदम ('किडे'-१९७१, 'स्त्रोत' १९७७, 'पाखरू'१९७९), दीनानाथ मनोहर ('रोबो'-१९७६), हे सर्व कादंबरीकार नवी नैतिकता आपल्या कादंबऱ्यांत मांडताना दिसतात.''[५] शिवाय मर्ढेकरांच्या 'पाणी' आणि 'तांबडी माती' या दोन कादंबऱ्यांचाही यासंदर्भात आवर्जून उल्लेख करावा लागेल. मर्ढेकरांची ओळख तशी ग्रामीण लेखक म्हणून करता येत नसली तरी त्यांनी आपल्या 'पाणी' या कादंबरीतून एक फार महत्त्वाचे वास्तव प्रकट केले आहे, ते म्हणजे ग्रामीण समाजाच्या भवितव्याचा निर्णय अंतिमत: नागर भागातील लोक आणि विशेषत: भांडवलदारच करतात हे वास्तव होय. साधारणपणे १९७० च्या आसपास महाराष्ट्रातील ग्रामीण साहित्यात क्रमाक्रमाने बदल होऊ लागला. सत्तरनंतर ग्रामीण साहित्याची चळवळ करू इच्छिणाऱ्या लेखकांनी आपल्या भोवतालच्या भीषण वास्तवाचा अन्वयार्थ लावण्यासाठी आपले नाते जोडले ते थेट म.फुले यांच्याशी त्यांच्या साहित्याशी. त्यामुळेच की काय जवळ-जवळ शंभर वर्षांनी म.फुले यांचा संदर्भ स्वीकारला गेला, ही बाब लक्षात घेण्यासारखी आहे. म.फुले यांचे 'शेतकऱ्यांचा आसूड' व 'गुलामगिरी' हे ग्रंथ तर महत्त्वाचे आहेच, पण कृष्णराव भालेकर यांचे लेखनही अतिशय मोलाचे ठरते. 'दैव-दैव म्हणत शेतकरी कसा रसातळाला जातो' याची परखड मीमांसा भालेकरांनी केली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी १९३५ मध्ये शेतकऱ्यांनी शेतकरी म्हणून एकत्र आल्याशिवाय आणि जाती सोडल्याशिवाय त्यांचा उद्धार होणे शक्य नाही असे म्हटले होते. याचाच अर्थ असा की, म.फुले ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर या परंपरेने जी मीमांसा केलेली आहे, तीच ग्रामीण साहित्याचे तत्त्वज्ञान आहे आणि याच तत्त्वज्ञानाच्या परंपरेशी ग्रामीण साहित्याच्या चळवळीने स्वत:ला जोडून घेतलेले आहे. त्यामुळेच १९७५ नंतरच्या ग्रामीण साहित्याचे स्वरूप बदलेले दिसते, त्याचे मूळ वरील फुले-आंबेडकरांच्या परंपरेत आहे.

ग्रामीण जीवनवास्तव खऱ्या अर्थाने वाङ्मयीन पातळीवर आणण्याचे काम काही मोजक्याच लेखकांनी केलेले दिसते, त्यात प्रामुख्याने वि.स.सुखटणकर, लक्ष्मणराव सरदेसाई, रामतनय यांच्या कथा, सुखटणकर यांच्या 'सहयाद्रीच्या पायथ्याशी' या संग्रहातील आठ कथा, लक्ष्मणराव सरदेसाई यांच्या 'कल्पवृक्षाच्या छायेत', 'सागराच्या लाटा', 'वादळातील नौका', 'ढासळलेले बुरूज' इ. कथासंग्रह यातील साहित्य खऱ्या अर्थाने ग्रामीण—प्रादेशिक जीवन वास्तवाचा प्रथमाविष्कार मानता येतो. वरील काही मोजक्या लेखकांचे साहित्य हे ग्रामजीवनाचे, प्रदेशविशेषांचे, तेथील रूढीपरंपरांचे, निसर्गनिष्ठ जीवनाचे दर्शन घडविणारे अशा प्रामाणिक हेतूने आलेले दिसते. सुखटणकरांच्या कथेतील देवदासींच्या चाळीचे चित्रण, त्यांची कुचंबणा, गावागावातील वैर, हेवेदावे, सामान्य गावकरी, श्रीमंत शेतकरी, सावकार, पुजारी, वतनदार यांच्यातील भांडणे, त्यातून गावाच्या समृद्धीची, शेतीची होणारी नासाडी, धार्मिकतेचे प्रभावी खूळ, अंधश्रद्धा, खेड्याची विस्कटलेली अवस्था, लाचारी, संस्कारापासून दूर जाणारे तरुण इ. विशेषांचे वास्तव चित्रण प्रभावी व सविस्तरपणे, सत्य व तळमळीने केलेले पाहावयास मिळते. इतक्या बारकाव्यांसह ग्रामीण जीवनविश्वातील समाजाचे चित्रण यापूर्वी मराठी साहित्यात आलेले दिसत नाही. ''कृषीजीवन हे मूलत:च कृषीशी, भूमीशी घट्ट बांधलेले असल्याने दलितांप्रमाणे किंवा ब्राह्मणांप्रमाणे शेतकऱ्यांना खेड्यांतून बाहेर पडणे शक्य नव्हते.''[६] याचा अर्थ असा की, 'ग्रामीण' या संज्ञेने ध्वनित होणारा अर्थ आता वेगळयाच अंगाने विचारात घेतला जातो आहे. ग्रामीण साहित्य म्हणजे केवळ ग्रामीण वास्तवाचे चित्रण करणे येथे अभिप्रेत नाही तर या 'वास्तवामागचे वास्तव' चित्रित करणे हे आता महत्त्वाचे झाले आहे. म्हणूनच ग्रामीण चळवळीनंतर येणारे वाङ्मय अनेक अर्थाने वेगळे झालेले आहे असे दिसते. ग्रामीण साहित्याच्या चळवळीनंतर एक मोठी लेखकांची पिढी आकाराला आलेली दिसते, ही लेखकांची पिढी संपूर्ण महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेली आहे. आज लिहिणारे हे लेखक वेगवेगळ्या सामाजिक स्तरातून आलेले आहेत. पूर्वीचे ग्रामीण लेखक हे नाही म्हटले तरी उच्चभ्रू वर्गातील होते. आज लिहिणारे ग्रामीण लेखक हे

ग्रामीण जीवनाचे वेगवेगळ्या अंगांनी चित्रण करताना दिसतात. त्यात प्रामुख्याने नाव घेता येण्यासारखे जे काही महत्त्वाचे लेखक आहेत, त्यात वासुदेव मुलाटे, इंद्रजित भालेराव, सदानंद देशमुख, भास्कर चंदनशिव, श्रीराम गुंदेकर, श्रीकांत देशमुख, विठ्ठल वाघ, प्रतिमा इंगोले, बाबाराव मुसळे, रवींद्र शोभणे, मोहन पाटील, शेषराव मोहिते, आनंद पाटील, तानाजी राऊ पाटील, इ. असे कितीतरी ग्रामीण लेखक-कवी आज लिहीत आहेत. ''ग्रामीण साहित्य चळवळीनं आमच्या व आमच्या नंतरच्या पिढीतल्या ग्रामीण साहित्यिकांना दिशा देण्याचं मोलाचं काम केलेलं आहे.''[७] या लेखकांचे लेखन एकूण परंपरांचा आणि समाज व्यवस्थेचाही अर्थ शोधू पाहत आहे. आपल्या वाटयाला आलेल्या दुय्यम स्थानाचा ते शोध घेऊ पाहत आहे. १९७५ नंतरच्या लेखकांमध्ये भास्कर चंदनशिव हे एक महत्त्वाचे लेखक आहेत. शेतीचे दहा दिशांनी होणारे शोषण ते एक जीवनदृष्टी घेऊन प्रकट करतात. म्हणूनच त्यांच्या कथांमधून एक ग्राम विद्रोहाची जाणीव दिसते. तसेच ग्रामीण भागातील दलित-दलितेतर ताण तणावांचे चित्रणही दिसते. यादृष्टीने त्यांची 'पाणी' ही कथा अतिशय अर्थवाही स्वरूपाची झाली आहे. तसेच त्यांची 'लालचिखल' सारखी कथा यासंदर्भात पाहता येईल. 'अंगारमाती', 'बिरडं', 'नवी वारूळं' हे त्यांचे कथासंग्रह जीवनाचा एक नवा वेगळाच अर्थ उलगडून दाखवतात.

आज ग्रामीण साहित्याला मराठी साहित्यात एक स्वतंत्र स्थान प्राप्त झाले आहे; परंतु तो सवतासुभा नाही. मध्यवर्ती मराठी साहित्यातील तो एक वेगळा वाण आहे असे असूनदेखील ग्रामीण साहित्याविषयी अनेकदा काही प्रश्न उपस्थित केले जातात, जसे ग्रामीण साहित्य आज कोणत्या स्तरावर आहे? त्याचे वेगळेपण कशात आहे? त्याची प्रेरणा कोणती? अशा प्रकारच्या साहित्याचे प्रयोजनच काय? यासारखे अनेक प्रश्न वारंवार चर्चासत्रात, साहित्यचर्चेत, विवेचनाच्या ओघात विचारले जातात याबद्दल आश्चर्य वाटते. यातून एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे काही लोकांना मुळातच ग्रामीण साहित्याचे वावडे दिसते. ''साहित्यामध्ये व्यक्तिगत राग लोभाचा, स्वार्थाचा शिरकाव झाला की निखळ साहित्यविचाराला पायबंद बसतो''[८] 'विषवृक्षाच्या मुळ्या', 'बुढाई', 'बस्तान', 'लिगाड', 'खांदेपालट', 'इजाळं', 'हल्या हल्या दुदू दे', 'नवी वारूळं', 'जांभळढव्ह', 'पीकपाणी', 'बळीवंत', अशा काही कलाकृती पाहिल्या की ग्रामीण जीवनाच्या उपेक्षेची, शेतकऱ्यांच्या दु:खाची पाळेमुळे नागर संस्कृतीत व आजच्या ग्लोबलायझेशनच्या युगात आहेत हेच या लेखकांना मांडावयाचे आहे. आजच्या भांडवलदारी व्यवस्थेवरही या लेखकांनी आपले लेखन केले आहे. ''आजची कांदबरी अधिकाधिक 'शहरी', निसर्गापासून शक्यतो दूर होतांना दिसते.''[९] अर्थव्यवस्थेचा हल्या काही दूध देत नाही याचा अनुभव बाबाराव मुसळे मांडतात, तर सहकारामुळे उद्धार होण्याऐवजी शोषणच वाढले आहे याचा अनुभव डॉ.वासुदेव मुलाटे देऊ पाहतात. शहरांचे खेड्यावर होणारे आक्रमण मोहन पाटील यांच्या 'बस्तान' मध्ये आणि प्रतिमा इंगोले यांचे 'बुढाई' मध्ये अर्थपूर्ण होऊन येते. शतकानुशतकांपासून लुटला गेलेला 'बळीवंत' श्रीकांत देशमुख काव्यात्मकपणे रेखाटतात, तर ग्रामीण भावबंध इंद्रजित भालेराव प्रकट करताना दिसतात. विशेषत: त्यांचे 'दूर राहिला गाव' आणि 'कुळंबिणीची कहाणी' हे दोन काव्यसंग्रह म्हणजे ते थेट म.फुले व विठ्ठल रामजी शिंदे यांच्याशी नाते जोडताना दिसतात. तर आजच्या सदयस्थितीतील नवकवयित्री कल्पना दुधाळ यांचा 'सीझर कर म्हणतेय माती' हा काव्यसंग्रह तर थेट बहिणाबाई चौधरींच्या काव्याची आठवण करून देतो. ग्रामीण कथा ही वेशीच्या आतील आणि वेशीच्या बाहेरील अशा सगळ्यांचे चित्रण करणारी कथा आहे. कारण दोन्ही ठिकाणचे जीवन हे शेवटी गावगाड्यातील जीवन आहे. अशा कथेतून खेड्यातील दलितांच्या जाणिवा प्रकट होत असल्या तरी ती ग्रामीण कथाच असते. ''उदा. योगीराज वाघमारे यांच्या बहुतेक कथा या एका अर्थाने ग्रामीणच आहेत किंवा 'जेंव्हा मी जात चोरली' या बाबुराव बागुलांच्या कथासंग्रहातील बहुतेक जीवनानुभव ग्रामीण पर्यावरणातलेच आहेत.''[१०] धरणग्रस्तांच्या वाट्याला येणारी ससेहोलपट 'झाडाझडती'मधून प्रकट होते, याशिवाय 'पांगिरा' विश्वास पाटील, 'तहान' सदानंद देशमुख यासारख्या कादंबऱ्यांमधून ग्रामीण भागातील पाण्याचा प्रश्न कसा तीव्र होतो आहे, याचे दिग्दर्शन मोठ्या परिणामकारकरितीने होते आहे असे दिसेल. ग्रामीण साहित्याची प्रेरणा ही सम्यक् परिवर्तनाची आहे. म.फुले ह्यांचा परिवर्तनवादी विचार ग्रामीण भागातील माणसाच्या शोषणाविरुद्ध आणि त्यांना सोसाव्या लागणाऱ्या विषमतेविरुद्ध आहे. अशा सामान्य माणसाला गुलामगिरीतून मुक्त करणे आणि त्याचे हक्क त्याला प्राप्त करून देणे हे म.फुले ह्यांचे कार्य होते.''एकोणविसशे नव्वदनंतर मात्र विश्वास पाटील यांच्या लेखनातून ग्रामीण वास्तवाशी पुन्हा अर्थपूर्ण नाते जोडल्याचे सुखद दृश्य दिसू लागले आहे.''[११] ग्रामीण माणूस व ग्रामीण समाज ह्यावरील अन्यायाविरुद्ध ग्रामीण लेखक आपल्या साहित्याच्या माध्यमातून प्रतिकार करताना दिसतो आहे. हाच नवा हिशेब मांडला तर एकूण जीवनाची, अर्थव्यस्थेची आणि संस्कृतीचीच पुनर्मांडणी करावी लागणार, हेच हे सारे नवे लेखक आपल्या लेखनामधून सांगत आहे. सांस्कृतिक पुनर्मांडणी हे आजच्या प्रस्थापित

साहित्यविश्वापुढील मोठे आव्हान आहे आणि हाच सगळ्यात मोठा प्रश्न ग्रामीण साहित्य चळवळीने प्रस्थापित साहित्य व्यवस्थेपुढे निर्माण केला आहे.

## निष्कर्ष

१. ग्रामीण साहित्याचे अनुभव क्षेत्र, आकलनाचे स्वरूप, आशय निर्मितीतील बदल, समाजाभिमुखता यामुळे ग्रामीण साहित्यातील समाजदर्शनाचा पटच बदललेला दिसतो.

२. ग्रामीण साहित्य हे कसे असावे, त्यात काय असावे, त्यामागील लेखनाच्या प्रेरणा, लेखकाची भूमिका, जीवनजाणिवा कशा असाव्यात हे स्पष्ट व्हायला हवे. ग्रामीणता हे एक वेगळेच जीवनविश्व आहे.

३. १९६० नंतर मराठी ग्रामीण साहित्य अधिकाधिक ग्रामवास्तवाच्या निकट जाण्याचा प्रयत्न करताना दिसते. यातूनच 'फकिरा', 'धग', 'इंधन', 'टारफुला' आणि 'माणूस' या महत्त्वाच्या कादंबऱ्या आलेल्या दिसतात.

४. १९७० च्या दशकानंतर महाराष्ट्रातील ग्रामीण साहित्यात क्रमाक्रमाने बदल होऊ लागला. या बदलाच्या प्रक्रियेत चळवळ करू इच्छिणाऱ्या लेखकांनी आपल्या भोवतालच्या भीषण वास्तवाचा अन्वयार्थ लावण्यासाठी आपले नाते जोडले ते थेट म.फुले यांच्या विचारांशी त्यांच्या साहित्याशी.

५. १९७० नंतरच्या ग्रामीण साहित्याचे स्वरूप बदलेले दिसते, त्याचे मूळ फुले-आंबेडकरांच्या परंपरेत पाहावयास मिळते.

## संदर्भटीपा


१. प्रा. जाधव रा.ग.,'मराठी वाङ्मय : स्वातत्र्योत्तर संदर्भ', प्र. आ. १९९८, प्रतिमा प्रकाशन–पुणे, पृ.२६.

२. डॉ. यशवंते राजीव, 'ग्रामीण साहित्य चळवळ : प्रेरणा व स्वरूप प्रकाशन–औरंगाबाद, पृ. १२.

३. डॉ. कोतापल्ले नागनाथ, 'स्वरूप आणि शोध', मेहता प्रकाशन–पुणे, पृ.१५.

४. डॉ. मुलाटे वासुदेव, 'ग्रामीण साहित्य:स्वरूप व दिशा', स्वरूप प्रकाशन–औरंगाबाद, पृ.१०.

५. प्रा. पवार गो.मा./हातकणंगलेकर म.द., 'मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप' (१९५०–१९७५) प्र.आ., १९८६/१९०७, पॉप्युलर प्रकाशन–मुंबई, पृ.४४.

६. प्रा. जाधव रा.ग., उ.नि. पृ.२७

७. डॉ. मुलाटे वासुदेव, (संपा),'ग्रामीण साहित्य चळवळ आणि आम्ही',मेहता प. हाऊस, पुणे. प्र.आ. १९९६, पृ.३०.

८. पाटील मोहन, 'ग्रामीण साहित्य आणि संस्कृती, स्वरूप प्रकाशन–औरंगाबाद, पृ.१०.

९. प्रा.सु.श्री.पांढरीपांडे,'साहित्य:स्वरूप,संदर्भ आणि सौंदर्य,'प्रतिमा प्रकाशन–पुणे, प्र.आ.१९८५, पृ.२९.

१०. डॉ. मुलाटे वासुदेव, 'ग्रामीण कथा : स्वरूप आणि विकास', स्वरूप प्रकाशन–औरंगाबाद, पृ.०६.

११. डॉ. मुलाटे वासुदेव, (संपा), उ.नि., पृ.३०


❖❖❖

# ग्रामीण साहित्याचे चार विशेष

प्रा. अतुलकुमार सारडे
सहा. प्राध्यापक
जिजामाता कला महाविद्यालय, दारव्हा, जि. यवतमाळ
भ्रमणध्वनी ९३७१४१२३७६

ग्रामीण साहित्याची मांडणी, मराठी साहित्यात १९६० नंतर प्रकर्षाने जोमात आली होती. ग्रामीण मराठी वाङ्मय नंतर विपुलही झाले, नंतर त्यात 'प्रादेशिक वाद' आला. ग्रामीण की प्रादेशिक, या प्रश्नचिन्हाने त्याच्या मर्यादा स्पष्ट करताना संभ्रम झालेलाही दिसतो. परंतु, एकूणच ग्रामीण साहित्य जुन्यापासून नव्यापर्यंत, म्हणजे सांगायचे झाल्यास १९२० नंतर ते आजच्या शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या युगातही त्याची निर्मिती 'कालानुरूप' होतेच आहे. त्यातील नेमक्या वैशिष्ट्यांचा संकल्पनात्मक पद्धतीने निबंध लिहून आढावा घेण्याचा हा प्रयत्न आहे, तो पुरेसा नाही याची मला जाणीव आहे.

इ.स. १९२५ पासून ग्रामीण साहित्याची जाणीवपूर्वक निर्मिती व्हायला लागली, तरी मात्र साठोत्तर साहित्याप्रमाणेच त्यात जोम आला, तो गेल्या तीस—पस्तीस वर्षापासून. ग्रामीण साहित्याचा प्रवाह खळाळता ठेवण्यात डॉ. आनंद यादव, रा.रं. बोराडे, शंकर पाटील, नागनाथ कोत्तापल्ले, रवींद्र ठाकूर, द.मा. मिरासदार, पुरुषोत्तम बोरकर, बाबाराव मुसळे इत्यादी ग्रामीण लेखकांचे योगदान निश्चितपणे प्रशंसनीय आहे. ग्रामीण जीवनपट साहित्यामध्ये प्रकर्षाने चित्रित होत आहे, हे शुभचिन्ह आहे. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात (१९२० नंतर) महात्मा गांधीजींनी खेड्याचे भान जागवले. त्यांनी खेड्यामध्ये भारतीय जीवनातील स्थान नव्या जाणीवांसह लोकांना पटवून दिले. 'खेड्याकडे चला', हा 'खरा भारत खेड्यातच बघा' या त्यांच्या वक्तव्यामुळे भारतीय मन खेड्याकडे आकृष्ट झाले. विचारवंताचे विचार खेड्यावर केंद्रित झाले. त्याचवेळी साहित्यानेही ग्रामजीवनाची जाणीवपूर्वक दखल घेतलेली दिसून येते.

ग्रामीण साहित्य समजून घेताना त्याच्या खालील वैशिष्ट्यांचा परामर्श घेणे अपरिहार्य ठरते.

## ग्रामीण साहित्यातील कृषी— 'केंद्र' चित्रण

ग्रामरचना ही अजूनही कृषिकेंद्रितच आहे. कुणबी (शेतकरी) पुढे झाल्याशिवाय ग्रामाची रचना झाली नाही. कृषक केंद्रस्थानी आला आणि मग त्याच्या आश्रयाने अलुतेदार—बलुतेदार जमा झाले, आणि खेडी उभी झाली. आज बलुतेदार पद्धती नष्ट होत आली असली तरी 'कृषी' हाच खेड्याचा कणा आहे. देशात स्वातंत्र्य आले लोकशाहीचा प्रयोग सुरू झाला. शिक्षणाचे सार्वत्रिकरण होऊन झपाट्याने सांस्कृतिक बदल झाले. सामाजिक व आर्थिक बदलांनाही मंदगतीने का होईना, पण प्रारंभ झाला. दूरदर्शन, इंटरनेट, मोबाईल आरोग्याची व दळणवळणाची साधने कमीजास्त प्रमाणात खेड्यात पोहोचली आहेत. तरीही, खेड्याची कृषीशी असलेली नाळ मात्र तुटली नाही. यांत्रिकीकरणामुळे बैलजोडी, नांगराच्या ठिकाणी ट्रॅक्टर दिसतो. मळणी यंत्र, कडबाकटर, हार्वेस्टर ही यंत्रे आली आहेत. करडीसारख्या पीकाची कापणी व मळणी एकाचवेळी अजस्र यंत्राच्या साह्याने केली जाते. विहिरीवर विद्युत पंप बसवून शेतीला पाणी दिले जाते. काही भागात धरणाचे पाणी दिले जाते. ठिबक सिंचन पद्धतीचाही वापर करून पीके काढली जात आहेत. स्वांतत्र्योत्तर कालखंडात झालेले हे अपरिहार्य बदल आहेत. तरीपण ग्रामविभाग कृषिकेंद्रितच आहे. या कृषिसंस्कृतीशी निगडित असणारे संपूर्ण संदर्भ अपरिहार्यपणे ग्रामीण साहित्यात येतात. ग्रामविभागातील 'कृषी' हा विषय जर काढून टाकला तर काहीच शिल्लक राहणार नाही म्हणून ग्रामीण साहित्य हे कृषिकेंद्रित साहित्य आहे. उदाहरणार्थ 'गोतावळा', 'हल्या हल्या दुदू दे' या कादंबरीचे नायक, त्याचे कृषीवरचे नितांत प्रेम, त्याची कष्ट उपसण्याची जिद्द, त्याची झालेली फसवणूक आणि जीवनाची झालेली वाताहत याचे प्रत्ययकारी चित्रण कृषिकेंद्रीतच आहे. कृषिकेंद्रितता हा ग्रामीण साहित्याचा विशेष म्हणूनच नमूद करावा लागतो. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात, ''शतकानुशतके पारंपारिक जीवन जगणारा ग्रामीण समाज मूलत: कृषिकेंद्रित जीवन जगतो. त्याच्या जीवनाचे सारे संदर्भ शेवटी कृषिजीवनाशी निगडित झालेले असतात. खेड्यातील सारे सण—उत्सव, मानपान, जातिव्यवस्था आणि अर्थव्यवस्थाही प्रामुख्याने शेतीशी निगडित असते.''

## ग्रामीण साहित्यातील निसर्गचित्रण

कृषी म्हटले की निसर्ग आलाच. ग्रामीण साहित्य हे निसर्गसन्मुखच आहे. निसर्ग आणि माती यांच्याशी ग्रामीण जीवनाचे अतूट आणि सनातन नाते आहे. प्रारंभीच्या काळात ग्रामीण साहित्यातील निसर्ग हा घटक म्हणून येत नव्हता, तर पार्श्वभूमी म्हणून तो अवतरत होता. आज मात्र ग्रामीण साहित्यात येणारा निसर्ग आशयाचा नि अभिव्यक्तीचा एक अपरिहार्य घटक म्हणून येतो.

भारतीय शेती ही मुख्यत: निसर्गावरच अवलंबून आहे, निसर्गाच्या लहरीपणाचा फटका शेतकऱ्यांना असंख्य वेळा बसतो. कृषि संस्कृती निसर्गाशी निगडित असल्यामुळे आणि निसर्ग लहरी असल्यामुळे माणूस दैववादी बनण्याची शक्यता आहे. ग्रामीण माणूस निसर्गसन्मुख असल्याने त्याचे मन आदिमतेकडे झुकलेले असते. या निसर्गसन्मुखतेमुळेच ग्रामीणांचे मन आदिम अवस्थेतील गुढत्वाचा स्वीकार करते, असे मत नागनाथ कोत्तापल्ले यांनी व्यक्त केले आहे. निसर्गाच्या एकूण खेळावर ग्रामीण माणूस पारंपरिक पाप—पुण्याच्या कल्पनांचे रोपण करताना दिसतो. वक्तशीर येणाऱ्या पाऊस—धारा पाहून वरुण राजाच्या कृपेची त्याला खात्री पटते. शेतात भराला येणारे पीक पाहून आनंदाने त्याची छाती फुलून येते, पण तोच वरूण एखाद्या वर्षी झुकांड्या देतो तेव्हा 'आपलंच नशीब फुटलं' असा बोल तो स्वत:वर घ्यायलाही मागेपुढे पाहत नाही. निसर्गाची करणी त्याला अतर्क्य वाटते. कधी त्याला त्यांचे संदर्भ जुळतात, बरेच वेळा जुळतही नाहीत. अशावेळी ग्रामीणांचे श्रद्धाळू व हळवे मन आणखी गुढत्वाचा स्वीकार करते. त्याला अन्न हे पूर्णब्रह्म वाटते तर शेतातल्या उभ्या पिकात लक्ष्मीचा वावर दिसतो. सारांश, ग्रामीणांच्या मनावर निसर्ग हा असे अधिराज्य गाजवितो, त्याची ही निसर्गसन्मुखता ग्रामीण साहित्यात मुखर होताना दिसते.

## ग्रामीण लोकजीवन—परंपरा—मानस

ग्रामीण जीवन कृषिकेंद्रित आहे, हा मुद्दा लक्षात घेतला की, ग्रामीण लोकमानस कसे असेल याचा उलगडा सहज होतो. ग्रामीण लोकाचे मन, भाव—भावना, व्यवहार इ.बाबी कृषीशीच निगडित आहेत. ते बोलतील, विचार करतील तो जास्तीत जास्त कृषीचाच. ग्रामीण भागातील लोकमानस कृषीशीच संबंधित आहे. मातीशी संबंधित आहे. शेत ही आपली 'माऊली' आहे. आपण तिची लेकरे आहोत. तिच्यामुळेच आपल्याला काही कमी पडत नाही. हजारो हजारो लेकरांना पोसणारी ती 'काळी आई' आहे या भावनांनी ग्रामीण लोकमानस संपृक्त झालेले पहावयास मिळते. 'शेत माऊली आमुच्यासाठी, आम्ही तिची लेकरे, आम्हाला कमी कोणते बरे!' या ग्रामीण कवितेत कृतज्ञताभाव व समाधान तृप्तीचा केवढा रम्य भाव गुंफलेला आहे! पेरणीसाठी निघालेल्या तिफनीची घरधनीकडून पूजा करणे, बियाण्यांची मूळ देवळातील मूर्तीजवळ ठेऊन त्याची पूजा करण, वरुण राजा नियमित यावा म्हणून मनामनातून त्याची आराधना करणे, धोंडी काढणे, दिसामासी वाढणाऱ्या अंकुराचे कौतुक करणे, सुगीच्या (हंगाम) दिवसात घरात येणाऱ्या लक्ष्मीचे पूजन करून मनपूर्वक स्वागत करणे, निरनिराळ्या सण—उत्सवामध्ये कृषीसंस्कृतीची पूजा बांधणे या साऱ्या क्रिया प्रतिक्रियामधून ग्रामीण लोकमानस प्रकट होताना दिसते.

काही ठिकाणी या लोकमानसाला जेव्हा धक्का बसतो तेव्हा हे लोकमानस उद्‌ध्वस्त होताना दिसते. गोतावळा, टारफुला मध्ये या लोकजीवन मानाचे चित्रण आले आहे. अलीकडे शेतकरी आत्महत्या हा विषय ग्रामीणता सोडून व्यापक होत आहे; परंतु ग्रामीण लोकांचा मन:पिंड कृषीवर पोसलेला आहे, हे आजच्या ग्रामीण साहित्यातून सहज दिग्दर्शित होत आहे.

## ग्रामस्तरावरील 'समस्या' चित्रण

भूक, दारिद्रय, अपेक्षा आणि शोषण ह्या प्रमुख चार गोष्टी आजच्या ग्रामीण जीवनाचे अविभाज्य अंग झाल्या आहेत. ग्रामीण साहित्यात हे वर्तमान वास्तव चित्रित करण्याची मुख्य प्रवृत्ती आढळते. ग्रामीण साहित्याने पूर्वी नागर वाचकांचे मनोरंजन करण्याची भूमिका घेतली होती, ती आता संपुष्टात आली आहे. अनुकरणाच्या मगरमिठीतून या साहित्याची सुटका झाली आहे. जे ग्रामवास्तव आहे. तद्‌वतच आजच्या ग्रामीण साहित्यावर आशयाच्या नि आविष्काराच्या बाबतीत नागर लेखकांच्या लेखनाचा प्रभाव पडलेला दिसून येत नाही. सध्याचे ग्रामीण साहित्य ग्रामवास्तवाचा शोध परिश्रमपूर्वक घेताना दिसते. साहित्यांगत वास्तव आणि लौकिक वास्तव यात फरक असतो. साहित्य ही एक कला आहे. या कलेसाठी ग्रामीजीवनातील वास्तवाचा वेध घेऊन त्याचा परिपोष

करून घेण्याची धडपड ग्रामीण साहित्याला भवितव्य प्राप्त करून देणार आहे, ग्रामीण लेखकांचे वास्तवाचे भान जागविले गेले असून या दिशेने काही प्रतिभावान, ग्रामीण लेखकांची वाटचाल सुरू आहे.

ग्रामीण साहित्याच्या कथा, कादंबरी, कविता या साहित्यप्रकारातून, विशेषतः कथात्म प्रकारातून (कथा, कादंबरी) जाणवलेल्या चार वैशिष्ट्यांचा मर्यादेमुळे विस्तृत आढावा घेता आला नाही. परंतु, या आढाव्याद्वारे आपण ग्रामीण साहित्याचे खालील निष्कर्ष मांडू शकतो...

१. ग्रामीण साहित्यामध्ये बव्हंशी 'शेती' हाच मुद्दा केंद्रस्थानी आहे म्हणून 'कृषी' या घटकाचे केंद्र स्थानी चित्रण आले आहे.

२. स्वाभाविकपणे, लेखकांच्या हातखंड्यानुसार शेती,गाव,वने,जंगले,रस्ते, नदी, नाल्या, बंधारे,प्रकल्प यांचे निमित्ताने निसर्गाचे चित्रण आले आहे.

३. साधारणपणे, शेतीला माऊली मानून, पोटाची खळगी भरणारी जीवनदात्री मानून तिच्या उदात्तीकरणाचे निखळ–निरागस चित्रण, परंपरा, जीवनवाद, लोकमानसातून दिसून येते. याचे सूक्ष्म आणि मार्मिक चित्रण, भावविश्वाचे गहिरे मूल्यांकन लेखकांनी केले आहे.

४. जुन्या जीवनमानातील समस्या, नवीन बदलातील समस्या, अपेक्षा आणि उपेक्षा,मूलभूत प्रश्न लेखकांच्या वर्णनातून जवळपास व्यक्त होताना दिसते.

## संदर्भ

१. साठोत्तरी मराठी वाङ्‍मयाचा इतिहास, डॉ.शरणकुमार लिंबाळे
२. ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव – डॉ.आनंद यादव
३. ग्रामीणता : स्वरूप आणि वास्तवता–डॉ. आनंद यादव
४. ग्रामीण साहित्य : शोध आणि बोध–डॉ.नागनाथ कोत्तापल्ले
५. ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास–डॉ.चंद्रकुमार नलगे

❖❖❖

# ग्रामीण साहित्याचे मराठी वाङ्‌मयात योगदान

डॉ. रमाकांत विठ्ठल ईटेवाड
श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती
भ्रमणध्वनी ९८५०३२६७७०

## प्रस्तावना

मराठी वाङ्‌मयाला समृद्ध आणि संपन्न करण्याकरिता मराठीतील विविध वाङ्‌मय प्रकार आणि प्रवाहांनी महत्त्वाची भूमिका बजावल्याचे जाणवते. ज्याप्रमाणे सर्व नद्या सागराला येऊन मिळतात, त्याचप्रमाणे साहित्यातील सर्व प्रकार व प्रवाह मराठीला येऊन मिळतात आणि मराठी त्या सर्व प्रवाहामुळे अतीविशाल अशा सागरासारखी जाणवते. त्यापैकी ग्रामीण साहित्याने देखील मराठीला समृद्ध आणि संपन्न करण्याकरिता मोलाचे योगदान दिलेले आहे. भारत हा विपुल प्रमाणात खेडे असलेला कृषिप्रधान देश आहे. इथली संस्कृती मुख्यतः कृषिप्रधान आहे. शेतीवर आधारित इथले मुख्य व्यवसाय असल्यामुळे अठरा अलुतेदार, बारा बलुतेदार आणि एक पाटील गावाच्या व्यवस्थेसाठी असायचे. याप्रमाणे गावाचा गावगाडा चालत असे. या परस्परावलंबी गावगाड्याचे प्रतिबिंब ग्रामीण साहित्यात प्रामुख्याने उमटते. संतवाङ्‌मयातदेखील गावातील संस्कृतीचा व तसेच गावगाड्याचा प्रामुख्याने उल्लेख आढळून येतो. म्हणूनच संतवाङ्‌मयापासून विविध वाङ्‌मयप्रकार आणि प्रवाह या सोबतच ग्रामीण साहित्याने मराठी वाङ्‌मयाला संपन्न करण्याकरिता मोलाची भर घातलेली आढळून येते. मराठीत येणारे सर्व प्रकार आणि प्रवाह मराठी भाषेतूनच विकसित झाले असल्यामुळे त्या सर्वांनीच मराठीला समृद्ध करण्याकरिता योगदान दिले आहे. त्यापैकी आपल्याला ग्रामीण साहित्याचा विचार करणे अगत्याचे आहे.

मराठी वाङ्‌मयाला प्रगल्भ अवस्था प्रधान करण्याकरिता ग्रामीण साहित्याची महत्त्वाची भूमिका ठरते. साहित्य हा समाजाचा आरसा असतो. त्यातून समाज जीवनाकडे डोकावून पाहिल्यास समाज जीवनाचे प्रतिबिंब त्यात उमटते.

समाजातील व्यथा, विवंचना, दुःख, दारिद्र्य, हर्ष, आनंद, पराक्रम, सण, उत्सव, व्यवसाय, शिक्षण, सुख–समृद्धी, जय–पराजय, संपन्नता, कला–कौशल्य, बुद्धिमत्ता, कुपोषण, शोषण, प्रतिभा, प्रज्ञा, संस्कृती या सर्व बाबींचा समन्वय लोक जीवनात कशाप्रकारे होतो याचे संपूर्ण दर्शन या आरसात बघायला मिळते.

कुठलेही साहित्य प्रतिभा किंवा प्रज्ञेचा आविष्कार असते. मराठी वाङ्‌मय याला अपवाद नाही. प्रतिभा आणि प्रज्ञा या दोन्ही सृजनात्मक प्रक्रियेचा आविष्कार मराठी वाङ्‌मयात प्रामुख्याने आढळतो. त्यापैकी ग्रामीण साहित्यात विशेषत्वाने त्याचे दर्शन होते.

'प्रतिभा' म्हणजे कवी लेखकांच्या अंतःकरणात विचाराचे कोवळे–कोवळे कोंब निर्माण करणाऱ्या सृजनात्मक प्रक्रियेचा आविष्कार.

'प्रज्ञा' म्हणजे चिंतनशील अवस्थेत माणसाची बुद्धी जेव्हा स्थिरावते, त्या स्थिरावलेल्या अवस्थेला प्रज्ञा म्हणतात. ग्रामीण साहित्यात प्रामुख्याने या दोन्हीचा समन्वय आढळून येतो.

कथा, कादंबरी, कविता, नाटक, लघुकथा हे वाङ्‌मयीन प्रकार प्रतिभेचे आविष्कार ठरतात तर संत साहित्य, ओवी, अभंग, भारूड, भजन, आरती हे सर्व प्रज्ञेचे आविष्कार दोन्ही साहित्यप्रकाराला लोकभाषेचे अधिष्ठान लाभलेले आहे. लोकभाषा म्हणजे लोकांची, ग्रामवासीयांची भाषा म्हणून हे दोन्ही आविष्कार ग्रामीण साहित्याचे अविर्भाज्य अंग ठरतात. ग्राम जीवनाशी निगडित सर्वच बाबींचा उल्लेख या वाङ्‌मयप्रकारात आढळून येतो. यातील प्रतिमा, प्रतिकं, रूपकं, शब्दसौष्ठव यातून ग्रामीण जीवन प्रामुख्याने डोकावताना दिसते. त्यामुळे ग्रामीण साहित्य हा मराठी साहित्याचाच एक भाग आहे. त्याला मराठी साहित्यापासून वेगळे करताच येत नाही.

लोकभाषेतून आविष्कृत होणारे आणि ग्रामीण जीवनाशी समरस असणारे तसेच मराठी वाङ्‌मयाला संपन्न करणारे साहित्य म्हणजे ग्रामीण साहित्य. या साहित्यावर देखील राजकीय, सामाजिक, धार्मिक, कृषीविषयक, आर्थिक, परिस्थितीचा प्रभाव पडलेला आढळून येतो.

सारांश, ग्रामीण साहित्याच्या निर्मितीला १९२० नंतर प्रारंभ झाला. १९२० साली महात्मा गांधींनी 'खेडयाकडे चला' अशी हाक या ऐतिहासिक टप्प्यावर दिली. 'ग्रामजीवन' केंद्रस्थानी ठेवून देशाच्या अर्थव्यवस्थेचे नियोजन केले पाहिजे असा विचार त्यांनी व्यक्त केला.

स्वातंत्र्यानंतरच विशेषतः १९६० नंतर जे वाङ्‌मयप्रकार उदयाला आले त्यापैकी ग्रामीण साहित्याचा प्रवाह लक्षणीय असा आहे. कारण ग्रामीण साहित्याची वैचारिक व तात्त्विक भूमिका महात्मा फुले यांच्या विचारसरणीवर आधारित आहे.

ग्राम जीवनाशी निगडित असणारे साहित्य म्हणजे ग्रामीण साहित्य. ग्रामीण साहित्याचा विचार करताना सदर साहित्य हे परिवर्तनवादी साहित्य असल्याचे आपल्या लक्षात येईल. १९९० पूर्वीचे ग्रामीण साहित्य व १९९० नंतरचे ग्रामीण साहित्य यामध्ये भरपूर फरक आहे. नवदोत्तर ग्रामीण साहित्य समजून घेण्याकरिता १९२० पूर्वीचे – १९२० ते १९७०, १९७० ते १९९० व १९९० पुढील असे ग्रामीण साहित्याचे टप्पे पाडावे लागतील तेव्हाच आपल्याला ग्रामीण साहित्याचा आढावा घेता येईल. यात १९२० पूर्वी फारच तुरळक व नागर लेखकांनी लिहिलेले साहित्य निर्माण झाले. उदा. महात्मा फुले यांचे १८५५ मध्ये 'तृतीयरत्न' नाटक १९७७ मधील कृष्णराव भालेकरांच्या कविता 'दिनबंधू' या नियतकालिकातून येणारी 'बळीबा पाटील' कादंबरी, ह.ना.आपटेंनी १९०३ मध्ये शेतकरी जीवनावर लिहिलेली 'काळ तर मोठा कठीण आला' कथा व धनुर्धारीची 'पिराजी पाटील' कादंबरी ग्रामीण वास्तव मांडतात.

१९९२ नंतर मात्र नामवंत लेखक नुसते निमित्तच झाले नाही तर त्यांनी त्यात मोलाची भर टाकली आहे. यातूनच कथा, कविता, नाटक, कादंबरी यासारखे विविध साहित्य प्रकार विकसित झाले.

नव्वदोत्तरी ग्रामीण साहित्यावर सामाजिक परिवर्तनाचा फार मोठा प्रभाव दिसून येतो. या बदलांचा निर्माण होत असलेल्या ग्रामीण साहित्यावर काही परिणाम झाला आहे का? यातूनच मराठी वाङ्मय समृद्ध झाले का? हे शोधणे काळाची गरज ठरते आणि याचाच शोध ग्रामीण साहित्यिक ग्रामीण साहित्याच्या निर्मितीपासून आजपर्यंत घेत आहेत आणि त्यामध्ये बदलत्या काळानुसार योगदान देत आहेत. त्यातूनच मराठी साहित्याच्या विपुलतेमध्ये कालाखंडानुरूप ग्रामीण साहित्याने आपली महत्त्वाची भूमिका बजावलेली आढळून येते.

नव्वदोत्तरी ग्रामीण साहित्य आणि वास्तवाचा आपण विचार केल्यास स्वातंत्र्यापूर्वीचा ग्रामीण माणूस शेती व्यवसाय आणि त्यावर आधारित व्यवसायावर अवलंबून होता. १९८० नंतर एकूणच समाजव्यवस्था, अर्थव्यवस्था वेगाने बदलू लागली. जागतिकीकरणामुळे संपूर्ण जग एकत्र येवू लागले. अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांच्या सीमा विस्तारू लागल्या. सुखाच्या संकल्पना पालटू लागल्या पैशाला अतिशय महत्त्व प्राप्त होऊ लागले. यातूनच जीवनमूल्यांची वेगाने पडझड होताना बघायला मिळाली. खेड्यातील तरुण पारंपरिक व्यवसायातून बाहेर पडून पांढरपेशा बनण्यात स्वत:ला धन्य समजू लागला. १९९० नंतरच्या दशकात भारताने मुक्त अर्थव्यवस्थेचा करार केला. 'गॅट' कराराच्या माध्यमातून अंतरराष्ट्रीय व्यापारासाठी परकियांना भारताची दारे मोकळी झाली. जागतिकीकरण, उदारीकरण, व्यापारीकरण याला कवटाळून धरणारं संगणक, इंटरनेट, ई–मेल, मोबाईल याचा झपाट्याने स्वीकार करण्यात आला. हल्ली साहित्यातील प्रतिमासृष्टी देखील इंटरनेट या शब्दाचं जाळं बनल्याची आढळून येते. नवनवीन तंत्रज्ञानातील शब्दांचा साहित्यात, कवितेत, कथेत प्रादुर्भाव झालेला आढळून येतो. यातून साहित्य रचनेतील बदलही त्याच प्रमाणात होताना आढळून येतात.

या सर्व बाबींचा परिणाम झपाट्याने ग्रामीण साहित्यावर झालेला आढळून येतो – सहानुभूती, सहृदयता, सहकार्य भावनेचा अभाव ग्रामजीवनातून कमी होताना आढळून येतो. यातूनच निर्माण झालेली जीवनघेणी स्पर्धा, पराकोटीचा संघर्ष, पारंपरिक शेती व्यवसाय आणि कमालीचे दारिद्र्य यातून होरपळून निघत असलेले ग्रामीण जीवन, परालंबित्वातून निर्माण होणारी उदासीनता यातून हताश झालेला ग्रामस्थ शेतकरी आत्मघात करून घेताना आढळतो. या ज्वलंत समस्या आज ग्रामीण साहित्यातून चित्रित होताना आढळतात.

'ग्रामीण साहित्याची प्रेरणा ही वास्तववादी आहे तर त्याचा हेतू गावगाड्याचे वास्तव चित्रण हा असतो'. या वाङ्मयातून मराठी साहित्याची मौलिकता, विस्मय आणि उत्कंठा अभिवृद्ध होताना आढळते. त्यातील परिपक्वता जाणवते. लेखनगर्भता, प्रेरकता, जिज्ञासा डोकावते. चिकित्सा फलद्रुप होताना आढळते. नवनवीन लेखन कलेतील कौशल्य विकसित झालेले आढळते. नवीन रचनाबंध, नवीन शब्द, शब्दसौष्ठव, प्रतिमा, प्रतिकं, रूपकं, नवीन संघर्ष, नवीन समस्या आणि त्यावर होत असलेले नवीन उपायदेखील आढळून येतात. गावगाड्यातील भावबंधातील भावगर्भता त्यातून निर्माण होणारी अंत:करणाला हेलावून टाकणारी हृदयस्पर्शिता, यातून निर्माण झालेले ग्रामीण साहित्यातील ऋणानुबंध यांत्रिकीकरणाच्या झगमगाटामुळे खिळखिळे झालेले आढळून येतात. गमावलेलं माणूसपण, कोमेजलेली भावुकता, करपलेला जिव्हाळा, होरपळलेली माणुसकी जगोजागी आजच्या मराठी वाङ्मयातून वाचायला मिळते.

मराठी वाङ्मयात कथा, कादंबरी, नाटक, कविता, प्रवास वर्णन, आत्मचरित्र, आत्मकथा, रूपककथा इत्यादी साहित्य प्रकार तर ललित, दलित, लोकसाहित्य, अनुवादित साहित्य, जनवादी साहित्य, अभिजनवादी साहित्य, जनसाहित्य, नागरीसाहित्य आणि ग्रामीणसाहित्य इत्यादी साहित्यप्रवाह आढळतात.

## मुद्दे

१. ग्रामीण साहित्याची निर्मिती : १९२० नंतर ग्रामीण साहित्याच्या निर्मितीला प्रारंभ झाला. 'जानपद'चे ग्रामीण हे साधारणत: श्री.म.माटे लिहू लागल्यानंतर 'ग्रामीण' ही संज्ञा रूढ झाली असे म्हटल्या जाते. १९२०

नंतर कविता, कथा, कादंबरी या तीन वाङ्मय प्रकारातून ग्रामीण जीवन प्रकट व्हायला लागले. ग.ल.टोकळ, वि. वा. हडप, श्री.म. माटे, व्यंकटेश मांडगूळकर, शंकर पाटील, आनंद यादव, रा.रं. बोराडे, उद्धव शेळके, मनोहर तल्हार, विश्वास पाटील, भास्कर चंदनशिव, ना.धों. महानोर, इंद्रजित भालेराव अशी सलग परंपरा सांगता येईल.

२. ग्रामीण साहित्याचे स्वरूप : ग्रामीण भागामध्ये काळी आणि पांढरी असे दोन शब्द जुन्या काळापासून वापरण्यात येतात. काळी म्हणून भूमी—शेती, या भूमीच्या दृष्टीनेच पांढरीचीही उभारणी होत असे. या पांढरीमध्ये कोणते घर कोठे असावे, मंदिर कोठे असावे, पाटलाचे घर कोठे असावे हेही ठरलेले असे. अशा ग्रामरचनेचे आठ प्रकार असल्याची नोंद संस्कृतीकोशामध्ये सापडते.

खेड्याच्या बाह्यरचनेमधून, शेतीमधूनच खेड्याची अंतर्रचना साकार झालेली आढळते. याच अंतर्रचनेमधून एक ग्राम संस्कृती आकाराला आलेली दिसते. त्यामुळेच ग्रामीण माणूस या ग्रामीण संस्कृतीशी पक्का बांधला जातो. यातूनच ग्रामसंस्कृती वैशिष्ट्यपूर्ण, स्वयंपूर्ण आणि स्वतंत्रही होती.

३. ग्रामीण साहित्याची चळवळीला आकार देणारे ग्रामीण लेखक : यात एक मोठी पिढी आकाराला आलेली दिसते. राजन गवस, विश्वास पाटील, भास्कर चंदनशिव, वासुदेव मुलाटे, बाबाराव मुसळे, इंद्रजित भालेराव, श्रीकांत देशमुख, सदानंद देशमुख, विठ्ठल वाघ, रवींद्र शोभणे, प्रतिमा इंगोले, श्रीराम बुंदेकर, शेषराव मोहिते, तानाजी पाटील, मोहन पाटील, आनंद पाटील असे कितीतरी ग्रामीण लेखक, कवी आज लिहीत आहेत. यात नवनवीन शोध घेत आहे आणि मराठीला समृद्ध करण्याकरिता मोलाची भर टाकीत आहेत.

## निष्कर्ष

१. मराठी भाषा ही विशालकाय सागराप्रमाणे असून त्यातील अनेक प्रकार आणि प्रवाह हे नद्यांप्रमाणे असलेले आढळून येतात.
२. सामाजिक दु:ख आरशासारखे साहित्यातून स्पष्ट दिसते असे आढळून येते.
३. ग्रामीण साहित्यात प्रामुख्याने प्रज्ञेसह प्रतिभेचा आविष्कार असल्याचे आढळून येते. संतसाहित्य प्रज्ञेचा आविष्कार तर इतर साहित्य प्रकार प्रतिभेच्या आविष्कारातून आकाराला आल्याचे आढळून येते.
४. ग्रामीण साहित्याने मराठी वाङ्मयात मोलाची भर घातल्याचे आढळून येते.
५. ग्राम जीवनाशी निगडित सर्व बाबींचा समावेश ग्रामीण साहित्यात होत असल्याचे आढळून येते.
६. ग्रामीण साहित्य १९२० नंतर आकाराला येऊ लागल्याचे आढळून येते.
७. गांधींची खेड्याकडे चला ही संकल्पना ग्राम जीवनाशी केंद्रस्थानी असल्याचे आढळून येते.
८. ग्रामीण साहित्याची वैचारिक व तात्त्विक भूमिका महात्मा फुलेंच्या विचारसरणीवर आधारित असल्याचे आढळून येते.
९. ग्रामीण भागात काळी व पांढरी असे दोन शब्द पूर्वीपासूनच आढळून येतात. काळी म्हणजे शेती, पांढरी म्हणजे गाव किंवा वसती या दोन्हीचा गावाच्या उभारणीत महत्त्वाचा वाटा आहे.
१०. ग्रामीण साहित्यिकाच्या विचारातून ग्राम जीवनात परिवर्तन होताना आढळते.
११. विविध साहित्य प्रकार आणि प्रवाहातून मराठी वाङ्मय समृद्ध झाले; परंतु मराठीला संपन्न करण्याचे मोलाचे कार्य ग्रामीण साहित्याने केल्याचे आढळून येते.

## संदर्भ ग्रंथ सूची

१. आनंद यादव — ग्रामीणता : साहित्य व वास्तव
२. रा.ग. जाधव — अश्वत्थाची चळवळ
३. य.दि. फडके — विसाव्या शतकातील महाराष्ट्र
४. भा.ल.भोळे — महात्मा फुले विचार आणि वारसा
५. नागनाथ कोतापल्ले — ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध
६. संपादक वासुदेव मुलाटे — ग्रामीण साहित्याची चळवळ व आम्ही
७. संपादक चंद्रकुमार नलगे — ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास
८. मोहन पाटील — ग्रामीण साहित्य आणि संस्कृती
९. संपादक जयद्रथ जाधव — जागतिकीकरण मराठी भाषा आव्हान आणि उपाय

❖❖❖

# १९८० नंतरच्या मराठी ग्रामीण कादंबरीचे स्वरूप

प्रा. डॉ. सविता माधवराव पवार
कला व विज्ञान महिला महाविद्यालय, मेहकर, जि. बुलढाणा
भ्रमणध्वनी ७०११५७९०७७

## प्रस्तावना

ग्रामीण भागातील लोकजीवन, संस्कृती, परंपरा, रीती या सर्वांतून निर्माण झालेल्या समस्यांचे चित्रण जे साहित्य करते त्याला ग्रामीण साहित्य म्हणता येईल. ग्रामीण साहित्यामध्ये कथा, कादंबरी, कवितेच्या माध्यमाद्वारे ग्रामीण जीवनाचे चित्रण झाले आहे. १९८० नंतरच्या काळात ग्रामीण साहित्यामध्ये बदल होत गेला. साहित्यात बदल हे होत असतात कारण साहित्याचा जीवनाशी अन्योन्यसंबंध असतो. १९७७ च्या सुमारास ग्रामीण साहित्याची नव्याने मांडणी होऊ लागली. या काळात लिहिणारे लेखक ग्रामीण जीवनाशी निगडित, संबंधित होते. आधुनिक ग्रामीण साहित्याचा जेव्हा आपण विचार करायला लागतो, त्याचा आरंभकाळ १९२५ च्या दरम्यानचा राहिला आहे. या काळी लेखन करणारे लेखक हे पांढरपेशा वर्गातले होते. साहित्य हे प्रामुख्याने रंजनासाठी निर्माण करायचे असते, असे समजण्याचा तो काळ होता. जे मी पाहिले आहे, भोगले आहे, अनुभवले आहे, त्यातूनच आजचे जे साहित्य निर्माण होत आहे, तसे स्वरूप प्रारंभकाळी नव्हते. आज ग्रामीण साहित्याचा विचार करता ते वास्तवाला अधिक जवळचे आहे असे म्हणता येईल.

देश स्वतंत्र झाला. गावगाडा मोडला गेला. साहित्याचा नायकही बदलत गेला. तो कष्टकरी झाला. नवी पिढी नव्या दृष्टीने जीवनाकडे पाहू लागली. खेडी शहराला दळणवळणाच्या माध्यमातून जोडली गेली. खेड्यातला एक घटक कसा उद्ध्वस्त होतोय त्याचे चित्रण ग्रामीण साहित्यातून यायला लागले. मराठी साहित्याच्या प्रवाहामध्ये ग्रामीण साहित्य हा प्रवाह स्वत:च्या अस्मितेची जाणीव ठेवून पुढे जाणारा प्रवाह आहे. ग्रामीण साहित्याच्या प्रवाहामध्ये ग्रामीण कादंबरीने मोलाचे योगदान दिले आहे. ग्रामीण कादंबरीच्या बाबतीत १९४५ नंतरचा कालखंड महत्त्वाचा आहे. या कालखंडात एकूणच मराठी साहित्यामध्ये परिवर्तन घडून आले. या काळातील अनेक लेखक वस्तुनिष्ठ चित्रणाकडे लक्ष द्यायला लागले. तांबडी माती, बळी, भावीण, हद्दपार, गारंबीचा बापू, पवनाकाठचा धोंडी, शितू, पडघवली, बनगरवाडी, फकीरा इ. ग्रामीण कादंबऱ्यांतून बदललेल्या ग्रामीण जीवनाचे दर्शन घडते. १९६० नंतरच्या काळात यंत्रयुगाने ग्रामीण संस्कृतीवर प्रभाव टाकला. ग्रामव्यवस्था विस्कळीत झाली. टारफुला, पाचोळा, गांधारी, गोतावळा आदी कादंबऱ्या या कालखंडात लिहिल्या गेल्या. १९८० नंतरच्या काळात ग्रामजीवनात प्रचंड उलथापालथ झाली. विज्ञान व तंत्रज्ञानाने केलेली प्रगती, चंगळवाद, पाणी टंचाईचा गंभीर प्रश्न, सततच्या नापिकीमुळे हैराण झालेला शेतकरी वर्ग यामुळे ग्रामजीवन विस्कळीत झाले. या कालखंडातील ग्रामजीवनाचे वास्तववादी चित्रण अनेक कादंबरीकारांनी केले आहे. सदानंद देशमुख, शंकर सखाराम, विश्वास पाटील, रा.रं. बोराडे, बाबाराव मुसळे, अशोक कोळी इ. कादंबरीकारांचा उल्लेख करता येईल. तहान, बारोमास, एस.ई.झेड., पांगिरा, झाडाझडती, पखाल, वारूळ या कादंबऱ्यांतून ग्रामीण जीवनाचे वास्तववादी चित्रण आले आहे.

## १९८० नंतरची मराठी ग्रामीण कादंबरी

१९८० नंतरच्या कालखंडात डॉ. आनंद यादव यांनी 'झोंबी,' 'नांगरणी,' 'घरभिंती' इ. आत्मचरित्रात्मक कादंबऱ्या लिहिल्या. रा. रं. बोराडे यांच्या 'सावट,' 'चारापाणी,' आणि 'आमदार सौभाग्यवती,' इ. कादंबऱ्या याच काळात आल्या. नागनाथ कोत्तापल्ले यांची 'गांधारीचे डोळे', बाबाराव मुसळे यांची 'हाल्या हाल्या दुधू दे', वासुदेव मुलाटे यांची 'विषवृक्षाच्या मुळ्या' या सर्व कादंबऱ्यांतून ग्रामीण भागातील विदारक स्थिती, राजकारण, तरुण मनाचा उद्रेक, ग्रामीण भागातील प्रश्न, ग्रामीण माणसाचे अपेक्षाभंगाचे दु:ख चित्रित झालेले दिसते. या काळातील या साहित्यनिर्मितीला ग्रामीण साहित्य चळवळीचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष असा स्पर्श झालेला आहे, ही वस्तुस्थिती लक्षात घ्यावी लागते. पुरुषोत्तम बोरकर, राजन गवस, विश्वास पाटील यांनीही ग्रामीण कादंबरी संपन्न करण्याचे काम केले आहे.'चौंडक','भंडारभोग', 'तणकट' या राजन गवस यांच्या कादंबऱ्या तसेच 'मेड इन इंडिया' ही पुरुषोत्तम बोरकर यांची ग्रामीण भागातील राजकारणाची उपहासात्मक चित्रण करणारी कादंबरी तसेच

धरणग्रस्तांच्या प्रश्नावरील विश्वास पाटील यांची 'झाडाझडती' ही कादंबरी इ. या काळातील साहित्यकृतींचाही उल्लेख करता येईल.

शेतकऱ्यांची होणारी ससेहोलपट बाबाराव मुसळे यांनी 'हाल्या हाल्या दुधू दे' (१९८५) या कादंबरीतून मांडली आहे. 'पखाल' (१९९५) या त्यांच्या कादंबरीमध्ये ग्रामीण जीवनातील दु:ख, दैन्य, शोषण याचे चित्रण आले आहे. पाणीप्रश्न हा या कादंबरीच्या केंद्रस्थानी दिसतो. ही कादंबरी पुंजा व त्याच्या कुटुंबाची शोकांतिका आहे. नळयोजनेमुळे गावात नळ येतात, त्यामुळे पखालीने पाणी वाहणाऱ्या पुंजाचे जीवन उद्धवस्त होते याचे चित्रण लेखकाने या कादंबरीत करून ग्रामीण भागात परंपरागत व्यवसाय कसे धोक्यात आले आहेत त्याचे वास्तवदर्शी चित्र या कादंबरीद्वारे उभे केले आहे. त्यांचीच 'वारूळ' (२००४) ही कादंबरी ग्रामीण जीवनाचे दर्शन घडविते. ही दीर्घ कादंबरी असल्यामुळे तिच्यामध्ये विविध घटना येतात. वैदर्भीय ग्रामीण जीवन, ग्रामीण माणूस, शेती, रूढीपरंपरा यांचे वस्तुस्थितीपूर्ण चित्रण बाबाराव मुसळे यांच्या कादंबऱ्यांतून आले आहे. ग्रामीण जीवनानुभवाचे प्रत्ययकारी चित्रण बाबाराव मुसळे आपल्या कादंबऱ्यांतून उभे करतात.

रवींद्र शोभणे यांची 'कोंडी' (१९९२) सदानंद देशमुख यांची 'तहान' (१९९८) आणि 'बारोमास' (२००२) या कादंबऱ्यांनीही मराठीमध्ये मोठे स्थान प्राप्त केले आहे. परिसर वैशिष्ट्यांसह व्यक्त होऊन त्यांनी मराठी ग्रामीण व प्रादेशिक कादंबरीवर आपली छाप पाडली आहे. ग्रामीण व प्रादेशिक कादंबरीने मराठी कादंबरीत देशी जाणीव रुजविली, हे तिचे मोठे श्रेय आहे. सदानंद देशमुख यांनी ग्रामीण समाजवास्तव प्रकर्षाने मांडले आहे. कथानकाची प्रवाही व ओघवती मांडणी त्यांनी आपल्या कादंबऱ्यांतून केलेली दिसते. पिण्याच्या पाण्याच्या प्रश्न त्यांनी 'तहान' या कादंबरीतून मांडला आहे. 'मेड इन इंडिया' (१९८९) ही पुरुषोत्तम बोरकर यांची एक वैशिष्ट्यपूर्ण कादंबरी आहे. या कादंबरीचा नायक हा शहरी वातावरणात राहून आलेला आहे . गावात झालेला बदल, गावातील राजकारण, अर्थकारण, सोयीसुविधा तो अलिप्तपणे पण चिकित्सकरीत्या पाहतो. गंभीर विषय अत्यंत कौशल्याने लेखकाने या कादंबरीमध्ये हाताळला आहे. पाण्याची समस्या ही ग्रामीण भागातील मोठी समस्या. या समस्येचे चित्रण 'पांगिरा' आणि 'तहान' यांसारख्या कादंबऱ्यांतून आले आहे. समृद्ध गाव पाण्याच्या गैरवापरामुळे कसा उद्‌ध्वस्त होत जातो, त्याचे चित्रण विश्वास पाटील यांची 'पांगिरा' (१९९०) ही कादंबरी करते. रवींद्र शोभणे यांची 'कोंडी' (१९९२) ही कादंबरी नरखेड तालुक्यातील खरसोली या गावाचे कथानक मांडते. गणपत व कौसी यांच्या उद्‌ध्वस्त जीवनाची करुण कहाणी या कादंबरीतून उभी केली आहे. समकालीन वास्तव आपल्या लेखनाद्वारे यशस्वीपणे मांडण्याचा प्रयत्न रवींद्र शोभणे यांनी आपल्या कादंबऱ्यांतून केला आहे. त्यांच्या 'पांढर' (२०१०) या कादंबरीत दुष्काळाच्या निमित्ताने सामाजिक पर्यावरणाचा वेध चिकित्सकपणे घेतला आहे. दुष्काळाचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्यांमध्ये उलट चालिला प्रवाहो, बनगरवाडी, फकिरा, तहान इ. कादंबऱ्यांप्रमाणेच 'पांढर' या कादंबरीचे योगदानही महत्त्वाचे आहे. वैदर्भीय ग्रामीण स्त्री कादंबरीकार म्हणून प्रतिमा इंगोले यांचाही उल्लेख महत्त्वपूर्ण आहे. बदलत्या काळात ग्रामीण जीवनामध्ये स्त्रीच्या दर्जामध्ये बदल झाला नाही, त्याचे चित्रण त्या करतात. त्यांच्या 'बुढाई' (१९९२) या कादंबरीचा उल्लेख महत्त्वाचा आहे.

१९८० नंतरच्या काळात ग्रामीण जीवनाचा विचार अनेक अंगांनी ग्रामीण कादंबरीतून कादंबरीकरांनी मांडलेला दिसतो. २००१ मध्ये 'ऐसे कुणबी भूपाळ' ही भारत काळे यांची कादंबरी प्रकाशित झाली. ग्रामीण बोलीचा समर्थपणे वापर या कादंबरीमध्ये करण्यात आला आहे. एका कुटुंबातील सत्तासंघर्ष या कादंबरीतून वर्णिला आहे. सरकारी पातळीवर सुरू असणाऱ्या विविध योजना वरपासून खालपर्यंत कोणत्या पद्धतीने राबविल्या जातात, त्याचे भेदक चित्रण रमेश इंगळे उत्रादकर यांनी आपल्या 'निशाणी डावा अंगठा' या कादंबरीतून केले आहे. साक्षरता अभियानाचा आलेख त्यांनी या कादंबरीतून मांडला आहे. तिरकस, विनोदी शैलीत या कादंबरीची मांडणी लेखकाने केली आहे. रा. रं. बोराडे यांच्या महानगाव, राहट पाळणा, इथं एक गाव होतं, मरणदारी, नामदार श्रीमती इ. कादंबऱ्याही या काळात प्रकाशित झाल्या दुष्काळामुळे मेटाकुटीला आलेल्या दामाच्या कुटुंबाची होणारी वाताहात 'रानसाखळी' या कादंबरीतून भीमराव वाघचौरेंनी मांडली आहे.

## ग्रामीण कादंबरीचे स्वरूप व स्थान

प्रारंभापासूनच मराठी साहित्यात ग्रामीण जीवनाला हवे ते स्थान मिळालेले नाही. पांढरपेशांनी शहरी मध्यमवर्गाचे केलेले चित्रण म्हणजे मराठी साहित्य नव्हे, तेव्हा आमचे खरे जीवन साहित्यात आले पाहिजे, असा विचार १९७५ नंतरची तरुण पिढी एकत्र येऊन करू लागली. १९७५ पासून खेड्यातील सुशिक्षित तरुणांनी ग्रामीण साहित्यविषयक चळवळ सुरु केली. या चळवळीने ग्रामीण लेखकांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला.

आपल्या कादंबऱ्यांतून हा लेखक वास्तव परिस्थिती मांडू लागला. परंपरागत ग्रामीणजीवनापेक्षा बदलते ग्रामजीवन या कालखंडात कादंबऱ्यांतून चित्रित झालेले दिसते. बा. ग. केसकर यांनी ऊसतोडणी कामगारांच्या जीवनावर 'कुणाच्या खांद्यावर' ही कादंबरी लिहिली. या कामगारांना किती कष्टाचे जीवन जगावे लागते व त्यांचे कौटुंबिक जीवन किती व कसे उद्ध्वस्त होते, याचे वर्णन या कादंबरीत आहे. 'विषवृक्षाच्या मुळ्या ही वासुदेव मुलाटे यांनी लिहिलेली कादंबरी सहकारी चळवळीचे आजच्या घडीचे खरे पण विकृत रूप चित्रित करते. सर्वसामान्यांचा आर्थिक विकास साधण्यासाठी सहकारी चळवळीचा जन्म झाला. पण या चळवळीने सर्वसामान्यांऐवजी आर्थिकदृष्ट्या सबलांचेच हित पहिले. १९८० नंतरची कादंबरी आशयदृष्ट्या संपन्न झाल्याचे निदर्शनास येते.

ग्रामीण साहित्याने मराठी साहित्याच्या कक्षा विस्तृत केल्या आहेत. लौकिक जीवनाला शब्दरूप देणारे हे साहित्य ग्रामीण माणसांच्या भावभावना, वृत्तीप्रवृत्ती, गाव, कुटुंब यांच्याशी असणारी त्यांची बांधिलकी, माणसामाणसांतले परस्पर संबंध, ग्रामजीवनातले अनेक प्रश्न, संकटे, अर्थव्यवस्था, समाजव्यवस्था, सण, उत्सव ग्रामीण समाजातील सत्तास्थाने आदींसह कृषिसंस्कृतीला शब्दरूप देते. मध्यमवर्गीय शहरी लेखकापेक्षा ग्रामीण लेखकाचे अनुभवविश्वाच्या पार्श्वभूमीवर ग्रामजीवनाचा वैविध्यपूर्ण वेध घेणारे हे साहित्य त्याच्यातल्या जिवंतपणाने उमटून दिसते. डॉ. गुंदेकर लिहितात, ''शेतीवर अवलंबून असणाऱ्या, मातीशी अतूट नाळ असणाऱ्या, कष्टकरी स्त्री–पुरुषांच्या जीवनवास्तवाचे कलात्मक दर्शन घडविणे, शोषणमुक्त,भयमुक्त, समताधिष्ठित समाजनिर्मितीसाठी झटणाऱ्या किंवा अशा प्रकारच्या समाजनिर्मितीची स्वप्ने पाहणाऱ्या नायक–नायिकांचे चित्रण करणे, हे ग्रामीण साहित्याचे प्रयोजन आहे. ग्रामीण साहित्य अंधश्रध्दा निर्मूलन, विज्ञान, तंत्रज्ञान यांचे स्वागत करते. ग्रामीण माणसांचे सर्वांगीण जीवन सुखी व्हावे, हा ग्रामीण साहित्याचा ध्यास आहे. ग्रामीण साहित्याची निष्ठा माणसांवर आणि त्यांच्यातील माणुसकीवर आहे. कृषिनिष्ठ, कृषिअधिष्ठित ग्रामीण समाज हा ग्रामीण साहित्याचा केंद्रबिंदू आहे. शोषणमुक्तीच्या चळवळी, वर्ण–वर्ग–जाती, स्त्री–दास्यांताच्या चळवळी ग्रामीण साहित्य चळवळीला समविचारी वाटतात. ग्रामीण जीवनातील या नव्या जाणिवांचे चित्रण करणे, हेही ग्रामीण साहित्य चळवळीचे प्रयोजन आहे.''[१]

मराठी ग्रामीण कादंबरी ही वास्तववादी, समस्याप्रधान कादंबरी आहे. ग्रामीण जीवनानुभव समर्थपणे मांडण्याचे काम मराठी ग्रामीण कादंबरीने केले आहे. विश्वास पाटलांची 'झाडाझडती' (१९९२) ही एक लक्षवेधी कादंबरी आहे. धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाचा महत्त्वाचा प्रश्न तिने मांडला आहे. साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त ही कादंबरी जांभळी गावाच्या धरणग्रस्तांची कहाणी सांगते. धरणग्रस्तांना करावा लागणारा संघर्ष व त्यांचे होणारे शोषण त्याचे वास्तवदर्शी चित्र तेवढ्याच ताकदीने लेखकाने जिवंत केले आहे. शेतकऱ्यांच्या समस्यांबरोबरच दलित, देवदासी वर्गाच्या समस्या, त्यांच्या जीवनाचे चित्रण १९८० नंतरची कादंबरी करते. राजन गवस यांची भंडारभोग (१९८४), चौंडक (१९८५) या कादंबऱ्या देवदासी, जोगतिणी, जोगते यांच्या जीवनातील दुःखभोग मांडतात. १९८० मध्ये प्रकाशित झालेली 'नटरंग' ही आनंद यादव यांची कादंबरी तमाशातील नाच्याच्या वाट्याला आलेल्या दुःखाचे चित्रण करते. राजन गवस यांचीच 'तणकट' (२००२) ही साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कादंबरी समकालीन दलित चळवळीचा दिशाहीन प्रवास मांडते. सवर्ण–दलित राजकारणाचे अनेक पैलू तिने समर्थपणे साकारले आहेत. महारवाड्यात राहणाऱ्या कबीरचा संघर्ष तिने मांडला आहे. परंपरागत व्यवस्थेमध्ये शिकणारा कबीर अवतीभोवतीचे राजकारण, समाजव्यवस्था, मूल्यऱ्हास व राजकारणातील दिशाहीनता अशा परिस्थितीमध्ये जगताना कसा हतबल होतो, त्याचे चित्रण 'तणकट' ही कादंबरी करते.

'राघववेळ' ही १९९३ मध्ये प्रकाशित झालेली नामदेव कांबळे यांची साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कादंबरी. कांबळे यांनी विदर्भातील ग्रामीण भागातील मातंग समाजाचे चित्रण या कादंबरीतून केले आहे. कळणू जाधवाची विधवा पत्नी वालंबी व तिच्या मुलांची ही कथा आहे. धर्म, रूढीपरंपरा, जात, आर्थिक विषमता याद्वारे मातंग समाजाची व्यथा सशक्तपणे ही कादंबरी मांडते. 'राघववेळ'नंतरची 'ऊनसावली' व 'सांजरंग' अशा पुढच्या दोन कादंबऱ्या लिहून लेखकाने या कादंबरीतील रघूचा विकसनशील प्रवास मांडला आहे. बाबाराव मुसळे यांच्या 'वारूळ' (२००४) या कादंबरीमध्ये मातंग समाजाच्या तीन पिढ्यांचे चित्रण येते. मतांचे राजकारण, समाजपरीवर्तनाची चळवळ या अंगाने मातंग समाजाच्या जीवनाचा वेध ही कादंबरी घेते उत्तम बंडू तुपे यांनी 'झुलवा' (१९९२) या कादंबरीतून जोगतिणी, देवदासींच्या जीवनातील दाहक दुःख मांडले आहे.

ग्रामीण साहित्याची वास्तवदर्शी निर्मिती १९६० च्या आसपास झाली, असे साधारणतः म्हणता येईल. १९६० नंतरच्या चार–पाच दशकात ग्रामीण साहित्यामध्ये, कादंबरीचा विचार करता–ग्रामीण कादंबरीमध्ये समर्थपणे निर्मिती झाली आहे. मध्यवर्ती साहित्यामध्ये न येणारे चित्रण मराठी ग्रामीण कादंबरीमध्ये आले आहे. वास्तवाशी संबंध ठेवणारी साहित्यनिर्मिती १९८० नंतरच्या काळामध्ये झालेली आहे. भारतीय समाजव्यवस्था

कृषिप्रधान आहे. ग्रामीण कादंबरीतून प्रकट होणारी सुखदु:खे प्रामुख्याने शेतकऱ्यांची आहेत. त्याचबरोबर इतरही समाजघटकांचा, त्यांच्या जीवनाचा, सुखदु:खाचा विचार तिने केला आहे. १९८० नंतरच्या काळात ग्रामीण साहित्याचे मोठ्या प्रवाहात रूपांतर झालेले दिसते. डॉ. आनंद यादव, वासुदेव मुलाटे, बाबाराव मुसळे, नामदेव कांबळे, रवींद्र शोभणे, सदानंद देशमुख यांनी ग्रामीण कादंबरीला एका उंचीवर नेऊन ठेवले आहे. अलीकडच्या काळामध्ये अनेक गोष्टी ग्रामीण संस्कृतीवर आक्रमण करीत आहेत. अलीकडच्या लेखकांनी या वस्तुस्थितीचे चित्रण आपल्या साहित्यातून करायला हवे. डॉ. आनंद यादव म्हणतात, ‘‘लेखकांना जबाबदारी पेलण्यासाठी आपल्या वाचनाचा आवाका मोठ्या प्रमाणात वाढविणे आवश्यक आहे. नव्या पिढीतील साहित्यिकांचे, इतर साहित्याचे वाचन फारच कमी दिसते.त्यांचे इंग्रजीचे वाचन तर नाहीच नाही, पण मराठीचेही नाही, हा अनुभव मला येतो. एवढेच नाही, तर त्यांच्या कानावर मराठीतील काही प्रयोगशील नियतकालिकांची नावेही अजून गेलेली नाहीत. तरी त्यांची चार–चार, पाच–पाच पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. अधूनमधून त्यांच्या वाचनात बाजारी नियतकालिकांतील जे अतिसामान्य ग्रामीण साहित्य येईल, तेवढेच ते वाचत असतात.’’[२] जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे नवनवीन प्रकल्प उभारल्या जात आहेत. त्यामुळे अनेक शेतकरी आज भूमिहीन होत आहेत. ग्रामीण कादंबरीतून शेतकऱ्यांच्या या परिस्थितीचे चित्रण होणे आवश्यक आहे. जागतिकीकरणामुळे ग्रामीण संस्कृतीवर होणारे परिणाम, बदलणारी खेडी, परिस्थिती याचे बारकावे, संदर्भ ग्रामीण कादंबरीने टिपायला हवेत.

## समारोप

एकंदरीत १९८० नंतरची ग्रामीण कादंबरी ही वास्तवदर्शी आणि समस्याप्रधान कादंबरी आहे. ग्रामीण जीवनाशी जवळीक असणाऱ्या लेखकाने आपले ग्रामीण परिसरातील प्रत्यक्ष अनुभव कादंबरीबद्ध केल्याने या अनुभवात अधिक जिवंतपणा आला आहे. या कादंबऱ्यांतून प्रामुख्याने खेड्यातील कष्टकरी, भटके, दलित आणि शेतकरी वर्गाच्या दु:स्थितीच्या वास्तव चित्रणावर भर दिलेला असल्याने ग्रामीण जीवनाचे दर्शन घडविण्यात १९८० नंतरची कादंबरी यशस्वी झालेली दिसते. यापुढे जागतिकीकरणाने निर्माण होणाऱ्या परिस्थितीचे चित्रण, ग्रामीण संवेदन मराठी ग्रामीण कादंबरीने मांडायला हवे.

## संदर्भ

१. डॉ. श्रीराम गुंदेकर, मूल्यसंकल्पना व साहित्यविचार, संपादक– प्रकाश मेदककर, औरंगाबाद, आवृत्ती २००४, पृ. क्र.२४६ वरून उद्‌धृत.

२. डॉ. आनंद यादव, ग्रामीण–दलित साहित्याचा अनुबंध, संपादक– डॉ. म. सु. पगारे, पुणे, आवृत्ती पहिली २०१०, पृ. क्र. ९७ वरून उद्‌धृत.

❖❖❖

# ग्रामीण साहित्यातील अनुभवविश्व

डॉ. सुवर्णा रा. गाडगे
महात्मा फुले महाविद्यालय, वरुड, जि. अमरावती
भ्रमणध्वनी ९४२३१५२९१२

## प्रस्तावना

ग्रामीण साहित्यात व्यक्त होणाऱ्या जाणिवांचे स्वरूप मानवी जीवनातील विविध घटकांनी बद्ध व संस्कारित होत असल्याने त्याचे अविष्करण ग्रामीण साहित्यात प्रभावीपणे आलेले दिसते. प्राचीन संतसाहित्यामधे अठरापगड जातीतील संताचे साहित्य भक्तिभावातून निर्माण झाले असले तरी त्यातून त्यांचे जीवनानुभव सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक विचारांनी संस्कारित व प्रेरित झालेले दिसते. त्या त्या काळातील परिस्थितीचा परिणाम मानवी जीवनावर होत असतो. स्थळकाळानुसार ही परिस्थिती भिन्न असतेच मात्र पूर्वापार ग्रामीण व्यवस्थेतील जीवन पद्धती मानवी मनावर परिणाम करणारी आहे. बहुसंख्य भारत हा ग्रामीण भागात जगणारा आहे. खेड्यातील माणसाच्या जीवनजाणिवा ग्रामीण साहित्याचा गाभा आहे. मराठी साहित्यात ग्रामीण, दलित, आदिवासी, स्त्रीवादी, मुस्लीम, ख्रिश्चन असे विविध साहित्य प्रवाह साठच्या दशकानंतर गतिशील झालेले दिसतात. ग्रामीण भागात विविध समस्यांचा सामना करीत जगणारा ग्रामीण माणूस अनेक व्यथावेदना, वंचितता यांच्यासोबत जगण्याचं बळ नि उमेद देणाऱ्या शेतीशी एकरूप होऊन जगतो त्याच्या जगण्याचे चित्रण ग्रामीण साहित्यातून प्रगट होताना दिसते. ग्रामीण समाजजीवनातील सुखदु:खांची वेदनांची नि कृषी जीवनाची मूल्यगर्भ अभिव्यक्ती ग्रामीण साहित्यातून होत आहे. शेती हा जगण्याचा मूलाधार असणारा खेड्यातील शेतकरी शेतमजूर यांनी अनुभवलेले, अनुभवित असलेले खेडे आणि जीवनानुभव साहित्यातून साठ, सत्तर च्या दशकात वेगाने येवू लागले.ग्रामीण जीवन जगणारी माणसे शेती, निसर्ग, पशुधन, ऋतुचक्र, पीकपाणी, त्याचबरोबर सण, उत्सव, जत्रा, पूजा, विधी, धातुक्रिया, रितीरिवाज, आहार, आतिथ्य, वेशभूषा, आंतरजातीय, आंतरधर्मीय भावबंध कृषीसंस्कृती इत्यादींशी त्याचा घनिष्ठ संबंध असतो.

शेती संस्कृतीशी निगडित अनुभवविश्व असलेला समाजगट साहित्यातून ग्रामीण जीवनातील काबाडकष्टांचे, हालअपेष्टांचे त्याचबरोबर जीवनातील आनंदाचे क्षण, सुखाच्या स्मृती मांडतो. ग्रामीण साहित्यातील सौंदर्यस्थळे म्हणजे मृगाचा पहिला पाऊस, त्याचा मृदगंध, बियांतून तरारणारे कोंब, अंकुर, कोवळ्या पानांची नक्षी, रंगाच्या विविध छटा, कामाची धांदल, सुगीचे नि सणासुदीचे दिवस, पाखरांची किलबिल, गुराढोरांचा चारापाणी, जत्रा तसेच गावगाड्यातील इतर प्रसंग भजन कीर्तन, भारूड, सोंगे, कलावंताचे खेळ, तमाशाचे फड, लेझिम, टिपऱ्या, कुस्त्या, बैलाचे पट यामध्ये रमणारा यामुळे त्यांच्या कष्टमय जीवनात आनंद, उत्साह, जल्लोष आणि नवचैतन्य निर्माण होते. “भारतीय खेड्यांची रचना व समाजव्यवस्था बघितली तर पुष्कळ बाबी स्पष्ट होत जातील. एक तर या समाजव्यवस्थेची स्वत:ची अशी एक स्वतंत्र आणि स्वयंपूर्ण रचना आहे. युगायुगापासून चालत आलेल्या या रचनेत माणसे विशिष्ट अशा एक पद्धतीने बांधली जातात. त्या रचने बाहेर बहुधा ती जात नाहीत.”[१] ग्रामीण अनुभवविश्व, काळाबरोबर बदलत जाणारे जीवन, परिस्थितीनुरूप स्थित्यंतरे ग्रामीण साहित्यातही आलेले दिसतात. अस्सल ग्रामजीवन अनुभूतीपूर्ण साहित्य निर्माण करणाऱ्या ग्रामीण लेखकाबरोबरच ग्रामीण जीवनाचा भाग नसलेल्या पांढरपेशा पिढीतील लेखकांनी ग्रामीण जीवनाच्या आकर्षणातून ग्रामीण साहित्याची निर्मिती केली. मात्र निर्मितीचा अनुभवातून येणारा अस्सलपणा त्याला नाही.

“मानवी कृती, मानवी स्वभाव, मानसिकता आणि मानवी वर्तन यातून ही संस्कृती घडली आहे. त्यातूनच वेगळ्या जाणिवा निर्माण होतात. वेगळ्या जाणिवांमधून वेगळे संवेदन आणि वेगळ्या संवेदनेतून वेगळे साहित्य निर्माण झाले आहे. जीवनाचे परिमाण वेगळे असल्याने साहित्यातून व्यक्त होणारे जीवनही वेगळेच आहे. हे वेगळे सांगण्याची गरज नाही. या वेगळ्या असणाऱ्या साहित्याला ‘ग्रामीण साहित्य’ असे नामकरण प्राप्त झाले”[२] ग्रामीण जीवनाच्या विविध छटा या साहित्यात उमटल्या आहे. ग्रामीण समाजातील स्त्री पुरुष कृषीसंस्कृतीशी जुळलेले आहे. ग्रामीण स्त्रिया तर जणू कष्टाचीच प्रतिमा आहे. घरकाम, शेतीकाम, सासुरवास, नववैवाहिक जीवनातील सुखदु:ख यातून त्या सोशिक, सहनशील, संयमी आणि मितभाषी होतात. त्यामुळे स्त्रियांची भाषा अर्थवाही, अर्थघन आणि नेमकेपणाने आशय व्यक्त करणारी असते. शिवाय त्या आपल्या कुटुंबीयांवर, कुंकवाच्या धन्यावर असीम प्रेम करणाऱ्या असतात. दुधाच्या सायीपासून शेणाच्या पोवटीपर्यत शेत

शिवाऱ्यातल्या झाडाझुडपात नि पशुपक्षात त्यांचे भावबंध गुंतलेले असते. बहिणाबाई चौधरींसारखी अस्सल ग्रामीण जीवनानुभव मांडणारी स्त्री सर्व ग्रामीण स्त्रियांचे अनुभवविश्व घडविते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही जगण्याचे चिवट बळ त्यांनी आत्मसात केलेले असते. शेतीचा शोध स्त्रियांनी लावला आणि त्यांच्याच कष्टावर शेती तरली आहे. स्त्री ही सर्जनशील आहे. कृषीच्या सर्जनक्रियेत ती सहभाग घेते. कला साहित्य क्षेत्रात सर्जनशीलतेचा सहजाविष्कार उत्कटतेने घडविणारी ही ग्रामीण स्त्री, ग्रामीण साहित्यावर आपला ठसा उमटवीते. काळाबरोबर बदलत चाललेले जीवन त्यात झालेले बदल आणि त्या बदलत्या परिस्थितीत स्त्रीचे अनुभवविश्वही नव्याने स्त्री साहित्यात उमटवीत आहे.

"ग्रामीणता हा लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग मानावा लागतो. ग्रामीण जीवन समजून घेऊन त्या जीवनाच्या अंगानेच स्वत:विषयीचे आकलन मांडत जाणे, त्या अंगानेच अनुभवांचे आकार शोधणे, अनुभवांची मांडणी करणे; हेच ध्येय समजून जेव्हा साहित्यनिर्मिती होते तेव्हाच तिच्यात ग्रामीणतेचे (लेखकाच्या व्यक्तिमत्वातील) रंग उतरू लागतात. दुसऱ्या भाषेत असे म्हणता येईल की, लेखकाची ग्रामीणतेची जाणीव इथे महत्त्वाची असते."[३] ग्रामीण संवेदनशीलता डॉ. आनंद यादवांना महत्त्वाची वाटते. "ग्रामीण साहित्य जीवनाच्या वास्तवाचा आग्रह धरते आणि त्याचवेळी दुसरीकडे व्यापक अशा विश्वमानवाचा आग्रह धरते... साहित्य हे मानवाच्या सांस्कृतिक जीवनाचेच एक अंग आहे."[४] ग्रामीण कथा, कादंबरी, नाटक, कविता ,ललित गद्य इ. साहित्यप्रकारांनी ग्रामीण जीवनातील भावभावनांची, व्यथावेदनांची, सुखदु:खाची अभिव्यक्ती घडविलेली आपल्याला दिसते. ग्रामीण संवेदनशीलता हा कोणत्याही ग्रामीण साहित्यकृतीचा 'आत्मा' आहे. ग्रामीण संवेदना आत्मानुभूतीपूर्ण अनुभवविश्वातून निर्माण झालेली कोणत्याही वाङ्मय प्रकारातील कलाकृती ही अस्सल ग्रामीण साहित्यकृती ठरते. त्या कलाकृतीत नगर, शहराचा कोरडेपणा असू नये ग्रामीण साहित्याचा मूळ गाभा खेडे, तेथील जगणे, कृषिसंस्कृती, परंपरा, सोसलेपण जगण्याचे भान हे आहे. "ग्रामीणता हा लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग झालेला असावा लागतो. ग्रामीण जीवनाच्या अंगानेच स्वत:चे आकलन मांडले, त्या अंगानेच अनुभवांचे आकार शोधले तर आणि ग्रामीणांच्या अंगानेच या अनुभवांची मांडणी केली तर लेखकाच्या व्यक्तिमत्वाचे रंग त्यात उतरतात."[५] जीवनानुभवातून साहित्याची निर्मिती झाली तरच अस्सल ग्रामीण साहित्य असे म्हणता येईल. वास्तवाचे भान ठेवून निर्माण झालेले साहित्य हे समाजमनाचे संस्कृती परंपराचे, निसर्ग व सभोवतीच्या जगण्याचे चित्रण घडविणारे असते.

"ग्रामीण वास्तव, ग्रामीण संस्कृती व ग्रामीण बोली यांचा वापर करणारे साहित्य, खेडी व त्यांचा परिसर व त्यात वावरणारी माणसे, त्यांचे जीवन हे ग्रामीण साहित्याचे कथनकेंद्र असते. खेड्यातील माणसांच्या जीवनरिती, श्रद्धाविश्वे, शेती व निसर्ग यांच्याशी असणारे भावबंध, ग्रामव्यवस्थेतील बलुतेदारी, सामाजिक, आर्थिक संबंधाची पारंपरिक व्यवस्था, आधुनिक काळात आलेली पंचायतराज व्यवस्था, सहकार तत्त्वावर चालणाऱ्या विविध संस्था, यंत्रसंस्कृतीचे ग्रामीण जीवनावर झालेले आक्रमण व त्याचे परिणाम, आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेने बदलत चाललेले ग्रामीण जीवन, तेथील व्यक्ती व समूह यांतील ताण ही ग्रामीण साहित्याची आशयसूत्रे असतात."[५] ग्रामीण साहित्यातील अनुभवविश्वात आजचे वा कालचे ग्रामजीवन, त्याचे विविध अवस्थांमधील मनोव्यापार, सांस्कृतिक संवेदना सखोलपणे अभिव्यक्त होताना दिसते. ग्रामीणव्यवस्था व कृषिसंस्कृती यांचे परस्परांशी घट्ट संबंध आहे. यांत्रिकीकरण नगर, शहर यांच्या ओठीने जुनी गावगाडा पद्धती मोडकळीस आली आहे. पण ती संपूर्ण नष्ट झाली नाही. शेतीनिष्ठा कमीअधिक प्रमाणात बदलली आहे. शेतीकडे पाहण्याचा मायेचा दृष्टिकोन बदलतो आहे. शहरीकरणाच्या ओढीचे शेतीचे प्लॉट होत आहेत या सर्व बदलत्या परिस्थितीचा व शेती — शेतकरी यांच्या जीवन वास्तवाचा विचार करणारे अस्सल ग्रामीण साहित्य नव्याने निर्माण होत आहे. खेड्याचा, शेतीचा, निसर्गाचा लळा असलेला हाडामासांचा शेतकरी मात्र आजही शहरात रमत नाही.

## ग्रामीण साहित्यातील व्यामिश्र अनुभवविश्व

गावात विविध धर्म, जाती, वंश ,संप्रदाय एकत्र गावगाडा करून राहतात. त्याचे संस्कार रीतिरिवाज, प्रथापरंपरा वेगळ्या असतील तरीही वर्षानुवर्षे ही बहुविध संस्कृतीची माणसे ग्रामीण भागात एकत्र नांदत आली आहे. त्याचबरोबर आपला वेगळेपणा जपत एकत्र समूह जीवनाचा आनंद ते घेतात. भांडणतंटे, कोर्टकचेऱ्यांचे प्रसंग हे उद्‌भवतात, मात्र तिथे संघर्ष नि सलोखा एकत्र नांदत असतो. हा ग्रामीण समाज फार मोठा असून तो आजही असंघटित आहे.या ग्रामीण समाजाला परिवर्तन सन्मुख करावयाची गरज आहे.

खेडी बदलत आहेत. पक्क्या रस्त्यांनी गाव जोडले जात आहे. शाळा, दवाखाने, ग्रामपंचायती, सहकारी संस्था, इ. कार्यालये यांची आधुनिक बांधकामे, गावात एस.टी., ऑटोरिक्षा, ट्रॅक्टर, दुचाकी, चारचाकी वाहनांची संख्या झपाट्याने वाढली आहे. एकंदरीत सर्वांगाने गाव बदलते आहे. याशिवाय शहरी जाणिवा गावात वेगाने पोहोचल्या आहे. इंग्रजी माध्यमाच्या शाळा, शिक्षणाचे वाढते प्रमाण यामुळे भाषिक परिणाम दिसून येतो. प्रसार माध्यमाचा प्रसार व चैनीच्या साधनांचा वापर वाढल्याने ग्रामीण माणसाची मानसिकता त्या वळणाची बनत आहे. शेतीवरचा खर्च वाढला मात्र त्या प्रमाणात उत्पन्न व शेतमालाची किंमत वाढत नसल्याने शेतकरी हवालदिल झाला. व्यवस्था सर्व बाजूने त्याला लुटत आहे. जगण्यामरण्याचा प्रश्न, शेती विकण्याकडे कल वाढत आहे. असंघटितता, जागृततेचा अभाव, आर्थिक दुर्बलता व परावलंबित्व यासर्व अनुकूल–प्रतिकूल बदलांचा परिणाम ग्रामीण माणसाच्या मानसिकतेवर होत आहे. याचे प्रतिबिंत नव्याने अनुभवित ग्रामीण साहित्यात उमटत आहे. आधुनिकतेमुळे ग्रामीण समाजाच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक जीवनाची पडझड होत आहे. निष्ठा, जीवनातील स्वाभिमान, खरेपणा, सत्यनिष्ठा, शील, सैल होत आहे. या सर्व बदलांचा विचार आधुनिक ग्रामीण साहित्यात होतांना दिसून येतो आहे. प्रसारमाध्यमाचा प्रभाव व परिणाम ग्रामीणतेवरील सांस्कृतिक आक्रमण आहे. राजकारणाचा ग्रामीण जीवनावरील परिणाम ग्रामीण साहित्यातून प्रभावीपणे घडणे आवश्यक आहे.

ग्रामीण समाज हा समग्र समाजाचा एक भाग आहे. तो सर्वात मोठा असून महत्त्वाचा भाग आहे. ग्रामीण समाज म्हणजेच समग्र भारतीयतेच्या संदर्भातच करावा लागतो. भारताच्या अस्मितेतच ग्रामीण समाजाची अस्मिता सामावलेली आहे. अनेक धर्म, जाती, संप्रदाय, समाजगट भाषा, लिंगभेद यानुसार त्याच्या निरनिराळ्या जाणिवा आहेत. त्यांचा मुक्तपणा स्वतंत्र आविष्कार निरनिराळ्या साहित्यप्रवाहात होत आहे. ग्रामीण समाजाचे वास्तव प्रतिबिंब ग्रामीण साहित्य प्रवाहातच उमटेल हे स्वाभाविक आहे. ग्रामीण माणूस, समाज यांच्यातील परिस्थिती सापेक्ष बदल ग्रामीण साहित्यात उमटत आहे.

१९४० नंतर श्री.म. माटे यांच्या कथांनी ग्रामीण कथा वाङ्मयाला सामाजिक वास्तवाचे भान दिले. ग. ल. ठोकळांचे साहित्य अद्‌भुत रम्यतेचा भाग असला तरी शेतकरी कुटुंबाची वास्तवताही त्यात आहे. व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथेतून माणसांच्या विविध प्रवृत्तींची अभिव्यक्ती झाली आहे. तसेच प्राणिजगताची भावाभिव्यक्ती प्रभावीपणे चित्रित केली आहे. त्यांची कथा माणदेशांच्या अस्सल कसदार मातीतून निर्माण झाली आहे. बहिणाबाई चौधरी यांच्या कवितेने ग्रामीण जीवनातील अनेक विषय अत्यंत हळुवारपणे हाताळले तसेच नवे प्रश्नही निर्माण केले. ओवी गीताचा बाज असलेली त्यांची कविता अस्सल ग्रामीण कविता आहे. शेतीच्या संबंधाने कापणी, मळणी, पेरणी, रगडणी, उफणनी किंवा सण उत्सवात पोळा, पाडवा किंवा खेड्यातील विविध जाती, नातेसंबंध, निसर्ग व माणूस शेती यांचे अतुट नाते, ग्रामीण स्त्री जीवन, मनाच्या भावावस्थेचे चित्रण, पती पत्नीच्या नात्यातील गोडवा, आर्थिक विषमता, मन, प्राणी, पक्षांचे भावविश्व, अशा अनेकविध प्रतिमांचे वेगळे भावविश्व त्यांनी आपल्या कवितेतून उभे करून ग्रामीण कवितेत स्वत:चे वेगळे स्थान निर्माण केले आहे. ग्रामीण जीवनाचे समग्र दर्शन बहिणाबाईच्या कवितेतून घडते. त्यांच्या प्रतिमांना ग्रामीण जीवनाचे जे अधिष्ठान आहे ते इतरांच्या कवितेतून प्रत्ययास येत नाही. ग्रामीण वास्तव साकार करणारी त्यांची कविता ह्दयातील दु:ख सांगणारी आहे. ग्रामीण माणसाच्या दारिद्र्याचे विदारक चित्रण, कुटुंबव्यवस्थेतील ग्रामीण स्त्री, तिचे ह्दयस्पर्शी दु:ख, निसर्ग, प्रेमभावना असे जीवनानुभव व्यक्त करणारी आहे. ना.घ. देशपांडेची कविता वऱ्हाडी बोलीत, लोकगीताची लय असणारी असून प्रेम व निसर्ग यांचा सुरेख समन्वय त्यांच्या कवितेत साधला आहे. ना.धों. महानोरांच्या रानातल्या कवितेत स्त्री देहाचे रूप घेवून निसर्ग अभिव्यक्त होतो. प्रेम, शृंगारात रमणारी त्यांची कविता नंतर ग्रामीण वास्तवाच्या जवळ गेली. तेथील भीषण वास्तव त्यांच्या कवितेने चव्हाट्यावर मांडले. विठ्ठल वाघ यांची कविता ग्रामीण जीवन अभिव्यक्त करण्यात यशस्वी झाली आहे. लोकगीत आणि गेयात्मकता यांच्या समन्वयाने त्यांची कविता ग्रामीण मनाशी एकरूप झाली आहे. इंद्रजीत भालेराव, शंकर बडे, राजा मुकुंद, देविदास सोटे इतरही नव्या पिढीतील कवींच्या कविता ग्रामीण जीवनाशी समरस झालेली दिसून येते. उद्धव शेळके यांच्या साहित्यातून विदर्भातील ग्रामीण जीवन, खेड्यातील जीवन परंपरा, दु:ख, भटके यांचे वास्तव चित्रण आले. शंकर पाटील यांनी ग्रामीण जीवनातील व मनातील अनेक ताणतणावाचे चित्रण केले आहे. द.मा. मिरासदार यांच्या कथावाङ्मयात व्यक्तिस्वभाव आणि जीवनातील विसंगतीतून विनोद साकार होतो. आनंद यादव यांनी विविध प्रकार हाताळून ग्रामीण साहित्य समृद्ध केले आहे. ग्रामीण साहित्य निर्मिती आत्मानुभूतीतून झाली आहे. शेतकरी कामकरी वर्गामध्ये आत्मविश्वास, आत्मसन्मान निर्माण करून त्यांना सामाजिक गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी त्यांना शिक्षित करणे गरजेचे आहे. मानवी हक्क महात्मा फुल्यांच्या विचारातून ग्रामीण साहित्यात आले. त्या–त्या कालखंडातील नव्या जाणिवांबरोबर नवे घाट प्रवाहही साहित्यात येतात. साहित्यात जे बदलते प्रवाह उसळत

असतात त्यांचे नाते सामाजिक संरचनेशी असते. व्यापक पातळीवर व व्यापक अंतस्वरूपात असा दोन्ही बाजूने बदल घडत असतो. 'माणसाविषयी आणि माणसांसाठी' लिहिले गेलेले साहित्य हे कालातीत असते.

## निकर्ष

ग्रामीण साहित्य खऱ्या अर्थाने माणसाचे साहित्य आहे, मानवाच्या स्थितीतील बदल काळानुरूप होतो तसा त्यांच्या भोवतीचे वास्तवही तो कृतीने बदलु शकतो. ही बदलाची प्रक्रिया गतिमान होण्यासाठी साहित्याने समाजमनात परिवर्तनाचा विचार रूजवायला पाहिजे. ग्रामीण साहित्यातील जाणीव निर्मीती परिवर्तनवादी आहे. गतिशील विचार मांडणारे हे साहित्य आहे. आज खेडयातील जगणे विस्कटले आहे. त्यांच्या समोरील अस्मानी सुलतानी संकटाची मालिका सुरूच आहे. यामुळे ग्रामीण माणूस होरपळला जात आहे. ग्रामीण साहित्याला ही व्यथा जाणवते ही व्यथा मनीमानसी बाळगून ग्रामीण साहित्याला परिवर्तनासाठी आपला लढा उभा करावा लागणार आहे. समाज परिवर्तनाचे कार्य मूलत: निर्मितीचे कार्य आहे. ही निर्मिती विचारांची आणि भावनांची आहे ती झाल्याशिवाय समाज कृतिशील होणार नाही.आशय जिवंत करणारी ग्रामीण बोली भाषा, प्राणिजगाची अभिव्यक्ती, जिवंतपणा, निसर्ग, चित्रात्मकता, कौटुंबिक भावसंबंध यांचे मनोज्ञ दर्शन घडविते .स्त्री वास्तवाचे भान, मानवी स्वभावातील विविधता, ग्रामीण माणसाचे दु:ख वेदना हा तिचा जिव्हाळ्याचा विषय माणसाच्या अंतरंगात शिरून अनुभवाशी एकात्मता ,बदलत्या ग्रामीण जीवनाचे चित्रण ग्रामीण साहित्याला जे मूलगामी तत्वज्ञान लाभले ते महात्मा फुले यांच्या मानवतावादाचे, सुधारणावादाचे सम्यक परिवर्तनाचे ग्रामीण साहित्य खऱ्या अर्थाने माणसाचे साहित्य आहे. कथा, कादंबरी प्रमाणे ग्रामीण कवितेचा प्रांत समृद्ध झालेला दिसत नाही.

## सारांश

ग्रामीण साहित्य आणि वास्तवातील अनुभवविश्व यांचा सलगीचा संबंध आहे. साहित्यनिर्मितीचा संबंध सांस्कृतिक जडणघडणीशी असतो. माणूस हे साहित्याच्या केंद्रवर्ती आहे. माणूस माणसाच्या वृत्ती प्रवृत्ती बदलती सामाजिक आर्थिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक परिस्थिती यासर्वांचा परिणाम व प्रभाव साहित्यावर होत असतो. मानवी संवेदनेतून साकारलेले वास्तववादी अनुभवविश्व, अनुभूती यांचे आविष्कारण साहित्यात अभिव्यक्त होते. साहित्य हे सृजनशील असते. नवनव्या जीवन जाणिवांना जन्म देण्याचे कार्य ग्रामीण साहित्य करीत असताना दिसते .ग्रामीण मराठी साहित्याची निर्मिती कथा, कादंबरी, कविता, ललितगद्य इत्यादी वाङ्‌मय प्रकारात झालेली आहे. सर्वच दशकातील ग्रामीण साहित्याचा आढावा घेताना हे लक्षात येते की साहित्य नित्य नव सृजन करीत आहे. नवनिर्माणाचे कार्य मानवी संवेदनशीलतेतून घडत असते आणि बदलत्या वस्तुस्थितीचे दर्शन साहित्य सातत्याने घडवित आहे. काळानुरुप बदलत गेलेल्या गरजा, जाणिवा, भावना, विचार, मानवी जीवनशैली यासर्वांचे प्रतिबिंब ग्रामीण साहित्यात उमटत आहे.

## संदर्भसूची

१. ग्रामीण साहित्य – स्वरूप आणि शोध – डॉ. नागनाथ कोतापल्ले, पृ.७
२. साहित्याचे वर्तन आणि वर्तमान – डॉ. प्रल्हाद लुलेकर, पृ. ८ साकेत प्रकाशन २००८
३. साहित्यातील ग्रामीणता – ग्रामीण साहित्य विशेषांक, १९८०,–आनंद यादव, पृ.४३
४. ग्रामीण साहित्य : एक चिंतन, द.ता. भोसले, पुणे १९८८ पृ. ४३–४४
५. वाङ्मयीन संज्ञा –संकल्पना कोश : संपा. प्रभा गणोरकर व इतर, मुंबई २००१ पृ.२००

❖❖❖

# समाज परिवर्तन आणि ग्रामीण साहित्य

प्रा. रा.तु. आदे
सहयोगी प्राध्यापक
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ
E Mail: rajuade2512@gmail.com Mob. 9422608715
(दोन पुस्तकांचे सहसंपादन, सचिव, अम. विद्या. मराठी प्राध्यापक परिषद)

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतातील शहरी व ग्रामीण भागात आमूलाग्र परिवर्तन झालेले दिसत आहे. राजकीय, सामाजिक,शैक्षणिक, सांस्कृतिक व आर्थिक अशा सर्वच क्षेत्रामध्ये हे परिवर्तन पहायला मिळते. या बदलाची गती काही ठिकाणी जोरकस तर काही ठिकाणी मंद आहे. या परिवर्तनाचा 'ग्रामीण मराठी साहित्या'वरही बराच प्रभाव पडला आहे. त्यातून निर्माण झालेल्या कथात्मक स्वरूपाच्या साहित्य निर्मितीची परिवर्तनाच्या अंगाने नोंद घ्यावी म्हणून हा लेखन प्रपंच!

साहित्य ही समाजाची हुबेहुब प्रतिकृती नसते. समाजातील कोणत्या घटकाचे ते प्रतिनिधित्व करत आहे हे नेमकेपणाने सांगता येत नाही. अशा पार्श्वभूमीमध्ये समाजजीवनाचे अस्सल रूप न्याहाळणे, हा महत्त्वाचा विषय ठरू शकतो. भारतीय ग्रामीण समाजजीवनाचे स्वरूप पारंपरिकच आहे, ही गोष्ट सर्वश्रुत आहे. भारतातील ही सारीच खेडूत जनता परंपरेने आखून दिलेल्या जीवनधारणेला चिकटून आहे. श्री. आत्रे यांनी लिहिलेल्या 'गावगाड्या'तून यांचे प्रतिकात्मक रूप साकार झाले आहे. सामूहिकता आणि पारंपरिकता ही या गावगाड्याची दोन चाके, खेड्यातील मुख्य व्यवसाय शेती हा गावगाड्याचा कणा. बलुतेदार, कारू–नारू, फिरस्ते हे सर्व गावगाड्याच्या चाकाचे आरे. शेतकरी आणि शेतमजूर हे गावगाड्याला जुंपलेले दोन बैल. पाटील–कुळकर्णी गावगाड्याचे हाकारे. गावातील जत्रा, उत्सव, विधी, तसेच गावातील हेवेदावे, संघर्ष हे गावगाड्याच्या चाकाचे वंगन, असा हा पारंपरिक 'गावगाडा'. हीच ग्रामीण समाजाची जीवनरहाटी होय. त्यातून ग्रामजीवनातील वास्तव प्रकर्षाने प्रकट झाले आहे. ग्रामजीवनाचे साक्षात दर्शन त्यात घडते.

या गावगाड्याचे चित्रण धनुर्धारी यांच्या 'पिराजी पाटील' या कादंबरीपासून सुरू झाल्याचे मानले जाऊ लागले तर ग्रामीण साहित्याची प्रेरणा हरिभाऊ आपटे यांच्या 'काळ तर मोठा कठीण आला' या दीर्घ कथेपासून झाल्याचे डॉ.आनंद यादव सूचित करतात. खरे तर ग्रामसंस्कृती, शेतकरी, शेतमजूर यांच्याशी संबंधित लेखन 'शेतकऱ्याचा असूड' आणि 'तृतीयरत्न' ह्या नाटकातून महात्मा फुले यांनी पहिल्यांदा केले. शेतकऱ्यांच्या प्रश्नांची त्यांच्या इतकी वस्तुनिष्ठ मांडणी त्यांच्यापूर्वी कुणीही केलेली नाही. त्यांची शेतकऱ्यांविषयीची भावनिक हळहळ व कृतीतील कळवळा उल्लेखनीय स्वरूपाचा आहे. स्वातंत्र्यपूर्व काळी शेती व्यवसायावरच संपूर्ण ग्रामीण समाज व्यवस्था अवलंबून होती. 'काळ तर मोठा कठीण आला' या कथेतून हरिभाऊ आपटे यांनी दुष्काळापीडित शेतकरी कुटुंबाच्या दुर्दशेची, वाताहतीची करुण कहाणी विषद केली आहे. मात्र, त्यातून ग्रामीण समाजजीवनाविषयीची व्यापक जाणीव व्यक्त झाली नाही. तरीही ग्रामजीवनाला अभिव्यक्त करण्याचा पहिला प्रयत्न म्हणून या कथेला मोल प्राप्त झाले आहे.

हरिभाऊंनंतर वि.स.सुखटणकर, लक्ष्मणराव सरदेसाई, बा.द. सातोस्कर, महादेवशास्त्री जोशी यांनी ग्रामीण जीवन जाणिवा साहित्यामधून व्यक्त केल्या. कोंकणचा प्रदेश यातून विपुल प्रमाणात साकार झाला. कथा या वाङ्मयप्रकारातून या लेखकांनी ग्रामीण विश्व साकारले. बोधवादाचा हेतू वा कलाकृतीच्या निर्मितीमागे असला तरी व्यापक जीवनानुभवाच्या दृष्टीने या साहित्यकृती महत्त्वपूर्ण ठरतात. १९२० नंतर गांदीवादाचे लोण खेड्यापाड्यापर्यंत पोहचले होते. कथात्म साहित्यप्रकारातूनही या विचारांना महत्त्व प्राप्त झाले. १९२० नंतर म. गांधी प्रणीत ग्रामोद्धाराची चळवळ गतिमान झाली. त्यामुळे समाजजीवनात एक वेगळेच चैतन्य संचारले. १९३० ते १९५० या कालखंडात जीवनवाद आणि कलावादाला उधाण आले. त्याच्या आवर्तात अनेक कलावंत–साहित्यिक सापडले. वि.स. खांडेकरांच्या बोधवादी लेखनास ते राहत असलेल्या खेड्याच्या परिसरातूनच वैचारिक प्रेरणा मिळत होत्या. परंतु त्यांच्या साहित्यात ग्रामीण जीवन जाणिवा उमटल्या नाहीत. म.गांधींच्या 'खेड्याकडे चला' या संदेशामुळे शहरी–मध्यमवर्गीय मंडळी जी ग्रामीण जीवनदर्शनासाठी आसुसली होती तिला 'जानपद' साहित्यामुळे ग्रामीण जीवनाचे वास्तव परिचित झाले. म.गांधींनी देशाच्या सर्वांगीण विकासाचे लक्ष 'भारतीय खेडे' बनवले. पण साहित्याच्या क्षेत्रात त्याचा फारच वरवरचा, भाबडा अर्थ घेतला गेला, हे ग्रामीण जीवनावरील रोमॅंटिक प्रवृत्तीचे ग्रामीण साहित्य पाहिल्यास प्रकर्षाने ध्यानात येते. (उदा. ग.ल. ठोकळ, र.वा. दिघे,

द.र. कवठेकर यांच्या साहित्यकृती.) या सर्वांच्या साहित्यकृतीमधून ग्रामीण जीवन तांत्रिक चौकटीत रंजकतेने व्यक्त होत होते. या सर्वांच्या साहित्यकृतीत काही ठिकाणी अस्सल गावरानपणा दिसतो. जिवंत निसर्गवर्णने आढळतात. ग्रामीण माणसाचा रांगडेपणाही दिसतो; पण त्यांच्या लेखनामागे ग्रामभिमुखता आढळत नाही. या सुमारास खेड्यांमध्येही फार मोठे स्थित्यंतर झाल्याचे जाणवत नव्हते. गांधीयुगात गावगाडाही पारंपरिकच होतो. अलुतेदार–बलुतेदार परंपरेतही फारसा बदल झाला नव्हता. मात्र, म.गांधींच्या ग्रामोध्दार चळवळीची व सुतकताई, ग्रामसफाई, प्रभात फेऱ्या या कार्यक्रमांची रेचलेच वाढली होती. देशप्रेमाचा मंत्र सर्वांच्या मनात निनादत होता.

ग्रामजीवनातील जीवघेण्या मूलभूत समस्या, निसर्ग आणि शेतकरी यांच्यातील सनातन संघर्ष, जातीव्यवस्था, दारिद्रय, अज्ञान,अंधश्रद्धा यामुळे चिखलात रुतलेला गावगाडा याचे समर्थ चित्रण 'जानपद' म्हटल्या जाणाऱ्या साहित्यात आढळत नाही. 'खेड्यामधले घर कौलारू' याच्या पलीकडे कलावंताची दृष्टी जात नाही. त्यांना केवळ खेड्याचे आकर्षण आहे पण वास्तव जाणिवा त्यातून व्यक्त झालेल्या दिसत नाही.

१९४० ते ५० च्या दशकात मराठी साहित्या नवविचाराचे वारे वाहू लागले. दुसऱ्या महायुद्धाच्या भीषण उत्पाताने कुंठीत झालेले मानवी जीवन, जीवनाविषयी अनिश्चितता, औद्योगिक क्रांतीने निर्माण केलेल्या समस्या, जीवनातील एकारलेपणा या सर्वांमुळे वैफल्यग्रस्त बनलेले मानवी मन, भांबावून गेले. त्या मनाच्या तळाशी जाऊन साहित्यातून त्या व्यथा मांडण्याचा प्रयत्न बा.सी. मर्ढेकरांनी कविता–कादंबरीमधून केला तर व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, द.मा. मिरासदार, रणजीत देसाई, उद्धव शेळके या लेखकानी ग्रामीण अनुभूतीचे प्रत्यक्ष चित्रण करण्याचा प्रयत्न आपल्या (कथा,कादंबरी) कलाकृतीमधून केला. यानंतर आनंद यादव, रा.रं. बोराडे यांचेही साहित्य क्षेत्रात पदार्पण झाले.

नवसाहित्याच्या या प्रवाहात व्यंकटेश मागडगूळकरांच्या 'बनगरवाडी', 'माणदेशी माणसे' शंकर पाटलांचे वळीव, आभाळ, या कथासंग्रहाचे मिरासदारांच्या 'माझ्या बापाची पेंड', 'भूताचा जन्म' या कथासंग्रहाचा रणजीत देसाई यांच्या 'माझा गावा', 'बारी' या कादंबऱ्यांचा उद्धव शेळकेंच्या 'धग' या कादंबरीचा उल्लेख करावा लागेल. या सुमारास कोणत्याही तंत्राला, प्रवाहाला न जुमानता श्री.म. माटे आणि अण्णाभाऊ साठे यांचेही लेखन सुरू होते. या दोन्ही लेखकांचा विचार मराठी ग्रामीण साहित्याने अग्रस्थानी ठेवावा, या योग्यतेचा आहे. या दोघांच्याही लेखनात 'गावगाड्या'तील बहुतेक सर्वच घटकांना स्थान मिळाले आहे. या लेखकांनीच ग्रामीण जीवनवास्तव त्याच्या बहुविध अंगोपांगासह आपल्या साहित्यकृतीतून रेखाटले आहे. या दृष्टीने या दोन्ही लेखकांची फारशी दखल घेतली गेली नाही. श्री.म. माटे यांचे 'उपेक्षितांचे अंतरंग', 'माणुसकीचा गहिवर' हे कथात्मक साहित्य आणि अण्णाभाऊ साठे यांचे जवळ जवळ सर्वच कथात्मक साहित्य दार्शनिक म्हणून जिवंतपणे आविष्कृत झालेले आहे.

१५ ऑगस्ट १९४७ साली देशाला स्वातंत्र्य मिळाले. ग्रामीण भागात यावेळी 'गाववाड्या'चे नूतनीकरण सुरू झाले. जुनी ग्रामीण व्यवस्था जाऊन नवी लोकशाहीप्रणीत 'पंचायत राज व्यवस्था' कार्यान्वित झाली. अर्थकारणाची व राजकारणाची चक्रे खेडयाकडे वळू लागली. पाटील जाऊन सरपंच आले. सावकारी जाऊन सहकारी बँका आल्या; परंतु यावेळी 'डोके तेच टोपी नवी' असे काहीसे चित्र खेड्यात निर्माण झाले. पिळवणुकीचे स्वरूप बदलले, पण ती थांबली नाही. या नव्या बदलाने ग्रामीण समाज मानस बदलले नाही. जाती व्यवस्था नष्ट झाली नाही. चावडीत बसून पाटील गर्जायचे, ते फक्त पंचायतीत बसून ओरडू लागले इतकेच. जुना नांगर अडगळ ठरू लागला. त्याजागी ट्रॅक्टर आला; पण रानाचे दैन्य हटण्याऐवजी वाढलेच. गावकी, भावकी, हेवदावे, जाती संघर्ष, गावातील उत्सव,सणवार, अंधश्रध्दा यामध्ये बदल घडला नाही.

नवसाहित्याच्या प्रभावाखालचे परंतु ग्रामीण वास्तवाचे चित्रण करणारे ग्रामीण साहित्य जरी 'कलात्मक' नागर अभिरूचीशी सन्मुख असले तरी ग्रामीण समाजजीवनातील परितर्वनाच्या खुणा यातील काही महत्त्वाच्या साहित्यकृतीत उमटलेल्या आढळतात. व्यंकटेश मागडगूळकरांची 'सर्व्हीस मोटार' ही कथा त्या दृष्टीने बघण्यासारखी आहे. एका पारंपारिक खेड्यात 'सर्व्हीस मोटारी'चे आगमन होते आणि त्या मोटारीमुळेच खेडुताचे कुटुंब, त्याचे भावविश्व पूर्णत: उद्ध्वस्त होते. या कथेच्या माध्यमातून माडगुळकरांनी ग्रामीण समाजजीवनातील परिवर्तनाची पहिली खूण 'सर्व्हीस मोटार' मधून व्यक्त केली आहे.

१९६० ते १९८० या कालखंडात ग्रामीण समाज परिवर्तनास खऱ्या अर्थाने प्रारंभ झाला असे म्हणता येईल. शेतीची नवी अवजारे, नवीन बी–बियाणे, नवी कीटनाशके, पिके घेण्याच्या नवीन पध्दती, संकरीत जनावरे, नवे ग्रामीण उद्योगधंदे, कार्यकारी सोसायटी, राजकारण, आरोग्यव्यवस्था, पाणी पुरवठा योजना, साखर कारखाने, शेतीविषयक नवे कायदे, वाहन व्यवस्था आणि आसपासच्या परिसरात होऊ लागलेला शिक्षणाचा प्रसार या सगळ्यांचा प्रभाव ग्रामीणांच्या जीवनावर झाल्याशिवाय राहिला नाही.

१ मे १९६० रोजी 'महाराष्ट्र राज्याची स्थापना' झाली व त्या पाठोपाठ महाराष्ट्राच्या नव्या घडणीसाठी स्वीकारलेले कृषी औद्योगिक धोरणही परिणामकारक ठरले. या सर्वांचा परिणाम म्हणून ग्रामीण भागात बदलाचे वारे सोसाट्याने वाहू लागले. उच्च शिक्षण घेऊन खेड्यातील तरुणही सजग होऊ लागला. त्याला वास्तवाचे नव्याने भान येऊ लागले.

याच सुमारास मराठी साहित्याचे केंद्रही उपेक्षित स्तराकडे सरकू लागले. आजवर अंधारात असलेली अनेक भावविश्वे प्रकाशात येऊ लागली. ग्रामीण भागात सुशिक्षित तरुण मने नव्याने साहित्यविश्वाकडे बघू लागली. त्यांच्यात स्वानुभव शब्दांकित करण्याच्या ऊर्मी निर्माण होऊ लागल्या. आपली मानसिकता कागदावर उतरविण्याचा प्रयत्न तो करू लागला. आनंद यादव, रा.रं. बोराडे, चारूता सागर या लेखकांनी या कालखंडात अत्यंत अं:करणस्पर्शी कथात्म लेखनास प्रारंभ केला होता. कलात्मकतेतही त्यांनी सांभाळलेली ग्रामाभिमुखता उल्लेखनीय ठरली आहे. किंबहुना त्यांनी नागर अभिरूची सन्मुखतेच फाटा देऊन आपले अनुभवविश्व धीटपणे शब्दबद्ध केले. याच सुमारास 'ग्रामीण साहित्य' ही नवी संकल्पना मराठी साहित्यात मूळ धरू लागली होती. मराठी साहित्याच्या मुख्य धारेलाच ग्रामीण, दलित, जनवादी असे छोटे छोटे प्रवाह फुटले. साहित्याच्या या स्थित्यंतरामुळे पूर्वीची जानपद, प्रादेशिक ही विशेषणे मागे पडून 'ग्रामीण साहित्य' अशा नव्या वैशिष्ट्यपूर्ण साहित्य प्रवाहास अभ्यासकांमध्ये मान्यता मिळू लागली. या निमित्ताने ग्रामीण साहित्याच्या वैशिष्ट्यांचे, त्याच्या वेगळेपणाचे विचारमंथनही प्रभावीपणे सुरू झाले. मात्र ग्रामीण साहित्यामागील प्रेरणा आणि ग्रामीण साहित्याची नेमकी व्याख्या सर्वांना मान्य होईल अशी करता आली नाही.

ग्रामीण साहित्य 'गाववाडयाचे, कृषिकेंद्रीत समाज व्यवस्थेचे प्रतिनिधीत्व करते हे मान्य केले तर गाववाडयातील, कृषिकेंद्रीत समाजव्यवस्थेशी निगडीत असलेल्या दलितांच्या सामाजिक दु:खाचे चित्रण ग्रामीण साहित्यात आढळत नाही. ग्रामीण साहित्यिकांनी त्यांची दखल घेतली नाही. 'दलित साहित्य' म्हणून नावारूपास आलेल्या प्रवाहाने वेगळेच भावविश्व उत्कटपणे साकारले. त्यामुळे गाववाडयांच्या चाकाचे आरेच निखळून पडले आणि पारंपरिक गाववाडा अशा अर्धवट अवस्थेत त्याच चिखलात रूतून राहिला. म्हणूनच गावकुसाच्या आतील विविध जातीच्या जीवनाचे, त्यांच्यावरील अन्यायाचे चित्र ज्या साहित्यात उमटेल त्यालाच केवळ 'ग्रामीण साहित्य' म्हणावे हे मत पुढे आले. पण तेही एकांगी ठरवले गेले. कृषिकेंद्रीतता आणि निसर्ग सन्मुखता हा ग्रामीण समाजव्यवस्थेचा पाया आहे, असे मत पुढे मांडले गेले पण आजच्या ग्रामीण जीवनाच्या बदलत्या प्रवाहात हे मत किती काळ तग धरू शकेल याविषयी साशंकता आहे.

१९६० नंतर विविध योजना आणि सुधारणा यांच्या माध्यमातून खेडयाच्या विकासाची चक्रे फिरू लागली. त्यामुळे पारंपरिक शेतीव्यवसायाच्या अस्तित्वाविषयी प्रश्नचिन्ह उभे राहिले. शेती व्यवसायाकडे आणि जनावरांकडे पहिल्यांदाच फायद्या तोटयाच्या दृष्टीने पाहिले जाऊ लागले. आनंद यादवांच्या 'गोतावळा' या कादंबरीत या उद्ध्वस्त समाजजीवनाचे चित्रण कलात्मकतेने आणि फारच परिणामकारक रीतीने उतरले आहे. नांगराच्या जागी ट्रॅक्टर आला. मोटा मोडल्या त्या जागी विजेची मोटार आली. गावातली जात्याची घरघर बंद झाली. पिठाच्या गिरण्यांनी त्यांची जागा घेतली. जुने जाऊन, त्या जागी नवे आले. सुधारणेच्या पाऊलखुणा त्यातून जाणवू लागल्या. गावालगतच्या मोठया गावात कासरे, खुरपी, कुदळी, तयार चप्पल, तयार कपडे, दागिने मिळू लागले. ग्रामव्यवस्थेतील या सुधारणांमुळे साधन आणि श्रम यामध्ये कायापालट सुरू झाला. पण समाजव्यवस्थेत मात्र फरक पडला नाही. धर्म, जात, इतिहास, परंपरा यात कोणताही फरक पडला नाही.

१९८० नंतर शेतीकडे फायद्या—तोट्याच्या दृष्टीने पाहिले जाऊ लागले. शेती परवडत नसेल तर फुकून टाकण्याची भाषा बोलली जाऊ लागली. शेतकऱ्यांच्या मानसिकतेत झालेला हा बदल लक्षणीय स्वरूपाचा आहे. शिक्षण संस्थांच्या निर्मितीमुळे शिक्षणाचे प्रमाण वाढले. सुशिक्षित मुलांना शेतीत काम करणे कमीपणाचे वाटू लागले. कष्टाची सवय कमी होऊ लागली. 'कसेल त्याची शेती' हा विचार मागे पडून 'पैसा असेल त्याची शेती' ही नवी धारणा दृढ झाली. पैसा असणाऱ्या व्यक्ती शेतीमध्ये नानाविध स्वरूपाचे प्रयोग करू लागली आहेत. फळबागा, फुलांची शेती, भाजीपाला, मत्स्यशेती, ग्रीन हाऊस असे नवनवीन प्रयोग शेतीमध्ये केले जात आहेत. त्यामुळे पारंपरिक शेतीव्यवसायाला उतरती कळा लागल्यासारखी वाटते आहे. कमी श्रमात अधिक उत्पादन, अधिक नफा असे नवे समीकरण तयार होत आहे. शेती व्यवसाय मूळ शेतकऱ्यांकडून धनिकांच्या हाती जाताना दिसत आहे. शेतकऱ्याचा शेतीशी असणारा भावनिक संबंध दुरावत चालला आहे. शिक्षीतांची शेतीप्रती असणारी कमालीची उदासिनता, बदललेले सामाजिक पर्यावरण, शेतीकडे हलके काम म्हणून बघण्याची मनोवृत्ती, यामुळे शेती करण्याची प्रवत्तीच दिवसेंदिवस क्षीण होताना दिसत आहे. १९८० नंतर झालेल्या या सर्व बदलांची नोंद ग्रामीण साहित्यातून घेतली जात आहे.

१९८० नंतर बदलत्या ग्रामीण वास्तवाचे चित्रण नागनाथ कोत्तापल्ले, भास्कर चंदनशिव, मोहन पाटील, राजन गवस, वसंत केशव पाटील इ. लेखकांच्या साहित्यकृतीतून प्रत्ययास येते. बदलत्या ग्रामीण वास्तवात या लेखकांची मानसिकता घडलेली आहे, असे लक्षात येते. आजचा खेड्यातील तरुण मोठ्या विचित्र मन:स्थितीतून वाटचाल करत आहे. त्याला मिळालेले शिक्षण, घरची ओढग्रस्त परिस्थिती, शहरी आक्रमणाचा जाच, नवा जातीसंघर्ष, नवा वर्ग संघर्ष, किळस आणणारे नीतिशून्य राजकारण, भ्रष्टाचार, पारंपरिक जीवन मूल्यांचा ऱ्हास, तुटणारी कुटुंबव्यवस्था, दुरावणारी नाती—गोती, हरपत चाललेली संवेदनशीलता, लुप्त होत चाललेली विश्वासार्हता, आदर्शाचे बदलते संदर्भ, या सर्वामध्ये टिकून राहण्यासाठी करावी लागणारी धडपड यातच तरुणाई पिचून गेली आहे. संघर्षाच्या नवनवीन पातळ्या त्याच्यासमोर उभ्या आहेत. संघर्ष करावयाचा पण कुणाशी? या प्रश्नाने हा तरुण हतबल झालेला आहे. या तरुणाईचे समर्थ चित्रण आजच्या ग्रामीण साहित्यात बऱ्याच प्रमाणात होताना दिसत आहे. या दृष्टीने नागनाथ कोतापल्ले यांची 'गांधारीचे डोळे', मोहन पाटील यांची 'लिंगाड आणि खांदेपालट', राजन गवस यांची 'धिंगाणा', वसंत पाटील यांचा 'छप्पर' हा कथासंग्रह या साहित्यकृती लक्षात घेण्यासारख्या आहेत.

आजच्या ग्रामीण समाजव्यवस्थेत होत असलेले परिवर्तन अशा प्रकारचे आहे. अर्थात साहित्य या मूल्यात्म भावनेला त्यामुळे काही ढळ पोहचेल असे नाही. साहित्य म्हणून त्याचे मूल्य अबाधित राहील. ग्रामीण समाजजीवनातील परिवर्तनाचे ग्रामीण साहित्यात पडलेले प्रतिबिंब काहीसे असे आहे.

## संदर्भग्रंथसूची

१. मा.ना. कागणे, मराठी प्रादेशिक वाङ्मय, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती १९५६, प्रका. गोदावरी प्रकाशन 'मंगलप्रभा' औरंगाबाद.

२. द.ता. भोसले, ग्रामीण साहित्य : एक चिंतन, मेहता पब्लिसींग हाऊस, पुणे—३०, प्रथमावृत्ती १९८८ प्रका.अनिल मेहता.

३. वा.गो. आपटे, मराठी शब्द रत्नाकर,केशव भिकाजी ढवळे, प्रकाशन, द्वितीयावृत्तीचे पुनर्मुद्रण १९८९, प्रका. धनंजय बाळकृष्ण ढवळे, मुंबई.

४. भाऊ मांडवकर, गजरा, सेवा प्रकाशन, अमरावती.

५. अक्षरवाटा, ग.सु.पाटील,अनमोल प्रकाशन,पुणे—२. प्रथमावृत्ती १९८२ प्रका. मो.द.नांदुरकर,पुणे.

६. श्रीराम गुंदेकर, ग्रामीण साहित्य प्रेरणा आणि प्रयोजन, प्रकाशन १५ ऑगस्ट १९९९, प्रका.राजीव बर्वे दिलीपराव प्रकाशन प्रा.लि.पुणे.

७. आनंद यादव, ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या कोतापल्ले नागनाथ, ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध.

८. वासुदेव मुलाटे, ग्रामीण साहित्य चळवळ आणि आम्ही, मेहता पब्लिशिंग हाऊस, प्रथमावृत्ती जानेवारी १९९६.

❖❖❖

# मराठीतील नवा साहित्य प्रवाह: आदिवासी साहित्य

अनिता अर्जुन कांबळे
सहा. प्राध्यापक, मराठी विभाग
फुलसिंग नाईक महाविद्यालय, पुसद, जि. यवतमाळ
भ्रमणध्वनी ८१८००७१५८२

## प्रस्तावना

आदिवासी साहित्याला मराठीतील नवा साहित्यप्रवाह समजण्यात आले. तशी चर्चाही मराठी साहित्यक्षेत्रात सुरू झाली. दलित साहित्य प्रवाह निर्माण झाला तो आजवरील अनन्वित अन्याय—अत्याचाराने, विषमताजनक परिस्थितीने असे म्हणता येणार नाही. कारण अशी परिस्थिती तत्पूर्वीही होती. त्यांच्या मुक्या वेदनांना वाचा देण्याचे काम, अस्मिता जागे करण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विराट व्यक्तिमत्त्वाने प्राप्त झाले. या प्रभाव निर्मितीतून साकार झालेल्या दलित सहित्यप्ररणेने समाजातील शोषित आदिवासी, विमुक्त भटक्या जातीजमाती यांनाही अभिव्यक्तीचे बळ मिळाले. आणि दलित साहित्याप्रमाणे, आदिवासी साहित्य, प्रवाह निर्माण झाले ती निर्माण होणेही गरजेचे होते.

## बीजकल्पना

आदिवासी साहित्य: मराठीतील नवा साहित्यप्रवाह याविषयी अभ्यासक व समीक्षक यांचे विचारविमर्श हा या लेखनाचा विषय आहे.

## उद्देश

१. आदिवासी साहित्य: मराठीतल नवा साहित्यप्रवाह म्हणून निर्माण होण्यामागची गरज स्पष्ट करणे.

## गृहितक

१. शोषितांच्या साहित्याला नाकारण्याची परंपरावादी प्रस्थापित मराठी साहित्यिकांची मानसिकता दिसून येते.

## विषय विवेचन

स्वातंत्र्योत्तर कालखंडात शिक्षण, सुधारणा, लोकशाही या माध्यमातून विकासाचा जास्त लाभ समाजातील सुस्थीर व प्रगत घटकाला जलदरीत्या करून घेता आला. त्यामानाने समाजातील दुर्लक्षित, पिचलेले जे शोषित स्तर आहेत त्यांच्यापर्यंत ही विकासाची साधने उशीरा पोहोचल्याचे व पाहोचले तरी त्याचा फारसा लाभ त्यांना न झाल्याचे दिसून येते. समाजातील शोषित स्तरावर शोषकवर्गाचा विकास अवलंबून असलेला दिसतो. याविरोधात विविध महापुरुषांची विचारधारा व क्रांतिकारक चळवळीने शह दिलेला दिसतो. शोषित वर्गालाही सन्मानाने जगता यावे. स्वातंत्र्य—समता—मूलभूत अधिकारांचा लाभ घेऊन स्वत:चा विकास करता यावा हा प्रयत्न विस्तृत पातळीवर संविधानाच्या माध्यमातून झालेला दिसेल. विविध आंदोलने, चळवळीने समाजातील विकासापासून वंचित असलेले समाजस्तर दलित, विमुक्त भटके, आदिवासी, श्रमिक कामगार हळुहळू जागृत होऊन अभिव्यक्त होऊ लागले; परंतु एकीकडे हे चित्र समाधानकारक वाटत असताना सामाजिक परिस्थिती मात्र विषमताजनकच होती. जातीयव्यवस्थेच्या पाशांनी समाज आवळला जाऊन आहे तेथेच थांबवल्या जात होता; परंतु विषमताजनक परिस्थितीने, होणाऱ्या अन्याय —अत्याचाराच्या रेट्याने अभिव्यक्तीला शब्दरूप मिळाले. अशीच मते व्यक्त करीत शरणकुमार लिंबाळे म्हणतात, ''—विषमव्यवस्था व त्याविरुद्धचे असमाधान यामुळे समाजात वेदना आणि विद्रोहाने पेट घेतला, त्याचेच वाङ्मयीन रूप म्हणजे स्वातंत्र्योत्तर काळातील वाङ्मयीन प्रवाह होय.''

मराठी साहित्यात साठोत्तरी वेगवेगळे वाङ्मयीन प्रवाह निर्माण झालेले दिसून येतात. दलित, ग्रामीण, जनवादी, स्त्रीवादी, मुस्लिम, ख्रिश्चन, विमुक्त भटके, आदिवासी या साहित्य प्रवाहात मूलत: फरक दिसून येतो.

भारतीय विविधांगी जाती–जमातीची संरचना विचारात घेता, समाज–स्तरावर विविध जातीच्या, धर्माच्या छावणीतून हे निर्माण झालेले साहित्य आहे. असे समजण्याचे कारण नाही. उलट एकेक समाजस्तर, समाजघटक आपापला स्वतंत्र हुंकार, वेदना घेऊन अभिव्यक्त होत असलेला दिसेल. दलित वर्गाप्रमाणे जातियतेचे तीव्र चटके इतर वर्गाच्या वाट्याला आले नसले तरी स्वातंत्र्यप्राप्तीनंतर वर्णवर्गश्रेणी–बद्धतेचे व शोषणाचे बळी हे इतर घटकही ठरलेले दिसतात. या समाजघटकांचे वर्णन प्रस्थापितांच्या साहित्यात फारसे झालेले दिसत नाही. झाले ते सहानुभूतीच्या पातळीवर. त्यांच्या अस्मिता व अस्तित्वाला उजागर करणारे वर्णन घडणे दुरापास्त. आंबेडकरी जाणिवेने विषमतेविरुद्ध उफाळलेला विद्रोह, समानता व स्वातंत्र्याचा जागर शोषित वर्गानाही दिशा–दर्शन देणारा ठरला. खरे तर इथल्या जातीय व्यवस्थेचा ताण साहित्यप्रवाहावर पडणे अपरिहार्य होते. कुठल्याच जाती–जमातीचा जसा आपसात सुसंवाद नव्हता तसा तो साहित्यातही दिसून येत नव्हता. आभासपर असे वाटत असले तरी तो खरा नव्हता आणि म्हणूनच मराठी साहित्यात नवनवे साहित्यप्रवाह निर्माण झाले. हे प्रवाह निर्माण होणे काळाची गरज होती. हे प्रवाह निर्माण व्हावे, टीका–प्रतिटीकेच्या फैरीत नवसाहित्याचे प्रवाह अवगुंठीत होऊ नये, तर ते फळावे, फुलावे अशी विचारधारा समोर आली. भालचंद्र फडके यासंदर्भात म्हणतात की,''–कोणत्याही भाषेतील जिवंत साहित्यात नित्य नवे प्रवाह निर्माण झाले नाहीत किंवा नव्या भाषेतील जाणिवेतून लेखन करणारा लेखकवर्ग उदयास आला नाही तर ते साहित्य नि:सत्त्व व दुबळे होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आजवर जे दबलेले होते, दडपले गेलेले होते, पिळले गेलेले होते त्यांचा स्वर, त्यांची वेदना, त्यांचा विद्रोह त्यांच्याच लेखणीतून व्यक्त होत आहे. याचे मराठी माणसाने स्वागत केले पाहीजे.''सर्व शोषितांच्या साहित्यालाच हे मत लागू पडणारे आहे.

विशेषत्वाने मांडाविषयी बाब ही की, समाजातील शोषित स्तर जेव्हा आपल्या भाषेत, आपल्या स्वरात बोलू लागतो, लिहू लागतो तेव्हा इथला आधीचा परंपरावादी असा फार मोठा वर्ग त्यांच्यावर टीका करणारा असतो. परंतु या टीकेची फारशी तमा न बाळगता आंतरिक वेदना, वंचना, विद्रोह निषेधाच्या स्वरूपात तो प्रवाह सारखा अभिव्यक्त होत राहतो, तेव्हा त्याला कुठलाही वाङ्मयीन प्रवाह समृद्ध करायचा नसतो वा कुठल्याही साहित्याचा चेहरा–मोहरा बदलायचा नसतो. फक्त अभिव्यक्त होणे हीच त्याची खरी आंतरिक गरज असते. त्यातून जे काही सत्व सामर्थ्यानिशी आविष्कृत होतात, ते कुठल्याही साहित्याला आपसूकच समृद्ध करतात. म्हणूनच शरणकुमार लिंबाळे साहित्यात अभिव्यक्त होणारा नवा प्रवाह चैतन्य युक्त असेल, त्याच्या अंगी सामर्थ्य असेल तर त्याचा विचार करावाच लागतो हे मांडलेले मत संयुक्तिक वाटणारे आहे. मराठी साहित्यात षोशितांच्या साहित्याची फारषी दखल घेतलेली दिसून येत नसली तरी या नवसाहित्याने मराठी साहित्यातील साचलेपणा दूर करीत, जबरदस्त हादरा दिला व त्यांचे दरवाजे किलकिले केलेत असे मत डॉ. शरणकुमार लिंबाळे मांडतात व पुढे म्हणतात,''–कुठल्याही वाङ्मयीन प्रवाहाची निकोप वाढ होण्यासाठी 'टीका–प्रतिटीका' महत्त्वाची असते. वेगळ्या अनुभवांचे साहित्य हे पारंपरिक चौकटीत बसत नाही. त्यांची चर्चा व चिकित्सा करायची असेल तर वेगळीच झाली पाहीजे. वाङ्मयीन प्रवाहाला वेगळे काढून त्याचे मूल्यमापन करणे यात वाङ्मयाची हानी नसून, वाङ्मय समृद्ध करणारी कृती ठरते. नव्या प्रवाहाची स्वतंत्रपणे दखल घेतली नाही तर या प्रवाहाचा विकास होणार नाही.''

दलित साहित्य प्रवाहाने सर्व शोषितांशी नाते जोडल्यावर निर्माण झालेल्या आदिवासी साहित्याची वेगळी चूल कशासाठी? हा प्रश्न निर्माण करण्यात आला. दलित साहित्याला त्याच्या आत्मगत मर्यादेमुळे आदिवासींच्या व्यथा–वेदना व जीवन जाणिवांना न्याय देता येणे शक्य नव्हते. आदिवासी साहित्यिकांच्या जीवन–जाणिवांतून साकार झालेल्या या साहित्यात एक नवा वेगळा स्वर होता. आंतरिक वेदना होती जी ताकतीने स्वानुभवाच्या पातळीवर दलित जाणिवेपेक्षा वेगळी अभिव्यक्त झाली होती. कड्या–कपारीत जीवन जगणाऱ्या वंचित समाजसमूहाच्या व्यथा–वेदनांचा तो प्रतिनिधिक साहित्याचा प्रवाह नवा होता. दलित साहित्य प्रवाहात जे जे शोषित घटक येणारे होते त्यांनी अन्यायी व्यवस्थेविरोधात विरोधी सूर लावला. आदिवासींच्या वेगळया नव्या साहित्यप्रवाहाची आवश्यकता डॉ. गोविंद गारे म्हणतात की,''–ब्राम्हणी संस्कृतीच्या विरोधातला प्रत्येक लढा हा आपला आपण मानायला हवा. प्रस्थापितांचे साहित्य हे शोषक व्यवस्थेला पोषकच असते. म्हणन त्याला बाजूला करून चाललेले दलित, आदिवासी, ग्रामीण, स्त्री, जनसाहित्य संमेलने आपण  आपलेच मानून, आपले स्वतंत्र अस्तित्व कायम ठेवून आपण सर्वांनी त्यात सहभागी व्हायला हवेत. समाजाच्या दु:खाची आणि सामाजिक जीवनातील व्यवहाराची रचना व अस्तित्वाची तीव्रता वेगळी आहे.त्यामुळे निर्माण झालेले साहित्यपण निश्‍चित वेगळे असावे लागतील. त्यामुळे आदिवासींच्या वेगळ्या साहित्यप्रवाहाची आवश्यकता आहे.''अशाच स्वरूपाचे मत वाहरू सोनवणे या आदिवासी कवींनीही व्यक्त केलेले दिसेल.

आदिवासी साहित्याला मराठीतीतल नवा साहित्यप्रवाह म्हणून उल्लेखित केल्यामुळे डॉ. विनायक तुमराम या आदिवासी समीक्षक, साहित्यिकांना मात्र हा उल्लेख मान्य असलेला दिसत नाही. ते म्हणतात, ''—मराठी वाङ्मयातील नवीन प्रवाह म्हणून का होईना, मान्यता देऊन विद्यापीठीय अभ्यासक्रमात त्याचा समावेश केला आहे; परंतु आदिवासी साहित्य इतर कोणत्याही साहित्याची प्रतिकृती नाही. ते स्वतंत्र, स्वयंभू व स्वयंसिद्ध आहे. आदिवासी साहित्य हे मराठी साहित्याचेच नव्हे तर विश्वसाहित्याचे वैभवलेणे आहे, अशी माझी धारणा आहे. आणि म्हणूनच हे साहित्य मराठी वाङ्मयातील केवळ एक प्रवाह हा समज मी आधी नाकारतो.'' डॉ. तुमरामांच्या मतांचा विचार करता सुरुवातीला त्यांनी आदिवासी साहित्याला नवीन साहित्य प्रवाह म्हणून अनुकुलता दर्शवलेली आहे. नंतर मात्र 'नवे साहित्य प्रवाह' या मताला समज संबोधून नाकारले आहे. नाकारल्याचे संदर्भ देताना आदिवासींचे प्राचीन पृथकत्व, अस्तित्वाची पूर्वपीठिका लक्षात घेऊन विश्वसाहित्याचे वैभवलेणे मानले आहे. या ठिकाणी विशेषत्वाने हे लक्षात घेणे गरजेचे आहे. की आदिवासी साहित्याची अभिव्यक्ती तीन दशकातील असताना, आदिवासींच्या मूळ अस्तित्वाची पूर्वपीठिका आदिवासी साहित्याने अंगीकारणे त्यांच्या अस्मितेचा भाग जरी असला तरी, साहित्याच्या अभिव्यक्तीचा कालखंड लक्षात घेणे गरजेचे आहे. डॉ. मधुकर वाकोडेंनीसुद्धा अशाच स्वरूपाची प्रतिक्रिया व्यक्त करताना तीन दशकाच्या या वाङ्मयप्रवाहाला अस्तित्व नाही आणि जे अस्तित्व आहे ते अद्याप प्रारंभिक पातळीवरचे असूनही अशी भूमिका घेणे वाङ्मयीन चळवळीच्या दृष्टीने अपायकारक मानले आहे, त्यामुळेच या मतांचा विचार करणे गरजेचे आहे.

आदिवासी साहित्याला 'मराठीतील नवा साहित्यप्रवाह' मानण्याचे कारण या साहित्यातील आदिवासी जीवन जाणिवानुभवांचे नवेपण, उठावाचे चित्रण, अभिव्यक्तीत सच्चा सूर व एकंदरीत वेगळेपण लक्षात घेऊन म्हटल्या गेले आहे. तेव्हा सारसार विचार करता यावर निकोप चर्चा होणेही गरजेचे वाटते.

## निष्कर्ष

१. आदिवासी साहित्य मराठीतील एक नवा साहित्य प्रवाह म्हणून नाकारणारी परंपरावादी मानसिकता कालांतराने त्या प्रवाहाला स्वीकारताना दिसते.

## संदर्भ

१. शरणकुमार लिंबाळे — साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह
२. डॉ. भालचंद्र फडके — दलित साहित्य वेदना व विद्रोह
३. गोविंद गारे (संकलन) — आदिवासी साहित्य संमेलन अध्यक्षीय भाषणे
४. डॉ. विनायक तुमराम — आदिवासी साहित्य दिशा आणि दर्शन

❖❖❖

# वैदर्भीय मराठी गझलेतील सामाजिक जाणीव

प्रा. संजय एस. पोहरे
सहायक प्राध्यापक, मराठी विभाग
श्री शिवाजी महाविद्यालय, अकोला
E mail: sspohare@gmail.com भ्रमणध्वनी ९८२२२९६१२७

## प्रस्तावना

विदर्भ हा हिंदी भाषिक प्रांताशी लागून असल्यामुळे, विदर्भाच्या बोली–भाषेवर हिंदी भाषेचा निरंतर प्रभाव राहिला व त्या संयोगाने वैदर्भीय मराठी अस्तीत्वात आली. गझल हा साहित्य प्रकार फारशीतून अरबीत व अरबीतून उर्दू–हिंदी–मराठी असा आलेला आहे. गझल हा फारशी शब्द 'गजाला' म्हणजे हरिणीचे पाडस, कोशातील अर्थ – कातना, बुनना असा आहे. प्रेमाची वा शृंगाराची कविता उर्दू–हिंदी भाषिकांच्या संपर्कातून वैदर्भीय मराठी भाषिक प्रांतात आली. विदर्भातील बुलडाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा तालुक्यातील साखरखेर्डा या गावी 'अमृतराय' यांनी मराठीत पहिली ज्ञात गझलसदृश्य रचना लिहिली. उदा. 'जग व्यापका हरिला नाही कसे म्हणावे' या रचनेचा कालखंड इ.स. १७२९ मानला जातो. माधव ज्युलियन, ना.ग.ज ोशी, प्रा. रमेश तेंडुलकर ह्या अभ्यासकांनी अमृतरायांच्या या रचनेचा उल्लेख मराठीतील पहिली ज्ञात गझल म्हणून केलेला आहे. १९७४ पासून मराठीमध्ये सक्षम गझल लिहिल्या गेली. त्यामध्ये वैदर्भीय गझल सम्राट सुरेश भटांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. त्याचप्रमाणे उ.रा. गिरी, श्रीकृष्ण राऊत, अनिल पाटील, राम पंडित, अरुण सांगोळे, शिवाजी जवरे, श्रीकांत कोरान्ने इत्यादी गझलकारांच्या गझलेचा अभ्यास एक महत्त्वाचा टप्पा म्हणून करावा लागेल.

आंबेडकरी साहित्य १९६० पासून लिहिल्या गेले. परंतु आंबेडकरी गझलेचा प्रवास १९९० च्या दशकापासून सक्षम आलेला दिसतो. सामाजिक समता आणि विश्वबंधुतेसाठी प्रामुख्याने नकार आणि विद्रोह व्यक्त करणारी गझल विदर्भामध्ये सिद्धार्थ भगत व गौरवकुमार आठवले यांच्या गझलेमध्ये दिसते तसेच अनेक नवोदित गझलकारांच्या गझलेचा अभ्यास करून ते मांडता येईल.

गझल हा प्रभावी काव्यप्रकार असल्यामुळे गझल लिहिणारा आधी उत्तम कवी असला पाहिजे, असे गझल सम्राट म्हणून मराठी कवितेमध्ये ज्यांना ओळखले जाते असे सुरेश भट म्हणतात. ती गझलेची पूर्व अटच आहे; परंतु मराठी कवितेमध्ये गझलेची उपेक्षा होताना दिसते. ती का हा सुद्धा संशोधनाचा विषय आहे. गझल सांप्रत काळासाठी फारच प्रभावी माध्यम आहे; कारण गझलेमध्ये प्रत्येक ओळीच्या कवितेला 'शेर' असे म्हणतात. प्रत्येक 'शेर' हा आपल्या जागी एक संपूर्ण अभिव्यक्ती असलेली स्वतंत्र कविताच असते. नेहमीची कविता सलग असते. तिचे एक आशयसूत्र असते. आणि म्हणूनच ती उलगडत जाते; पण गझल उलगडत नसते, एकाच गझलेत विविध विषय हाताळले जाऊ शकतात. म्हणजेच प्रत्येक शेराचा आशय स्वतंत्र असू शकतो किंवा एकत्र संवेदना, एकच भाव एकच मूड असलेले सर्व शेर असू शकतात. जर आपण गझलेमधून कोणताही शेर बाहेर वेगळा काढून त्याचे चिंतन केले तर मागचा पुढचा कोणताही संदर्भ किंवा संबंध असूनही तो शेर म्हणजे एक संपूर्ण अभिव्यक्ती असलेली एक वेगळी कविताच असल्याचे आढळून येते. आणि हेच गझलेचे खरे गमक आहे.

मराठी कविता ही संत, पंत, तंत या प्रवाहातून आधुनिकतेकडे आली आहे. कारण 'विरक्ती ही काव्याच्या दरबारातील सर्वश्रेष्ठ भावना नसून अनुरुक्ती हीच सर्वश्रेष्ठ भावना आहे. हे केशवसुतादी रोमँटिक–सौंदर्यवादी कवींनीच ओळखले व धीटपणे उद्घोषित केले. या त्यांच्या सौंदर्यपूजक स्फुरणाच्या काळी त्याच्या समोर दोनच वाटा होत्या. एक तर इंग्रजी रोमँटिक कवींची सुरात गायचे नाहीतर जुन्या खेडवळ असंस्कृत लावणीकारांच्या पंक्तीला बसायचे.' असे समीक्षक श्री.के.क्षीरसागर म्हणतात. मराठी कवितेला इंग्रजीखेरीज उर्दू शायरीसारखी सुंदर नाजूक आणि नखरेल, आत्मपूजक सोबतीन होती. आणि त्याचप्रवाहातून ही पुढे आलेली मराठी गझल आहे.

मराठी कवितेतील सामाजिक जाणीव हा मराठी कवितेचा आत्मा आहे. आणि सामाजिक जाणीव मराठी कवितेतून वजा केली तर फारसे काही उरणार नाही. असे म्हणणे जरी अतिशयोक्तीचे वाटत असले तरी ते वास्तव आहे. असेच म्हणावे लागेल. वर्तमान काळात तरुण पिढी ही गझलेकडे आकृष्ट झालेली आहे. कारण

कमी शब्दात प्रभावी भावना व्यक्त करण्याचे माध्यम गझल आहे. त्यामुळे तरुण पिढीपर्यंत सामाजिक जाणिवेची गझल पोचावी या उद्देशाने या संशोधनामध्ये मराठीतील निवडक गझलकारांचा अभ्यास अपेक्षित आहे. ज्यामध्ये शिवाजी जवरे, डॉ.श्रीकृष्ण राऊत, सिद्धार्थ भगत, गौरवकुमार आठवले या गझलकारांच्या सामाजिक गझलांचा अभ्यास करता येईल.

## संशोधन समस्येचा उगम

विदर्भातील मराठी गझलेला मानसन्मान मिळवून दिला आणि मराठी कवितेच्या प्रवाहाला आणखी समृद्ध बनविले, या टप्प्याचा शोध घेणे. प्रचंड मोठ्या प्रमाणात मराठी कवितेचा वाचक वर्ग आहे. आणि मराठी कवितेतील गझलेचे वेगळेपण शोधणे, गझलेतील सामाजिक जाणीव विचार तत्त्वज्ञान याचा शोध घेणे. वैदर्भीय मराठी भाषा ही जागतिक भाषा जरी नसली तरी या भाषेतील मूल्ये, ही आंतरराष्ट्रीय नक्कीच आहेत. सामाजिक गझलेच्या माध्यमातून लोकशाही व मानवाधिकार या जागतिक विचाराचा अभ्यास करुन स्वातंत्र्य, समता आणि विश्वबंधुता या मूल्यांचा वैदर्भीय मराठी गझलेच्या माध्यमातून विचार करता येईल.

## संशोधन अभ्यासाचे महत्त्व

साहित्यातून आलेली प्राचीन मूल्ये आजही आपल्या मनावर अधिराज्य गाजवित आहेत. परंतु आधुनिक भारताच्या अर्वाचीन मूल्यांचा वा सुख–दुःखाचा, समस्या व निराकरणाचा विचार सामाजिक गझलेच्या माध्यमातून नवीन पिढीला मार्गदर्शक व दिशादर्शक ठरू शकतो.

## संशोधनाची उद्दिष्टे

प्रस्तुत संशोधन प्रकल्पातून

१. विदर्भातील गझलकारांचा शोध घेतला

२. मराठी कवितेतील गझलेचे वेगळेपण मांडले

३. सामाजिक गझलेचा अभ्यासाची मांडणी केली.

४.

## संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधन प्राथमिक व द्वितीय तथ्य संकलनावर आधारित आहे. संशोधनामध्ये–प्राथमिक तथ्य संकलनातील माहिती. तद्वतच द्वितीय तथ्य संकलनासाठी ग्रंथालयातील ग्रंथ व पुस्तकांचा उपयोग करण्यात आला. तसेच संकेतस्थळावरील गझलकारांच्या माहितींचा उपयोग करण्यात आला. प्रस्तुत संशोधन प्रकल्प पुढीलप्रमाणे संशोधनपद्धतीचा उपयोग केला.

१. तुलनात्मक संशोधन पद्धती, २. ग्रंथ समीक्षणात्मक अभ्यास पद्धती, ३. संकेतस्थळावरील गझल पेजचा अभ्यास

## सारांश

प्रेमभावना हा गझलेचा आद्य विषय आहे हे कालौघात मागे पडून गझलेत समकालीन जीवनातील गुंतागुंत ताणतणाव, भेदभाव संकल्पना, एकात्मता, आंतरिक द्वंद्व, सामाजिक विषमता, सांस्कृतिक संघर्ष असे अनेक विषय येताना दिसतात. यातील  सामाजिक जाणिवेची गझल एक महत्त्वाचा टप्पा आहे.

एका धर्माची जोखड खांद्यवर घेतलेला कवी निधर्मी, सेक्युलर असावा लागतो. कुठल्यातरी एका धर्माची जोखड खांद्यावर घेतलेला कवी हा व्यापक अर्थाची गझल लिहू शकतो.

''ये सारा जिस्म झुककर बोझसे दुहरा हुआ होगा
मै सजदे मे नही था, आपका धोका हुआ होगा.''

असे कवी दुष्यंतकुमाराने सांगणे नि –

''छान झाले भाविकांची पंढरी उद्ध्वस्त झाली
एकही वाचाळ दिंडी यापुढे निघणार नाही.''

यामध्ये एक धार्मिक बंडखोरीची छटा आहे. दोघांनी हा चिकित्सेचा राजरोसपणा केला. तसेच सुरेश भट आपल्या नामांतर या गझलेमध्ये म्हणतात—

''राख सांभाळून ठेवा राख झालेल्या घराची
संपली नाही लढाई यार हो नामांतराची !''
''संतहो, आम्ही जरी हे जन्मण्याचे पाप केले
लागली नाही आम्हाला लूत रोगी ईश्वराची''

मराठीमध्ये फार थोड्या कवींनी गझल हा काव्यप्रकार हाताळण्याचा प्रयत्न केला. सुरेश भट हे त्यांच्यापैकी एक महत्त्वाचे कवी आहेत. किंबहुना प्रभावी आणि अर्थपूर्ण गझला लिहिणे हे सुरेश भटाचे सामर्थ्य आहे.

गझलेमध्ये दोन ओळींचा एक 'शेर' असतो. अशा अनेक शेरांनी मिळून गझल तयार होत असते. याचा अर्थ असा की, अनेक शेरांमधून एक अर्थपूर्ण कविता साकार होते. परंतु त्याचवेळी प्रत्येक शेर हा सुटा वाचला तरी तो स्वयंपूर्ण असतो. म्हणजे तो एकाचवेळी स्वतंत्रही असतो आणि त्याचवेळी तो त्या संपूर्ण कवितेचा एक भागही असतो. अशी ही वैशिष्ट्यपूर्ण रचना असते.

येथे नामांतराच्या आंदोलनानंतरच्या उद्ध्वस्ततेचा अनुभव कवी व्यक्त करीत आहे. तसेच परिवर्तनवाद्यांनाही जो जागृत करीत आहे. अजून लढाई संपलेली नाही, जे आपले विरोधक आहेत त्यांची जिंदगी तरी केवढी, असे त्यांना धीर देतो आहे. नामांतराचा लढा हा केवळ विद्यापीठ नामांतराचा नसून तो माणुसकीचा, माणुसकीच्या प्रस्थापनेचा लढा आहे असे सांगतो आहे.

आपल्यासाठी काल आणि आजही अंधारच आहे. याची जाणीव करून देउन कवी प्रस्तापितांच्या 'मोडक्या जहाजाची' आणि त्यांच्या कोत्या मनोवृत्तीची जाणीव करून देतो. तसेच येणारा प्रत्येक सत्ताधारी कसायाचा रूपानेच येतो. हे भीषण वास्तवही कवी प्रकट करतो. परंतु असे सगळे असले तरी अभंग आत्मविश्वास आणि मूल्यावरील निष्ठा यांमधून  शोषितांचा भविष्यकाळ उज्ज्वलच असणार याची खात्री कवी कवितेच्या शेवटी देतो.

सुरेश भटानंतर सक्षम गझल लिहिणारे विदर्भातील गझलकार म्हणून श्रीकृष्ण राऊत यांचे नाव घ्यावे लागेल. त्यांच्या सामाजिक जाणिवेच्या गझलेमध्ये धर्माच्या नावाखाली सोईच्या स्वरूपात लोक धर्माचाही वापर करतात आणि ढोंगीपणाने वागतात. अशा संधीसाधूंना कवी म्हणतात —

''पिंडास टाळणाऱ्या सर्वज्ञ कावळ्यांनी
गुंतून ठेवलेली प्राणात सर्व नाती''
''नीतीस वाव नाही, धर्मास भाव नाही
मृत्यूस काय त्याचे जाती तशा जमाती''

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या सामाजिक समतेच्या मानवतावादी चळवळीला सुरुवात केली आणि महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह, काळाराम मंदिर प्रवेश व हिंदू कोड बिल, महिलांच्या हक्कासाठी दिलेला आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा कवी थोडक्या शब्दात मांडतात—

''रामाने काळ्या तेव्हा दारास उघडले होते
जेव्हा तू समतेसाठी धडधडला तोफेवाणी''
''अबलांच्या पाठीमागे कायदा उभा तू केला
शिवलेल्या ओठांवर मग हक्काची आली गाणी''

सामाजिक समतेसाठी ज्या संतांनी वारकरी चळवळीच्या माध्यमातून आध्यात्मिक लोकशाही महाराष्ट्रामध्ये निर्माण केली त्यांच्या विचारांची होणारी बनवेगिरी, नकलीपणाचे बुरखे कवी टराटरा फाडतात—

''अहो ज्ञानेश्वरा टाका जुन्या ओव्या दुरुस्तीला
फुकाचा मारुनी रंधा इथे देतात मंबाजी''
''तुकारामा, अरे ह्यांना जरा तू हाण पैजारा
मुखोटा लावूनी फिरती तुझ्या वेशात मंबाजी''

महात्मा फुल्यांच्या चळवळीचा भाग असावा आणि फुल्यांनी ज्या स्वर्ग—नर्क संकल्पनेवर टीका केली आणि ही काल्पनिक आहेत हे सांगितले तेच सामाजिक जाणिवेतून कवी बोलतात—

''स्वर्ग छान कल्पना, मोक्ष फालतूपणा
चालला कुठे असा शोधण्या दिगंत तू''

गझलचा स्थायीभाव प्रेम कवितेचा आहे, असे सर्वत्र म्हटल्या जाते. त्यामध्येही प्रेम कवितेच्या माध्यमातूनही सामाजिक जाणीव फार प्रभावीपणे मांडल्या जाउ शकते याचे छान उदाहरण सिद्धार्थ भगत यांच्या कवितेचे देता येईल —

''जखमा अजून ओल्या असतील जाणतो मी
भरतील घाव हेही भरतील जाणतो मी
रणकंदनात ज्यांचे बरबाद जन्म झाले
उसळून ते नव्याने लढतील जाणतो मी
अजुनी न थंड झाले नजरेतले निखारे
तव एक फुंकरीने फुलतील जाणतो मी''

प्रियकर आपल्या प्रेयसीला समजावताना सामाजिक वास्तव अवगत करुन देत आहे. आपल्या प्रेम विरहाच्या जखमा भरतील परंतु आपल्या प्रेमाने जातियतेचे रंग येउन परत जुना संघर्ष पुढे उभा होऊ शकतो. किंवा आतापर्यंत गुण्यागोविंदाने राहणारे थोडी जातीयता विसरलेले आपले आप्त, परत आपल्या अशा एकत्र आल्याने दोन समाजात तेढ निर्माण होईल म्हणून आपण येथेच थांबणे हिताचे आहे. येथे कुसुमाग्रजांच्या 'तू उंच गढी राहशी' या सामाजिक व प्रेम कवितेच्या पुढचा टप्पा या कवितेतून दिसतो.

मराठी कवितेमध्ये सामाजिक जाणीव हा महत्त्वाचा भाग आहे. त्याच अनुषंगाने गझलेतही सामाजिक जाणिवेतून खूप मोठ्या प्रमाणात लेखन होत आहे, ही आनंदाची वा भाषिक समृद्धतेची बाब आहे म्हणायला हरकत नाही.

## संदर्भ ग्रंथ

१. गुलाल आणि इतर गझला — डॉ .श्रीकृष्ण राउत
२. झंझावात — सुरेश भट
३. विदर्भाची मराठी गझल — भीमराव पांचाळ, संपादन
४. वैखरी भाग—२ — संपादन, संगाबा अमरावती विद्यापीठ
५. साठोत्तरी हिंदी गझल — डॉ.मधू खराटे

❖❖❖

# लोकसाहित्य : व्याख्या, महत्त्व आणि प्रयोजन

प्रा. डॉ. वीरा मांडवकर
एम.ए. मराठी, इतिहास, बी.एड., पीएच.डी., सेट
सहा. प्राध्यापक, मराठी विभाग
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५४०१
E mail: pavanmandavkar@yahoo.com भ्रमणध्वनी ९४०३०१४८८५
(८ पुस्तके, राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावरील ७ शोधनिबंध, २ पुरस्कार, प्रकाशक, संस्था विश्वस्त, संचालक, डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र)

## गोषवारा

लोकसाहित्य हा शब्द इंग्रजीतील 'फोकलोअर' Folklore या शब्दाचा पर्यायी शब्द म्हणून वापरला जातो. म्हणजेच फोकलोअर या शब्दाच्या कक्षेत जो आशय येतो, तोच आशय लोकसाहित्य या शब्दाच्याही कक्षेत समाविष्ट होतो. लोकसाहित्यातील लोक हा शब्द अत्यंत महत्त्वाचा आहे. लोक हा शब्द सामान्य माणूस किंवा स्थान या दोन्ही अर्थाने वापरला जातो. या लोकांची परंपरा असलेले साहित्य म्हणजे लोकसाहित्य अशीही त्याची उत्पत्ती सांगितली जाते. लोकसाहित्य म्हणजे सर्वसामान्य लोकांचे साहित्य. हे साहित्य लोकांकडूनच निर्माण झालेले असते. सहजपूर्तता आणि अनामिकता ही त्याची वैशिष्ट्ये आहेत. लोकांमध्ये प्रचलित असलेल्या मौखिक परंपरा लोकसाहित्यात असतात. लोकसाहित्याची निर्मिती प्रारंभकाळी कुणीतरी केलेली असते. त्यावेळी त्या साहित्याला नाममुद्रा असते. कालांतराने या लोकसाहित्याचा निर्माता, त्याच्यावर असलेली नाममुद्रा गळून पडते. असे वाङ्मय अपौरुषेय अनाम बनते. याचा अर्थ असा नाही की त्या साहित्याला कोणी निर्माताच नाही. लोकवाङ्मय विशिष्ट जनसमूहाने आपली जनसमूहाची निर्मिती म्हणून स्वीकारलेले असते.

**बीजशब्द** : लोकसाहित्य, लोक, परंपरा, संस्कृती, समाज, अभ्यासक

## लोकसाहित्याची व्याख्या

लोकसाहित्याची व्याख्या कोणत्याही एका दृष्टिकोनातून करणे शक्य नाही. मानववंशशास्त्रज्ञ लोकसाहित्याची व्याख्या करताना लोकसमूहातील चालत आलेल्या प्राचीन अवशेषांवर भर देतात. समाजशास्त्रज्ञ लोकसमूहाच्या भौतिक परंपरेला महत्त्व देतात. मानसशास्त्राच्या दृष्टीने विचार करणारे, लोकसाहित्यातून लोकमानसाचा आविष्कार होतो, अशी भूमिका घेतात. यापैकी कोणत्याही एका दृष्टिकोनातून विचार केल्यास लोकसाहित्याच्या विशेषांचा आणि लक्षणांचा बोध होईल अशी समाधानकारक व्याख्या अजून तयार करता आली नाही. तरी विविध अभ्यासकांनी केलेल्या सर्वसमावेशक अशा व्याख्या येथे मांडणे उचित ठरेल.

### जोनास बॅलीस

जोनास बॅलीस म्हणतात, 'लोकसाहित्य हे आदिमानव निर्मित असून परंपराप्राप्त असते. याचबरोबर सुसंस्कृत मानवाने देखील निर्मिलेले असते. ही निर्मिती ध्वनी व शब्द याद्वारे केली जाते. लोकसाहित्यात लोकविश्वास, लोकभ्रम, लोकरूढी, लोककलाप्रकार, त्याचप्रमाणे नृत्य, नाट्य यांचा अंतर्भाव होतो.

### गास्टर

गास्टर यांच्या मते, 'लोकसाहित्य हे लौकिक परंपरांचा निधी असते. लोकजीवनाचा सर्वसंग्राहक असा तो घटक असतो. ते लोकांचे, लोकांनी निर्माण केलेले आणि लोकांसाठी असते. त्यातून लोकांची प्रकृती आणि सर्जनशीलता प्रकट होत असते. त्याचप्रमाणे त्यात व्यक्तिविशिष्टत्व नसते, तर समूहनिर्मित सर्जनक्षमता प्रभावी असते.'

### डॉ. प्रभाकर मांडे

गास्टर यांच्याप्रमाणेच डॉ. प्रभाकर मांडे यांच्या मते 'लोकांमध्ये प्रचलित असलेल्या मौखिक परंपरा म्हणजेच लोकसाहित्य असते. लोकसाहित्य हे लोकांचे असते, व्यक्तीचे कधीही नसते.'

डॉ. गंगाधर मोरजे

'लोकसाहित्य म्हणजे केवळ मौखिक स्वरूपात चालत आलेला वाङ्मयप्रकार नाही. उलट मौखिक आशय विधीसंबंधित कृती व अभिनय यांच्याद्वारा सादर केलेला तो प्रयोग असतो. तो प्रयोग श्राव्य, व दृश्य असतो. म्हणजेच लोकसाहित्य ही प्रयोगात्मक कला आहे.

डॉ. सरोजिनी बाबर

डॉ सरोजिनी बाबर म्हणतात, 'विविध प्रकारांच्या जातिवंत स्वरविलासांनी शिणगारलेले व अशिक्षितांनी कितीक वर्षांमागे रचले असतानाही पाठांतराच्या बळावर पिढ्यान्‌पिढ्या आपल्या नवनवोन्मेषशालिनी तेजाने पुढच्या पिढीला उत्तेजित करणारे ते लोकसाहित्य.'

अशा अनेक अभ्यासकांच्या व्याख्याच्या मतांचा परामर्श घेता लोकसाहित्याची काही लक्षणे निश्चितच सांगता येतात की, लोकसाहित्य हे मौखिक किंवा अलिखित स्वरूपात असते. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे त्याचे संक्रमण होत असते. पारंपरिकता हा लोकसाहित्याचा महत्त्वाचा विशेष होय. लोकसाहित्याचा कर्ता अज्ञात असतो. लोकसाहित्याला संहिता नसते. पूर्वकालीन संस्कृतीच्या रूपाने ते समाजात प्रचलित असते. लोकसाहित्य हे कला व वाङ्मय यांचे स्रोत असते. लोकसाहित्य हे एकाचवेळी परिवर्तनशील व पारंपरिक असते.

## लोकसाहित्याचे महत्त्व

'इंग्रजीत लोकसाहित्याला 'फोकलोअर' (Folklore) असा शब्द आहे. ही संज्ञा थॉमसन या अमेरिकेतील जागतिक कीर्तीच्या अभ्यासकाने इ.स. १८४६ साली प्रचारात आणली. 'फोक' शब्दाचा अर्थ लोक, जनलोक असाच आहे.'[१] जनजीवनातील आणि जनमानसातील भावना, कल्पना, विचारप्रवाह, रूढी, आदर्श यांचे दर्पण म्हणजे लोकसाहित्य. भारतीय परंपरा आणि संस्कृती या दृष्टीने लोकसाहित्याचे स्थान उच्च आहे. लोकसाहित्याची तुलना ही वेद, पुराणे, श्रुती, स्मृती, शास्त्रे, इतिहास यांच्याशी केली जाते. त्याचे वैशिष्ट्य म्हणजे ते लिखित, ग्रंथित वा लिपिबद्ध नाही. तर ते निसर्गनिर्मित मानवांच्या प्रकृतीशी पूर्णत: संबंधित आणि जीवनाशी समर्पित राहून प्रवर्तित झालेले आद्य अलिखित अक्षर वाङ्मय आहे. श्रीमती दुर्गा भागवत लोकसाहित्याचे महत्त्व विशद करताना म्हणतात, 'लोकसाहित्य ही उच्च दर्जाची श्रुती आहे. उदात्त संहिता आहे. प्रभावी लोकगाथा आहे, आणि अलिखित पण अभिजात व अक्षरवाङ्मयात मोडणारा भारतीय जीवन संस्कृतिदर्शक, प्रेरक इतिहास आहे. तो अमर आहे यात संदेह नाही. लोकसाहित्याचा अभ्यास म्हणजे संस्कृतीच्या अभिसरणाचा अभ्यास आहे. संस्कृतीचे सातत्य आणि तिच्यात होणारे बदल त्याचे निरीक्षण करावयाचे झाले तर ते लोकसाहित्यात करावे लागते.'[२]

## लोकसाहित्याचे प्रयोजन

लोकसाहित्याद्वारे कळत नकळत का होईना, पण अनेक महत्त्वाची कार्ये पार पाडली जातात. विशेषत: तळागाळापर्यंत लोकसाहित्य पोचत असल्यामुळे त्याची व्याप्ती जास्त असते. म्हणूनच लोकसाहित्याचे महत्त्व अजूनच वाढते. लोकसाहित्याच्या प्रयोजनासंबंधी विचार करता पुढील गोष्टी प्रामुख्याने लक्षात येतात.

## १. नीतीशिक्षण

लोकसाहित्यात दिसणाऱ्या समाजातील प्रचलित रूढी, परंपरा, प्रथा, नीतीकथा, प्राणीकथा याद्वारे उच्च प्रकारचे नीतीशिक्षण समाजाला मिळत असते. समाजात कसे वागावे, पारंपरिक आचारविचार, पेहराव, राहणी, खाद्यपदार्थ याविषयीच्या संकेतांविषयी माहिती लोकसाहित्यातून समाजाला मिळते. संस्कृतीचे वहन लोकसाहित्यातून होत असल्यामुळे व्यक्तीच्या स्वैरतेला आळा बसतो. सामाजिक संकेतांचे, परंपरांचे पालन आपल्याला करायचे आहे, ही भावना लहानथोरांपर्यंत सगळ्यांच्या मनात निर्माण होते. समाजात कोणते कृत्य मान्य आहे, कोणते निषिद्ध आहे, याची माहिती मिळते. ही सगळी ज्ञानगंगा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत असते.

## २. अनौपचारिक शिक्षणाचे माध्यम

परंपरागत व्यावसायिक कौशल्ये जसे विविध प्रकारच्या गाठी बांधण्याचे कौशल्य, मांडे, बाशिंग बनविण्याचे कौशल्य, कलात्मक आविष्कार, जसे लोकनृत्य, लोकचित्रे यांचे कुठलेही प्रशिक्षण वर्ग नसताना हे ज्ञान एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत असते. कुंभार, सुतार, लोहार, चांभार यांचे हस्तकौशल्य हेसुद्धा कुठेही न शिकता पुढच्या पिढीपर्यंत पोचते. जातिअंतर्गत सांकेतिक बोली, क्षेत्रदेवता, लोकदेवतांची परंपरा असे संस्कृतीचे शिक्षण लोकसाहित्याच्या स्वरूपात प्रवाहीपणे पुढेपुढे वाहत राहते.लोकसाहित्याच्या अशा स्वरूपाच्या संक्रमणामुळे समाजजीवनात परंपरासातत्य असते.

## ३. राष्ट्रीय ऐक्य

अनेक सण, उत्सव, धार्मिक विधी परंपरागत पद्धतीने साजरे केले जातात. त्यामुळे एकटेपणाची भावना लोप पावते. माणूस हा तसाही समाजशील प्राणी आहे, म्हणूनच एकत्रितरीत्या आनंद, दु:ख व्यक्त करणे त्याला आवडते. लोकपरंपरा याचसाठी निर्माण झाल्या असाव्यात. सर्वांसोबत सण, समारंभ साजरे केल्याने लोकसमुह एका समान नात्याने एकत्र बांधला जातो. आपण एकटे आहोत ही भावना नष्ट होऊन आपण लोकसमूहाचे घटक आहोत ही जाणीव निर्माण होते. अर्थातच त्यामुळे राष्ट्रीय ऐक्य निर्माण होण्यास हातभार लागतो. मानसिक ताणाचा निचरा होतो.

## ४. सामाजिक संस्थांचा आधार

समाजात परंपरेने चालत आलेल्या सामाजिक संस्थांना लोकसाहित्यामुळे आधार लाभतो. कुटुंबसंस्था, विवाह संस्था यांच्या विधींमध्ये थोडाफार बदल होत असला तरीही त्याचे मूळ स्वरूप कायम राहते. निरनिराळ्या सामाजिक संस्था तसेच धार्मिक संस्थांचे स्वरूप, त्यांचे कार्य याची माहिती लोकसाहित्यातून मिळत असते.

## ५. स्वप्नरंजन

लोकसाहित्यामुळे माणसाला काही क्षणांपुरता का होईना अद्‌भुतरम्यतेत प्रवेश मिळतो. जीवनातील दु:ख, चिंता, निराशा, अपयश यांतून काही काळापुरता मुक्ती मिळाल्याने त्याच्या मनातील ताण नाहीसे होतात. लोकनृत्यातील सहभागामुळे त्याच्या शरीराला आणि मनाला तजेला मिळतो. लोककलांमुळे तो थोड्यावेळासाठी का होईना आपल्या मनाचा राजा होतो. या भावनेमुळे त्याला वेगळा आत्मविश्वास मिळतो. त्याचप्रमाणे 'लोकसाहित्य हे सामाजिक निषेधाचे वाहक आहे. लोकगीते, लोककथा, उखाणे, होळीचा फगवा, दिवाळीचे डोयरे, पोळ्याच्या झडत्या, लग्नातील थट्टामस्करी या प्रसंगांद्वारे व्यक्ती स्वत:ची तसेच समाजाची प्रतिक्रिया नोंदवतो. ती समूहाची निर्मिती असल्यामुळे त्यावर कोणी आक्षेपही घेऊ शकत नाही.'[३]

## ६. मनोरंजन

आबालवृद्धांचे मनोरंजन करणारे असेही लोकसाहित्याचे स्वरूप आहे. लोककथा, लोकगीते, म्हणी, उखाणे, यातील कितीतरी भाग मनोरंजनासाठी निर्माण केलेला आहे. विधीनाट्यात विधीचा भाग असला तरी त्यातील नाट्यात्मकतेमुळे त्यात रंजकत्व निर्माण झालेले असते. लोकनृत्य, खेळ यांतून शारीरिक वा मानसिक आनंद मिळतो. पहेलिका, उखाणे यातून बौद्धिक क्रीडेला चालना मिळते. डॉ. गंगाधर मोरजे म्हणतात, 'लोकसाहित्य प्रायोगिक कला आहे. ते विशिष्ट लोकसमूहाचे मनोरंजन करण्याचे त्यांना आल्हाद देण्याचे कार्य करते. कलांच्या आस्वादन प्रक्रियेत आणि लोकसाहित्यातील आस्वादन प्रक्रियेत थोडी भिन्नता जाणवते. लोकसाहित्य निर्मितीचे वा आस्वादाचे प्रयोजन सारखे वा वेगवेगळे असू शकेल, पण लोकसाहित्याचा प्रयोग करणारा आपल्या परीने तो प्रयोग रंजक करीत असतो, हे नाकारता येत नाही. त्याच्या परीने ती कलानिर्मिती असते व ज्या लोकसमूहासमोर ती सादर केली जाते, तो लोकसमूहही 'कला' म्हणून त्या प्रयोगाचा आस्वाद घेत असतो.'[४]

## ७. जनसंपर्काचे प्रभावी माध्यम

प्रबोधन, धर्मजागरण आणि करमणुकीबरोबरच लोकसाहित्याने जनसंपर्काचे माध्यम म्हणून भारतीय जीवनात मोलाची कामगिरी केली आहे. लोककलांना जातीधर्माचे बंधन नसते. संत एकनाथ महाराजांनी भारूडासारख्या लोककलाप्रकाराचा तत्कालीन सामाजिक आणि धार्मिक जागृतीसाठी समर्थपणे वापर केला. महात्मा

फुले यांनी प्रबोधनासाठी लोकसाहित्याचाच आकृतिबंध स्वीकारला. कीर्तनकार, शाहीर यांनीही लोककलांद्वारे भारतात नवजागृती आणण्यासाठी प्रयत्न केले. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात आकाशवाणी, दूरदर्शन, वर्तमानपत्रे अशी प्रभावी माध्यमे असली तरीही माणसाच्या चैतन्ययुक्त वाणीचा प्रत्यक्ष संपर्काचा प्रभाव समोरच्या समुहावर पडतो. तो प्रभाव निर्जीव यंत्रातून पडत नाही. त्या सादर करणाऱ्याबद्दल लोकसमूहाला आपलेपणाची भावना असते. हा सजीवांचा सजीवांशी असलेला व्यवहारजनसंपर्काच्या दृष्टीने निश्चितच प्रभावी ठरतो.

## ८. कलाप्रकारांचे उगमस्थान

विविध कलाप्रकार लोकसाहित्यातून जन्माला आलेले आहेत पुढे त्याच्यात कलात्मक प्रयोगांचा प्रवाह मिसळल्याने त्याचे बदललेले स्वरूप आज आपण पाहतो. उदा. परंपरेने चालत आलेली लोकगीते, लोककथा, चित्रकला, नृत्य, संगीत, लोकनाट्य यांच्यात आधुनिक कलांची बीजे निश्चितच दिसतात. उलट ज्यावेळी एखाद्या कलाप्रकारात साचलेपणा येतो, तेव्हा लोकसाहित्यातून किंवा लोककलेतून संजिवनी मिळालेली आपण पाहतो. जसे वारली पेंटिगला आलेले चांगले दिवस, नाट्यामध्ये लोकसाहित्यातील मिथके, पात्रे किंवा संदर्भ वापरणे, तमाशा, लावणी यांना आलेले चांगले दिवस या दृष्टीने कलाप्रकारांच्या विकासात लोकसाहित्याचा मोठा वाटा आहे.

लोकसाहित्य हे एखाद्या नदीच्या प्रवाहाप्रमाणे अनेक अज्ञात प्रवाहांच्या एकरूपतेतून निर्माण होते. लोकसाहित्याचे स्वरूप विशाल, व्यापक, मनोहर आहे. एकप्रकारचे स्वाभाविक जीवनदर्शन घडविणारा तो एक महान कल्पवृक्ष आहे. म्हणूनच जोपर्यंत समाज आणि मानवाचे अस्तित्व आहे, तोपर्यंत लोकसाहित्य जिवंत राहणार, यात शंका नाही.

## निष्कर्ष

१. लोकसाहित्यातील 'लोक' हा शब्द अत्यंत महत्त्वाचा आहे.

२. लोकसाहित्याच्या विशेषांचा आणि लक्षणांचा बोध होईल अशी समाधानकारक व्याख्या अजून तयार करता आली नाही.

३. लोकसाहित्य हे मौखिक किंवा अलिखित स्वरूपात असते.

४. पारंपरिकता हा लोकसाहित्याचा महत्त्वाचा विशेष होय.

५. लोकसाहित्याचा कर्ता अज्ञात असतो.

६. लोकसाहित्य हे एकाचवेळी परिवर्तनशील व पारंपरिक असते.

७. लोकसाहित्याचा अभ्यास म्हणजे संस्कृतीच्या अभिसरणाचा अभ्यास आहे.

८. एखाद्या कलाप्रकारात साचलेपणा येतो, तेव्हा लोकसाहित्यातून किंवा लोककलेतून त्याला संजिवनी मिळते.

९. लोकसाहित्याचे स्वरूप विशाल, व्यापक, मनोहर आहे.

## संदर्भ

१. मांडवकर, भाऊ, विदर्भ आणि लोकसाहित्यलेखनाचा आलेख, वैदर्भीय लोकसाहित्य, सेवा प्रकाशन, अमरावती, पहिली आवृत्ती, १९८६, पृ. १५

२. भागवत, दुर्गा, प्रस्तावना, लोकसाहित्याची रूपरेखा, वरदा बुक्स, पुणे, दुसरी आवृत्ती, १९७७

३. कालभूत, डॉ. पुरुषोत्तम, लोकसाहित्य : उद्गम आणि विकास, लोकसाहित्य स्वरूप आणि विवेचन, विजय प्रकाशन, नागपूर, पहिली आवृत्ती, २००७, पृ. १०

४. डॉ. गंगाधर मोरजे, प्रस्तावना, लोकसाहित्य: एक स्वतंत्र अभ्यासक्षेत्र, दास्ताने रामचंद्र अँड कं., पुणे, प्रथमावृत्ती १९८५, पृ ८

❖❖❖

# ग्रामीण साहित्य आणि शेतकऱ्यांचे जीवनवास्तव

प्रा. डॉ. गजानन गोपाळराव हेरोळे
सहयोगी प्राध्यापक
श्रीमती कोकिळाबाई गावंडे महिला महाविद्यालय, दर्यापूर, जि. अमरावती
E Mail: dr.herole@gmail.com Mob.No. 9423427063
(वामन निंबाळकरांचे समग्र वाङ्मय व सखीच्या चार ओळी हे दोन ग्रंथ प्रकाशित, बारा पुरस्कारांनी सन्मानित, विविध नियतकालिके व वृत्तपत्रातून विविध विषयांवर स्फुट लेखन)

## सारांश

ग्रामीण साहित्य हे मराठी साहित्याचाच एक भाग आहे. सांप्रत ग्रामीण साहित्याचा सवतासुभा निर्माण झालेला आहे. भारत हा खेड्यांचा देश आहे असे संबोधले जाते. ते खरेच आहे. त्यामुळे खेड्यांचे संदर्भ ग्रामीण साहित्यावर मिळतात ग्रामीण जनजीवन हे पावसावर आधारलेले आहे. शेतीसाठीचा पाऊस आणि देवाधर्मावरील श्रद्धा असा ग्रामीण साहित्याचा गाभा आहे. शेती, शेतकरी, लोकजीवन, लोकसाहित्य आणि दलित साहित्य या सर्व घटकांचा अनुबंध साधणारे ग्रामीण साहित्य हे शेतकरी आणि शेती निगडित समाजजीवनातील अनेक घटकांशी संबंधित आहे. लोकांच्या शेती, रूढी, परंपरांची ओळख करून देत ग्रामीण साहित्याचे बारा बलुतेदार आढळतात. कारू–नारू त्याचप्रमाणे बहुरूपी, गोंधळी, डोंबारी, कोल्हाटी, कडकलक्ष्मी, नंदीबैलवाले, माकडवाले, अस्वलवाले, नागवाले गारुडी हे सर्व भटके लोक, शेतकऱ्यांनी पिकविलेल्या अन्नधान्यावरच गुजराण करतात. शहरी लोक त्यांच्या व्यस्त जीवनशैलीकडे त्यांच्याकडे ढुंकूनही पाहत नाहीत. उलट त्यांना चोर, दरोडेखोर म्हणून त्यांना मारहाण करतात. हाकलून देतात, वेळप्रसंगी त्यांचा खूनही करतात. या संदर्भात नागपूर येथील घटना फार बोलकी आहे. शेतकऱ्यांची दयनीय स्थिती, पावसाचा लहरीपणा यांमुळे हवालदिल झालेला शेतकरी आणि शेतमजूर बकाल आणि बेताल वातावरणात जगत असताना त्याच्यावर अवलंबून असलेले कारू–नारू व बारा बलुतेदार शहराकडे पोट भरण्यासाठी येऊ लागले. अशातच बुलढाणा जिल्ह्यातील काही बहुरूपी नागपूरला कोराडी परिसरात सोंग घेऊन भिक मागण्यासाठी गेले तर त्यांच्यावर जमावाने हल्ला करुन ठार केले. तपासाअंती लक्षात आले की ते चोर नसून बहुरूपी होते.

ग्रामीण साहित्य म्हणजे खेड्यातून जन्माला आलेले साहित्य होय. भारत हा खेड्यांचा देश आहे. या देशाची अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान आहे. शेतीनिष्ट शेतकऱ्यांच्या पिकवण्यावर या देशाची समृद्धी अवलंबून आहे. खेड्यातील भावभावना, संवेदना, आशय आणि विषय जोपासणारे साहित्य म्हणजे ग्रामीण साहित्य! खेडी आणि शहरे यांनी माणसांच्या अस्तित्वावर परिणाम केलेला आहे. माणसाचे व्यक्तिमत्त्व त्यांचे अस्तित्व आणि त्यांचे सुख–दु:खाचे निकष खेड्यांनी आणि शहरांनी बदललेले दिसतात. माणसाच्या संस्कृतीचा विकास आणि अध:पात खेड्यामध्ये व शहरांमध्ये झालेला दिसतो. खेड्यातील माणूस आणि शहरामधील माणूस यांच्यामध्ये बराच फरक आढळतो.

## बीजशब्द

शहरांचे आदिमरूप म्हणजे खेडे होय. खेडी ही अविकसित तर शहरे ही विकसित असतात. खेड्यांच्या तुलनेत शहरामध्ये रोजगार, उद्योगधंदे, व्यापार इत्यादी सुविधा उपलब्ध असतात. सुखाचा शोध घेणारा माणूस शेतीत 'राम' नाही म्हणून शहराकडे ओढला गेला, शहरी झगमगाटात हा शेतकरी माणूस उंच–उंच इमारती, मोठमोठी व्यापारी केंद्रे, रेल्वे, मोबाईल, संगणक, शाळा–महाविद्यालये, विद्यापीठ, चकचकीत डांबरी रस्ते ही वैज्ञानिक प्रगती प्रचंड झाली; परंतु वाढत्या प्रदुषणामुळे शहरी आणि ग्रामीण माणसाची प्रकृती खालावली आणि या वातावरणात माणूस बेचैन होऊ लागला. चिमण्या–कावळे दिसेनासे झाले आणि जंगली श्वापदे मानवी वस्तीत धुमाकुळ घालू लागले. माकड, हरिण, रानडुकरे यांनी शेतकरी आणि शहरी माणसाला सळोकी पळो करून सोडले आहे.

शहरी वातावरणात एक प्रकारची कृत्रिमता, धावपळ, बेगडीपण आहे तर गावखेड्यात अस्सल स्वरूपाचा निसर्ग आहे. शेतजमीन, विहीर, मोट नाडा, विविध पिके विविध फळे–फुले आहेत. हे शेतकरी निसर्गातच अनुभवतो. रात्रंदिवस शेतात राबून शेळ्यामेंढ्या, गाई–गुरे या जिवांसोबत तो राहतो. प्रकृतीने उत्तम असतो.

शहरी माणसांना असणारे लहानमोठे आजार खेडूत माणसाकडे सहजासहजी फिरकतही नाहीत. कारण त्याचा गाई गुरांबारोबच शेण–शेती–माती व गोमुत्राशी सातत्याने संबंध येतो.

बारा बलुतेदारीची पद्धती खेड्यामध्ये होती. आजही ती बऱ्याच खेड्यामध्ये आढळून येते. लोहार, कुंभार, चांभार, महार, मांग अशा अनेक जाती जमीनदाराकडे राब–राब राबत आणि पोटाला मिळणारा कोरभर तुकडा आयुष्यभर चघळत राहत. शैक्षणिक दृष्ट्या खेडे अप्रगत राहिले. परिणाम स्वरूप अज्ञान, अंधश्रद्धा, शोषण यांना उधाण आले. जातीच्या नावाखाली बांधलेले कोंडवाडे खेड्यात भक्कम तटबंदीनिशी उभे आहेत. त्यांनी गोरगरिबांना आणि उपेक्षित जातींना शिक्षणापासून वंचित ठेवले होते. त्यामुळे गुलाम किंवा नोकर म्हणून राबविण्याची प्रथा निर्माण झाली. साहजिक शहरांकडे लोक धाव घ्यावयाला लागले. शहरात शिक्षणाची दारे सतत उघडी आहेत. शहरातल्या बकाल झोपड्या गोरगरिबांनी गच्च भरलेल्या आहेत.

भारतीय संस्कृतीचे मूळ क्षेत्र ग्रामजीवन, कृषिजीवन हे आहे. भारतीय खेडी ही शहरांच्या अगोदरची असून ती वेदकाळापासून अस्तित्वात आहेत. ''हजारो वर्षे अस्तित्वात असलेल्या ह्या खेड्यातून आजही लोकसंस्कृतीचे, कृषी संस्कृतीचे व शेतकरी जीवनवास्तवाचे झरे वाहताना दिसतात. भारतीय स्वातंत्र्योत्तर काळात सरकारी पातळीवर कागदोपत्री तरी चांगले दिवस आले आहेत. लोकशाही आली आणि खेडी, खेड्यातला शेतकरी जागा होऊ लागला या जागृतीची एक महत्त्वपूर्ण खूण म्हणजे अलीकडचे ग्रामीण साहित्य व शेतकऱ्यांचे समाजजीवन होय''[१] कृषी संस्कृती नव्या उन्मेशाने अवतरू पाहते आहे. या नव्या वाटचालीत अनेक प्रश्न निर्माण होतील संक्रमण अवस्थेच्या काळात बरीच उलथापालथ होईल; परंतु ग्रामीण साहित्य व शेतकऱ्यांचे जीवनवास्तव यांचा संबंध अतूट आहे.

ग्रामीण समाजरचना ही प्रामुख्याने कृषिकेंद्रित आहे. ग्रामीण भागातील इतर व्यवसायदेखील कृषिपुरक राहिले आहेत. ''कृषिकेंद्रित समाजरचना ही निसर्गसन्मुख असून ती आदिमतेकडे झुकलेली असते. हजारो वर्षांपासून समाजातील ज्या घटकांचे विविध मार्गांनी दमन झाले ते सर्व प्रस्थापित समाजरचनेस आव्हान देऊ लागले अशी भाषा बोलणारे साहित्य आज मोठ्या प्रमाणात निर्माण होऊ लागले''[२] सामान्य माणसाचे जगण्याचे प्रश्न इतके मोठे असतात की त्याला स्वातंत्र्याचा अर्थच कळत नाही. तेव्हा या सामान्य माणसांना जीवनातील मूल्यांचा अर्थ कळावयाचा असेल तर त्याला हातातोंडाच्या हातघाईतून सोडविले पाहिजे आणि हे तेव्हाच शक्य होईल जेव्हा शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण होणार नाही. या संदर्भात डॉ. म.सु. पगारे यांचे विचार मननीय वाटतात. ''ग्रामीण जीवनव्यवहार हा आमच्या चेहऱ्यावरील मेकअप रखडलेला मूळ चेहरा आहे. या मूळ चेहऱ्याला उपेक्षित ठेवणे म्हणजे मानवी अस्तित्वाची ओळख पुसून टाकण्यासारखे आहे. ग्रामीण जीवनव्यवहाराची ओळख ग्रामीण साहित्यातून होते. ग्रामीण भागातील आचार, विचार, रूढी, परंपरा विकसित होण्यासाठी साहित्यप्रवाहांमध्ये त्याचे समाविष्ट होणे गरजेचे आहे. ग्रामीण साहित्यातून दिसणाऱ्या ग्रामीण व्यवहारांच्या अनेक बाबी शहरी संस्कृतीने जोपासणे आवश्यक आहे. साहित्याचा मानवी चेहरा संस्कारित होण्यासाठी आणि माणसातल्या माणुसकीसाठी ग्रामीण साहित्याचा सन्मान झाला पाहिजे!''[३] अशा ह्या ग्रामीण साहित्य चळवळीने १९६० नंतर ग्रामीण जीवनावर खूप मोठा परिणाम झालेला दिसून येतो. महाराष्ट्र आणि भारतामध्ये एका मोठ्या परिवर्तनाला प्रारंभ झालेला आढळतो.

## प्रस्तावना

ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा महात्मा फुलेंनी लिहिलेल्या साहित्यामधून अधिक स्पष्टपणे मिळतात. त्यामुळे महात्मा फुले हे ग्रामीण जीवनाचे व शेतकरी वर्गाचे आद्यभाष्यकार, आद्यसंशोधक आणि आद्यसाहित्यिक ठरतात. 'शेतकऱ्यांच्या जीवनवास्तवाचे दर्शन घडविणारे 'तृतीय रत्न' हे नाटक महात्मा फुलेंनी १८८५ मध्ये लिहिले आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे जीवन, अंधश्रद्धा व अज्ञानामुळे त्यांची होत असलेली पिळवणूक आणि ढोंगी ज्योतिषाचे कपट–कारस्थान त्यांनी आपल्या लेखणीने समाजासमोर आणले आहे. अंधश्रद्धाळू असणारा समाज भोंदुगिरीने कसा नाडला जातो हे त्यांनी दाखविले आहे. या नाटकात ग्रामीण भागातील एका शेतकऱ्याचे जीवनवास्तव मांडताना एक कुणबी स्त्री व तिचा नवरा दैववादामुळे, अंधश्रद्धेमुळे भोंदूगिरीचे बळी ठरतात.''[४] म. फुलेनी १८८३ मध्ये 'शेतकऱ्यांचा असूड' हा वैचारिक ग्रंथ लिहिला आहे. गेल्या अनेक वर्षापासून शेतकऱ्यांचे खरे शोषण करणारे कोण आहेत, हे बारकाव्यानिशी त्यांनी जनतेसमोर मांडलेले आहे. आपल्या धारदार लेखणीने शेतकऱ्यांचे जीवनवास्तव, अज्ञान, दारिद्र्य, शेतकऱ्यांच्या समस्या यांचे आपल्या ग्रंथातून म. फुले यांनी चिंतन केले आहे. म्हणूनच ग्रामीण कृषिजीवन आणि त्यावरील समस्या नोंदविणारे महात्मा फुले हे ग्रामीण साहित्याचे

जनक ठरतात. ''ज्ञानाची, विद्येची महती समाजमनावर त्यांनी बिंबविली. स्त्री शूद्रातिशूद्र म्हणजे सर्व उपेक्षित समाज हा या देशाचा भाग्यविधाता आहे. शेतकरी हाच या देशाचा पोशिंदा आहे, या ठोस भूमिकेतून त्यांनी 'शेतकऱ्यांचा असूड' हा ग्रंथ लिहिला. शंभर वर्षापूर्वी त्यांनी सहकाराचा कृतिशील पुरस्कार केला. कृषी औद्योगीकरणाचा शेतीच्या अत्याधुनिकरणाचा ते आग्रह धरित असत''५ शेतक–यांच्या शोषणाविरुध्द शेतकरी आंदोलने उभारून शेतकऱ्यांच्या दैनावस्थेला जबादार असणाऱ्या ब्रिटिश सरकारवरही त्यांनी कोरडे ओढले. लोकसंख्येच्या बेसुमार वाढीमुळे शेतीवर पडणारा बोजा, तिचे होणारे तुकडे, पर्यावरणाच्या विनाशामुळे होणारा विध्वंस याकडे विशेषत्वाने लक्ष देण्याची गरज त्यांनी प्रतिपादन केली.

## निष्कर्ष

१. ग्रामीण साहित्य आणि शेतकऱ्यांचे जीवनवास्तव या साहित्यविषयक चळवळीला महाराष्ट्राच्या वाङ्मयीन आणि सांस्कृतिक जीवनात अर्थपूर्ण स्थान लाभले आहे.

२. महात्मा फुले हे ग्रामीण साहित्य आणि शेतकऱ्यांच्या जीवनावास्तवतेचा पुरस्कार करणारे आद्य भाष्यकार संबोधता येतात. त्यांच्या विचार परंपरेतील शाहू, आंबेडकर विचार प्रेरणा ही ग्रामीण समस्यांचे निराकरण करून आशयाला बळ पुरविणारी आहे.

३. ग्रामीण साहित्यात दिसणारे विविध रूढी, परंपरांचे आणि संस्कृतीचे संदर्भ लोकसाहित्यात, दलित साहित्यात आढळतात असल्याने त्यांच्यामध्ये साधर्म्य तसेच वैधर्म्यदेखील आढळते.

४. शेतकरी हाच या देशाचा पोशिंदा आहे. ग्रामीण भागात राहणारे सर्व स्त्रीशूद्रातिशूद्र अर्थात उपेक्षित समाज हा या देशाचा भाग्यविधाता आहे.

५. भारतीय संस्कृतीचे मूळ क्षेत्र ग्रामजीवन आणि कृषीजीवन आहे. यातून शेतकरी जीवनवास्तव वजा करता येत नाही.

## संदर्भ ग्रंथ


१. आनंद यादव, ग्रामीणता साहित्य आणि वास्तव, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथम आवृत्ती १९८१, पृ..१

२. डॉ. नागनाथ कोतापल्ले, ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध, प्रकाशक, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, द्वितीय आवृत्ती १९९३, पृ. ४९

३. डॉ. म.सु. पगारे, 'ग्रामीण साहित्य', साहित्य लोक ग्रामीण आणि दलित, दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती २०१२, पृ. ४८

४. तत्रैव, पृ. ५२

५. य. दि. फडके, 'महात्मा फुले समग्र वाड.मय', सचिव म.रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पाचवी आवृत्ती १९९१, पृ. ६


❖❖❖

# वऱ्हाडी कादंबरीतील ग्रामीणवास्तव आणि शेती जीवन

डॉ. राजेश मिरगे
सहा. प्राध्यापक, मराठी विभाग
श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती.
E Mail: drrajeshmirge@1975gmail.com Mob. No.: 9404710558, 9420875720

वऱ्हाडातील वऱ्हाडी बोलीभाषेतून वऱ्हाडाच्या ग्रामीण भागातील जीवनाचे दर्शन मांडण्यात आले आहे. वऱ्हाडी भाषेतील कथा, कादंबरी, कविता, टीकात्मक समीक्षण लेखनातून व्यक्त झाले आहे. वऱ्हाडी प्रदेशात वऱ्हाडी बोलीभाषा प्रमाण भाषा म्हणून सदैव वापरात आहे. वऱ्हाडातील अनेक लेखकांनी येथील मानवी जीवन आणि त्या ठिकाणचे वास्तव असे वातावरण अगदी निसर्गचित्रणासह सुंदरपणे मांडले आहे. लेखक हा ज्या भागातून, ज्या मातीतून जन्माला येतो, तेथील बोलीभाषेचा परिणाम त्याच्या व्यक्तिजीवनावर निश्चितपणे होतो. स्वातंत्र्यपूर्व काळात सन १९४७ पूर्वी ग्रामीण लेखकांनी लेखन केलेले साहित्य हे गांधीवादी विचारांचा संस्कार झालेले साहित्य असल्याचे आपल्याला जाणवते; परंतु स्वातंत्र्यानंतरच्या कालखंडातील लेखकाचे साहित्यावर, चिंतनशीलतेचा परिणाम दिसून येतो. कारण स्वातंत्र्यानंतरच्या ग्रामीण भागातील लोकजीवनात खूप काही बदल झाला. ग्रामीण भागात झालेला शिक्षणाचा प्रसार हाही त्यात महत्त्वाचा विचार दिसून येतो. शेतकरी आणि शेतमजुरासह गावात राहणारे बारा बलुतेदार यांच्या दैनंदिन जीवनात असलेले दु:ख, व्यथा, वेदनांचे चित्रण, कादंबरीत स्पष्टपणे उमटते. शेती हा जगण्याचा मुख्य आधार असल्याने, शेतीत होणाऱ्या उत्पादनक्षमतेवरच सर्व आर्थिक व्यवस्था अवलंबून राहिली. तसेच एकविसाव्या शतकातील विविध प्रकारच्या वैचारिक बदलाची पार्श्वभूमीसुद्धा ह्या बाबीला कारणीभूत ठरली. शहरे ही अधिक विस्तारित झाली आणि ग्रामीण क्षेत्रातील माणूसही शहराकडे धाव घेऊ लागला. खेड्यातील स्थितीत त्यामुळे परिवर्तन निर्माण झाले. शेतकऱ्यांचे जीवन जगण्याचे तत्त्वज्ञानात बदल झाले. गावे/खेडी ओस पडून सर्वांची धाव शहराकडे होऊ लागली. निरुपाय असल्यानेच काही शेतकरी खेड्यात राहू लागले. काळानुरूपे खेडे स्वरूप त्याचे भावसमृद्ध जीवनाचे विविध रंग, बदलून शेतकऱ्यांची दुरावस्था निर्माण झाली.

मराठी साहित्य सारस्वतात वऱ्हाडी भाषेत लेखन करणाऱ्या लेखकांचे योगदान फार मोठे आहे. भाषेच्या समृद्धी आणि विस्तृततेत आपले अस्तित्व सिद्ध केले आहे. बाजीराव पाटील, उद्धव शेळके, मधुकर वाकोडे, रमेश अंधारे यांच्यासारख्या लेखकांनी आपल्या कादंबरीतून समर्थपणे असे ग्रामीण जीवनातील वास्तव उभे केले आहे. त्यांच्या कादंबऱ्यांतून संबंधित विषयाचा ऊहापोह करण्यात आला आहे. वऱ्हाडी कादंबरीतील ग्रामीण वास्तव शब्दबद्ध करून, शेती जीवनही त्यांनी व्यक्त केल्याचे दिसून येते. स्त्रियांच्या समस्यांचे उत्कृष्ट चित्रण प्रतिभा इंगोलेंसारख्या लेखिकेने दर्जेदार शब्दांत मांडले आहे. पुरुषोत्तम बोरकर, बाबाराव मुसळे, किशोर सानप, रमेश अंधारे यांनी अर्वाचीन म्हणजे साधारणपणे सन १९७५ नंतरच्या कालखंडातील ग्रामीण वास्तव लेखनबद्ध केले आहे. अर्वाचीन कालखंडात शहरीकरण झाले, त्यामुळे खेड्यांची स्थिती सुद्धा बदलली. जाणीव जागृतीतही बदल झाला. साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त 'बारोमास' ही सदानंद देशमुखांची कादंबरी असेल, नामदेव कांबळेची 'राघववेळ' असेल, ह्यामधून ग्रामीण वास्तवाचे अचूक निरीक्षण व्यक्त केले आहे. तत्कालीन शेती जीवनाची माहितीही प्राप्त होते.

## बदललेला निसर्ग आणि त्याचा परिणाम बदललेली शेती

भारत हा कृषीप्रधान देश असल्यामुळे ग्रामीण जीवन हे अतिशय महत्त्वाचे आहे. स्वातंत्र्योत्तर काळात वास्तव अशा ग्रामीण जीवनाच्या चित्रणाला फार मोठे स्थान मिळाले आहे. शेतीची अर्थव्यवस्था हीच भारतीय अर्थव्यवस्था असल्याने शेती हा जगण्याचा मुख्य आधार आहे. भारताला स्वातंत्र मिळाले आणि स्वातंत्र्याच्या प्राप्तीनंतर तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी पंचवार्षिक योजनांची अंमलबजावणी सुरू केली. सर्वप्रथम त्यांनी देश विकासाला चालना मिळाली, याकरिता 'हरित क्रांतीला' खूप महत्त्व दिले. बदलत्या युगात जे काही परिवर्तन होत गेले त्याचा विचार हा ग्रामीण क्षेत्रात अगदी खेड्यातील माणूस हा शहराकडे आकृष्ट होत गेला. त्याचा परिणाम असा झाला की, ग्रामीण क्षेत्र हे आटत गेले, कमी होत गेले आणि शहरे वाढायला लागली. खेडी ओस पडली. शेतकरी वर्गाला शेती न परवडणारी झाली. वऱ्हाडातील शेतकऱ्यांचे जीवन हे कष्टमय झाले. सन १९७५ च्या नंतर कादंबऱ्यांतून बाबाराव मुसळे, सदानंद देशमुख, पुरुषोत्तम बोरकर आणि

रमेश अंधारे ह्या लेखकांनी हे वास्तव मांडले आहे असे दिसून येते. सदानंद देशमुखाची 'बारोमास' कादंबरी ह्या दृष्टीने लक्षणीय ठरेल, ज्यात शहरी संपर्कानंतर बदललेल्या ग्रामीण भागाचे चित्रण केलेले आहे. निसर्गाचा समतोल बिघडल्याने पाऊस येण्यावर परिणाम झाला आणि त्यामुळे कृषिक्षेत्रातील विकासाचा विचारच कोलमडून पडला. ग्रामीण जीवनात संपन्नता समृद्धता आहे हा समज त्यामुळे बाद झाल्याचे दिसून येते. शेतकरी वर्गाचे संपूर्ण जीवन हे पीकपाण्यावर अवलंबून आहे. ग्रामीण क्षेत्रातील लोकांचे लोकजीवन हे सर्वस्वी पीकावर आहे, शेतकऱ्यांचा संबंध हा भाकरीशी आहे. ह्या जाणिवेला ग्रामीण क्षेत्रावर लिहिणाऱ्या लेखकांनी नेमके हेरले आणि तशा प्रकारचे चित्रण त्यांनी आपल्या लेखनातून केले.

## शेतकरी आत्महत्या कारणे आणि उपाययोजना

शेतीवर अवलंबून असणाऱ्या आणि मातीशी अतूट नाते असणारे कष्टकरी स्त्री–पुरुषांचे वास्तव जीवन दर्शन वऱ्हाडी साहित्यात व्यक्त झाले आहे. शेतकऱ्यांचे संपूर्ण जीवन दारिद्र्य, भूक आणि आर्थिक शोषण यांमुळे नासलेले आहे. बदलत्या काळाबरोबर अनेक अनिष्ट प्रवृत्तींमुळे ग्रामीण भागातील जीवन होरपळून जात आहे. गावात येणाऱ्या सरकारी योजनांचा पुरेपूर लाभ ग्रामीण क्षेत्रातील लोकांना मिळत नसल्याचे विदारक चित्र आज निर्माण झाले आहे. पुरुषोत्तम बोरकरांच्या 'मेड इन इंडिया'त वर्णन केलेले आहे की, ''या इंडियात काही खरं नाही. भारतातले गरम मसाल्यात फ्राय करून खात खात गब्बर होत जातील हे इंडियन्स दिवसे दिवस'' पूर्वीच्या काळात माणसाला किंमत होती. आता पैशाचे एवढे महत्त्व वाढले की, पैशाशिवाय कुणी कुणाला ओळखत नाही. कुटुंबावर एखादे संकट आल्यास कसे तोंड द्यावे याचा प्रचंड ताणतणाव आजच्या ग्रामीण भागातील माणसावर आहे. आधुनिक काळातील भांडवलदारी औद्योगिकरण आणि प्रत्येक क्षेत्रातील आधुनिकीकरण, अर्थव्यवस्था ह्यामुळे अनेक प्रकारचे प्रश्न निर्माण झालेले आहेत, आधुनिकीकरणाचा विचार वाढत असल्याने सर्व बलुतेदारी आज नष्ट होत आहे. ज्या बलुतेदारांचा पिढीजात बलुतेदारीचा व्यवसाय होता, त्यांनी नाराजीने का होईना पण नवीन व्यवसाय स्वीकारला आहे. शेतकऱ्यांची दु:खाच्या फेऱ्यातून कशी सुटका होईल? हा प्रश्नच आहे.

खेड्यातील परिवर्तन विविध अंगाने झाले आहे, होत आहे. शेतकऱ्यांच्या विकासासाठी शासनाने योजलेल्या योजनांचा लाभ शेतकरी, शेतमजुरांना पाहिजे त्या प्रमाणात मिळत नाही हे कटू वास्तव आहे. सूर्यचूल आणि सबसिडीसारख्या अनेक योजना आल्या पण त्या फक्त राबवायच्या हाच सगळ्यांचा हेतू झाला. खेड्यात फोन, मोबाईल, वाहतुकीची साधने, व्हिडीओ आलेत. त्या माध्यमातून खेड्यांचा संपर्क शहराशी आला. खेड्यातील माणूसही आता सुखलोलूप प्रवृत्तीचा होत आहे. शेतीत कष्ट करण्याची बहुतांश लोकांची तयारी नाही. चंगळवादाकडे तो झुकू लागला. शेतीकडे दुर्लक्ष आणि फक्त रिकामटेकडे उद्योग वाढलेत. वऱ्हाडी साहित्यातून कादंबरीकारांनी आर्थिक बाबीची परिणामकारक तीव्रता व्यक्त केली आहे.

ग्रामीण भागात तरुणांचे बेकारीचे तांडे निर्माण झाले आहेत. त्यांना शिक्षणासाठी खर्च आलेला असतो. नोकरी मिळाली म्हणजे खर्चाची परतफेड आपण करू हा त्यांचा प्रयत्न असतो; परंतु परिस्थिती अशी निर्माण झालेली आहे की, नोकरीच मिळत नाही, झालेल्या शिक्षण खर्चाची परतफेड होऊ शकत नाही? हा त्याच्यापुढे यक्षप्रश्न आहे. नोकरी नाही म्हणून समाजात स्थान नाही आणि समाजात स्थान नसल्यामुळे लग्नास अडसर अशा भयावह स्थितीत आजचा युवक आहे. ह्या संबंधी काय करता येईल म्हणजे जीवनात स्थिरता येईल? हा ताणतणाव त्याच्या मनावर आहे. ह्या ताणतणावाच्या अतितीव्रतेने शेतकरी अस्वस्थ्य आहे. विदर्भात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण अधिक आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्येची कारणे खालीलप्रमाणे प्रत्ययास येतात.

१. सततची नापिकी २. निसर्गाचा प्रकोप ३. खंडित कुटुंब व्यवस्था ४. शेतीचे झालेले (न परवडणारे)
५. महसूल विभागाचा भ्रष्टाचार ६. सावकाराचे व्याजासहित देता न येणारे कर्ज ७. बँकांचे आणि खाजगी सावकारांचे फुगत चाललेले व्याज ८. सततच्या दु:खाने आलेले औदासिन्य ९. मुलीच्या लग्नाचा प्रश्न (हुंडा पद्धतीमुळे) कठीण झाला आहे. १०. वाढती व्यसनाधीनता.

ह्या सर्व बाबींमुळे शेतकऱ्यांना दारिद्र्य आले आहे. अशा भीषण अवस्थेत सापडलेल्या शेतकऱ्यांना जगणेच कठीण झाले आहे आणि जगता येत नाही म्हणून शेतकऱ्यांनी आत्महत्येचा मार्ग स्वीकारला ही चिंतेची बाब आहे.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या टाळण्यासाठी शासनस्तरावर उपाययोजना होत आहेत; परंतु पाहिजे त्या प्रमाणात उपाययोजना झाली नाही असे आजचे वास्तव आहे. मुख्यमंत्री, प्रधानमंत्री आदींनी आकर्षक पॅकेज

जाहीर केले. परंतु शेतकऱ्याच्या जीवनातील दु:ख आणि दारिद्र्य दूर झाले नाही. उलट लालफीतशाहीला लागलेल्या वाळवीलाच हा मलिदा (लाभ) मिळाला आणि ज्याच्यासाठी हा एवढा प्रयत्न तो शेतकरी उपाशीच राहिला आहे आणि म्हणूनच हे आज जाणवत आहे की, महाराष्ट्रातील शेतकऱ्याच्या आत्महत्येचा मुदा आज खूपच संवेदनशील झाला आहे. मानवतेला काळिमा फासणारा आत्महत्येचा प्रश्न वऱ्हाडातील ग्रामीण कादंबऱ्यांत व्यक्त झालेला आहे. ह्या भीषण वास्तवाची दखल शासनस्तरावर घेणे आज गरजेचे आहे, एवढे मात्र खरे आहे.

डॉ. पंजाबराव देशमुख यांनी शेतकऱ्यांना 'धननिर्माता' म्हटले आहे. एका दाण्याचे हजारो दाणे पिकविणारा शेतकरी मात्र आज 'अन्नदाता' असूनही तो आत्मघातकी मार्ग स्वीकारत आहे हे आजच्या प्रगतिशील समाजाला भूषणावह नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्याकरिता सामाजिक शासनस्तरावर व्यापक प्रयत्नांची गरज आहे. शासन केवळ योजना जाहीर करते पण त्या राबविण्यासंबंधी गंभीर नाही परिणामत: योग्य, गरजू शेतकऱ्यांपर्यंत मदत पोहचत नाही. तिचा लाभ अन्यच घेत आहे. यात भ्रष्टाचाराचा गंध आहे हे प्रथमत: शासनस्तरावर प्रतिबंध करणे काळाची गरज आहे. शेतकऱ्यांना हंगामी काळात पीककर्जाची विनाविलंब सोय, बी–बियाणे यांच्या काळ्याबाजाराला रोखून उपलब्ध करून देणे, खत–कीटकनाशके कोणती वापरावीत यासाठी मार्गदर्शन कार्यशाळा कृषी विभाग, विद्यापीठे यांच्या स्तरावर व्हावेत, तसेच त्याची उपलब्धता करून देणे महत्त्वाचे आहे.

तसेच शेतमालाला गोदाम उपलब्ध करून देणे नसल्यास गोदाम बांधकाम करावे, वाहतूक व्यवस्था, बाजारभाव योग्य मालाला मिळावा. कृषिउत्पन्न बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांसाठी सोईसुविधा संपूर्ण राज्यात प्राप्त होण्यासाठी नीती तयार करावी. शेतकऱ्यांच्या पाल्यांना शिष्यवृत्ती देण्यासंबंधी शासनाने कारवाई करावी तसेच ग्रामीण विभाग हा विकासासाठी केंद्रबिंदू मानून सिंचनाच्या नावाखाली केवळ भ्रष्टाचार न करता प्रत्यक्षात पाणी अडवा, पाणी जिरवा, वनराई बंधारे, शेततळे योजना राबवून शेतकऱ्यांना त्याचे महत्त्व कळण्यासाठी प्रबोधन कार्यशाळेचे आयोजन करावे तसेच शेतीपूरक व्यवसायासाठी कर्जाची योजना करताना त्यातील अडचणी दूर कराव्यात. उदा. दुधाळ म्हशी, शेळ्या, संकरित गायी यांतून दुग्धक्रांती निर्माण होऊ शकते अशा प्रकारच्या प्रभावी उपाय योजना जर राबविल्या तरच शेतकऱ्यांच्या आत्महत्येला विराम मिळू शकतो, तसेच दुष्काळ सदृश्यस्थिती भविष्यात निर्माण होणार नाही यासाठी शासन, स्वयंसेवी संघटना, कृषी विद्यापीठे यांनी सक्रियपणे पुढे येणे ही काळाची गरज आहे, असे मनस्वीपणे वाटते.

## निष्कर्ष

१. वऱ्हाडी कादंबरीतील ग्रामीण वास्तवाचे आणि शेती जीवनाचे स्पष्ट आकलन होते.

२. वऱ्हाडी बोली भाषेतील कादंबरीतून काळानुरूप परिवर्तने झाली आहेत. या परिवर्तनातून ग्रामीण जीवनात बदल झाला तसेच शेतकरी आणि शेतमजुरासह गावात राहणारे बारा बलुतेदार यांच्या दैनंदिन जीवनात असलेले दु:ख, व्यथा, वेदनांचे चित्रण व्यक्त झाले.

३. सामाजिक जीवनाशी भावनात्मक नाते असणाऱ्या वऱ्हाडी साहित्याचे वेगळेपण प्रकर्षाने दिसून येते.

४. वऱ्हाडची बोलीभाषा वऱ्हाडी आहे. बोलीभाषेतूनच प्रमाणभाषा समृद्ध होते. भाषेतील शब्द, वाक्प्रचार, वऱ्हाडी लोकगीते, लोकगीते आदींच्या प्रवाहातून सिद्ध झालेली भाषा प्रमाणभाषा म्हणून मानली जाते.

५. ग्रामीण भागात आलेले बकालपण तेथील विषमता, भौतिक सुखाचा अभाव, ढासळलेली अर्थव्यवस्था, कृषीव्यवस्था हे वास्तव वऱ्हाडी कादंबरीत प्रखरपणे व्यक्त झाले.

६. वऱ्हाडी कादंबरीतून प्रत्येकाच्या निष्ठा आणि मूल्ये, जीवन जगणाऱ्याच्या पद्धती वेगळ्या असल्याने त्यातूनच मूल्यहीन संस्कृती उदयाला येते. मरगळलेली मने आणि मुखवटेप्रधान संस्कृती लेखकाला अवस्थ करते.

७. निसर्ग बदलल्यामुळे दूरगामी परिणाम शेतीवर झाले. ग्रामीण व्यवस्थेची चौकट खिळखिळी झाली, याचे वास्तव वर्णन वऱ्हाडी कादंबरीतून व्यक्त होते. परिणामत: स्वातंत्र्योत्तर काळात बदललेली जीवनमूल्ये आणि खेड्याने गमावलेली स्वयंभूषण स्पष्ट दिसते.

८. भारतीय शेती म्हणजे मान्सूनचा जुगार आहे. निसर्गाचा लहरीपणा, मजुरांचे प्रश्न, पीक मालाला प्राप्त भाव, बी–बियाण्यांचा प्रश्न आणि सरकारचे आडमुठे धोरण यामुळे शेतकरी नागविल्या जात आहे.

९. शेतकऱ्यांच्या आत्महत्या टाळण्यासाठी राज्य व केंद्र सरकारने व्यापक कृषिनीती तयार करावी. प्रधानमंत्री पॅकेज, मुख्यमंत्री पॅकेज आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबापर्यंत पोहचविण्यासाठी समाज व शासनातील स्वच्छ लोकांना सोबत घ्यावे.

❖❖❖

# मराठी ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा आणि ग्रामीण कादंबरी

डॉ. माधव जाधव
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग
नारायणराव वाघमारे महाविद्यालय, आ.बाळापूर, जि. हिंगोली
इ मेल : mrjadhav1995@gmail.com मो. ९४२३४३९९९१

ग्रामीण साहित्य लेखनाची सुरुवात इ.स. १९२५ पासून झाली. तेव्हापासून जाणिवपूर्वक ग्रामीण जीवनाचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न मराठी साहित्यात सुरू झाला. इ.स. १९६० च्या आसपास या लेखनाला स्वतंत्र अस्तित्व प्राप्त झाले. हे लेखन 'ग्रामीण साहित्याचा प्रवाह' म्हणून ओळखले जाऊ लागले. पुढे या अस्तित्वाच्या जाणिवेला सामूहिक स्वरूप प्राप्त होऊन त्यातून ग्रामीण साहित्याची चळवळ आकाराला आली. मध्यवर्ती मराठी साहित्यापेक्षा 'ग्रामीण साहित्य प्रवाह' आपले वेगळेपण दाखवू लागला. ग्रामीण साहित्यात प्राधान्याने कविता, कथा, कादंबरी सोबतच नाटक ललित आणि समीक्षालेखन होत होते. यातील कविता, कथा कादंबरी लेखन करणारेच काही साहित्यिक हे समीक्षालेखनही करीत होते. त्यांनी बदलत्त्या ग्रामजीवनाचा वेध आपल्या वैचारिक लेखनाच्या माध्यमातून घेतला.

मुळात हे साहित्य मध्यवर्ती मराठी साहित्यातून वेगळे ठरताना निश्चित अशा वेगळ्या उदिष्टांनी निर्माण झाले का? या साहित्याच्या प्रेरणा कोणत्या? त्या साहित्यातून प्रकट झाल्या आहेत का? हे साहित्य आपले वेगळेपण निश्चितपणे स्पष्ट करते का? एकंदरीतच या साहित्यातून दर्जेदार जीवनानुभूती व्यक्त होते का? आणि त्याचे मध्यवर्ती मराठी साहित्यात काय स्थान आहे याचा शोध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधाच्या साह्याने करण्यात येईल. ग्रामीण साहित्यातील केवळ काही प्रातिनिधिक ग्रामीण कादंबऱ्यांच्या आधारे हा प्रयत्न केला आहे.

ग्रामीण साहित्य लेखनाच्या प्रेरणा कोणत्या आहेत हे पाहण्यापूर्वी ग्रामीण साहित्य समीक्षक त्या कोणत्या मानतात हे प्रथम पाहणे उचित ठरेल; कारण वर स्पष्ट केल्याप्रमाणे यातील बरेचसे समीक्षक हे वैचारिक लेखक, ललित लेखकही आहेत. यातील महत्त्वाचे समजले जाणारे साहित्यिक डॉ. आनंद यादव म्हणतात, 'ग्रामीण साहित्याची चळवळ ही महात्मा फुल्यांच्या मानवतावादाचा, शुद्रातिशूद्रावर व स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाचा व त्यांच्या विकासाचा, छोटे शेतकरी व खंडकरी, कुळे, कुणबी शेतमजूर, खेड्यातून नागर विभागात पोटार्थी म्हणून आलेले... मजूर कामगार दलित यांच्या होणाऱ्या शोषणाचा वारसा सांगते'[१] महात्मा फुल्यांनी शेतकऱ्यांबद्दलचे त्यांचे विचार 'शेतकऱ्याच्या असूड' या ग्रंथात मांडले आहेत. शेतकऱ्यांच्या अवनत स्थितीचे चित्र रेखाटून त्या अवनत स्थितीची मूलगामी चिकित्सा केली आहे. ती सुधारण्यासाठी सर्वांगीण उपाययोजनाही सुचविली आहे. जमिनीची सुधारणा कशी करावी, धरणे पाटबंधारे कोठे बांधावे, गुरांची उत्तम निपज कशी करावी, जमिनीची धूप थांबविण्यास काय करावे, अन्य सुधारलेल्या राष्ट्रात शेती कशी केली जाते याचे शिक्षण देऊन भारतीय शेतकऱ्यांच्या मुलांना परदेशात पाठवून आणणे कसे अगत्याचे आहे, शेतकीची वार्षिक प्रदर्शने भरवून उत्तम पिक काढणाऱ्या शेतकऱ्यास पारितोषिक देणे कसे उपकारक ठरणारे आहे यांसारख्या विधायक सूचना त्यांनी केल्या आहेत. या विचाराचा वारसा मानताना डॉ. वासुदेव मुलाटे म्हणतात 'म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मार्क्स यांच्या तत्त्वज्ञानाचा समन्वय साधून संपूर्ण समाजाची पुनर्मांडणी ग्रामीण साहित्य चळवळ करू इच्छिते.'[२] मराठीत जी काल्पनिक आदर्शवादी नि रंजनवादी साहित्याची परंपरा होती त्या परंपरेला नाकारून ग्रामीण जीवनवास्तवाचे रेखाटन करणारे ग्रामीण साहित्य नक्कीच वेगळे आहे, अशी डॉ. मुलाटे यांची भूमिका दिसते. ते पुढे म्हणतात 'ग्रामीण साहित्य हा माझा अत्यंतिक जिव्हाळ्याचा आणि आत्मीय विषय आहे. मी स्वत: ग्रामीण भागातून आणि शेतकरी समाजातून आलो आहे. हे आणि एवढेच कारण नाही मला एकूणच श्रमजीवी, कष्टकरी, शोषित माणसाविषयी जवळीक वाटते. कारण ती माझी माणसे वाटतात. ग्रामीण साहित्य चळवळीचा हेतू ग्रामीणांचा जीव घुसमटून टाकणाऱ्या विषारी शक्तीवर आघात करून त्याला जगणे सुखकर करणे हाच आहे.'[३] यातून त्यांचा ग्रामीण साहित्यलेखन आणि चळवळ यामागील दृष्टिकोन व्यक्त होतो.

रा.रं. बोराडे यांनी मात्र ग्रामीण साहित्यनिर्मितीच्या प्रेरणा म.फुले वा म.गांधी यांच्या विचार व कार्यकर्तृत्वात नसल्याचे सांगितले आहे. ते ग्रामीण साहित्य निर्मितीचे कारण स्पष्ट करताना म्हणतात, 'मराठी ग्रामीण साहित्याची निर्मिती ही प्रामुख्यानं नागरी वाचकांसाठी झाली आहे. ग्रामीण जीवनाविषयी नागरी वाचकांना

कुतूहल आहे, हे जीवन जाणून घेण्याची त्यांना उत्सुकता आहे. हे लक्षात घेऊनच मराठी ग्रामीण साहित्याची निर्मिती झालेली आहे.'[४] म्हणजेच नागरी वाचकांची भूक भागविण्यासाठी निर्माण झालेले हे साहित्य महात्मा फुले यांच्या परिवर्तन विचाराशी कसे जुळू शकेल ही शंका रास्त आहे डॉ. यादव, डॉ. मुलाटे आणि रा.रं. बोराडे या तिघांच्या विचारांच्या भूमिकाना सांधत डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी ग्रामीण साहित्य लेखनाच्या प्रेरणेची आपली भूमिका व्यक्त केली आहे. ते म्हणतात 'एकूण व्यवस्था उद्ध्वस्त करण्याची आणि नवी समताधिष्ठित समाजरचना उभारण्याची जाणीव ग्रामीण साहित्यात कमी प्रमाणात आहे यात शंका नाही... ग्रामीण साहित्य अजूनही मध्यमवर्गीय संवेदनशीलतेपासून संपूर्णत: मुक्त होत नाही. मराठीतील आधीच्या ग्रामीण साहित्याच्या संस्कारापासून ग्रामीण साहित्याला संपूर्णत: मुक्त होईपर्यंत स्वत:ची वेगळी शब्दकळा सापडणार नाही.... ग्रामीण साहित्याला हे जाणीवपूर्वक करावे लागेल. हे जोपर्यंत होत नाही, तोपर्यंत ग्रामीण साहित्याची चळवळ सदृढ होणार नाही'[५] यातून कोत्तापल्ले यांनी ग्रामीण साहित्याला परिवर्तनवादी विचाराचे अधिष्ठान मिळणे बाकी आहे, हे अधोरेखित केले आहे. ते मिळू शकेल असा आशावाद स्पष्ट करताना मध्यमवर्गीय जाणिवांपासून ते विभक्त झाले तरच हे शक्य आहे असेही स्पष्ट केले आहे. या मताच्या पुढे जाऊन ग्रामीण साहित्याचे लेखक व अभ्यासक डॉ. द.ता. भोसले म्हणतात, 'आजच्या ग्रामीण साहित्यात तटस्थपणे न्याहळले तर काय दिसते? या साहित्याला वैचारिक अधिष्ठान नाही, म्हणून आक्रमक भूमिका घेता येत नाही असा दोष आहे यामुळे दलित साहित्याप्रमाणे या साहित्यात विद्रोह, बंडखोरी वृत्ती आणि नव्या संस्कृतीसाठी घेतलेला ध्यास अजिबात आढळत नाही.'[६]

महात्मा फुले यांचे विचार कार्ये खरे तर या चळवळीला साह्यभूत असेच आहे. तरीही त्यांची प्रेरणा पूर्णत: ग्रामीण साहित्याला घेता आली नाही. आपला नेमका शत्रू कोण हे न ओळखता आल्यामुळे कोणाविरुद्ध लढायचे हेच कळाले नसल्याने विद्रोह आला नाही. तो यायचा असेल तर 'लोकायत, बौद्ध, जैन इ. दर्शने, नीती, अर्थ इ.शास्त्रे,याचा अभ्यास करून पचवून, इतर महान कलावंतांच्या कलाकृती अभ्यासून ताकदीने साहित्यनिर्मिती केली पाहिजे'[७] असे ग्रामीण साहित्यिक डॉ.श्रीराम गुंदेकर यांचे मत आहे. स्वातंत्र्यानंतर खेडोपाडी शिक्षण आले. शेतकऱ्याची पोरे शिकली लिहिती झाली; परंतु कोणासाठी लिहायचे, कोणाविरुद्ध लिहायचे याचे ज्ञान पुरसे प्राप्त न केल्यामुळे केवळ त्यांच्या अनुभवविश्वाचे आणि लेखनाचे भांडवल झाले हे खरेच आहे. या नवोदितांनी प्रसिद्धीसाठी आपल्या अनुभवविश्वाचे भांडवल करण्याऐवजी त्याचे वेगळेपण जपणे गरजेचे होते या संदर्भाने ग्रामीण साहित्यिक प्रा. भास्कर चंदनशिव हे शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी यांचे ग्रामीण लेखकाविषयीचे उदगार उदधृत करतात आणि त्यास आपणही पुष्टी जोडतात, ''शहरात गेलेली शेतकऱ्यांची पोरे शहरात रमली, त्यात लिहिण्याचं कसब असणाऱ्यांनी (आपल्या) गावाविषयी लिहिले, पण शहराला काय पटेल, काय आवडेल याचा विचार करीत लिहिले (पण) हरामखोरांनो! तुम्ही माझं गाव लुटलं, या पापाचा तुम्हाला झाडा द्यावा लागेल. हा टाहो कोणी फोडला नाही...' यात आत्मभानापासून ढळलेल्या आणि स्वजनांची निंदानालस्ती करणाऱ्या, सवंग साहित्य आणि साहित्यिकांसंबंधी केलेला हा सवाल खोटा कसा समजावा.''[८] ग्रामीण साहित्यलेखनाची दिशा काय आहे आणि काय असावी याबाबत चंदनशिव आणि शरद जोशींचे हे मत लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

ग्रामीण साहित्य प्रवाहाच्या प्रेरणेच्या संदर्भाने रा.ग. जाधव म्हणतात, 'महात्मा फ ुले व महात्मा गांधींचा संबंध आपल्या सोयीसाठी जोडून ग्रामीण साहित्याच्या परंपरंचे श्रेष्ठतव सिद्ध करण्याचा दुबळा प्रयत्न केला जातो. तो चुकीचा आहे... ग्रामीण साहित्याने परिवर्तनवादी म्हणून घेण्याइतपत कुठल्याही वैचारिकतेची मांडणी केलेली नाही. जीवनाच्या संदर्भात काय नाकारायचे आणि काय स्वीकारायचे या विषयीची त्यांची निश्चित भूमिका दिसत नाही.'[९] म्हणूनच हे साहित्य कलावादी असल्याचाही आरोप केला जातो आणि तो रास्त आहे.

वरील मताच्या आधारावरून ग्रामीण साहित्य प्रवाहातील कादंबरीचे स्वरूप आपणास पाहता येईल. या कादंबरीचे कथानक व्यक्तिचित्रण, समाजवास्तवचा अभ्यास करता येईल. वरील अभ्यासकांनी सांगितलेल्या ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा ग्रामीण कादंबरीतून अभिव्यक्त होतात का? याचा शोध पुढीलप्रमाणे घेता येईल.

मराठीतील पहिली ग्रामीण कादंबरी म्हणून धनुर्धारी यांच्या 'पिराजी पाटील' (१९०३) या कादंबरीचा उल्लेख केला जातो. तर काही अभ्यासक इ.स. १८८८ साली प्रसिद्ध झालेल्या कृष्णराव भालेकर यांच्या 'बळीबा पाटील' या कादंबरीला पहिली मराठी ग्रामीण कादंबरी मानतात. असे असले तरी, 'पिराजी पाटील' (१९०३) या कादंबरीचाच मराठीतील पहिली ग्रामीण कादंबरी म्हणून निर्देश करावा लागतो. दुष्काळामुळे भणंग झालेला पिराजी दुष्काळामुळे आपल्या कुटुंबाची व इतर शेतकऱ्यांची कशी वाताहत झाली याची कहाणी सांगतो. तत्कालीन ग्रामव्यवस्था शहरी पांढरपेशीची शेतकऱ्याकडे पाहण्याची संकुचित व तुच्छतावादी वृत्ती, सरकारी अधिकऱ्यांची

लाचखोरी, सरकार आपल्यासाठी काहीच करत नाही याविषयीची शेतकऱ्यांची चीड इ. अनेक बाबी या कादंबरीत येतात.

१९२५ साली प्रसिद्ध झालेली ना.वि. कुलकर्णी यांची 'दिवस कसे जातील' ही कादंबरी एका शेतकरी कुटुंबाची शोकात्मिका आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या कष्टमय जीवनाचे चित्रण करण्याऱ्या धनुर्धारी नंतरचा हा दुसरा प्रयत्न होता. दुष्काळ, शेतसारा, कर्ज इ. अनेक कारणांमुळे शेतकरी कुटुंबाची कशी वाताहत होते याचे विस्तृत वर्णन या कादंबरीतून येते. पुढे वरेरकरांची 'सातलाखातील एक', रामतनय यांच्या 'मोहित्यांची मंजुळा', 'खरा उद्धार', रा.शा. पाटील यांची सीता, आदी कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या एकूणच समजाजीवनाच्या वास्तवचित्रणासाठी या काळात ग्रामीण कादंबरी लिहिली जात होती. पण तिच्या निर्मितीची प्रेरणा मध्यमवर्गीय साहित्याच्याच होत्या.

१९४० ते १९५० या काळात र.वा. दिघे, ग.ल. ठोकळ, बी. रघुनाथ यांनी ग्रामीण कादंबरी लेखनाचा प्रयत्न केला. एकीकडे गांधीवादाचा प्रभाव तर दुसरीकडे मध्यवर्ती साहित्यातील फडके, खांडेकर युगाचा प्रभाव या काळातील लेखकांच्या लेखनावर होता. अशाही परिस्थितीत र.वा. दिघ्यांच्या 'पाणकळा' आणि 'सराई' या कादंबऱ्यांनी लोकप्रियता मिळविली. त्याचे कारण वाचकांना झालेला नवीन अनुभवविश्वाचा परिचय हा होय. दिघ्यांच्या कादंबऱ्यांमुळेच ग.ल. ठोकळांना कादंबरी लेखनाची प्रेरणा मिळाली आणि 'गावगुंड' ची निर्मिती झाली पुण्यात शिक्षण घेणारा जयवंत मुसळगावला जायला निघतो आणि वाटेत नेमकी गुणाजीची टोळी त्याची बस अडवते. गुणाजीची धाडसी कृत्ये आणि जयवंत लीळा यांचे प्रणय प्रसंग यांनी कादंबरीचा कथाभाग व्यापला आहे. देशकार्यासाठी स्वत:ला वाहून घेणाऱ्या ग्रामीण तरुणाची कथा 'बाबू दडके' मध्ये बी. रघुनाथ यांनी वर्णिली आहे. वि.वा. हडपांची 'अन्नदाना उपाशी', ना.के. महाजनांची 'किसान' म.म. भोसल्यांची समरांगण बर्वेची मुचकुंददरी, बा.भ. बोरकरांची 'भावीन' विभावरी शिरूरकरांची 'बळी' आदी कादंबऱ्याही याच काळात निर्माण झाल्या. इथपर्यंतचे ग्रामीण कादंबरीलेखन हे एखाद–दोन अपवाद वगळता मध्यमवर्गीय लेखकांनी केलेले कादंबरी लेखन होते ते मध्यवर्ती साहित्यलेखनाच्या प्रभावाने निर्माण झालेले आणि त्याचाच एक भाग म्हणून झालेले लेखन होते.

'१९५० च्या आधी साधारणत: पन्नासेक वर्षापासून तुलनेने कमी प्रमाणात का होईना ग्रामीण कादंबरीलेखन सुरू होते. तरी नेमके १९५० ते ६० च्या दशकात केवळ तीन कादंबऱ्या प्रकाशित झालेल्या दिसतील. व्यंकटेश माडगूळकरांची बनगरवाडी (१९५५), अण्णा भाऊ साठे यांची 'फकिरा' (१९५९) आणि उद्धव शेळके यांची 'धग' (१९६०) या त्या कादंबऱ्या होत. दुर्दैवाने बनगरवाडीचा अपवाद सोडला तर दुसऱ्या दोन्ही कादंबऱ्यांची दखल मराठी समीक्षेने घेतली नाही' असे डॉ.नागनाथ कोतापल्ले म्हणतात ते पुढे असेही म्हणतात की, 'गेल्या अर्धशतकातील चांगल्या ग्रामीण कादंबऱ्यांची निवड करायची ठरली तर किमान वीसेक चांगल्या ग्रामीण कादंबऱ्या निवडता येतील. ही संख्याही लक्षणीय ठरेल'[१०] या वीसेक कादंबऱ्या कोणत्या त्यांची नावे मात्र कोतापल्ले यांनी उद्धृत केली नाहीत. गेले अर्ध शतक म्हणजे १९५० ते २००० हे होय. १९६० नंतर ग्रामीण साहित्य प्रवाहाने आपला स्वत:चा चेहरा शोधण्याचा प्रयत्न केला आहे, हे आपण मागेच सांगितले. ग्रामीण आणि नागर अशी एक सीमारेषा आखली तर या दोन्ही भागांचे जीवन, समाजवास्तव त्यांचे प्रश्न समस्या या मुळात भिन्न आहेत. महात्मा फुल्यांनी हंटर कमिशनसमोर प्राथमिक शिक्षण सक्तीचे मोफत करा असे ठणकावून सांगितल्यानंतरही कित्येक वर्षापर्यंत ग्रामीण भागात शिक्षण पोहचलेच नव्हते. साठोत्तरी काळात रस्ते वीज आणि शिक्षण खेड्यात गेल्यानंतरच येथील शेतकरी, शेतमजूर तरुणांच्या डोक्यात आणि दृष्टीपुढे प्रकाश पडला. यातूनच तो स्वत:चा शोध घेऊ लागला. या शोधाचा अविष्कार म्हणजेच खऱ्या अर्थाने ग्रामीण साहित्य लेखन होय; परंतु हे साहित्य लेखन का करायचे कुणासाठी करायचे कोणविरोधात करायचे याचे भान मात्र या काळात त्याला आले नव्हते.

१९७५ च्या सुमारास ग्रामीण साहित्य चळवळ सुरू झाली 'समतावाद मूल्यांच्या प्रेरणेतून विराट आणि ग्रामीण समाजाची सुखदु:खे व्यक्त केली पाहिजेत, या हेतूने आनंद यादव, रा.रं. बोराडे, नागनाथ कोतापल्ले, चंद्रकुमार नलगे यांनी या चळवळीला वैचारिक बळ दिले. संमेलने, मेळावे व परिसंवादातून चळवळीची भूमिका मांडली जाऊ लागली यामुळे ग्रामीण नवलेखकांना नवे आत्मभान आले.'[११] परंतु प्रेरणेपासूनच संदिग्ध भूमिका घेऊन लेखन करणाऱ्या ग्रामीण लेखकांना निश्चितपणे आपला सवतासुभा निर्माण करता आला नाही.

ज्या आनंद यादवांनी महात्मा फुल्यांच्या विचारांची प्रेरणा मानली खरी पण कादंबरी लेखनात मात्र ग्रामसंस्कृती, कृषिसंस्कृती, परंपरा यांनाच कलात्मकतेने फुलविण्याचा प्रयत्न केला. त्यांनी आपल्या 'गोतावळा' या कादंबरीत नारबाची शोकांतिका अतिशय कलात्मक पातळीवर जाऊन चित्रित केली. यंत्रसामुग्रीचा शेतात झालेल्या

प्रवेशामुळे प्राण्यांच्या गोतावळ्यात जीव गुंतून असणाऱ्या नारबाच्या जीवनाची शेवटी होरपळेच होते. हेच या कादंबरीतून सूचित केले.

आनंद यादवांनी मानलेली प्रेरणा 'गोतावळा'मधून उतरविली असती तर कदाचित पुढच्या ग्रामीण साहित्याला फार वेगळे स्वरूप प्राप्त झाले असते. आणि नारबाने परंपरागत धंद्याचा नाद सोडून दुसरा धंदा स्वीकारला असता. यावरून काळाची मर्यादा म्हणायची की लेखनाची? हा प्रश्न आहे. त्यांच्या झोंबी, नांगरणी, घरभिंती आणि काचवेल तर आत्मचरित्र वाटाव्या अशा कादंबऱ्या आहेत.

ज्यांनी आपल्या लेखनाची भूमिका 'ग्रामीण भागात ग्रामीण साहित्याला फारसा वाचक नाही. विशेषत: ज्या शेतकरी शेतमजुरांच्या जीवनावर आम्ही ग्रामीण साहित्यिक ग्रामीण साहित्याची निर्मिती करतो ती प्रामुख्याने नागरी वाचकासाठी झालेली आहे'[१२] असे प्रामाणिकपणे मान्य केले. त्यांची 'पाचोळा' ही कादंबरी त्याचेच द्योतक आहे. ग्रामीण कारागिरांच्या जीवनाला लागलेले ग्रहण, त्यातून गंगारामच्या जीवनाची होणारी शोकांतिका ते चित्रित करतात. परंपरावादी असणारा गंगाराम हा खेड्यातील बलुतेदारीला बसलेला तडा सहन करू शकत नाही हेच केवळ बोराडे यांना दाखवून द्यायचे आहे.

'गोतावळा' आणि 'पाचोळा' या दोन कादंबऱ्यांच्या माध्यमाने मात्र पराजित नायकांच्या चित्रणाची सुरुवात झाली होती. तिला ग्रामीण नायकाची शोकांतिकाही म्हणता येईल.

मराठी ग्रामीण साहित्य लेखकांनी निश्चित अशी प्रेरणा न घेतल्यामुळे एका निश्चित भूमिकेतून लेखन होऊ शकले नाही. त्यामुळे बहुतांशी ग्रामीण कादंबरी ही बदलत्या ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रण, समस्या दर्शन, संघर्ष आणि अस्वस्थ मानसिकतेचा वेध यापलीकडे जाऊ शकली नाही.

महाराष्ट्रात सुरू झालेली सहकार चळवळ ग्रामीणांच्या जीवनात कसे दु:ख निर्माण करते याचा वेध वासुदेव मुलाटे यांनी 'विषवृक्षाच्या मुळ्या' या कादंबरीतून घेतला. सहकारातील वाढता भ्रष्टाचार पाहून अस्वस्थ होणारा विश्वनाथ तरटे संधी मिळताच खेडीच्या सोसायटीमधील घाण साफ करण्याचा प्रयत्न करतो; परंतु शेवटी त्याचीच कोंडी होते. तो अयशस्वी होतो. मुलाटे यांनी आपल्या लेखनाची प्रेरणा परिवर्तनवादाची आहे, हे स्पष्टपणे सांगितले. पण विषवृक्षाच्या मुळ्यामधून संघर्ष, विद्रोह म्हणावा तसा येत नाही.

'हल्या हल्या दुधू दे' या बाबाराव मुसळे यांच्या कादंबरीचा नायक 'ज्ञानबा' हा सामान्य शेतकरी असून मुलीच्या लग्नासाठी सावकाराला शेतीचे गहाणखत करून देतो व मुलगी लग्नानंतर सुखात राहील, अशी अपेक्षा करतो; परंतु मुलगी सुखात राहत नाही आणि दारिद्र्याने ज्ञानबाचा दु:खद शेवट होतो. ज्ञानबा हा विदर्भातील कोरडवाहू शेतकऱ्यांचा प्रतिनिधी आहे. वाढती सावकारशाही निसर्गाचे दुष्टचक्र आणि शासनाचे शेती धोरण यातून शेवटी त्याची शोकांतिका होते. 'उलट चालिला प्रवाहो' या कादंबरीतून डॉ. नागनाथ कोतापल्ले यांनी ग्रामीण भागातील दलितावरील अन्याय, अत्याचार निस्तारायला गेलेल्या समाजसेवकाची दारूण शोकांतिका चित्रित केली. 'झाडाझडती'मधून विश्वास पाटलांनी धरणग्रस्तांची कैफियत मांडली, तर सरदार जाधव यांनी 'कोयता' मधून ऊसतोड कामगाराची कैफियत मांडली. आनंद पाटलांनी शेतखरेदी करताना कोणत्या अडचणींना सामोरे जावे लागते हे 'कागूद' मधून तर घर बांधणे किती जिकिरीचे आहे हे 'सावली'मधून सांगितले. गणेश आवटेंनी 'गणगोत'मधून हुंडा आणि मानापानाकरिता नवविवाहितेचा होणारा छळ चित्रित केला तर 'पाणसळ'मधून सुशिक्षित बेकाराचा प्रश्न अधोरेखित केला. पुरुषोत्तम बोरकर यांनी 'मेड इन इंडिया'मधून पंजाब गरसोळीकर हा नायक आपल्या बापाला म्हणण्यावरून गावात सरपंच होतो लोकांचे कल्याण व्हावे म्हणून प्रयत्न करतो, पण त्याला यश येत नाही अशी शोकांतिका चित्रित केली.

बाबू बिरादारांच्या 'मातीखालचे पाय' कादंबरीतून गावात चालणारी प्रतिष्ठितांची गुंडगिरी, हेवेदावे आणि त्यामुळे भरडला जाणारा दीनदलित व्यक्ती याची व्यथा चित्रित होते.

कुठलाही एखादा कळप केल्याशिवाय माणसाला सुखाने जगता येत नाही, हा विचार राजन गवसांनी 'कळप' या कादंबरीतून मांडला तर 'तणकट' मधून दलित व सवर्ण यांच्यातील संघर्ष चित्रित केला.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत शेतकऱ्याची आत्महत्या हा विषय सदानंद देशमुखांनी 'तहान' व 'बारोमास' या कादंबऱ्यातून चित्रित केला 'जागतिकीकरणाच्या भांडवलशाहीच्या मार्गाने जाणाऱ्या शेतकऱ्याची अशीच अवनती होते हा आशय 'तहान' कादंबरी मांडते; परंतु काळाचा महिमा समजून बदलत्या परिस्थितीस सामाऊन घेण्याची व बबनच्या वाईट वर्तनाचा कार्यकारणभाव तपासण्याची जबाबदारी ही कादंबरी घेत नाही'[१३] असा अभिप्राय डॉ. शंकर विभुते नोंदवितात.

स्वातंत्र्योत्तर काळात शासनाने शेतकऱ्यांसाठी अनेक योजना आणल्या; पण निसर्गाचा लहरीपणा व बाजारभावाची अनिश्चितता यामुळे चांगला शेतकरीसुद्धा हैराण झाला आहे, याचे चित्रण शेषराव मोहिते यांनी

'असं जगणं तोलाचं' या कादंबरीतून केले. शिकलेला शेतकऱ्याचा मुलगा गोपाळ हा शिक्षक होतो आणि आपले घर सुधारण्याच्या ध्यासाने नोकरीचा पैसा शेतीला लावतो. या कादंबरीच्या शेवटी त्याने आपल्या भावाला लिहिलेले पत्र म्हणजेच या कादंबरीचा सार आहे. आपल्या वडीलांची आणि आता भावाची पिढी शेतात मरमर राबत संपत आली म्हणून आपल्या भावाच्या मुलाला मात्र शेती करू द्यायची नाही. त्याला शिकवायचे, नोकरीला लावायचे हाच ध्यास गोपाळ घेतो. तोच भावाचा मुलगा धुळपेरणीचा नायक आहे. 'धुळपेरणी' मधून शेतकऱ्यांच्या मुलांची शेतीविषयीची अनास्था त्यांनी व्यक्त केली. या कादंबरीची एक जमेची बाजू म्हणजे शेषराव मोहित्यांनी या कादंबरीतून कृषिमहाविद्यालय व विद्यापीठीय शिक्षणज्ञान किती कुचकामी आहे आणि शेतीव्यवसायात ते कसे उपयोगाचे नाही हे अधोरेखित केले. शेती हेच शेतकऱ्याच्या दुःखाचे मूळ असल्याचे भारत काळे यांनी 'ऐसे कुणबी भूपाळ' कादंबरीतून सूचित करून एकाच कादंबरी लेखनाने ग्रामीण कादंबरीचे वेगळेपण जपले.

आजच्या समाजजीवनातही विजेची अनिश्चितता, शेतीमालास मिळणाऱ्या भावाची अनिश्चितता संधीसाधू राजकारण आणि भ्रष्टाचार या प्रश्नांच्या चक्रव्युहातून शेती अजापर्यंत बाहेर पडू शकली नाही, ही वास्तवता अशोक कोळींनी 'पाडा' कादंबरीतून व्यक्त केली तर जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण या धोरणांचा कृषीवर पडलेला प्रभाव शंकर सखाराम यांनी (एसईझेड) 'सेझ' या कादंबरीतून स्पष्ट केला.

डोक्यावर प्रचंड कर्ज, शासनाची उदासिनता व अवकाळी पावसाने दिलेला दगा ही बाब आनंद विगंकरांच्या 'अवकाळी पावसा दरम्यानची गोष्ट' कादंबरीतून नायकाच्या आत्महत्येची कारणे ठरतात.

एकंदरीतच साठोत्तरी मराठी ग्रामीण कादंबरीपासून ते २०१० पर्यंतच्या ग्रामीण कादंबरी लेखनाचा आढावा वरील काही प्रातिनिधिक ग्रामीण कादंबऱ्यांच्या आधारे घेऊ जाता असे लक्षात येते की, मराठी ग्रामीण साहित्य म्हणून ग्रामीण कादंबरीने १९६० नंतर स्वतःची केवळ वेगळी ओळख निर्माण केली, ती अशी की, ही कादंबरी ज्या अनुभवविश्वाचे समाजवास्तवाचे चित्रण करते ते समाजवास्तव मध्यमवर्गीय साहित्यापेक्षा वेगळे आहे. यातील अनेक लेखकांनी ते अतिशय ताकदीने आपल्या कादंबरीतून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. ग्रामीण जीवनातील प्रखर आणि बदलते वास्तव अनेकांनी उमेदीने कादंबरीतून मांडले. बदलते ग्रामीण जीवन, सहकार, शासन, जागतिकीकरण, निसर्ग, राजकारण आदींच्या प्रभावाने निर्माण झालेले अनेक प्रश्न समस्या यांना थेट भिडण्याचा प्रयत्न केला. सोबत या प्रश्नांच्या कचाट्याने शेतकरी, शेतमजूर, खेडे यांच्यावर आलेले संकट, त्यांचे दुःख, वेदना, त्यांची अस्वस्थता अतिशय पोटतिडिकीने मांडली.

परंतु ग्रामजीवनात निर्माण होणाऱ्या समस्या, खेड्यातील जीवन जगणाऱ्यांची होणारी होरपळ, त्यांच्या वाट्याला आलेले आत्महत्येचे जीणे यांच्या पाठीमागे असणाऱ्या कार्यकारण भावाचा शोध घेण्याचा प्रयत्न मात्र ग्रामीण कादंबरीकारांकडून व्हावा तसा झाला नाही. उपाययोजना करणे तर त्यापुढचे आहे. हे ग्रामीण ग्रामीण कादंबरी लेखकांनी केले असते. तर कदाचित आज मोठ्या प्रमाणावर होत असलेल्या शेतकरी आत्महत्यांचा कदाचित उदय झाला नसता. हा शोध न घेण्याचे कारण शेवटी या कादंबरीकारांनी आपल्या लेखनासाठी घेतलेल्या लेखनविषयक प्रेरणामध्ये सापडते.

या साहित्यनिर्मितीस निश्चित अशी प्रेरणा आणि भूमिका नाही असेच शेवटी निष्पन्न होते. 'महात्मा फुल्यांचा वारसा जर ग्रामीण कादंबरीने जपला असता तर ही कादंबरी पूर्णतः वेगळी राहिली असती. परिणामी आजच्या वर्तमान ग्रामीण साहित्याने आपला परिणामकारक असा ठसा संपूर्ण मराठी साहित्यात उमटवला असता'[१४]

साहित्याचा मुख्य हेतू केवळ वास्तवचित्रण करणे एवढाच नाही तर या वास्तवनिर्मितीमागे असणाऱ्या कार्यकारण भावाचा शोध घेणे जी कारणे समाजविकासाच्या आड येणारी आहेत त्यावर प्रसंगी उपाय सुचविणे प्रसंगी अन्याय अत्याचार शोषणाच्या विरोधात उभे राहणे हा आहे आणि तो महात्मा फुल्यांच्या विचार कार्यात आहे तो ग्रामीण कादंबरीकारांनी न घेतल्यामुळे ही कादंबरी आपला वेगळा ठसा उमटू शकली नाही. मध्यवर्ती साहित्यानिर्मितीचाच एक भाग म्हणून ते अभिव्यक्त होते.

## संदर्भग्रंथसूची

१. मराठी ग्रामीण साहित्य : विचार आणि चळवळ—आमची श्रीवाणी—गणेश देशमुख पृ. ६८

२. नवे साहित्य : नवे आकलन—डॉ. वासुदेव मुलाटे पृ. ३५

३. तिफन : डॉ. वासुदेव मुलाटे विशेषांक—संपा.शिवाजी हुसे (मुलाखत) पृ. १४८

४. ग्रामीण साहित्य : चळवळ आणि निर्मिती—रा.रं.बोराडे पृ. ३७

५. ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध—डॉ. नागनाथ कोतापल्ले पृ. १४६, १४७
६. ग्रामीण साहित्य : एक चिंतन—डॉ. दत्ता भोसले पृ. ५४
७. ग्रामीण साहित्य : प्रेरणा आणि स्वरूप—डॉ. श्रीराम गुदेकर पृ. ११७
८. माती आणि मंथन—भास्कर चंदनशिव पृ. ८४
९. साहित्यातील नवे प्रवाह : आकलन आणी अन्वयार्थ—डॉ. माधव पुंटवाड पृ. २४, ४७
१०. गेल्या अर्धशतकातली मराठी कादंबरी—संपा. विकास खोले पृ.१५९
११. मराठी ग्रामीण कादंबरी—रवींद्र ठाकूर पृ. १६७
१२. ग्रामीण साहित्य चळवळ आणि निर्मिती—रा.रं. बोराडे पृ. ३७, ३८
१३. मराठी कादंबरीतील सामाजिकता—डॉ. शंकर विभुते पृ.१५५
१४. अक्षरगाथा कादंबरी विशेषांक—संपा. डॉ. मा.मा. जाधव पृ. १२१

❖❖❖

# संत एकनाथांची समयसूचकता

प्रा. डॉ. विठ्ठल जंबाले
मराठी विभागप्रमुख,
देगलूर महाविद्यालय, देगलूर, जि. नांदेड ४३१७१७
इ मेल jvithalh@gmail.com भ्रमणध्वनी—९४२२८७९६०९

## प्रस्तावना

मराठी संत परंपरेतील आगळे कर्तृत्व सिद्ध करणारे तथा परधर्मीय सत्तेचा हैदोसधुल्ला मातलेला असताना भेदरलेल्या स्वधर्मीय जनतेला अध्यात्मिक बोधासाठी प्रचलित विविध संकेतांचा आधार घेऊन विस्कटलेली धर्माची घडी सुव्यवस्थित बसविण्यासाठी तथा प्रादेशिक, धार्मिक, सामाजिक अस्मिता जागविण्यासाठी वाङ्मयीन क्षेत्रात मोलाचे योगदान देणारे वाङ्मयीन संशोधन व ऐतिहासिक स्मारकाचा जीर्णोद्धार करणारे, संशोधक, पुरातत्त्ववेत्ते, लोकशिक्षक, लोकरंजनकार, संत व तत्त्वज्ञ अशा बहुविध क्षेत्रात अष्टपैलू कामगिरी करणारे संत प्रभावळीतील एकच नाथ आहेत, ते म्हणजे एकनाथ सूर्याजी गोसावी! तत्कालीन परस्थितीला कवेत घेऊन लोकोद्धाराला पूरक ठरेल असे साहित्य लेखन करणारे, अद्वितीय व्यक्तिमत्त्व लाभलेले संत आहेत. त्यांचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांच्या जीवनातील संपूर्ण कार्यामध्ये साधलेली समयसूचकता! हेच मला वाटते.

## संत एकनाथकालीन परिस्थिती

एकनाथांच्या जीवनातील समयसूचकतेचा मागोवा घेत असताना तत्कालीन परिस्थितीचा मागोवा घेणे उचित होईल. याकरिता आपणास तत्कालीन ऐतिहासिक, सामाजिक, धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक या परिस्थितीशी संबंधित ठळक माहिती खालीलप्रमाणे नोंदविता येते.

इ. स. १३०९ मध्ये रामदेवराव यादवांची सत्ता संपुष्टात आली आणि अब्दुल खिलजी घराण्याच्या बहामणी सत्तेची पालेमुळे संपूर्ण महाराष्ट्रामध्ये पसरायला सुरुवात केली. इ.स. १३०९ ते एकनाथांच्या तहहयात काळापर्यंत (जन्म १५३२ते मत्यू १५९९) साधारणत: २५० वर्षात भौतिक व सांस्कृतिक संचितामध्ये प्रचंड परिवर्तन घडले. मुसलमान सत्तेच्या जुलूम अत्याचाराने महाराष्ट्रीयन समाज भरडून निघाला. सामान्य माणसांच्या जगण्यावर अनेक प्रकारची गडांतरे आली. दूरगामी परिणाम झाले. मुस्लिम राज्यकर्त्यांनी तेथील हिंदू धर्मीयांची जबरदस्तीने धर्मांतरे केली. हिंदू धर्मीयांची श्रद्धास्थाने उद्ध्वस्त केली. मंदिरे पाडून मस्जिदींची उभारणी झाली; मठाची जागा मदरसाने घेतली. तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी दर्गे उभे करण्यात आली. हिंदूचे सांस्कृतिक संचित नष्ट करण्याचे प्रयत्न झाल्यामुळे हिंदूंचे कित्येक धर्मग्रंथ नष्ट करण्यात आले. धर्मगुरू, धर्मसुधारकांचे खून झाले. दहशतीने कित्येक माणसे देश सोडून गेली. सामान्य लोक दशोधडीस लागले. जत्रा, यात्रा, उत्सव साजरे करण्यावर अंमलदारांकडून निर्बंध लादण्यात आले. त्यामुळे भरकटलेल्या समाजाला संघटित करणे, त्यांचा स्वधर्म अभिमान जागा करणे, सामूहिक अस्मिता जागी करण्यासाठी धर्मप्रसारक तथा समाजसुधारकांना प्रतिकात्मक हातोटीने समाज जागृती घडविणे ही काळाची गरज होती. याच पार्श्वभूमीवर एकनाथांचा उदय झाला व त्यांचे वाङ्मयीन तथा इतर सर्वच क्षेत्रातील योगदान साकारले. तत्कालीन स्थल, काल, परिस्थितीच्या गरजेतून समयसूचकतेने आपले कर्तृत्व सिद्ध केले.

तत्कालीन परिस्थितीच्या गरजेतून नाथांनी लोकशिक्षणासाठी विपुल प्रमाणात साहित्य निर्मिती केली. त्या विविधतेने नटलेल्या लिखित साहित्यातून उभे केलेल्या निरनिराळ्या भूमिकांमधून समाजाला जागृत करण्यासाठी तत्कालीन परिस्थितीचे सूक्ष्म निरीक्षण. अवलोकनातून प्रचलित सांस्कृतिक बाबींची व निसर्गातील पशू, पक्षी, प्राणी इ. प्रतिमा, प्रतिकांचा आधार घेऊन लोकरंजन व धर्मप्रबोधनाचे कार्य केले. त्याकरिता समाजातील धर्मोपासक, श्रद्धास्थाने प्रपंचातील वास्तव, व्यावहारिक वास्तव तथा धर्मग्रंथातील पौराणिक संदर्भ इत्यादी प्रतिमा. प्रतिकांना सुंदर रूपके साधून अखंडितपणे साहित्य सर्जनाचे कार्य तहहयात पूर्ण केले. त्यामधून समाजाला कलेला उपदेश सामान्यजनांना जगण्याचे भान देणारा ठरला. म्हणूनच नाथांना समकालीन व उत्तरकालीन समाजातील सामान्य माणसांच्या व्यक्तिगत, सामाजिक आणि धार्मिक पातळीवरील जगण्याची गुरुकिल्ली सापडली. नाथांच्या कार्यामुळे जागरुक झाालेल्या समाजाच्या संघटितपणातून नाथांच्यानंतरच्या काळात शिवशाही, पेशवाई या स्वधर्मीय राजसत्तांचा उदय, विकास, भरभराट झाली, असे म्हणता येते.

## संत एकनाथांची समयसूचकतेतून साहित्यनिर्मिती

१. देवगिरी किल्ल्याचे सुभेदार जनार्धन स्वामींकडे शिक्षण आणि गुरुपदेश, मातापित्याचे छत्र नसल्यामुळे आजोबा चक्रपाणी यांच्या पालन पोषणामध्ये अनाथ बालक एकनाथ शिक्षणासाठी जनार्धन स्वामींकडे जातात. हीच घटना त्यांच्या जीवनाला कलाटणी देणारी ठरली. गुरू जनार्धन स्वामीच्या साहचर्यातून आणि संस्कारातून नाथांचे व्यक्तिमत्त्व प्रगल्भ बनले. त्यामुळे त्यांच्या अंतरिक ऊर्मीना वाट मोकळी करुन देण्याची प्रेरणा प्राप्त झाली.

२. समाज अवलोकनार्थ तीर्थयात्रा : परधर्मीय मुस्लिम अंमलामध्ये आत्मभान हरपलेल्या महाराष्ट्रीय समाजाला जागृत करण्यासाठी समाज निरीक्षण करण्याचा प्रयत्न नाथांनी गुरुप्रेरणेने केला. त्यामुळे समाजातील बहुविधतेचा अनुभव घेऊन लोकशिक्षणासाठी साहित्य सर्जनातून विविध प्रायोगिक रचना साकारणे शक्य झाले. समाजाची लोकरंजनाची गरज लक्षात घेउन साहित्याला लोकरंजनातून लोकशिक्षण, असे दुधारी अस्त्र बनविता आले. विविध रचना प्रकारातून भरकटलेल्या समाजाला धर्म जागविण्याचा व समाज संघटनांचा संदेश देता आला. त्यामुळे महाराष्ट्रीय समाजाला स्वधर्मीय हिंदवी स्वराज्य शिवशाहीच्या उदयास पोषक वातावरण तयार झाले.

३. तीर्थयात्रा करत असताना चतु:श्लोकी भागवताचे लेखन : तीर्थयात्रेच्या निमित्ताने पर्यटन होत असताना नाथांनी गुरु सहवासातून अनुभवलेल्या अनेक घटकांबददल चिंतन केले. धर्मग्रंथांच्या वाचन व पारायणातून प्रगल्भ बनलेल्या नाथांच्या व्यक्तिमत्त्वातून मूळ संस्कृतमधील भागवत ग्रंथाच्या दशम स्कंधातील ३२,३५ अशा चार श्लोकांचे टीकाभाष्य स्वतंत्रपणे लिहिले. या लेखनातून नाथांची पहिली साहित्यनिर्मिती अवतीर्ण झाली. या ग्रंथरचनेच्या माध्यमातून मराठीतील अष्टपैलू लेखक , प्रयोगशील , कवी आणि कलावंत मराठी साहित्यांच्या दालनामध्ये दाखल झाला.

४. ज्ञानेशाच्या समाधीचा जीर्णोद्धार : ज्ञानेशांच्या समाधीला नाथांच्या अगोदर साधारणत: २५० वर्षापेक्षा अधिक काळ लोटला होता. या काळात मुस्लिम राजसत्तेचा हैदोसधुल्ला महाराष्ट्रभर मातलेला होता. वारकऱ्यांची अस्मिता श्रद्धास्थान असलेल्या आळंदीमध्ये समाधीस्थळी व परिसरात खूप पडझड झालेली होती. परधर्मीय राजकर्त्यांच्या दहशतीने वारकरी पंथातील माणसे डागडुजी करण्याच्या मनस्थितीत असूनसुद्धा भयग्रस्त होते. हे जवळून न्याहळल्यानंतर नाथांनी ज्ञानेशांच्या समाधीचा जीर्णोद्धार केला. या कार्यामुळे ते ऐतिहासिक वास्तू–स्थळांचा जीर्णोद्धारकर्ते पहिले संत ठरले.

५. भावार्थदीपिका ग्रंथाची शुद्धप्रत तयार करणे : मुस्लिम राज्यकर्त्याच्या धर्मप्रसारांच्या अतिरेकी धोरणामुळे हिंदू धर्मग्रंथ नष्ट करण्याच्या प्रयत्नामुळे अनेक धर्मग्रंथ सांकेतिक लिपीमध्ये बंदिस्त झाले. राज्यकर्त्यांच्या दीर्घकालीन साहचर्यातून अरबी, फार्शी भाषेचा प्रभाव वाढला. मौखिकतेने जतन केलेल्या ग्रंथांमध्ये अनेक अपपाठ घुसले. भावार्थदीपिका या ग्रंथातही अपपाठ आढळू लागले. नाथांनी अभ्यासाअंती संशोधन करून प्रस्तुत ग्रंथाचे संपादन केले. शुद्धप्रत तयार केली. म्हणूनच आज उपलब्ध असलेल्या भावार्थदीपिका या ग्रंथाचे आद्य संशोधक व संपादक नाथांनाच संबोधणे उचित राहील, असे मला वाटते.

६. दीर्घकाव्य ग्रंथरचना : भावार्थरामायण व एकनाथी भागवत या विपुल ओवीसंख्या असलेल्या दीर्घ स्वरूपाच्या ग्रंथाची निर्मिती नाथांनी केली. स्वराज्य स्वातंत्र्याविषयीची भावना लोकमनात जागविण्यासाठी व परधर्मीय सत्तेविरुद्ध असंतोष वाढविण्याकरिता आणि समाज संघटनांची प्रेरणा देणारी व तसेच मूलत: संस्कृत भाषेत अडकलेल्या वाङ्मयीन कलाकृतीआधारे रामायण व भागवत या पौराणिक रचना निवडून त्यांचे मराठी भाषेत विवेचन करण्याचा प्रयत्न नाथांनी केला. या ग्रंथाचे विवेचन करताना तत्कालीन परिस्थितीशी त्याचा अन्वयार्थ जोडला. पौराणिकतेपेक्षा सामाजिक संदर्भांना वास्तव रूप देऊन वर्णने केली. म्हणूनच त्यांच्या लेखनातील भावार्थरामायणामध्ये कालविपर्यासाचे दोषसुद्धा आढळतात. तत्कालीन महाराष्ट्रात मराठी सारस्वतामध्ये मराठी भाषाभिमान वाढविणे व साहित्य भाषा म्हणून मराठी भाषेला मान्यता मिळवून देणे व मराठी लेखनाला चालना देणे, धर्माचे मक्तेदार संस्कृत पंडितांचा विरोध न जुमानता एकनाथांनी भागवत या ग्रंथाचे मराठीमध्येच लेखन, या ग्रंथाच्या सिद्धतेनंतर काशी क्षेत्रात या ग्रंथाची संस्कृत पंडितांनी काढलेली मिरवणूक यातून एकनाथांच्या परिस्थितीसापेक्ष वर्तनाचे दर्शन घडते. समाजस्थिती सुधारणे, पौराणिक प्रतिमा–प्रतिकांच्या आधारे धार्मिक भावना वृद्धिंगत करणे, लोकभाषेतून परधर्मीय सत्तेबदल असंतोष निर्माण करणे आणि सधर्मीय सत्तेचे सुतोवाच करणे अशा उद्दिष्टाप्रती नाथांची ग्रंथसंपदा साकारली. तत्कालीन काल–परिस्थितीला अनुलक्षून नाथाचे हे कार्य अद्वितीयच आहे.

७.  मनोरंजन आणि उद्‌बोधन घडविणारी रचना : पदे—स्फूटरचना सामान्यजनांची कथात्मक मनोरंजनाची व उदबोधनाची गरज लक्षात घेऊन रुक्मिणीस्वयंवर हा ग्रंथ लिहिला. गजेंद्रमोक्ष, हस्तामलक यासारखे कीर्तन—प्रवचनास उपयुक्त आख्याने, काही पदे, गौळणी अशा प्रकारची स्फूट पद्य निर्मितीही त्यांनी केली. त्यामधून पौराणिक कथाबीजांच्या आधारे लौकिक भावार्थ जागविणे शक्य झाले. पौराणिक संदर्भाधारे तत्कालीन मानवी वृत्तीप्रवृत्तीचे दर्शन घडविणे व मनोरंजनातून लौकिक उपदेश देणे संत एकनाथांना साध्य झाले. गवळणी रचनांमधून श्रीकृष्ण—गोपिकांच्या बाळलीलांचे प्रसंग निवडून मानवी लौकिक भावभावनांची चाळवाचाळव कालसापेक्ष संदर्भ जागविणारी आहे.  नाथांनी भारुड रचनेच्या माध्यमातून समाजाची विस्कटलेली घडी नीट बसविण्यासाठी व्यवहारातील वेगवेगळया दाखल्यातून मनोरंजन आणि उपदेश असा दुहेरी हेतू साध्य केला. म्हणून आध्यात्मिक—पारमार्थिक पातळीवरील उन्नतीसाठी प्रतिकूल परिस्थितीतही प्रतिके—प्रतिमा—रूपक योजनांच्या आधारे साहित्य निर्मितीद्वारे आगळे कर्तृत्व सिद्ध करणारे एकनाथ हे एकमेव संत आहेत.

८.  साहित्यनिर्मितीसोबत नाथांनी त्यांच्या आयुष्यात विविध घटना व प्रसंगाच्या निमित्ताने समयोचित कर्त्यासमाजसुधारकाची भूमिका साकारली. हरिपंडिताने काशी येथून आणलेले गंगेचे तीर्थ (पाणी) पैठण येथे उन्हाने व्याकूळलेल्या गाढवाला पाजवले. या वृत्तीतून समाजामध्ये भूतदयेचा संदेश दिला. गावातील भुकेलेल्या गरीब दलितांना वडिलांच्या वर्षश्राद्धाच्या दिवशी मिष्ठान्न पित्रभोजन दिले. यामधून समाजाला अस्पृश्यता निर्मूलनाचा संदेश दिला. वारकरी पंथातील धर्मनिरपेक्षतेची शिकवण आणि स्वत:चे आचरण सुसंगती दर्शविली. गंगास्नानाहून सोवळ्यामध्ये घरी परतत असताना अस्पृश्याच्या मुलास त्याच्या मातेपर्यंत पोचविले. या प्रसंगातून एकनाथ हे कर्ते समाजसुधारक असल्याबाबतची साक्ष मिळते.

## समारोप

दत्त संप्रदाय आणि वारकरी संप्रदाय यातील समन्वयकार म्हणून नाथांचा उल्लेख केला जातो. प्रपंच व परमार्थ यांची सुयोग्य सांगड घालणारे बोले तैसा चाले, त्याची वृंदावी पाउले! अशा वंदनीय व्यक्तिमत्त्वाच्या नाथांनी अनुभवातून परिस्थितीचे निरीक्षण करून लोकोद्धारासाठी काव्यरचनेची हातोटी साधली. साहित्यशास्त्र, भाषाशास्त्र, काव्यशास्त्र, व्याकरण, लोकसाहित्य अशा अनेक शास्त्रांच्या पारंगतेतून नाथांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे उत्तुंग आविष्कार सुंदरपणे घडले.  म्हणूनच नाथांनी राजकीय, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक परिस्थितीशी जुळवून घेत समाजाला दिशादर्शक साहित्य निर्माण केले. साहित्य हा समाजाचा आरसा असतो. तसेच हे अप्रत्यक्षपणे समाजशिक्षणाचे कार्य करते, लोकांमध्ये तत्त्वज्ञान प्रसारणाचे कार्य करते, अशा वाङ्मयीन मूल्याचे प्रत्यंतर नाथांच्या वाङ्मयातून ठिकठिकाणी घडते. Literature is  Critcism Of Life या उक्तीप्रमाणे नाथांचे साहित्य सर्व वाङ्मयीन कसोट्यांना पुरून उरणारे आहे. म्हणून वास्तववादी त्रिकालबाधित सत्य असे तत्त्वज्ञान साहित्यातून कथन केल्यामुळे ते चिरंतन ठरले आहे. नित्यनूतनतेचा प्रत्यय देत आहे. या कार्यावरून एकनाथांना संत, कवी, तत्त्वज्ञ, समाजसुधारक, विचारवंत, भाष्यकार असे संबोधता येते.

## संदर्भ

१. प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप — ह. श्री. दृ.शेणोलीकर
२. एकनाथ दर्शन— खंड १ व २ — संपा. ब. गि. घाटे
३.श्री एकनाथ वाङ्मय व कार्य — न. र. फाटक
४. संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती — गं. बा. सरदार
५. पाच भक्तीसंप्रदाय — र.रा. गोसावी
६. मराठी वाङ्मयभिरुचीचे विहंगमावलोकन — २ व ३ — रा. श्री. जोग
७. मराठी वाङ्मयाचा इतिहास —ल. रा. पांगारकर
८. मराठी वाङ्मयाचा इतिहास — ल.रा. नसिराबादकर

❖❖❖

# ग्रामीण कादंबरीतील निसर्गदर्शन

डॉ. पंढरी डोईफोडे
सहा. प्राध्यापक
संत भगवान बाबा कला महाविद्यालय, सिंदखेड राजा, जि. बुलढाणा
भ्रमणध्वनी ८८०६७०९३२७

## प्रस्तावना

ग्रामीण जीवन आणि ग्रामीण साहित्य या दोहोंमधील अन्योन्य संबंध लक्षात घेतला पाहिजे. या दोन्हींची परस्परांपासून फारकत करता येणार नाही. ग्रामीण साहित्य निर्मितीची बीजे जीवनातील वास्तवातच असतात. जीवनाच्या घडणीमध्ये प्रत्यक्ष—अप्रत्यक्षपणे ग्रामीण साहित्याचा काहीना काही वाटा असतो. प्रत्यक्ष जीवनातील स्थिती—गतीचे प्रतिबिंब साहित्यात उमटत असते. कारण ग्रामीण साहित्याचा निर्माता निसर्ग चक्राला साक्षी ठेवूनच साहित्य लिहीत असतो.

## विषय विवेचन

ग्रामीण साहित्य आणि निसर्ग यांचा संबंध अतूट आहे. ग्रामीण साहित्याचे स्वतंत्र अस्तित्व निसर्गाला दूर सारून आपण मान्य करू शकत नाही. ग्रामीण जीवनातील साधने, शिक्षण, धर्म, नीती, या विषयीच्या ग्रामीण जीवनाच्या धारणा, त्याचे कौटुंबिक जीवन, सण, सोहळे, त्यांच्या श्रद्धा आणि दैवते यांचे पाथेय घेऊनच झालेला असतो; परंतु या सर्वाला पूर्णत: 'स्व—रूप' देणारा घटक म्हणजे ग्रामीण जीवनाचा अपरिहार्य घटक असलेला 'निसर्ग'. हा निसर्गच ग्रामीण जीवनाला अन् त्याच्या साहित्याला वेगळेपणा बहाल करताना दिसून येतो.

ग्रामीण जीवन आणि निसर्ग यांचा संबंध प्रस्थापित करण्याचे कार्य हे स्त्रीने केलेले आहे. ग्रामीण कादंबरीची नायिका ही ग्रामीण स्त्री आहे. स्त्रीच्या जीवनाचा संबंध हा निसर्गाशी जोडलेला आहे. सदानंद देशमुखांच्या 'बारोमास' मधील शेवंतामाय 'शेती हेच जीवन' मानणारी असल्यामुळे एकनाथला शेती विकू देत नाही. शेतीशिवाय आपली उपजीविक होणार नाही, अशी तिची भावना आहे. परंतु बदलत्या स्त्रीविचाराची अलका मात्र शेती विकून नोकरी मिळण्याची अपेक्षा ठेवते. परंतु शेवंतामायच्या आग्रहामुळे शेती विकता येत नाही. निसर्ग आणि माणूस यांना जोडणारा दुवा म्हणजे 'पाणी'. पाणी हीच निसर्गाकडून मानवाला मिळालेली देणगी आहे. त्यावर 'तहान' मधील रामकोर आपल्या आशा—अभिलाशा पूर्ण करण्याचे स्वप्न बाळगते.

निसर्ग हा ग्रामीण साहित्यात रक्षक आणि भक्षक या दोन्ही नात्याने आलेला आहे. 'हाल्या हाल्या दुधू दे' मधील अनसा नवऱ्याच्या बिमारीमुळे बैल चारायला नेते. तर अवकाळी पाऊस झाल्यामुळे तिचा बैल पुरात वाहून जातो. मुलीच्या लग्नासाठी शेतात जास्त कापूस लावतात. परंतु निसर्गाच्या कोपामुळे त्याला बोंडे न लागल्यामुळे त्यांचे संपूर्ण उत्पन्न नष्ट होते. 'पखाल'मधील निसर्ग मात्र कोळी कुटुंबाला जोपासणारा आहे. तो त्यांच्या जीवनात चैतन्य निर्माण करतो. पखालीच्या धंद्यामुळे घरात उपासमारीची वेळ येत नाही. परंतु मानव निसर्गाला औद्योगिकरणाच्या साह्याने अंकित करीत आहे. नळ योजनेमुळे त्यांच्या पखालीच्या धंद्यावर गंडांतर येते.

निसर्गाच्या अनियमितपणामुळे पारंपरिक व्यवसाय बदलत चालले आहे. 'पाटीलकी'मधील सरावन बिबे गोळा करण्याचे काम सोडून ट्रॅक्टरवर ड्रायव्हरकीचे काम करतो. शेती व्यवसाय परवडणारा नसल्यामुळे व्यवसायाच्या रूपाने शेतीचे प्लॉटींग करून काळ्या आईचे रूपांतर क्राँक्रीट इमारतीमध्ये होते आहे हा विषय प्रतिमा इंगोले यांच्या 'बुढाई'मध्ये आलेला आहे. शेतीवर उपजीविका होत नसल्यामुळे व खेड्यामध्ये उपजीविकेचे दुसरे साधन उपलब्ध नसल्यामुळे डॉ. किशोर सानप यांच्या 'पांगुळवाडा'मधील शेतकरी शहराच्या ठिकाणी स्थायी होतो. निसर्ग हा मानवी जीवनात रक्षक आणि भक्षक या दोन्ही नात्याने प्रवेश करीत असला तरीही निसर्गाशिवाय मानवी जीवन पूर्ण होऊ शकत नाही. कारण निसर्गच ग्रामीण जीवनाला नवनिर्मिती बहाल करीत असतो.

ग्रामीण साहित्यातील ग्रामीण माणूस आरोग्याच्या दृष्टीने निसर्गावर आधारित असतो. डोक्यावरील केस धुण्यासाठी मातीचा लेप लावतात. जखमेवर 'करमुडी'चा पाला पिळून त्याचा रस टाकल्यास जखम बरी होते. हातपाय ठणकत असल्यास लिंबाचा पाला त्यावर बांधतात. लहान मुलाचा खोकला 'निवडुंगाचा'रस पिण्यासाठी दिल्यास बरा होतो. तुळशीचे पान, अद्रक, लवंग टाकून चहा घेतल्यास पोटाचे दुखणे थांबते. ग्रामीण साहित्यातील कृषिजीवन निसर्गाशी जोडले आहे. एकंदर निसर्ग हा जीवनाचा अविभाज्य घटक मानला जातो.

पाऊस लहरी असल्यामुळे कुणबी दैववादी बनला. ऋतुचक्रानुसार पावसाची जी नक्षत्रे आहेत त्या नक्षत्रांविषयी कुणब्यांच्या तोंडी मौखिक परंपरेतून चालत आलेल्या ज्या म्हणी, वाक्प्रचार आहेत त्या पाहिल्या तर हे ऋणानुबंध किती खोलवरचे आहेत आणि कुणबी कसा 'वरुणराजा'ला मानतो, त्याची पूजा करतो याची अधिक प्रचिती येते. ग्रामीण समाजात पावसाच्या नक्षत्राविषयी समजुती रूढ आहेत. 'आला धोंडा नि पिकांचा लोंढा', 'लागतील मघा: वरती बघा नाहीतर चुलीपुढे हागा', पडेल उतरा तर भात खाईना कुत्रा' अशा प्रकारच्या म्हणींच्या माध्यमातून ग्रामीण माणूस अनुभवातून निसर्गाशी भाषिक व्यवहार साधत असतो.

ग्रामीण कादंबरीत शेती ही केंद्रस्थानी असल्यामुळे तेथे कृषीकेंद्रित अशी स्वतंत्र संस्कृती निर्माण होऊ शकली आहे. निसर्गावर शेती आणि शेतीवर संस्कृती अशी मांडणी ग्रामीण भागात झालेली आहे. या संदर्भातच डॉ. नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात, ''युगानुयुगापासून सबंध जीवन व्यवस्था जीवनमूल्ये ही कृषीजीवनाशी निगडित अशीच आहेत. येथे शेती हा केवळ उपजीविकेचा व्यवसाय उरला नाही; तर त्याहीपलीकडे जाऊन काही भावबंध निर्माण झाले. त्यानुसार मग संस्कृतीची जडणघडण होत गेली.'' सण आणि उत्सव पाहता आपल्या लक्षात येते, होळीमध्ये गोवऱ्या पळसाची फांदी व लाकडे जाळतात. 'गुढीपाडवा' या सणाला आंब्याचा डघळा, लिंबाचा फुलोरा, पिसोळा, 'अक्षयतृतीया' पळसाच्या पानाची पत्रावळी, 'लग्न' सौंदराची फादी, जांभळीचे डहाळे, 'नागपंचमी' वारुळाची पूजा, 'पोळा' पाचपानी पळसाचा डहाळा, 'गौरीपूजन' आघाड्याची पाने, 'दसरा' आपट्याची फांदी असा ग्रामीण कादंबरीतून ग्रामीण जीवन आणि निसर्ग यांचा संबंध दिसून येतो. पारंपरिक सणांमध्ये शेतीला पिकणाऱ्या त्या वेळेच्या धान्याला प्राधान्य दिलेले पाहता शेती केंद्रस्थानी ठेवून गावातील सगळ्या पारंपरिक सणांचे आणि उत्सवांचे पंचांग आखलेले आहे, असे म्हटले तर ती अतिशयोक्ती होणार नाही.

ग्रामीण माणसाला निसर्गाच्या आपत्तीमुळे येणाऱ्या संकटांचाही सामना करावा लागतो. याचेही चित्रण ग्रामीण कादंबरीत येते. निसर्गाशी सहकार्य, निसर्गाचे सहकार्य अशा मैत्रीच्या संबंधाप्रमाणे विरोधाचेही संबंध निसर्गाशी असतात. अनावृष्टी, अतिवृष्टी, गारपीट, पिकावरील अनावर कीड यांसाख्या निसर्ग कोपाला ग्रामीण माणसं धैर्याने तोंड देताना दिसतात. पाऊस कमी झाला तर व्याजाच्या रूपाने पैसा घेऊन त्यातून आणलेले बियाणे नष्ट होऊ शकते, किंवा पीक वावरात असेल तेव्हा पाऊस झाला नाही तर 'सोंकारल्याविणा गमावले पीक' अशी शेतकऱ्याची अवस्था होते. कपाशीला बोंडे लागण्यावेळी लाल्या रोग आल्यास संपूर्ण झाड होरपाळून निघते. त्यामुळे सावकाराचे किंवा बँकाचे कर्ज शेतकरी फेडू शकत नाही. पर्यायाने त्याच्यावर आत्महत्या करण्याची वेळ येते. ज्या शेतीवर संस्कृती उभारली, ज्या शेतीने त्याला जीवनदान दिले, त्याच शेतामध्ये झाडाला फाशी घ्यावी लागते. याचेही चित्रण ग्रामीण कादंबरीत आलेले आहे.

निसर्गाच्या कोपामुळे शेतकरी उन्मळून पडत असता तरी बदलत्या काळातील विचारप्रणाली त्याच्या मृत्यूस कारणीभूत ठरत आहे. अगोदरच्या वेळीही शेतकरी शेतीवर उपजीविका करीत होता. तेव्हा मात्र त्याला आत्महत्या करण्याची गरज नव्हती. आज मात्र विज्ञानयुगामध्येही तो समाधानी नसून दु:खीच आहे. त्याच्या जीवनामधील उत्साह, चैतन्य संपलेले आहे. विषयाची चिंता त्याला सतावत आहे. शेती पिकली तरी शेतीसाठी होणारा खर्च वाढला आहे. मालाला खर्चाच्या प्रमाणात भाव नाही, त्यामुळे निसर्ग आणि खर्च यांच्या तावडीतून जे काही पैसे शिल्लक राहतात, त्यामध्ये तो आपले घर समाधानाने चालवू शकत नाही. उत्पादन खर्चात वाढ, बॅकांचे व्याजदर, त्यामुळे सावकाराकडे पैशाची मागणी व त्याची परतफेड न होणे, मुलींचे लग्न आणि भांडवलशाहीने उत्पादन केलेल्या ऐषोरामदायी वस्तू, कृत्रिम पण आवश्यक वाटणाऱ्या भ्रामक गरजा इ.मुळे ग्रामीण माणूस उन्मळून पडला आहे. या संदर्भात बाबाराव मुसळे यांची 'हाल्या हाल्या दुधू दे' ही कादंबरी महत्त्वाची ठरते.

ग्रामीण भागाची रचना निसर्गानुसारच झालेली आहे. कोणतेही खेडे हे नदी, तलाव, नाला किंवा पाणी मिळेल अशाच ठिकाणी वसलेले आहे. आजूबाजूला सुपीक जमीन आणि काही प्रमाणात दूरवर गुरांना चारायला डोंगर असतो. घरेसुद्धा निसर्गाच्या साह्यानेच बांधलेली असतात. प्रत्येकाच्या सुख–दु:खात प्रत्येकजण सहभागी होतो. त्याच्यामध्ये शहरी भागाप्रमाणे आत्मकेंद्रिपणा नसतो. ग्रामीण जीवनाच्या प्रवाहाची या जीवनाशी तुलना करता, ग्रामीण जीवनप्रवाह वेगळा वाटतो. मध्यमवर्गीय जीवनापेक्षा ग्रामीण जीवनाचा पाया भिन्न आहे. निसर्गाशी ते बांधलेले असल्याने स्वाभाविकच बहिर्मुख असते. खेड्यातील सर्वजण सकाळी व रात्री एकत्र बसतात. त्यांच्यामध्ये निसर्गाचीच चर्चा जास्त असते. पावसाचा अंदाज असल्यास सर्व सुखाने, समाधानाने जेवण करतात. त्यामुळे प्रत्येकजण एकमेकांच्या भावना समजत असतो. स्वार्थीपण त्याला जाणवत नाही. त्यामुळे तो परस्परावलंबी बनतो.

निसर्ग व मानवी जीवन यांचे एकात्म रसायन ग्रामीण कादंबरीत घडत आहे. या आधी प्रसंगाच्या सजावटीसाठी किंवा भावभावनाच्या पार्श्वभूमीसाठी साहित्यात येणारा निसर्ग आता ग्रामीण कादंबरीत जीवनानुभवाचा अपरिहार्य भाग म्हणून येतो.

## निष्कर्ष :

१. ग्रामीण जीवनाचा विचार केल्यास असे निदर्शनास येते की, शेती ही निसर्गावर अवलंबून आहे. निसर्गाच्या चक्रानुसार शेतीची मशागत केली जाते आणि शेतीच्या पेरणी ते मळणी या कालाक्रमावर कृषीसंस्कृती आधारित आहे. आणि संस्कृतीचा आधार घेत ग्रामीण स्त्री आपले जीवन घडवित आहे.

२. निसर्ग हा ग्रामीण जीवनात रक्षक आणि भक्षक या दोन्ही रूपाने येत असला तरी; निसर्गाशिवाय मानवी जीवन समृद्ध होऊच शकत नाही.

३. निसर्गाशी ग्रामीण जीवन बांधलेले असल्यामुळे एकमेकांच्या भावना समजून घेतात. त्यामुळे त्यांचे जीवन बहिर्मुख बनते. शहरी माणसासारखी ग्रामीण माणसाची वृत्ती स्वार्थी नसल्यामुळे तो आत्मकेंद्री बनत नाही.

## संदर्भ

१) डॉ. द. ता. भोसले, ग्रामीण सहित्य एक चिंतन, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, १९८८.

२) मोहन पाटील, ग्रामीण साहित्य आणि संस्कृती, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, २००२.

३) डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, द्वितीयावृत्ती, १९९३.

४) डॉ. पंढरी डोईफोडे, ग्रामीण कादंबरी : बदलते स्त्री जीवन, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, २०१३.

❖❖❖

# रा.रं. बोराडे यांच्या कथेतील बदलते स्त्रीजीवन

प्रा. वाघमारे बी.एस.
सहा. प्राध्यापक
कै. निवृत्तीराव पाटील जवळगावकर महाविद्यालय
तामसा, ता. हातगाव, जि. नांदेड
इ मेल : waghmarebalaji0@gmail.com मो. ९८२३८८६२२४

मराठीत 'ग्रामीण' या प्रवाहात होणारी वाङ्मयनिर्मिती सर्वसाधारणपणे १९२५ पासून होऊ लागली. त्यापूर्वी सुद्धा मराठी वाङ्मयात 'ग्रामीणत्वाच्या' खुणा सापडतील; परंतु जाणीपूर्वक ग्रामीण जीवनदर्शन घडविण्याचा प्रयत्न मराठी साहित्यात इ.स. १९२५ पासूनच सुरू झाला. हा प्रयत्न सुरुवातीला कवितेच्या माध्यमातून करण्यात आला. 'मीठभाकर' आणि 'सुगी' या संग्रहातून अशी कविता संग्रहित केलेली दिसते. कवितेनंतर ग्रामीण जीवनदर्शन घडविण्याचा प्रयत्न कथा आणि कादंबरी या वाङ्मय प्रकारामधून झालेला आहे.

१९२५ पासून उदयाला आलेल्या ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा एकूण मराठी साहित्यापेक्षा वेगळ्या आहेत. या साहित्यावर गांधीवादाचा त्याचबरोबर सामाजिक जाणिवेचा प्रभाव पडलेला दिसतो. तसेच ग्रामीण जीवनवास्तव चित्रित करण्याच्या दृष्टिकोनातून या साहित्याची निर्मिती झाली. ग्रामीण साहित्यातील कथा या वाङ्मय प्रकारातील रा.रं. बोराडे यांच्या कथा लेखनाचे स्वरूप प्रस्तुत शोधनिबंधात बघायचे असून त्यांच्या कथेतील बदलत्या स्त्रीजीवनाचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात येईल. काही निवडक कथेच्या अनुषंगाने हा शोध घेता येईल.

## ग्रामीण कथावाङ्मयाची पार्श्वभूमी

मराठी गद्याने आधुनिक मराठी साहित्याची पूर्वरूपे ही इ.स. १८३२ ते १८७० पर्यंत सिद्ध केली. आधुनिक काळाची चाहूलही इ.स. १८७४ च्या विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या निबंधमालेपासून लागली. इ.स. १८८० पासून काव्य, नाट्य, कादंबरी, कथा यांची सामाजिक आशयनिष्ठ निर्मिती होऊ लागली. या काळातील साहित्यनिर्मिती करणारा वर्ग हा पांढरपेशी, बुद्धिजीवी व शिक्षित होता. त्याचबरोबर वाचकवर्गही पांढरपेशी व नागर होता. थोडक्यात इ.स. १८७० ते १९२० पर्यंतचे साहित्य हे सर्वकष मराठी समाजजीवनाचे प्रतिनिधित्व करू शकत नव्हते. कारण ठरावीक नगरांमध्ये राहणाऱ्या पांढरपेशांचे जीवनानुभव साहित्यातून रेखाटले जात होते.

''आज फोफावलेल्या ग्रामीण कथाविश्वाचा उगम म्हणून केवळ हरिभाऊंच्या 'काळ तर मोठा कठीण आला' कडे पहावे लागते. कारण त्यापूर्वी तसे काही 'ग्रामीण' लेखन सापडत नाही. १८९७ मध्ये महाराष्ट्रात दुष्काळ पडला त्यातील शेतकऱ्यांच्या परिस्थितीतीला अनुलक्षून ही कथा लिहिली आहे. म्हणजे ही शेतकऱ्यांच्या अगर ग्रामीण जीवनावरील कथा नाही. 'दुष्काळातील शेतकऱ्यांच्या' तत्कालीन वाताहतीची कथा आहे. 'डेक्कन सभेच्या' कागदपत्रात ही माहिती त्यांना वाचायला मिळाली. तिच्या आधारे त्यांनी ही कथा लिहिली. त्यामुळे ही कथा हकीकतीसारखी वाटते. पण ही हकीकत मोठ्या ताकदीची आहे. संवाद शक्य ते टाळले आहेत. वर्णनात विस्तार आणि स्थूलपणा सापडत नाही. गोष्टीची शक्ती मूळ कथानकात आहे. वाताहतीने निर्माण झालेले कारुण्य, दारिद्र्य, दुर्दशा इत्यादी गोष्टीच मनाचा ठाव घेतात. कथेत अगदी गडद रंग भरत जाऊन ती संपली आहे. शेतकरी जीवनाची सगळीच वाताहत एकाच कथेत आणावयाची इच्छा धरल्याने असंभाव्यतेला ही कथा मध्यानंतर स्पर्श करीत पुढे सरकते.''[१]

यावरून हरिभाऊंचा पिंड हा पांढरपेशी समाज चित्रित करणारा ग्रामीण जीवनाच्या अनुभवाचा स्पर्श सुद्धा त्यांना लाभलेला नाही. हरिभाऊंच्या समोर वाचकवर्ग पांढरपेशी व नागर होता. शहराच्या बाहेर खेड्यापाड्यातून आणि रानावनांतून कष्टणारा, निम्नस्तरावरचे जीवन जगणारा कष्टाळू, सोशीक, शेतात राबणारा ही जाणीव त्यांना झालेली नाही. परंतु हरिभाऊंची कथा ही ग्रामीण जीवनातील शेतकऱ्यांची व त्यांच्या कुटुंबाची होणारी वाताहत कशी होते याचे चित्रण करणारी आहे. त्यांनी अद्‌भुतता आणि अवास्तवतेच्या पकडीतून सोडवून ग्रामीण कथेचे बीजारोपण केले आहे. हरिभाऊंनी अनेक कथा लिहिल्या; परंतु 'काळ तर मोठा कठीण आला' ही कथा ग्रामीण साहित्याच्या तुलनेत प्रेरणादायी ठरली.

''हरिभाऊची अपातत: ही कथा एका मानवी करुणेपोटी लिहिली गेली आहे. एवढी एकच कथा त्यांच्या इतर कथांच्यापेक्षा कथाआशयाच्या दृष्टीने वेगळी आहे. ग्रामीण जीवनाला स्पर्श करणारी ही कथा आद्य ग्रामीण

मराठी कथा मानण्यास हरकत नाही. ग्रामीण मराठी कथा त्याच्यापलीकडे हाती लागत नाही. ग्रामीण मराठी कथेची पायरीखालची पायरी असे तिचे दर्शन आहे. तरीही तिचे महत्त्व नामदेवांच्या पायरीप्रमाणे आहे ते मानावेच लागेल.''[२] हरिभाऊंनी या कथेत अस्सल ग्रामीण वास्तवेचे चित्रण या कथेत केलेले आहे. असे काही अभ्यासकांचे मत आहे.

''साधारणत: मराठीमध्ये जाणीवपूर्वक ग्रामीण साहित्याच्या निर्मितीला १९२० नंतर प्रारंभ झाला असे नोंदविले जाते आणि ते अंशत: बरोबरही आहे. त्याचे कारणच मूळी हे आहे.''[३] असे ग्रामीण साहित्याच्या निर्मिती काळासंबंधी डॉ. नागनाथ कोत्तापले यांचे मत आहे. १९२५ ते १९४० या काळातच ग्रामीण वाङ्मय, प्रादेशिक साहित्य हे शब्द प्रयोग मराठी साहित्यात येऊ लागले. गांधीवादाबरोबरच साम्यवादाचाही प्रभाव या काळात होत होता. देशप्रेम, स्वातंत्र्यप्रेम यातून निर्माण झालेल्या ध्येयवादाची प्रेरणा होती. ग्रामीण जीवन, संस्कृती, श्रद्धा, अंधश्रद्धा, परंपरा, बहुरंगी निसर्ग, मातीचा वसा याचे चित्रण मराठी साहित्यात प्रथमच येऊ लागले. ग्रामीण साहित्याच्या एका वेगळ्या प्रवाहाची जाणीव एकूण वाङ्मयीन प्रवाहाला जाणिवाची अशा लेखनक्रमी होत्या. त्यामध्ये अतिरंजितता, कल्पना प्रचुरता, नि अद्‌भुतता गडद रंगात असली तरीही प्राथमिक अवस्थेतील ते ग्रामीण साहित्य होते. पुढील समृद्ध ग्रामीण कथेची बैठक याच काळात झाली.

या काळात गोव्यातील लेखक वि.स. सुखटणकर यांचा 'सह्याद्रीच्या पायथ्याशी' हा कथासंग्रह १९३१ साली प्रसिद्ध झाला. त्याबरोबर र.वा. दिघे यांचा 'वादळ' हा कथासंग्रह प्रसिद्ध झाला. अतिरंजितता, कल्पनाशकता, काव्यमयता ही खास वैशिष्ट्ये त्यांच्या कथावाङ्मयाची होती. दिघ्यांच्या बरोबरीनेच ग.ल. ठोकळ लिहीत होते. त्यांनी जे ग्रामीण जीवन भोगले, अनुभवले ते कथेत साकारले ग्रामीण जीवनातील विविध रंग आणि ढंग, रंगेलपण, रंगदारपणा त्यांनी साहित्यात आणला. ठोकळांच्या कथेने मराठी ग्रामीण कथा ही विस्तारलेली आहे. ग्रामीण कथेला लोकप्रियतेची पातळी प्राप्त करून दिली.

इ.स. १९४१ साली श्री.म. माटे यांनी 'उपेक्षितांचे अंतरंग' हा कथासंग्रह लिहिला. तो त्यांचा पहिला कथासंग्रह. त्यांचा 'माणुसकीचा गहिवर' हा दुसरा कथासंग्रह. समाजामध्ये जे पाहिले व दिसले तेच वास्तव त्यांनी साहित्यात मांडले.

''खरा ग्रामीण माणूस जीवनाच्या अंत:स्यूत जाणिवेशी ग्रामीण साहित्यात माटेंनी चित्रित केला आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने ग्रामीण कथा आशय, अभिव्यक्तीच्या दृष्टीने गुणवत्तापूर्ण कसदार बनली आहे. म्हणून त्यांच्याकडे ग्रामीण कथेचे जनकत्व जाते.''[४] माटेंनी दलितात, उपेक्षित समाजात, समाजातील खालच्या थरात मिसळून त्यांचे सुखंदु:खं, त्यांचे भोग, दारिद्र्य, त्यांच्या समस्या मानवतेने समजून घेतल्या आहेत.

''१९४२ च्या क्रांतीने खेडोपोडी नवी जागृती आली. ग्रामीण जीवन चेतले गेले. नव्या जगाची आस त्यांना लागली. स्वातंत्र्य मिळाले. नवे युग सुरू झाले. आत्मविश्वास बाळगून आत्मनिर्धाराने खेडी उभी राहिली. सुधारणेचे वारे वाहू लागले. शिक्षणाने डोळसपणा आला. खेड्यापाड्यातला तरुण वर्ग शिक्षित होऊ लागला. नवी स्वप्नं त्यांच्या मनीमानसी खेळू लागली. याच संदर्भात साहित्य लेखनाची जाणही त्यांना होऊ लागली. ग्रामीण जीवनाने ज्यांचे जीवन घडले, त्या जीवनाचे चित्रण करू लागले.''[५]

१९४२ नंतर खेड्यातील सुशिक्षित वर्ग आपल्या अनुभवांना लेखणीत गुंफत होता. अस्सल व वास्तव जीवनाचे प्रतिबिंब साहित्यामध्ये रेखाटत होता. स्वची जाणीव निर्माण झाली होती. १९४५–५० नंतर मराठी साहित्यात नवकथा आली. गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, पु.भा. भावे हे मराठी नागर कथा लिहू लागले. याच काळात भोगलेला, दुष्काळी माणदेश आणि तिथला रंजलेला माणूस व्यंकटेश माडगूळकरांनी कथेत चित्रित केला. त्यामुळे ग्रामीण कथा विकसित झाली. माडगूळकरांच्या काळात ग्रामीण माणसांच्या यथार्थ चित्रण करणाऱ्या शंकर पाटील यांनी ग्रामीण कथेच्या विकासात भर घातली. अस्सल सामाजिक, भान असलेला ग्रामीण मातीचा रंग असलेला लेखक अण्णा भाऊ साठे. त्यांचे 'खुळवाडी', 'बरबाद्या', 'कंजारी', 'भानामती', 'रानवेली' कथासंग्रह आहेत. त्यांची कथा मुजोर समाजव्यवस्थेने पिळल्या गेलेल्या माणसाची कथा आहे.

या काळात शंकरराव खरात, रणजित देसाई यांच्याही ग्रामीण कथा प्रसिद्ध झाल्या. वऱ्हाडी जीवनाचे अस्सल चित्रण करणारे उद्धव शेळके यांनी वऱ्हाडातील ग्रामीण माणसाचे विविधांगी रूपे कथातून साकारले. त्यांच्या कथांत वऱ्हाडी ग्रामीण बोलीभाषेचाच यर्थातेने केलेला वापर महत्त्वाचा आहे.

''१९६० सालापासून ग्रामीण जीवनात एक गतिचित्र दिसते. नव्यानव्या विकास योजना खेड्यापाड्यात राबवू लागल्या. कारखाने निघाले. शिक्षणाचा प्रसार झाला, विज्ञान घराघरात पोहोचले. सर्व स्तर जागृत झाले. आपल्याभोवती राबलेल्या जीवनाचा ते विचार करू लागले. त्याचे दडपले गेलेले जीवन साहित्यात येऊ लागले. अवतीभवतीचा समाज निरखू लागले. एक नवी पिढी नव्या जाणिवेने लिहून लागली.''[६] १९६० नंतर ग्रामीण

कथा साहित्याला वैभवाचे दिवस प्राप्त झाले. ग्रामीण भागातील नवशिक्षित तरुण आपल्या प्रतिमाशक्तीच्या साह्याने अस्सल व वास्तव अनुभव चित्रित करत होता. आपल्या मनातील भावभावना, तर्कवितर्क, विचारांना लेखणीमध्ये बांधू लागला. त्यामुळे मराठी ग्रामीण कथा ही अधिकाधिक समृद्ध होताना दिसून येते.

आपल्या आत्मनिष्ठ अविष्काराने ज्यांनी मराठी ग्रामीण कथेचे क्षितिज विस्तारले, ते म्हणजे डॉ. आनंद यादव त्यांनी 'मातीखालीची माणसे', 'उखडलेली झाडे' पर्यंतचा प्रवास कथेत चित्रित केलेला आहे. त्यांनी अनुभवाच्या अनुषंगाने ग्रामीण भाषा स्वीकारली.

याच काळात मराठवाड्यातील सुप्रसिद्ध ग्रामीण कथाकार रा.रं. बोराडे यांनी 'पेरणी', 'मळणी', 'नातीगोती', 'बोळवण' इ. कथासंग्रह लिहिले. मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त परिसर मराठी ग्रामीण वाङ्मयात आणला. बोराडेंनी बदलत जाणाऱ्या ग्रामीण जीवनातील स्थितीगती आपल्या कथातून चित्रित केली.

यानंतर कोकणच्या लोकसंस्कृतींच्या कथा लिहिणारे मधू मंगेश कर्णिक यांनी कोकणी जीवन अनुभवविश्व समृद्ध केले. याच काळातला चारूता सागर यांचा 'नागीण' हा कथासंग्रह लक्ष वेधून घेणारा आहे. शेतकऱ्याचे खडतर जीवन, प्राणीमात्रांवर असलेले प्रेम याचे चित्रण दिसते. द.ता.भोसले यांनी 'अन्न', 'अगं अगं म्हशी', 'पाऊस' हे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. ग्रामीण माणसाची व्यथा, स्त्रियांच्या वाट्याला आलेले दु:खभोग, गावागावात शिरलेले राजकारण त्यांच्या कथेतून साकारते. भास्कर चंदनशिव याचे 'मरणकळा' 'जांभळ ढव्ह', 'अंगारमाती' हे कथासंग्रह आहेत. यांच्या कथेतील मराठवाड्यातील बीड, उस्मानाबाद या भागातील ग्रामीण जीवनाचे चित्रण येते. याच मातीच्या कुशीत जन्माला आलेली बोलीभाषा त्यांच्या कथेत दिसून येते.

या सर्वच ग्रामीण कथेतून ग्रामीण जीवनदर्शन कष्टमय जीवन, शेतीत राबराब राबणारा शेतकरी वर्ग, तेथील संस्कृती, निसर्ग, चालीरीती, परंपरा, श्रद्धा तेथील दारिद्रय, राहणीमान, शोषण, नातीगोती, प्रेम, जिव्हाळा इ.चे दर्शन या कथेतून साकारलेले आहे.

## ग्रामीण कथाकार : रा.रं. बोराडे

१९६० नंतर ग्रामीण साहित्याच्या प्रवाहात मोलाची भर घालणारे साहित्यिक. त्यांची साहित्यसाधना ग्रामीण जीवनाचे अस्सल चित्रण करणारी आहे. मराठवाड्यातील माणसाची सुखंदु:खं, त्यांचे जगणे, त्यांच्या व्यथा, दारिद्रय त्यांनी आपल्या वाङ्मयात रेखीवपणे व ठाशीवपणे साकार केले.

रा.रं. बोराडे यांचा जन्म मराठवाड्यातील लातूर जिल्ह्यातील' काटगाव' ह्या खेड्यात एका शेतकरी कुटुंबात २५ डिसेंबर १९४० रोजी झाला. त्यांचे संपूर्ण नाव रावसाहेब रंगराव बोराडे. डॉ.यु.म. पठाण यांच्या अध्यापनाचा व सहवासाचा फार मोठा परिणाम त्यांच्यावर झाला. १९६३ पासून प्राध्यापक पदावर ते रुजू झाले. मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ, परभणी येथील शिवाजी महाविद्यालयात मराठीचे प्राध्यापक. १९७१ मध्ये औरंगाबाद येथील देवगिरी महाविद्यालयात मराठीचे विभाग प्रमुख म्हणून नियुक्ती. १९९८ मध्ये पुन्हा शिवाजी महाविद्यालय, परभणी येथे प्राचार्य पदावर रुजू झाले.

जीवनातील अनुभव मांडताना कथा, कादंबरी, नाटक, वगनाट्य, एकांकिका, समीक्षा इ. वाङ्मयप्रकारात कसदार असे लेखन. म. गांधीच्या 'खेड्याकडे चला'ची हाक, १९४२ चा स्वातंत्र्यलढा, इ.बाबींचा परिणाम त्यांच्या कथालेखनावर झाला. व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, द.मा. मिरासदार, पु.भा.भावे यांची प्रेरणा मिळाली. त्यांनी इतर साहित्याच्या तुलनेत कथा वाङ्मय प्रकार अधिक प्रमाणात हाताळलेला आहे. एकूण पंधरा कथासंग्रह मराठी वाङ्मयसृष्टीला बहाल केले. त्यांच्या कथेवर व्यंकटेश माडगूळकरांच्या 'गावाकडच्या गोष्टी' या कथासंग्रहातील कथांचा प्रभाव पडला. यातून त्यांची 'वसुली' (१९५७) ही पहिली कथा, पेरणी कथासंग्रह (१९६२) साली प्रकाशित झाला. त्यांचे ताळमेळ (१९६६), मळणी (१९६७), वरात (१९७३), नातीगोती (१९७५),बोळवण (१९७६), वाळवण (१९७६), फजितगाडा (१९७६), माळरान (१९७६), राखण (१९७८), गोंधळ (१९७८), बुरूज (१९७८), वानवळा (१९७९), खोळंबा (१९८३), हेलकावे (१९९०), कणसं आणि कडबा (१९९४) इ. कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. यातून ग्रामीण वास्तव मांडणे हा त्यांचा ध्यास होता.

हाडाच्या शिक्षकांचा जिव्हाळा, वास्तववादी ध्येयनिष्ठेचा विवेक, शिक्षक, प्राचार्य, साहित्यिक या जबाबदारीतील तत्त्वापेक्षा ते आपल्या आत असणाऱ्या सुप्त शक्तीला व माणुसकीला विशेष महत्त्वाचे मानतात. लोकसेवा, समाजकार्यात नेहमी सहभाग राहिला आहे.

## रा.रं. बोराडे यांच्या कथेतून बदलत जाणारे स्त्रीजीवन

रा.रं. बोराडे यांनी ग्रामीण कथांच्या माध्यमातून जिवंत स्त्रीचित्रण रेखाटलेले आहे. आपल्या परिसरातील, सभोवतालचे जीवन रेखाटताना त्यांनी स्त्री व्यक्तिरेखा ह्या ग्रामीण जीवनाचे स्त्रीचित्रण हुबेहूब साकारताना वेगवेगळ्या अंगानी आलेले आहे. तिची रूपेही बदललेली आहेत.

'चुंबळ' या कथेतील 'पुतळा' हे स्त्री पात्र त्याचे जिवंत उदाहरण आहे. "तिला माहेरी जाण्यासाठी आपल्या सासऱ्याची वाट पाहावी लागते. शेवटी सुगीचे दिवस असल्यामुळे, कामधंद्यामुळे सासरा नकार देतो. त्यामुळे क्षणभर पुतळा अस्वस्थ होते व थोड्या वेळाने एका कापडाचे फडके घेऊन 'चुंबळ' करून टोपली उचलून शेताकडे जाते."[७] या कथेतून ग्रामीण भागातील स्त्री ही पुरुषी वर्चस्वाला बळी पडलेली दिसून येते. तिच्या वैयक्तिक मताला या ठिकाणी वाव नाही. कुटुंबप्रमुखांच्या आदेशावर ती आधारलेली दिसून येते. तिच्या मानसिकतेला वाव दिसून येत नाही. त्यामुळे पुरुष प्रधान संस्कृतीच्या वर्चस्वाखाली ती भरडलेली आहे.

"लग्न झाले. पण मान–पान आणि देण्याघेण्यावरून दोघांच्या घरच्या वडिलधाऱ्यांमध्ये झालेल्या भांडणावरून नांदावयास आलेली चंद्रभागा ही माहेरी परतलेली असते. त्यामुळे विश्वनाथला स्वत:च्याच बायकोला – चंद्रभागाला चोरून भेटावे, बोलावे लागते."[८] 'बांध' या कथेत बोराडेंनी स्त्रीच्या जीवनातील ताणतणाव दाखविलेला आहे. मन मारून एकमेकांना जपणारी माणसे आहेत. या कथेतून ग्रामीण जीवनातील ताणतणाव व दोन मनाची ओढाताण दिसून येते.

'पाझर' या कथेतील 'यशोदा', "पतीचे अकाली निधन, वाट्याने दिलेली जमीन, लहान मुले, अशातच दुष्काळाने तिच्यावर घातलेली झडप, ही तिची दर्शनीय स्थिती आहे."[९] या कथेतून बोराडे यांनी दुष्काळाच्या छायेखाली जीवन जगणरी विधवा स्त्री उभी केलेली आहे. माहेराहून ज्वारी आणण्यास इच्छा होत नाही. आलेल्या संकटांना सामोरे जाते माहेरच्या अल्पशा मदतीमुळे असलेला राग मनात गिळणारी व एक सहनशील व्यक्तिमत्वाची स्त्री साकारले.

"खुरपणी आटोपून संध्याकाळच्या वेळेला सावित्री घरी परतत असते. तर जाधवाचा तिच्यावर एकदम घाला पडतो. तोंड आवळून पिकात अब्रू लुटली जाते. ज्याने अब्रू लुटली तो पकडला गेला तरी उपयोग नाही. कारण शरीर तर विटाळलं गेलच आहे. पण या गोष्टीची वाच्यता झाली तर आपल्या सासऱ्याची व नवऱ्याची अब्रू जाईल."[१०] 'झडप' या कथेत 'सावित्री' या कथेतील स्त्री ही शोषित आहे. कुटुंबातील व्यक्तिमत्त्वाचा विचार करणारी आहे. सासरा आणि नवऱ्याच्या नजरेतून कायमचे उतरून जाईल ह्या भीतीपोटी बलात्काराचे दु:ख भोगणारी स्त्री दिसून येते.

''मुलाने – तुकाने शिकावे म्हणून जीवाचा आटापिटा करणारी विधवा भागा 'आटापिटा' या कथेत भेटते''[११] आपल्या मुलाचे भविष्य हे आनंदात जावे, त्याचे उज्ज्वल भवितव्य घडावे त्यासाठी शिक्षणाचा अट्टाहास करणारी 'भागा' या स्त्री रूपात बोराडेंनी चित्रित केली आहे. शिक्षणाची गोडी असणारी, शिक्षणाची जाणीव असणारी, स्त्री दिसून येते.

'उंबरठा' या कथेतील 'कृष्णाबाई' घरंदाज आहे. ती एका खानदानी श्रीमंत शेतकऱ्याची पत्नी आहे, पण तिच्या मनात अपत्यहीनतेचे मोठे दु:ख आहे.''[१२] या कथेतील स्त्री कृष्णाबाई हिला अपत्याची ओढ तिच्या मनामध्ये निर्माण होते आणि आपल्या पतीकडून अपत्यप्राप्ती होत नाही तेव्हा 'दौला' या घरगड्यावर अधिक प्रेम करणारी आहे. हे प्रेम करताना चोरून त्याला जीव लावीत असे. घरातल्या मंडळींसमोर, वतनदाराप्रमाणे हुकूमतची भूमिका साकारते. दौलाला देखील कृष्णाबाईच्या प्रेमाची चाहूल कळते. तिच्यासाठी रेशीम खण आणतो. जरी दौलाकडून खणाने ओटी भरण्याची अपेक्षा केली तरी पण मनाला लाजवेल असे कोणतेही कृत्य करीत नाही. वासनेचा आगडोंब कितीही उसळला तरी तो दरवाज्याच्या उंबरठ्यावरच अडखळताना दिसून येतो. मनाने जरी विचलित किंवा दूषित वर्तन घडले असले तरी शरीराने मात्र पवित्रच आहेत. यातून स्त्री ही मनाला काळीमा फासणारी नाही. संयमी स्वरूपाची आहे.

''दादा, ह्यांना सांगा, तुमच्यासंग लगीन करायचं न्हाई म्हणावं. मला आल्या वाटन वापस जा म्हणाव त्यातला अशी उद्विगता व्यक्त करत कमा तेथून रडत निघून जाते.''[१३] 'खानदान' या कथेतून पुरुषी वर्चस्वाला बळी पडलेली स्त्री व्यक्तिरेखा आहे. 'कमा'च्या लग्नात जयसिंग याला मुलगी पायात अधू आहे, तिच्या मांडीवर डाग आहे असा संशय जेव्हा येतो तेव्हा ती ज्या सुरुवातीस वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवून ती चालून दाखविते; परंतु एवढ्यावरही जयसिंग हा समाधानी नसतो. त्याला मांडीवरचा डाग बघण्याची इच्छा होते तेव्हा 'कमा' ही आक्रमक पवित्रा साकारताना दिसते. भविष्यातील उद्भवणाऱ्या समस्येला सामोरे जाण्याची प्रखर ताकद

निर्माण करते. तिचा हा आक्रमकपणा ग्रामीण संकेताचा, नीतीअनीतीच्या, मर्यादेच्या आत जखडलेल्या दिसून येतात.

## सारांश

ग्रामीण कथावाङ्मयात व्यक्तिरेखा हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. लेखकाला कथेत जिवंत व्यक्तिचित्रण करता येते. तोच लेखक यशस्वी होत असतो. या बाबतीत बोराडेंची कथा पूर्ण सक्षम आहे यात शंकाच नाही. ग्रामीण कथेच्या माध्यमातून स्त्री चित्रण करताना सामान्य माणसांच्या जीवनातील अनेक समस्या त्यांनी उभ्या केल्या आहेत. ग्रामीण स्त्रीजीवन हुबेहूब साकारण्यात बोराडे यशस्वी ठरले आहेत. म्हणूनच त्यांच्या ग्रामीण कथा अक्षरवाङ्मय निर्मितीस साह्य ठरल्या आहेत.

ग्रामीण स्त्री चित्रण करताना पुरुषी वर्चस्वाला बळी पडलेली स्त्री दिसून येते. तिच्या वैयक्तिक मताला वाव दिसून येत नाही. कुटुंबात पुरुषप्रधान संस्कृतीच्या वर्चस्वाला दडपलेली आहे. कधी कधी मानवी मनाच्या भावभावनेचा विचार करणारी आहे. प्रेमळ अंतःकरण, तर कधी ताणतणावामध्ये जगणारी आहे, सहनशील व्यक्तिमत्त्व साकारणारी आहे, संयमी, शिक्षणाची आवड निर्माण झालेली, शिक्षणाची जाणीव निर्माण करणारी आहे. नात्यागोत्यात अडकलेली आहे. तर कधी लैंगिक शोषणाला व पुरुषी वर्चस्वाला बळी पडलेल्या आहेत. दुःख भोगणारी, सोशीक, कष्टमयी, संयमी, हालअपेष्टा सहन करणारी, सहनशीलता, जपणारी आहे. प्रसंगी कुटुंबाचा व वडील मंडळीच्या मान मर्यादा ठेवून बंडखोरीची वृत्ती धारण करणारी आहे.

## निष्कर्ष

१. १९६० नंतर ग्रामीण साहित्याच्या क्षेत्रात रा.रं. बोराडे यांनी मराठवाड्याच्या बोलीतून कथेच्या माध्यमातून ग्रामीण साहित्य समृद्ध केले आहे. ग्रामीण कथेला सखोलता प्राप्त केली.

२. बोराडेंची कथा अस्सल व वास्तव चित्रणामुळे वाचकवर्गावर आजही तितकाच प्रभाव कायम ठेवून आहेत.

३. मध्यमवर्गीय शेतकरी कुटुंबातील स्त्रियांचे चित्रण त्यांचे दुःख, समस्या, जीवन, संघर्ष, वाताहत हालअपेष्टा, चित्रण दिसून येते.

४. त्यांच्या कथेतून मराठवाड्यातील दुष्काळी भागाची जाणीव वाचकवर्गाला आकर्षित करते.

५. स्त्रिया ह्या भोळ्या, अंधश्रद्धाळू, निरक्षर, दैववादी वृत्तीच्या असल्या तरी वास्तवाचे भान ठेवून जगणाऱ्या आहेत.

६. बोराडे यांच्या कथेतून स्त्रीच्या मनातील भावनेचा उद्रेकांना कृतीतून साकारताना दिसत नाही.

७. शिक्षणाची जाणीव, शिक्षणाचे महत्त्व, शिक्षणाची कास धरणाऱ्या स्त्रिया आहेत.

## संदर्भ

१. आनंद यादव, 'ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. प्र.आ. एप्रिल १९७९ पृ. १०

२. चंद्रकुमार नलगे, 'ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास,' रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर. आवृत्ती २९ ऑगस्ट २०१३ पृ. १०९

३. नागनाथ कोत्तापल्ले, 'साहित्याचा आवकाश', प्रतिमा प्रकाशन, पुणे. प्र.आ.२००३ पृ. १२९

४. चंद्रकुमार नलगे, 'ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास,' रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर. आवृत्ती २९ ऑगस्ट २०१३ पृ. १११

५. चंद्रकुमार नलगे, 'ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास,' रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर. आवृत्ती २९ ऑगस्ट २०१३ पृ. ११२

६. चंद्रकुमार नलगे, 'ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास,' रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर. आवृत्ती २९ ऑगस्ट २०१३ पृ. १२१

७. प्रा.व्यंकटी पावडे, 'रा.रं.बोराडे यांची कथा—शोध आणि समीक्षा', इसाप प्रकाशन, नांदेड प्र.आ. १५ ऑगस्ट २०१३ पृ. १४७

८. डॉ. वासुदेव मुलाटे, 'ग्रामीण साहित्यः स्वरूप व दिशा', कैलाश पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद, प्र.आ. जून १९९४ पृ. ९२
९. प्रा. व्यंकटी पावडे, 'रा.रं. बोराडे यांची कथा–शोध आणि समीक्षा', इसाप प्रकाशन, नांदेड प्र.आ. १५ ऑगस्ट २०१३ पृ. १४८
१०. डॉ. वासुदेव मुलाटे, 'ग्रामीण साहित्यः स्वरूप व दिशा', कैलाश पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद, प्र.आ. जून १९९४ पृ.९३
११. डॉ. वासुदेव मुलाटे, 'ग्रामीण साहित्यः स्वरूप व दिशा', कैलाश पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद, प्र.आ. जून १९९४ पृ.९४
१२. प्रा. व्यंकटी पावडे, 'रा.रं. बोराडे यांची कथा–शोध आणि समीक्षा', इसाप प्रकाशन, नांदेड प्र.आ. १५ ऑगस्ट २०१३ पृ. १५९
१३. प्रा. व्यंकटी पावडे, 'रा.रं.बोराडे यांची कथा–शोध आणि समीक्षा', इसाप प्रकाशन, नांदेड प्र.आ. १५ ऑगस्ट २०१३ पृ. १६१

❖❖❖

# मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका
## डॉ. भाऊ मांडवकर रिसर्च सेंटर

इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ 445401 (महा. स्थापना १९८३, नॅक ब श्रेणी प्राप्त)
कार्यालय (07201) 226147, 226129, 226170, निवास (07232) 252975, 9422867658
E mail : marathipradhyapak@gmail.com


डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्रातर्फे व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषदेच्या संपादनाखाली **मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका** या राष्ट्रीय पातळीवरील ISSN जर्नलकरिता मराठी विषयाच्या प्राचार्य, प्राध्यापक, संशोधक छात्र व अभ्यासकांकडून शोधनिबंध मागविले जातात. API मध्ये या नियतकालिकात प्रकाशित शोधनिबंधाचे कॅटेगरी ३ ए (नॉन रेफर्ड जर्नल्स बट हॅविंग आयएसएसएन नंबर) मध्ये १० गुण मिळतात. मराठी साहित्य, संशोधन, संस्कृती, कला तसेच मराठी अध्ययन–अध्यापनाशी संबंधित कोणत्याही विषयावर शोधनिबंध स्वीकारले जातात. हे जर्नल जानेवारी महिन्यात प्रकाशित होते.

१. शोधनिबंध मायक्रोसॉफ्ट वर्डमध्ये ए ४ आकारात चारही बाजूंनी सव्वा इंच मार्जीन सोडून सिंगल स्पेसिंगसह कृतीदेव ५० फॉन्टमध्ये संपूर्ण बोल्ड करून वरील आयडीवर ई–मेलने पाठवावा. पीडीएफ चालणार नाही.

२. अक्षरांचा आकार १४, निबंध शीर्षकाचा आकार २८, शीर्षकाखाली मध्यभागीच लेखकाच्या नावाचा आकार १६, त्याखाली लेखकाचे पद, महाविद्यालयाचे नाव, पत्ता, स्वत:चा मेल आयडी व भ्रमणध्वनी १४ आकारात असावे. अंतर्गत उपशीर्षकांचा आकार १८ असावा व ती डावीकडे असावीत. त्यापुढे कुठलेही चिन्ह नसावे.
नाव व पत्त्याखाली लेखकाचा साहित्य, संशोधन इ. संदर्भात जास्तीत जास्त चार ओळीत परिचय पाठवावा.

३. शब्दमर्यादा २५०० किंवा अधिकतम ५ पेजेस. निबंध प्रकाशित करण्यासंदर्भात निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

४. शोधनिबंध लेखनाच्या आंतरराष्ट्रीय पद्धती पाळून त्याचा मूल्यात्मक व वाङ्मयीन दर्जा सांभाळला जावा. त्यात सारांश, बीजशब्द, प्रस्तावना, निष्कर्ष, संदर्भ यांचा समावेश करण्याचा प्रयत्न करावा. शुद्धलेखनाच्या चुका नसाव्यात.

५. शोधनिबंध इ मेलने पाठविण्याची अंतिम तारीख १५ डिसेंबर २०१५. मेल व्यवस्थित मिळाल्याची व खात्यात शुल्क जमा झाल्याची फोनवर खात्री करावी.

६. शोधनिबंध लेखकांसाठी प्रकाशन व वितरण सहकार्य शुल्क रुपये सातशे (रु. ७००/–) असून ते Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre या नावे बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा आझाद मैदान रोड, यवतमाळ, खाते क्र. 60175373000 मध्ये जमा करावे. बँकेचा IFSC code - MAHB0000047 हा आहे. बँकेत रक्कम जमा केल्याच्या दिवशी भ्रमणध्वनीवर कळवावे किंवा जमा पावती स्कॅन करून मेल करावी किंवा मुख्य संपादकांच्या 9422867658 या भ्रमणध्वनीवर व्हॉट्सॲपने पाठवावी.

विनीत

| डॉ. पवन मांडवकर | प्रा. रा.तु. आदे | प्रा.डॉ.सौ. वीरा मांडवकर |
|---|---|---|
| मुख्य संपादक व प्राचार्य | सचिव | संचालक व प्रकाशक |
| अध्यक्ष, मराठी प्राध्यापक परिषद | मराठी प्राध्यापक परिषद | डॉ. भाऊ मांडवकर रिसर्च सेंटर |
| भ्रमणध्वनी ९४२२८६७६५८ | ९४२२६०८७९५ | ९४०३०१४८८५ |

❖❖❖

# Form IV

(See Rule 8)

**Statement about ownership and other particular about the Journal**

## मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका

| | | |
|---|---|---|
| 1. Place of Publication | - | **Dr. Bhau Mandavkar Research Centre**, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445401 |
| 2. Periodicity | - | **Annual** |
| 3. Printer's Name | - | **Seva Prakashan**, Vijay Colony, Amravati 444606 (M.S.) |
| 4. Publisher's Name | - | **Dr. Mrs. Veera Mandavkar** |
| Nationality | - | **Indian** |
| Address | - | Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445401 |
| 5. Editor's Name | - | **Dr. Pavan Mandavkar** |
| Nationality | - | **Indian** |
| Address | - | Principal, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal |

**I, Dr. Pavan Mandavkar hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.**


**Dr. Bhau Mandavkar Research Centre**

**INDIRA MAHAVIDYALAYA**

KALAMB, DIST. YAVATMAL, MAHARASHTRA 445401

☎ 07201-226170, 226147, 226129 (Fax) Web.: www.indiramahavidylaya.com

E mail id for Research centre : marathipradhyapak@gmail.com

Alternate E mail id : imvkalamb@yahoo.co.in, indiram414@sgbau.ac.in

Permanently Affiliated to SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY

RECOGNIZED BY UGC UNDER 2 F & 12 B

NAAC ACCREDITED WITH 'B' GRADE

Multi-Faculty College Estd. in 1983

## डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्राचे प्रकाशित ग्रंथ

श्री क्षेत्र चिंतामणी कळंब, संत ज्ञानेश्वर संत नामदेव दर्शन, दलित, ग्रामीण आणि प्रादेशिक साहित्य, मराठी प्राध्यापक सूची, शिक्षणातील भारतीय व पाश्चात्य विचारवंत, संशोधनपर, INDIAN & WESTERN THINKERS IN EDUCATION, ठळक शुद्धलेखन, संत साहित्य, शांता शेळके यांचे ललित साहित्य, वैदर्भीय अष्टविनायक, कथा पुंडलिकाची

## प्रकाशित होणारी वार्षिक ISSN नियतकालिके

(Peer Reviewed Annual National Research Journals with ISSN)

Research Journal of India (Multi-faculty, Publishng month: October)

**मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका** (मराठी विषयाच्या प्राध्यापक व अभ्यासकांसाठी, प्रकाशन महिना: जानेवारी)

(डॉ. भाऊ मांडवकरांनी १९५४ मध्ये सुरु केलेल्या अमरावतीच्या सेवा प्रकाशनाने आतापर्यंत १९० साहित्य व संशोधनात्मक पुस्तके प्रकाशित केली आहेत.)